



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

# भारतातील वन्यप्राणीजीवन

अनुक्रमणिका

# भारतातील वन्यप्राणीजीवन

**:मूळ लेखक:**
इ. पी. जी

**:अनुवादक:**
सौ. शैलजा ग्रब

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती :** जून, १९९०

**प्रकाशक :** सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
नवीन प्रशासन भवन,
मुंबई - ४०० ०३२.

© **प्रकाशकाधीन**

**किंमत :** ८० =००

**टाईपसेट व छपाई :** **मायक्रोग्राफ**
**१ – भगवान भवन,**
**दादी संतुक लेन,**
**जे. एस. एस. रोड, चिराबाजार,**
**मुंबई – ४०० ००२.**

## अनुक्रमणिका

अर्चिस

व

कुमुदन

ह्या माझ्या लाडक्या मुलांस

प्रेमपूर्वक अर्पण

## अनुक्रमणिका

# निवेदन

इंग्रजी राजवटीत नोकरीनिमित्त किंवा व्यापार उद्योगानिमित्त भारतात आलेल्या आणि अनेक वर्षे राहिलेल्या काही इंग्रज अधिकाऱ्यांनी भारताची संस्कृती, इतिहास, समाजव्यवस्था परंपरा यांचा अभ्यास करून विविध ग्रंथ प्रसिद्ध केले हे आपण सर्वजण जाणतो. भारताच्या या परदेशी मित्रांपैकी काहींनी येथील वन्य जमाती, पशुपक्षी, वृक्षवेली यांच्यासंबंधीही माहिती मिळवून तो सारा खजिना ग्रंथरूपाने भारतीयांप्रमाणेच जगातील देशोदेशीच्या लोकांना उपलब्ध करून दिला. अशा ग्रथकारांमध्ये 'भारतातील वन्यप्राणीजीवन' या पुस्तकाचे मूळ लेखक ई. पी. जी यांची गणना करावी लागेल. १९०४ साली जन्मलेले एडवर्ड प्रिचर्ड जी केंब्रिज विद्यापीठातील शिक्षण घेऊन आसाममध्ये चहाच्या मळ्यात व्यवस्थापक म्हणून काम करू लागले. १९५९ साली सेवानिवृत्त झाल्यावरही ते शिलाँग येथे रहात होते. २२ ऑक्टोबर, १९६८ रोजी त्यांचे निधन झाले. वन्यप्राण्यांचे जीवन हा त्यांच्या खास अभ्यासाचा विषय होता. भूतानमध्ये आढळणारा सोनेरी लंगूर त्यांनीच प्रथम शोधून काढला होता. वन्यप्राण्यांची छायाचित्रे काढण्याचा त्यांना छंद होता. 'द वाइल्ड लाईफ ऑफ इंडिया' या त्यांच्या गाजलेल्या पुस्तकाचे श्रीमती शैलजा ग्रब यांनी केलेले भाषांतर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने प्रकाशित होत आहे. ते वाचकांना आवडेल असे वाटते.

**य. दि. फडके**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई.

दि. ८ जानेवारी, १९९१.

अनुक्रमणिका

# मनोगत

हे पुस्तक वाचकांसमोर ठेवताना मला मनापासून आनंद होत आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने इ. पी. जी यांचे "वाईल्ड लाईफ ऑफ इंडिया" हे पुस्तक मराठीमध्ये भाषांतरीत करून मराठी वाचकांसमोर आपले वन्यजीवन उलगडून दाखविण्याचा जो निर्णय घेतला तो स्तुत्य म्हणावा लागेल. त्यानुसार मंडळाने भाषांतराचे काम माझ्यावर सुपुर्द केले आणि वाचकांसमोर आणले. त्याबद्दल धन्यवाद!

ह्या पुस्तकाचे भाषांतर मूळ पुस्तकावरून जसेच्या तसे केलेले आहे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने मला हे काम करण्यास परवानगी दिल्याबद्दल संस्थेचे आभार मानते. मुखपृष्ठावरील रंगीत छायाचित्र श्री अजय देसाई यांनी दिले. त्यांचेही आभार मानते.

हे पुस्तक लहानथोर सर्वांस आवडेल व त्यामुळे नवीन पिढीस आपल्या देशाच्या वन्यजीवनाची कल्पना येऊन त्याबद्दल आवड निर्माण होईल ही अपेक्षा आहे.

**सौ. शैलजा ग्रब**

अनुक्रमणिका

# निवेदन

वन्यजीवन? अशाच प्रकारे आपण आपल्या जंगलांतील भव्य पशूंचा आणि सुंदरश्या पक्ष्यांचा उल्लेख करतो. मला केंव्हा केंव्हा वाटते की ह्या प्राण्यांना व पक्ष्यांना बोलता आलं तर ते मनुष्यप्राण्याच वर्णन कस काय करतील अन् त्यांना मनुष्य प्राण्याबद्दल काय वाटत असेल? मला नाही वाटत की माणसाबद्दल त्यांच चांगल मत असेल. आपली संस्कृती अन् सुधारणा जमेस धरल्या तरीही मानव जंगलीच राहिला आहे; एवढेच काय पण तो तथाकथित जंगली पशूंपेक्षा जास्त धोकादायक आहे.

निसर्ग त्याच्या नखादातांमध्ये लालभडक आहे असे म्हटले जाते आणि जंगलातील आयुष्य मोठे दयनीय परिस्थितीत दिसून येते. जे बलवान आहेत ते कमजोरांवर उपजिवीका करतात; आणि जे कमजोर आहेत ते स्वतःचे रक्षण करण्याकरीता पर्यावरणाशी मिसळून जातात. परंतु हा जंगलाचा कायदा प्रामुख्याने भूक भागविण्याकरीता अमलात येतो. मनुष्य मनुष्याला खरोखरी खात नाही पण तो त्याला इतर करणांकरीता मारतोच. तो जरी खरोखरच देहाने त्याला ठार मारीत नसला तरी त्याच्या भावनांची कदर न करता ठार मारीतच असतो. मानव हा बऱ्या-वाईटांचे; सुधारणा तसेच जंगलीपणा; पवित्र तसेच अगदी हीन वृत्ती यांचे चमत्कारिक मिश्रण आहे. आपण एका भाषेत बोलतो अन् दुसरीच कृती करतो. आपण उदात्त कल्पना बाळगतो, अनेक घोषणा देतो आपल्या वागणुकीत मात्र आपण त्याप्रमाणे न करता त्यांना हाणून पाडतो. आपण शांती शांती असे तोंडाने घोकात असताना आपली कृती मात्र अग्रेसर युध्दासारखी असते. इतर देशांपेक्षा भारतातच अशा प्रकारे बोलण्यामध्ये व कृतीमध्ये जास्त तफावत दिसून येते. इतर कुठच्याही देशांपेक्षा जास्त भारतातच जुन्या ग्रंथांतून, पुस्तकांतून वन्यप्राण्यांच्या संरक्षणाबद्दल लिहीले गेले आहे. अगदी क्षुद्रातील क्षुद्र किंवा अगदी धोकेबाज अशा प्राण्यांचा देखील नाश करण्यास इथले लोक धजावत नाहीत परंतु आपण प्रत्यक्षात मात्र वन्यजीवनाकडे फारच दुर्लक्ष केलेले आहे. गाईच्या संरक्षणासाठी आपण हिरीरीने भाग घेतो. गाय तर भारत्याच्या संपत्तीचा एक मोठा वाटा आहे व तिला रक्षण दिलेच पाहिजे परंतु आपण समजतो की कायदे केले की आपले कर्तव्य संपले. ह्यामुळे तिचे रक्षण होते असे नव्हे तर आपल्याला तसेच गाईला देखील त्रास पोहाचतो. गाई मोकाट सोडल्यामुळे त्या कुठेही भटकतात. त्यामुळे पिकांना तसेच माणसांनाही त्यांचा उपद्रव होतो. त्याही खालावतात अन् ज्या उद्देशासाठी त्यांना किंमत आहे तो देखील साधला जात नाही.

इतर अनेक देशात लहान मुले देखील पशूपक्ष्यांमध्ये खूप रस घेतात. पशूपक्ष्यांवर कितीतरी पुस्तके उपलब्ध आहेत. कित्येक लोक दुर्मिळ पक्षी पहाण्यासाठी त्रासदायक प्रवास देखील करतात. पक्षी निरीक्षकांच्या संस्थाही स्थापन झालेल्या आहेत. त्यांना मारण्यासाठी नव्हे तर त्यांना न्याहाळण्यासाठी, त्यांचा अभ्यास करण्यासाठी. आपल्या इथे किती लोकांना साधारणतः दिसून येणाऱ्या पक्ष्यांची नांवे माहित आहेत? आपल्याकडे पशू पक्ष्यांवर किती कमी पुस्तके उपलब्ध आहेत.

वन्यजीवनाच्या संरक्षणाबद्दल अलिकडे निर्माण होत असलेल्या ह्या गोडीचे मी स्वागत करतो जे वन्य पशू आपल्याला धोकादायक आहेत किंवा आपल्या पिकांचा नाश करतात त्यांना मारू नका असे मी म्हणणार नाही; परंतु जर हे भव्य अन् सुंदरसे पशूपक्षी पहाण्यासाठी किंवा मनोरंजनासाठी इथे नसले तर आयुष्य किती निरस अन् बेरंगी होईल. तेंव्हा आता जे काही वन्यजीवन आपल्या येथेउरलेले आहे त्याचे तरी संरक्षण करण्यासाठी आपण जितकी अभयारण्ये निर्माण करता येतील ती केली पाहिजेत. आपली जंगले आपल्याला कितीतरी दृष्टींनी उपयुक्त आहेत. त्यांचे आपण संरक्षण करू या. तसे पाहिले तर आपण

अनुक्रमणिका

त्यांचा फारच नाश केलेला आहे. लोकसंख्या जसजशी वाढते तसतशी जास्त धान्य पिकविण्याची जरूर आहे हे खरे आहे परंतु हे आपण जंगलांचा नाश न करता अधिक धान्य पिकवून साधले पाहिजे; कारण आपल्या देशाची आर्थिक संपत्ती वाढविण्यात जंगलांचा मोठा वाटा आहे.

ह्या संदर्भात इ. पी. जीं च्या ह्या सुंदर पुस्तकाचे मी स्वागत करतो. ते स्वतः भारतातील वन्यजीवनाचे माहितगार आहेत. ते जरी ब्रिटनचे नागरिक असले तरी त्यांनी त्यांचे अर्धेअधिक आयुष्य इथल्या वन्यजीवनाचे निरीक्षण व छायाचित्रण करण्यात घालविले आहेत. ते १९५२ पासून स्थापन झालेल्या भारतातील 'वाईल्ड लाईफ मंडळाचे' सदस्य आहेत. १९५६ मध्ये जेंव्हा मी आसाम मधील काझीरंगा अभयारण्याला भेट दिली तेंव्हा मला त्यांना भेटता आले याचे मला फार समाधान वाटते.

मला आशा वाटते की हे पुस्तक आपल्या तरूण पिढीमध्ये ह्या सुरस विषयाबद्दल गोडी उत्पन्न करेल. वन्यजीवनाची शिकार बंदूकीने करण्यापेक्षा कॅमेऱ्याने साधणे हे जास्त कठीण आहे ह्या लेखकाच्या विचाराशी मी सहमत आहे. आणि मी असे धरून चालतो की जास्तीत जास्त धाडसी असे आपले तरूण बंदूक टाकून देऊन कॅमेरा हातात धरतील.

जी काही उरलेसुरलेली जंगले व वन्यजीवन सद्या इथे आहे त्या सर्वांचे रक्षण करण्याचे आपण प्रयत्न केले पाहिजेत.

नवी दिल्ली
२० फेब्रुवारी

**जवाहरलाल नेहरु**

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


निवेदन ........ ६
मनोगत ........ ७
निवेदन ........ ८
प्रस्तावना ........ ११
बंदिपूरमधील “बायसन” (गवा) ........ १५
पेरियारमधील हत्ती ........ ३१
आंध्रमधील पेलिकन ........ ४८
भरतपूरमधील पक्षी ........ ५५
कान्हाचा बाराशिंगा ........ ७०
वाघ ........ ८७
बिबळ्या वाघ ........ १०७
रेवामधील पांढरे वाघ ........ ११०
कच्छच्या रणांतील रानगाढवे ........ ११७
गीरच्या जंगलातील सिंह ........ १२३
कॉर्बेट नॅशनल पार्क ........ १३८
काश्मिरी सांबर ........ १४५
उत्तर पंजाब ते नेपाळ ........ १५१
प्राणी — कल्पनेतले आणि खरोखरचे ........ १५६
हाफलाँगमधील पक्ष्यांचे गूढ ........ १७२
मणीपूरचे नाचणारे हरीण ........ १८७
मानसमधील रानरेडे ........ १९१
सोनेरी वानरांचा शोध ........ २००
काझीरंगातील गेंडा ........ २०८
एक सुंदरसा सुर्योदय ........ २२७
भारतातील प्राणी—उद्याने ........ २४६
संदर्भग्रंथ ........ २४७

# प्रस्तावना

*१९३३ एप्रिलमधला तो रेल्वेचा प्रवास माझ्या नेहमीच स्मरणात राहील. हा प्रवास मीटर गेजच्या रूळांवरून धावणाऱ्या एका माल आणि प्रवासीवाहू गाडीतून मी करीत होतो. इंग्रज आमदानीतील भारताचाच एक प्रांत असलेल्या आसाममधील ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्याच्या काठाकाठाने जाणाऱ्या एकमेव लोहमार्गावरून ही गाडी जात होती.*

*चहाच्या मळ्यांत ५ वर्षे काम केल्यानंतर मी माझ्या इंग्लंडमधील घराकडे प्रथमच जाण्यासाठी निघालो होतो. जगातील घनदाट जंगलांपैकी एका अतिदाट जंगलांतून आगगाडी आता जात होती. तसे पाहता तो भाग सपाट आणि दलदलीचा होता. त्यावर कुठे कुठे ६ ते १० फूट उंचीच्या टेकड्या दिसत होत्या. त्या भूभागावर उष्ण कटिबंधात दिसून येणारी झाडे व त्यांना गुरफटलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या वेली दिसत होत्या. सर्वात वाईट गोष्ट म्हणजे ते वेताचे बन होते. हे वेत फार उंच वाढतात; अन् त्यांना बाकदार व अणकुचीदार असे मोठे मोठे काटे असतात. जंगली जनावरेदेखील अशा जंगलात आत शिरावयाला कचरतात.*

*माझ्या दोनच बाके असलेल्या डब्यात मी एकटाच होतो. तोडलेल्या अरण्याच्या चिंचोळ्या भागातून हलत-डुलत धक्के खात, आवाज करीत गाडी चालली होती. माझ्या गत अन् भावी जीवनावर विचार करायला मला भरपूर वेळ होता. दुपार टळून तिन्हीसांजा व्हावयाला आल्या होत्या. गाडीची सावली खिडक्यांच्या लांबलचक सावल्यांच्या ओळीने छेदून हलत होती. मी पलीकडे पसरलेल्या गर्द हिरव्या दाटीतून आळसावलेल्या नजरेने पाहात होतो.*

*सुरुवातीला हिवताप, हगवण, चिखल्या अशा उष्ण कटिबंधात दिसून येणाऱ्या रोगांशी सामना देत जरी माझ्या इथल्या आयुष्याची सुरुवात झाली असली तरी नंतरच्या काळांत माझी प्रकृती चांगली ठणठणीत अन् उत्साही राहिली होती. या वस्तुस्थितीच्या आठवणीने मला बरे वाटले.*

*भरपूर काम, खेळ भरपूर अन् सर्वच गोष्टी भरपूर कराव्या अशा ज्या अपेक्षा चहाच्या मळ्यांत काम करणाऱ्या तरुणांकडून केल्या जातात त्या सर्वच गोष्टी मी करीत होतो. त्या व्यतिरिक्त त्या काळी मद्यपानाची जरी फारच प्रथा होती तरी ते मी फारच कमी केले होते.*

*घोड्यांवरून रपेट करणे व पोलोचा खेळ ह्या दोन्ही गोष्टी मी भरपूर केल्या होत्या. मागच्याच महिन्यात मी मीझी दोन्ही घोडी विकून टाकून माझी उरलीसुरली थकबाकी भागविली होती. साधारणतः प्रथमच सुट्टीवर घरी जाणारे माझ्यासारखे चहाच्या मळ्यात काम करणारे तरुण बेफिकीर राहून असे करीत नव्हते. हा वेळपर्यंत मी टेनिस भरपूर खेळलो होतो आणि काही प्रमाणात छोट्या प्राण्यांच्या शिकारीदेखील केल्या होत्या. पण त्याही-पेक्षा जास्त रस मी गावांतून भटकण्यात, गावकऱ्यांना भेटण्यात, त्यांच्या सवयी, रीतीरिवाज पाहण्यात घेतला होता. तसेच सर्वत्र असलेल्या प्राण्यांच्या व वनस्पतींच्या अनेक जाती माहीत नसल्यामुळे मोठ्या विस्मयतेने त्या पाहण्यात बराच वेळ घालविला होता.*

*आता गाडी नांबारच्या ज्या राखीव जंगलातून हळूहळू जात होती त्या मोठ्या जंगलाच्या फक्त कडेकडेचाच भाग मी अजूनपर्यंत पाहिला होता. ह्या जंगलात गेलेली अनेक माणसे पुन्हा बाहेर येऊ न*

अनुक्रमणिका

*शकल्याच्या काही वाचलेल्या व काही ऐकीव गोष्टी मला आठवल्या. अशा ठिकाणी जर एखादा माणूस रस्ता चुकला तर त्याला बाहेर येणे क्वचितच शक्य होते. एखादा माणूस झऱ्याच्या दिशेने जाऊ शकेल. पण कुठच्या दिशेने? हे निश्चल पाणी कुठल्याच दिशेने वाहताना आढळत नाही. आणि काही झाले तरी अशा सपाट प्रदेशात हे असे उथळ जमिनीतले झरे कुठलीच दिशा दाखवू शकत नाहीत.*

*एका अनुभवी शिकाऱ्याने वयाच्या उत्तरार्धात स्वतःच्या प्रवासवर्णनाची अनेक पुस्तके लिहिली. तो एकदा ह्या जंगलांत एका मोठ्या रानरेड्याची नोंद मिळाली म्हणून त्याला मारण्याकरिता शिरला होता. त्याने तेथीलच रहिवासी असलेला एक अनुभवी शिकारी वाटाड्या म्हणून आपल्याबरोबर घेतला होता. तो खुणांसाठी झाडांच्या फांद्या विशिष्ट आकाराने तोडून आत शिरण्यासाठी वाटा तयार करीत असे. परतीच्या प्रवासात काही अंतर तोडून आल्यानंतर त्याला ह्या खुणा सापडेनात. त्यामुळे शिकारी घाबरून कावराबावरा झाला. रात्री जळवांपासून बचाव व्हावा म्हणून ते झाडावर चढले तरी त्यांना ओल, पायातील पेटके आणि डास यांच्या यातना सहन कराव्या लागल्या. दुसऱ्या दिवशीही तेथपर्यंत सूर्यप्रकाश पोहोचलाच नाही की ज्यायोगे त्यांना दिशेचे ज्ञान झाले असते. फक्त ढग, पाऊस आणि दाट जंगलच सर्वत्र पसरलेले होते. यातनांची दुसरी रात्रही तशीच गेली. तिसऱ्या दिवशी मोठ्या चिकाटीने पाण्याच्या छोट्या छोट्या झऱ्यांचा मागोवा घेत घेत ते बाहेर येऊ शकले.*

*तीस वर्षांपूर्वी इंग्रज सैनिकांची एक छोटी तुकडी ह्या जंगलांत हरणांचा ठाव घेण्यासाठी शिरली होती. ते कधीच परत आले नाहीत. त्यांचा काही पत्ता देखील लागला नाही. मनुष्य व इतर प्राणीमात्रांचे अवशेषही अशा जंगलांतील झाडांच्या दाट रांगांमध्ये सहज दडले जातात तर आता मी जो काहीसा आरामात प्रवास करीत होतो ते अशा प्रकारचे जंगल होते. त्यामुळे किंबहुना मला त्याबद्दल एक मैत्रीची जवळीक उत्पन्न झाली होती. धूसर सूर्यप्रकाशात मी धनेश पक्ष्याची एक जोडी झाडाच्या शेंड्यावर पंख फडफडवून झाडावरून घसरताना पाहिली. पुन्हा पुन्हा ते पंख फडफडवीत अन् घसरत होते. उडणाऱ्या कीटकांचा ठाव घेत सूर अन् कोलांट्या मारणारे भीमराज अन् लांब शेपटीचे कोतवाल मधूनच दृष्टीस पडत होते. गाडीचा आवाज नेहमीचाच ओळखीचा झाल्यामुळे त्या आवाजाची विशेषशी दखल न घेता जमिनीवरून एखादे भेकर सावधतेने झुडुपांमधून जाताना दिसत होते.*

*सावरीच्या झाडांवर रक्तासारखी लालभडक मोठीमोठी फुले आता बरीच शिळी झाली होती. अन् झाडाला नवीन पानांची पालवी फुटावयास लागली होती; परंतु पांगाऱ्याची झाडे मात्र रसरशीत लालभडक दिसत होती. अन् तामणीच्या झाडांनी रान नाजूक जांभळट-गुलाबी छटांनी रंगवायला सुरुवात केली होती. गिरीमालेला आलेल्या कळ्यांनी झळाळत्या सोनसळी रंगाचे वचन अगोदरच देऊन ठेवले होते. याशिवाय मला माहीत नसलेल्या दुसऱ्या कित्येक झाडांची अन् रानटी वनस्पतींची छोटी छोटी फुले तिथे मोठ्या संख्येने दिसत होती. दिवसाचा सूर्यप्रकाश मिळविण्यासाठी त्यांची जणू एकमेकांशी स्पर्धाच लागली होती.*

*आधीच हळूहळू चालत असलेल्या गाडीचा वेग अधूनमधून आणखीच मंदावू लागे; रुळाच्या दोन्ही बाजूंची मोकळी जागा आणखीन् रुंदावली जाई; चाके रुळावर घासली गेल्याचा मोठा आवाज होऊन गाडी छोट्याशा स्थानकात शिरत असल्याचा इशारा मिळत असे. तिथे मोठमोठे फलाट किंवा कचेऱ्या नव्हत्या; तर रेल्वेकर्मचाऱ्यांकरिता फक्त बांबूच्या कामट्यांनी उभारलेली छोटीशी आडोशाची जागा, तसल्याच*

अनुक्रमणिका

*कामट्यांची बनविलेली काही घरे अन् बाहेरगावी जाणाऱ्या चहाच्या मालाच्या पेट्या आणि जवळपासच्या भागाकरिता आलेला माल साठविण्याकरिता काही गुदामे होती.*

*काही मिनिटे थांबल्यानंतर गाडी हेलकावे खात पुन्हा गती घेई अन् पुन्हा जंगल दृष्टोत्पत्तीस येई. सूर्यास्त होत असल्यामुळे आता गाडीची सावली आणखीच लांब लांब पसरत होती; त्यामुळे जंगल जास्तच गडद अन् दाट भासत होते. निशाचर प्राणी त्यांचे खाद्य मिळविण्यासाठी बाहेर येण्याची वेळ झाली होती.*

*पूर्ण अधार पडण्यापूर्वी मी जंगलाकडे पुन्हा एकवार रेंगाळत्या नजरेने पाहिले अन् मला हे सर्व मागे सोडून जात असल्याबद्दल खेद झाला. जिज्ञासू मनोवृत्तीला आव्हान देणारी; निसर्गाचा आनंद लुटताना नवीन नवीन साहसे करण्याची एकमेव संधी, मागे सोडून जात असल्याच्या जाणिवेने, मी प्रथमच जरी माझ्या घरी मोठ्या उमेदीने अन् उत्साहाने परतत होतो तरी त्यावर जणू विरजण पडले होते.*

*एखादा तरुण मुलगा बराच काळ परदेशांत राहून पुन्हा आपल्या घरी प्रथमच परततो तेव्हा त्याची घरी जी बडदास्त राखली जाते अन् मजा असते ती मनमुराद अनुभवून अन् मनसोक्त आराम करून मी सहा महिन्यानंतर पुन्हा एकदा तोच रेल्वेप्रवास चहाच्या मळ्याकडे परतण्यासाठी केला.*

*जेव्हा मी त्या वेलींनी गुरफटलेल्या ओळखीच्या जंगलाकडे दृष्टी टाकली आणि त्या जंगलात आता भर उन्हाळ्याच्या रंगाचे आणि वसंत बहारात नुकत्याच फिकट हिरव्या रंगाची पाने फुटत असलेल्या त्या झाडांचे एक कुतूहलपूर्वक मिश्रण पाहिले तेव्हा मी येथे पुन्हा परतलो ही योग्यच गोष्ट केली असे मला मनोमन वाटले. जगाच्या ज्या भागात पूर्वी कोणी काही विशेषसे काम केले नव्हते अन् मला बरेचसे काही करता येण्यासारखे होते; अशा भागातच मला राहावयाचे होते, यात शंकाच नव्हती.*

*म्हणूनच मी माझे चहाच्या मळ्यातील जीवन पुन्हा सुरू केले. माझ्या मनाने निश्चय केला की, उत्तर इंग्लंडमधील एका गावात जन्मलेल्या, अन् तेथेच वाढलेल्या माझ्यासारख्या तरुणाला ह्याच प्रकारचे बाहेरील जीवन योग्य आहे. दुसऱ्या महायुद्धामध्ये भारतीय सैन्यात चार वर्षे काम केल्यानंतर मी आसाममधील दुसऱ्या एका चहाच्या मळ्यात मॅनेजर म्हणून काम करावयास परतलो.*

*स्वतः जंगलात जाऊन हवे असलेले काम करावयास मला फारच थोडा फावला वेळ मिळत असे. परंतु मोठ्या जंगलाच्या अन् गवताळ जंगलाच्या कडेकडेलाच मी राहात असल्यामुळे अन् माझे कामही तेथेच असल्यामुळे मला भारताच्या वन्यप्राणी जीवनाची तसेच गावांबद्दलची माहिती मिळविण्यास खूपच संधी मिळाली. कित्येक वेळा मी वाघ, बिबळे, अस्वल, निरनिराळ्या प्रकारची मांजरे, खवले मांजर (मुंग्याखाऊ) तसेच इतर प्राण्यांची व काही पक्ष्यांची देखील पिल्ले घरी आणून वाढविली व नंतर ती मोठी होऊन त्यांचे खाद्य शोधावयास समर्थ झाल्यावर सोडून दिली.*

*जेव्हा घोड्याची जागा मोटारीसारख्या वाहनांनी घेतली आणि भारतात घरी जाण्यासाठी मिळणाऱ्या सुट्टीशिवाय वार्षिक रजा देखील मिळू लागली तेव्हा माझ्या चहाच्या मळ्यातील जीवनात मला भारताच्या दूरच्या भागांतील जंगलात देखील जाऊन तेथील पाहणी करावयास वेळ मिळू लागला. जगातील अति पावसाळी अशा भारताच्या ईशान्येकडील भागापासून ते वायव्येकडील अगदी रखरखीत प्रदेशांतील, तसेच हिमालयातील अत्युच्च शिखरांपासून ते खाली अगदी समुद्रसपाटीपर्यंत, ह्या देशातील*

अनुक्रमणिका

*वेगवेगळी अनेक प्रकारची वन्यप्राण्यांची वसतिस्थाने अन् त्यांच्या विविध आणि विपुल जाती मी आता स्वतः पाहू शकत होतो.*

*प्रस्तुतचे हे पुस्तक म्हणजे भारतातील उरलेले वन्यप्राणी व पक्षीजीवन नाहीसे होऊ नये व ते जतन करण्याकरिता सर्व भारतीयांमध्ये आवड निर्माण व्हावी या दिशेने केलेला एक प्रयत्न आहे. जरी यामध्ये संपूर्ण भारतीय उपखंडाचा समावेश केलेला आहे तरी त्यात फारसे खोलवर विवेचन केलेले नाही; परंतु मनोरंजक, गमतीदार अशा प्राण्यांच्या जातींचा समावेश यात आहे.*

*भारताची कधीही भरून न येण्यासारखी विनाश झालेली अतिविशाल अशी वन्यप्राणीसंपत्ती टिकविण्याचे जोरदार व महान् परंतु पुष्कळदा निष्फळ असे प्रयत्न ज्यांनी ज्यांनी केले आहेत त्या व्यक्तींचा देखील यात समावेश करण्याचा प्रयत्न केला आहे.*

**– इ. पी. जी.**

अनुक्रमणिका

**प्रकरण १ ले**

# बंदिपूरमधील “बायसन” (गवा)

१९५० च्या वसंतऋतूत मी दक्षिण भारताच्या प्रवासास प्रथमच जात होतो. माझ्या जाण्याचा उद्देश शिकारीची तसेच वन्यप्राण्यांचे संरक्षण करण्याची आवड असलेल्या अनेक नामवंत व्यक्तींना भेटणे, तसेच दक्षिणेत असलेल्या अभयारण्यांतील काही वन्यप्राणी पाहणे आणि तद्नंतर इंग्लंडला आपल्या घरी परतण्यासाठी कोलंबोहून बोट पकडणे असा होता.

कर्नल आर. डब्ल्यू. बर्टन यांना भेटण्यासाठी मी माझा प्रवास मध्येच खंडित केला. वन्यप्राण्यांचे जतन करण्यासंबंधाने त्यांच्याशी मी पूर्वी अनेक वेळा पत्रव्यवहार केला होता. ते मोठमोठ्या वन्यप्राण्यांची शिकार करणारे म्हणून नावाजलेले होते. त्यांचे वय तेव्हा ८० वर्षांच्या वर होते. छोटीशी, किडकिडीत परंतु ताठ अन् अधिकार गाजविणारी अशी त्यांची मूर्ती होती. त्यांनी व्यवसायपूर्तीनंतरचे बरेचसे आयुष्य भारतांतील नेहमीच समृद्ध असलेल्या वन्यप्राणीजीवनाचे जास्तीत जास्त जवळून निरीक्षण करण्यात घालविले होते.

त्यांच्या ह्या साहसपूर्ण आयुष्यात त्यांचा एक पाय थोटा झाला होता, अन् एका डोळ्याची खालची पापणी त्यावरील जखमेच्या खुणेसकट लोंबत होती. आम्ही बोलावयास सुरुवात केल्यानंतर मी त्यांना ज्यामुळे ही खूण राहिली होती त्या दुर्दैवी साहसाबद्दल विचारले.

ते उपहासाने हसून सांगू लागले, “मी एकदा गुडघ्यावर रांगत रांगत एका जखली अस्वलाचा त्याच्या गुहेमध्ये पाठलाग करीत होतो. त्यानं माझं डोकं त्याच्या जबड्यात पकडलं.

त्यानंतर ते काही काळ थबकले. जणू काही बऱ्याच काळापूर्वी ऐन तारुण्यात घडलेल्या गोष्टीवर ते झोत टाकीत होते.

“तेव्हा तुमची बंदूक तुमच्याकडे होती काय?” मी विचारले.

“होय, बंदुकीचे टोक तेव्हा अस्वलाच्या छाताडावर रोखलेले होते. परंतु मी जर चाप ओढला असता तर अस्वलाचा जबडा जोराने मिटला असता अन् त्यानं मला खतम् करून टाकलं असतं.” क्षणभर स्तब्धता पसरली.

“मग काय झालं?” मी विचारले.

“मी तरीही बंदूक झाडली नाही. मी मोठ्यानं किंचाळलो, आणि अस्वलाने मला जबड्यातून सोडले!” “मी ताबडतोब सुटकेकरिता धाव घेतली.” त्यांनी असा शेवट केला. नंतर आमचे संभाषण वन्यप्राण्यांच्या संरक्षणाकडे वळले.

श्री. बर्टन हे गेली अनेक वर्षे वन्यप्राण्यांचे जतन करण्यासंबंधाने शासनामध्ये जागृती व्हावी म्हणून अनेक पत्रे तसेच लेख लिहीत असत.

ह्याच विषयावर एक पुस्तिका लिहून ती अलीकडेच त्यांनी स्वखर्चाने प्रकाशित केली होती. पुस्तके, हस्तलिखिते आणि कागदांनी भरलेली त्यांची खोली त्यांच्या मेहनतीची; तसेच मोबदला मिळत नसतांना स्वतःवर ओढवून घेतलेल्या कामाची ग्वाही देत होती. त्यांच्या घराच्या भिंतीवर कुठेही मारलेल्या जनावरांची भरून ठेवलेली कातडी किंवा फोटोदेखील दिसत नव्हते.

कदाचित् त्यांचे आताचे वन्यप्राणी संरक्षणाचे कार्य काही प्रमाणांत त्यांनी तारुण्यात केलेल्या मोठमोठ्या प्राण्यांच्या शिकारींचा पश्चात्ताप किंवा खेद वाटत असल्याकारणाने केलेले असावे. काही असले तरी त्यांचा याबद्दलचा प्रामाणिकपणा, त्यांची मिशनऱ्याची श्रद्धा आणि त्यांचा वयाच्या उत्तरार्धातीलही थकावटीचा मागमूसही नसलेला उत्साह, या सर्वांमुळे त्यांना तेथील वन्यप्राणी टिकविण्यासाठी धडपडत असलेल्या अनेक माणसांकडून आदर अन् आपुलकी मिळालेली होती.

त्या भेटीत त्यांनी मला शेवटी एक गोष्ट सांगितली. ते म्हणाले, “मला वाटलं होतं त्याहूनही तुम्ही खूपच तरुण आहात. तुमच्यापुढे अजून कितीतरी वर्षं जायची आहेत. वन्यप्राणी संरक्षणाचे हे चांगले कार्य तुम्ही चालू ठेवा.”

म्हैसूर आणि मद्रासला दुभागणाऱ्या डोंगरावरील म्हैसूर राज्यातील कॉफीच्या मळ्याकडे जाण्यासाठी मी माझा प्रवास चालू केला. रेल्वेच्या शेवटच्या स्थानकावर माझ्यासाठी आलेली एक खासगी मोटार मला दिसली. या मोटारीतून मी जो प्रवास केला तो भारतात मी आतापर्यंत पाहिलेल्या प्रदेशांपैकी एक अतिशय सुंदर प्रदेशातील होता. इथे ५००० फुटांपेक्षाही अधिक उंचीवर गवताळ कुरणे होती. उत्तरेकडच्या उतारांवर आणि पर्वतांच्या घळ्यांमध्ये दाट सदाहरित जंगले होती. शिवाय आजूबाजूला दाट जंगल आणि मधल्या खोल भागात पाण्याचे झरे असलेली ‘शोला’ जातीची जंगलेही मला पाहावयाला मिळाली.

मी लवकरच द. भारतांतील एक प्रख्यात शिकारी आणि निसर्गप्रेमी गृहस्थ श्री. आर. सी. मॉरीस यांच्या घरी जाऊन पोहोचलो.

त्यांचे सुंदर घर व्यवस्थितपणे मढविलेल्या मोठ्या वन्यप्राण्याच्या डोक्यांनी आणि कातड्यांनी सुशोभित केलेले होते. परंतु ती शिरे जसे दर्शवीत होती तितके ते अमानुष शिकारी असतील असे मला वाटत नाही. ते एक खरेखुरे निसर्गप्रेमी आणि वन्यप्राण्यांच्या स्वभाव विशेषांचे निरीक्षण करणारे अभ्यासक होते. त्यांनी त्यांच्या वयाच्या उत्तरार्धांत काही नरभक्षक वाघ, मस्त झालेले हत्ती आणि काही वयस्क किंवा रोगग्रस्त गौर (गवे) अशासारखेच काही प्राणी मारले होते. वन्यप्राण्यांच्या समागमाच्या हंगामाबद्दल ते फारच दक्ष असत. इतर अनेक ठिकाणी चालत असलेल्या खेददायक, अमानुष आणि बेकायदेशीर कत्तलीबद्दल त्यांना खेद वाटत होता. त्यांनी कधीही नर किंवा मादी असे पूर्ण वाढ न झालेले (बच्चे) मारले नाहीत.

अनुक्रमणिका

पाहुणचार म्हणून त्यांनी मला विचारले, “तुम्हाला ‘बायसन’ पाहिजे कां?” “होय” मी म्हणालो; “परंतु शिकार करण्यासाठी नाही त्याचा केवळ फोटो काढण्यासाठी.” त्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला असे दिसले. त्यांच्याकडे कित्येक माणसे वाघ किंवा “बायसन” यांची शिकार करण्याच्या उद्देशाने आलेली होती.

दक्षिण भारतांतील शिकारीचे शौकिन ज्याला “बायसन” असे संबोधितात त्या “गौर” (गवा) या प्राण्याची छायाचित्रे घेण्यात आमचे नंतरचे चार दिवस गेले. (छायाचित्र क्र. १ ते ३)

दुर्बिणी, त्यांची आवरणे, साधा कॅमेरा, चलत्‌चित्र कॅमेरा, दूरवरची दृश्ये टिपण्याकरिता खास भिंगे, प्रकाश कमी जास्त करण्याची यंत्रे, बंदूक (-अर्थात ती केवळ नावापुरतीच) अशा सर्व साधनसामुग्रीने चोहोबाजूंनी हिंदकळत असलेले श्री. ‘मॉरीस’ हे नाताळच्या झाडासारखे कसे मजेशीर दिसत होते याची मला आठवण झाली. परंतु मी जेव्हा स्वतःचे प्रतिबिंब पाहिले तेव्हा मी देखील असाच सर्व साधनसामुग्रीने भरलेला होतो. फरक इतकाच की माझ्याकडे बंदुकीऐवजी कॅमेरा स्थिर ठेवण्यासाठी तिवई होती.

आम्ही त्या ४ दिवसांच्या काळात तेथे १०९ “गौर” (गवे) पाहिले. [आम्ही सांबरदेखील पाहिले – मोठे गडद रंगाचे भारतातील जंगलात दिसून येणारे असे हे हरीण आहे. तसेच दोन चौशिंगे (चार शिंग असलेला जगातील एकमेव असा हा प्राणी फक्त भारतातच आढळतो) आणि काही राखी जंगली कोंबड्या देखील पाहिल्या. काय सुंदर देश हा!] मी त्यातील १० जबरदस्त नर गवे सहज मारू शकलो असतो-परंतु मला त्यांचे एकही छायाचित्र घेण्यात यश आले नाही; यावरून सहज दिसते की कॅमेरा हे चालविण्यास बंदुकीहूनही कठीण शस्त्र आहे.

गौर पाहण्यास व त्यांची छायाचित्रे घेण्यास सर्व भारतात बहुधा अतिशय आरामदायक अन् सुखसोयींनी युक्त असे अभयारण्य बंदिपूर येथे आहे. जरी मला भारताच्या इतर भागांमधूनही गव्यांची कित्येक चांगली छायाचित्रे घेता आली असली तरी मी ह्या सुंदर अन् आनंददायी भागातून साधी तसेच चलत्‌चित्रपटाकरिता कितीतरी छायाचित्रे सहजतेने अन् यशस्वीरित्या घेतलेली आहेत.

बंदिपूरचे अभयारण्य म्हैसूरच्या पठारांवर ३३०० फूट उंचीवर असून ते तौलनिक दृष्ट्या सुके अन् खडकाळ आहे. जंगल विशेष दाट नसून विखुरलेले आहे अन् त्यात सुप्रसिध्द चंदनाच्या झाडांबरोबरच विशेष जोमाने न वाढलेली अशी सागाची झाडेही आहेत. ह्या वाढ खुंटलेल्या झाडांमुळे ही जागा छायाचित्रे घेण्याकरिता मात्र फारच सुंदर अन् रंगीबेरंगी झालेली आहे. भारतातील इतर अनेक अभयारण्यांप्रमाणेच ही जागा मूळची म्हैसूरच्या महाराजांच्या ताब्यातली होती. ह्या जागेत वन्यप्राण्यांच्या रक्षणा-संवर्धनासाठी त्यांनी स्वतःचे राखीव जंगल ठेवले होते. आता ही जागा म्हैसूर वनखात्याच्या अधिकारकक्षेत येत असून चांगलीच सुधारलेली आहे. तेथील २२ चौ. मैलांच्या एकंदर जागेत जवळजवळ ८० मैलांचा मोटारीने जाता येण्यासारखा रस्ता आहे. ह्या अभयारण्याचा विस्तार वाढविता येण्याची आशा आहे. सुदैवाने अभयारण्याच्या आसपास बरेचसे जंगल देखील आहे.

भारतातल्या जुन्या संस्थानिकाचे चित्र कल्पनेने कसे उभे करता येईल तसेच हे महाराज स्वतः होते. त्यांची श्रीमंती, वैभव, त्यांचा भव्य राजवाडा (इथे ठराविक प्रसंगी सोन्याची शामदाने असलेले साठसाठ हजार दिवे उजळले जात. ही केवळ कल्पना नव्हे तर पाहाणारानेच विश्वास ठेवावा अशी गोष्ट आहे.) शृंगारलेले हत्ती, सैन्याच्या तुकड्या, शिकारीला लागणारे हाके हे सर्व चित्रातल्या सारखेच होते. ते स्वतः एक अनुभवी शिकारी, वन्यप्राण्यांचे छायाचित्रकार तसेच निसर्गप्रेमी आहेत.

अनुक्रमणिका

ते अतिशय सुसंस्कृत, संगीतप्रेमी आणि विद्वान गृहस्थ तत्त्वज्ञ म्हणून विदेशातही मान्यता पावलेले आहेत. ह्या सर्व गुणांमुळे त्यांना भारतीय वन्यप्राणी मंडळाचे अध्यक्ष म्हणून भारत सरकारने नेमलेले होते.

त्यांचे वाचन इतके दांडगे होते की माझ्याबरोबर संभाषण करताना त्यांनी मी पूर्वी "बायसन" आणि इतर विषयांवर "दि फील्ड" मध्ये लिहिलेल्या ज्या लेखांबद्दल मी स्वतःदेखील विसरून गेलो होतो, त्यांचे उल्लेख केले. वरिष्ठ कचेरीतील कामाचा व्याप सांभाळून जेव्हा आम्हाला वेळ मिळत असे तेव्हा आम्ही वन्यप्राण्यांवर अनेकदा चर्चा करीत असू.

'गौर' हा शब्द 'सॉवर' (इंग्रजीमध्ये 'आंबट' ह्या अर्थी वापरण्यात येणारा शब्द) अशा प्रकारे उच्चारला पाहिजे "डोअर" ह्या शब्दाप्रमाणे उच्चारू नये असे माझे ठाम मत आहे.

मध्य किंवा दक्षिण भारतांतील लोक मात्र "गौर" ला "बायसन" म्हणूनच संबोधितात. अर्थात आपण त्याला काहीच करू शकत नाही; जसे सर्वसाधासण अमेरिकन "बायसन" ह्या प्राण्याला सरळ "रेडा" ('बफेलो') म्हणतात किंवा उ. अमेरिकन "वापीती" या प्राण्याला "एल्क" असे म्हणतात.

खरोखर पाहता "गौर" हा प्राणी "बायसन" ह्या प्राण्यापेक्षा वेगळाच आहे. तो रानबैल आहे. गाईच्या कुटुंबातील तो सर्वात मोठा प्राणी असून केव्हा केव्हा त्याची खांद्यापर्यंतची उंची ६ फूट ४ इंचापर्यंत भरते. तसेच त्याचे वजनही २००० पौंडापर्यंत भरू शकते. ती खरोखर रानबैलाची जात असून ह्या संदर्भात ती ब्रिटनच्या उद्यानातील "रानटी" बैलापेक्षा (चिलीघॅम वाईल्ड कॅटल) वेगळी आहे. हे बैल पूर्वीच्या पाळीव गुरांचे नंतरच्या काळात वन्य अवस्थेला पोचलेले वंशज असावेत असे मानले जाते. [मी भारतातील "रानटी गुरे" पाहिलेली आहेत. परंतु ही पाळलेली गुरे नंतर माणसांनी सोडून दिल्यामुळे रानात जाऊन "वळू" सारखी राहत असलेली आढळतात.]

गौर (गवे) दक्षिण भारतातील बहुतेक डोंगरा-जंगलांतून दिसून येतात; त्याप्रमाणे ते मध्य, उत्तर अन् पूर्व भारतातही आढळतात; परंतु वायव्येकडे मात्र दिसून येत नाहीत. अजूनही नेपाळमध्ये काही प्रमाणात ते आढळतात. ईशान्य भारतात त्यांना "मिथून" हे नाव आहे. ते ब्रम्हदेश आणि मलाया येथे देखील दिसून येतात. तेथे त्यांना "सेलडंग" असे म्हणतात. सिलोनमधून मात्र ते ३०० वर्षांपूर्वीच नाहीसे झाले आहेत असे नोंदीवरून आढळते.

उत्तर अमेरिका आणि युरोपमध्ये दिसून येणाऱ्या खऱ्या "बायसन" ह्या केसाळ आणि छोट्या शिंगाच्या प्राण्यापेक्षा गौर (गवा) हा प्राणी बराच मोठा आणि भव्य असतो. मग द. भारतातील शिकाऱ्यांनी याला "बायसन" असे म्हणायला का सुरुवात केली? त्याचे उत्तर कदाचित् खालील गोष्टीमध्ये मिळू शकेल.

इंग्रज लोक जेव्हा भारतात प्रथमच आले तेव्हा सुरुवातीला ते येथील मुळच्या रहिवाशी शिकाऱ्यांबरोबर शिकारीस जात. बऱ्याच अंतरावरून त्यांनी (गौर) गवा पाहिला.

विस्मयाने शिकाऱ्याने विचारले असेल, "तो कुठचा प्राणी आहे?" चुकीने कदाचित् तो रानरेडा आहे असे समजून इथल्या शिकाऱ्याने उत्तर दिले असावे "भैंसा".


अनुक्रमणिका

तो शिकारी "बायसन" म्हणालासे वाटून त्याने विचारले काय "बायसन"?

"हो" तो शिकारी मोठ्या नम्रतेने म्हणाला असावा. असे म्हणतात की त्या इंग्रज शिकाऱ्याने तो प्राणी मारला अन् आपल्या मित्राला तो प्राणी "बायसन" आहे असे वर्णन करून सांगितले. तेव्हा "गौर" ला "बायसन" हा शब्द जेव्हा वापरतात तेव्हा तो अवतरण चिन्हातच लिहिला पाहिजे.


बंदिपूरच्या खेडेगावातील लोकांना "कुरुबा" असे म्हणतात. हे 'कुरुबा' म्हणजे ह्या गावचे वैशिष्ट्य आहे. ते कुशल वाटाडे आहेत. ते पावलांच्या खुणांचा मागोवा काढीत नाहीत. त्याकरिता येथील जमीन फारच कठीण आहे. जंगलात काय चाललेय् हे बरोबर हुडकून काढण्याचे त्यांचे मार्ग अगदी जगावेगळे आहेत. कोळ्यांची हवेत विणलेली पातळशी जाळी जागच्या जागी आहेत किंवा नाहीशी झाली आहेत, खालील हिरवळीवरचे किंवा झुडुपांवरचे दंव, गवताच्या वाकलेल्या पाती, पशुपक्ष्यांचे दूरवरचे आवाज या सर्वांवरून त्यांना कुठची जनावरे कधी आणि कुठच्या दिशेने गेली आहेत ते बरोबर सांगता येते.


अनुक्रमणिका



१. भारतीय गवा (नर-पहाटेच्या वेळी)


अनुक्रमणिका






२अ. कळपप्रमुख नर-गवत खाता खाता माझ्या अगदी जवळ आला.
२ब. संपूर्ण कळप अचानक उठला आणि पलिकडच्या जंगलात पसार झाला.

अनुक्रमणिका







३अ. गवत खाता खाता कळपप्रमुखाने माझ्याकडे रोखून पाहिले. याच छायाचित्रावरून टपालतिकीट बनविले गेले.

३ब. हरीणांच्या जातीपैकी चितळांहून एखादीच क्वचित् अधिक सुंदर असेल.

अनुक्रमणिका






४अ. जंगलात मादी चितळ


४ब. पाण्यात भिजून निघाल्यामुळे ते काळ्याशार एबनीच्या लाकडातून कोरलेल्या भव्य मूर्तीसारखे दिसत होते.


अनुक्रमणिका



५. पेरीयारच्या संथ पाण्यात हत्तींच्या छोट्या कळपाचे प्रतीबिंब.


अनुक्रमणिका





६अ. तो रानटी सुळेवाला हत्ती एका बाजूला मान वळवून आमच्याकडे आला.
६ब. जंगलात मादी आपल्या पिलाला दूध पाजीत असताना.


अनुक्रमणिका






७अ. अगदी डावीकडचा हत्ती उजव्या चालीचा आहे तर अगदी उजवीकडील हत्ती डाव्या चालीचा आहे.
७ब. नैसर्गिकपणें मेलेल्या हत्तीच्या पाठीवर गिधाडे जमली आहेत.

अनुक्रमणिका





**८अ. पेरीयारच्या अभयारण्यात रानडुकरे.**
**८ब. दख्खनी माकड-आई आणि तिचे पिल्लू.**

भेट देणाऱ्या प्रवाशाला ते प्रथम त्याला काय पाहावयाचे आहे ते विचारून घेतात. अन् मग त्याप्रमाणे दाखविण्याची व्यवस्था करतात. मला 'गव्यांची, छायाचित्रे घ्यावयाची होती अन् त्यांनी मला लवकरच ३४ भव्य 'गव्यां'च्या कपाळाकडे नेले. मी त्या कळपाच्या आसपास जवळजवळ दोन तास होतो. मी हत्तीच्या पाठीवर गुपचूप बसल्यामुळे मला खालच्या झुडुपांत चरत चरत जात असलेले ते गवे चांगलेच

अनुक्रमणिका

पाहता आले. कळपाचा प्रमुख नर बैल चांगलाच जबरदस्त अन् भव्य व तकतकीत काळ्या रंगाचा होता. माद्यांमध्ये मिसळून तो चरत होता. त्यामानाने छोटे असलेले नर त्याचा मान राखून काही अंतर सोडूनच होते. माद्या त्यांच्या बछड्यांच्या संरक्षणासाठी अगदी सज्ज होत्या. गवत जरी फार उंच वाढलेले होते तरी मला त्यामानाने चांगली छायाचित्रे घेता आली.

वाहतुकीच्या रस्त्यापासून दूर जंगलांतून जाण्याची ज्यांची इच्छा असते त्यांच्याकरिता बैठक असलेले हत्ती मिळू शकतात. मी तिथे एकदा वनाधिकाऱ्याबरोबर हत्तीवरून जात होतो तेव्हा आम्ही एक मोठा सुळेवाला जंगली हत्ती पाहिला. एका बाजूला किंचित् डोके वळवून तो जंगली हत्ती आमच्या रोखाने आला. तशी ह्या जंगली हत्तींची एक लकबच असते. सरळ समोर पाहिल्यास त्यांना कपाळावरील उंचवट्यामुळे नीट दिसत नाही. (छायाचित्र- ६ अ)

त्या जंगली हत्तीने जर हल्ला चढविलाच तर जवळ असावी म्हणून त्या अनुभवी वनाधिकाऱ्याने बंदूक घाईघाईने भरून सज्ज ठेवली. परंतु आम्ही ज्याच्यावर बसलो होतो ती हत्तीण होती; त्यामुळे विशेषसा काही उपद्रव होणार नाही हे मी जाणून होतो. तरीदेखील जर त्या हत्तीने आणखी जवळ येण्याचा प्रयत्न केलाच तर हवेत एखादा बार काढल्यास तो जंगली हत्ती सहज घाबरून जाईल हे देखील मी पक्के जाणून होतो. त्यामुळे दुसऱ्या कशाचाही विचार न करता मी माझ्या कॅमेराने छायाचित्रे घेण्याच्या कामात व्यग्र होतो. त्याचे फळ म्हणजे त्या हत्तीचे एक तरी चांगले छायाचित्र माझ्या पदरात पडले.

ह्या जंगलाच्या जवळपास अनेक दख्खनी माकडे आहेत आणि म्हैसूर ते बंदिपूरच्या रस्त्यावर मी अनेकदा ती पाहिली आहेत (छायाचित्र ८) ह्या माकडांच्या राहणीचा, सामूहिक जीवनाचा अभ्यास करण्यासाठी एक पदवीधर अमेरिकन संशोधक सुमारे सात महिने त्यांच्या सहवासात राहिला होता त्याला मी मागील खेपेस भेटलो.

आपणही त्या माकडांच्यातीलच एक दिसावे आणि त्यांनी त्याला स्विकारावे या उद्देशाने त्याने देखील तोंडावर सर्व बाजूंनी कल्ले वाढविले होते व मधील केस मात्र काढून टाकले होते. त्या कळपांतील अगदी पिले सोडली तर बाकीच्या सर्व ५८ माकडांना त्याने नावे दिली होती.

ती माकडे घाबरू नयेत म्हणून शरणागती पत्करल्यासारखे हावभाव त्याने कसे केले, तसेच त्यांच्या कळपातील वयोमानाप्रमाणे वरचढ किंवा बलवान अशा माकडांचा क्रम देखील त्याने कसा माहीत करून घेतला हे त्याने मला सांगितले. एकदा कळपाच्या प्रमुखाचा एक सुळा तुटला असताना तो दुसऱ्यांना दिसू नये म्हणून बरेच दिवसपर्यंत त्याने असे तोंड बंद करून घेतले होते. परंतु शेवटी त्याचे गुपित फुटले आणि त्यानंतर दुसरी माकडे त्याच्यावर तुटून पडली आणि त्यांनी त्याला कसे अगदी कळपाच्या बऱ्याच शेवटच्या क्रमांकावर नेऊन टाकले हेही त्याने सर्व सांगितले.

बंदिपूरच्या माझ्या पहिल्या भेटीपूर्वी म्हैसूरच्या महाराजांनी आणि मुख्य वनाधिकाऱ्यांनी मला सांगितले होते की विश्रांतिगृहाजवळच मला सुमारे पाचएकशे तरी चितळे पाहावयास मिळतील. त्यांनी वारंवार केलेले हे विधान ऐकून मी त्यांच्याकडे थोड्या साशंकतेने पाहिले असेल.

अनुक्रमणिका

परंतु खरोखरच बंदिपूरला माझे आगमन झाले तेव्हा अगणित अशी चितळे जणू काही माझी वाट पाहात हमरस्त्यावर उभी होती. मी माझी गाडी चालू केल्यावर मला जाऊ देण्याकरिता ती मोठ्या डौलदारपणे रस्त्याच्या दोहो बाजूस पांगली.

ती हरणे आता कुठे आहेत? ह्या ठिकाणी त्यानंतर मी दिलेल्या भेटीत ती सुंदर हरणे कमी कमी होत गेलेली मला आढळली. म्हैसूरपासून उटकमंडला जाणारा हमरस्ता बंदिपूर आणि तामीळ नाडूत असलेल्या मुदुमलाई ह्या अभयारण्यामधून जातो. ह्या दोन्ही शहरांमधून रात्रीच्या वेळेस मोटारगाड्यांमधून बंदुकीच्या गोळ्या झाडल्याचे आवाज येतात अशा अफवा मी वारंवार ऐकून होतो. ह्या अफवा खऱ्या असतील काय?

म्हैसूरच्या बंदिपूर ह्या अभयारण्याला लागूनच तामीळ नाडूतील मुदुमलाई अभयारण्य आहे, त्यामुळे दोन्ही राज्यांना दुभागणारी मधली एक हद्द सोडली तर जंगलचा एक सलग असा पट्टा निर्माण झालेला आहे. मुदुमलाई कमी उंचीवर असून तिथे जास्त पाऊस पडतो त्यामुळे तेथे जास्त दाट जंगल आहे.

दोन राज्यांना दुभागणारी ही हद्द जंगली जनावरे जाणीत नाहीत; तर ती हंगामानुसार एका राज्यातून दुसऱ्या राज्यात, जेथे चरावयाला चारा आणि पाणी मुबलक असेल, तेथे जातात.

मुदुमलाईमधील माझ्या पहिल्या भेटीत मी एकही गवा पाहिला नाही. ते सर्व बंदिपूरला गेले आहेत असे मला सांगण्यात आले. परंतु मी जंगली हत्ती, चितळे, मलबारी खारी, वानरे, जंगली कुत्रे आणि इतर पशुपक्षी, एवढेच काय अगदी राखी जंगली कोंबड्यादेखील पाहिल्या.

माझ्या ह्या भेटीतच मी ते निर्दयी जंगली कुत्रे गवतावर चरणाऱ्या हरणावर कसा पाशवी हल्ला चढवितात ते पाहिले. त्यांच्या हल्ला करण्याच्या पद्धती अतिशय क्रूर असतात. मी त्यांच्यातील दोनतीन कुत्रे एका हरणाच्या मागे लागलेले पाहिले. पाठलाग करणारे कुत्रे जसे थकत जातात, तशी त्यांची जागा कळपातले दुसरे कुत्रे घेतात. त्यामुळे हरणाला किंवा इतर सावजाला त्यांच्या तावडीतून सुटण्याची मुळीच आशा राहात नाही.

ही भयानक श्वापदे एखाद्या बिबळ्याला देखील झाडावर चढून खाली खेचू शकतील; किंवा चित्त्याच्या भक्ष्यात त्याच्या बरोबरीने भागीदारी करू शकतील. अलीकडे हरणांची संख्या कमी झाल्यामुळे या कुत्र्यांच्या संख्येवरही नियंत्रण घालण्याची शिफारस केली जाते. तरीही हे जंगली कुत्रे निसर्गाच्या एकंदर चक्रामध्ये आपले स्वतःचे असे उपयुक्त काम करतातच. ते हरिणांना सतत एकीकडून दुसरीकडे पळवून लावीत असल्यामुळे एकाच ठिकाणची चांगली कुरणे फार चरल्यामुळे उजाड होत नाहीत. परंतु ह्याशिवाय काही विशेषसे चांगले ह्या प्राण्यांबद्दल म्हणता येणार नाही. ते लालसर रंगाचे असून त्यांचे शेपूट गडद रंगाचे असते. शेपटीचे टोक काळे असते. जरी ते गावठी कुत्र्यांचे जवळचे भाईबंद नसले तरी ते बरेचसे त्यांच्यासारखे दिसतात. ते केव्हाही माणसांवर हल्ला करीत नाहीत; तसेच पाळीव प्राण्यांच्याही वाटेस सहसा जात नाहीत. त्यांना माणसाळवून पाळता येत नाही.

अनुक्रमणिका

त्यानंतर मी मुदुमलाईला अनेक वेळा भेटी दिल्या. मी बहुतकरुन 'कारगुडी' म्हणजे "ढगाळ गाव" येथे असलेल्या विश्रामगृहात राहात असे. अलीकडे येथे सर्व सोयींनी उपलब्ध असे नवीन उपहारगृह किंवा प्रवाशांसाठी विश्रांतीगृह की कायसे आहे.

हत्तीच्या पाठीवर बसून जंगलात जेथे गवे पाहता येतील इतक्या आतपर्यंत जाता येते. अभयारण्य जरी वर्षभर उघडे असले तरी मार्च आणि एप्रिल हे महिने ह्याकरिता फारच उत्तम. मी फेब्रुवारी १९६१ मध्ये तेथे कित्येक गवे पाहिले. परंतु तेथे मोठ्या प्रमाणावर घाणेरीच्या काटेरी जाळ्या असल्यामुळे छायाचित्रे घेणे फारच कठीण होते. [येथील जास्त खडकाळ डोंगरावर दिसून येणाऱ्या एका महत्त्वाच्या आणि दुर्मिळ अशा रानबकऱ्याचा उल्लेख मी येथे केलाच पाहिजे. त्याला "निलगिरी थार" किंवा "आयबेक्स" (एडक्याच्या जातीचा प्राणी) असे म्हणतात. "निलगिरी गेम असोसिएशन"ने ह्या प्राण्याचे जतन करण्यासाठी मोठ्या हिरीरीने प्रयत्न केलेला आहे. ह्या मजेशीर प्राण्याला मात्र मी अजून तसे प्रत्यक्ष पाहिलेले नव्हते. ते आणखी दक्षिणेकडे म्हणजे केरळमधील पर्वत रांगांवर देखील दिसून येतात. ते नष्ट होऊ नये म्हणून त्यांच्याकरिता खास अभयारण्य निर्माण करून त्यांचे नीट जतन झाले पाहिजे.]

तामिळनाडू सोडण्यापूर्वी मला गिंडीच्या वनाचा उल्लेख करावासा वाटतो. तामिळनाडूच्या सरहद्दीवर राजभवनाजवळ (गव्हर्मेंट हाऊस) असलेला हा नैसर्गिक स्थितीतल्या विरळ जंगलाचा असा भाग आहे. तेथे काळवीट आणि चितळे बऱ्याच मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे ह्या राज्याला तो एक प्रकारे मोठा फायदाच आहे. महापालिकेच्या शहर नियोजन अधिकाऱ्यांच्या नजरेतून तो सुटावा अशीच माझी इच्छा आहे. वाढत्या शहराचे "फुफ्फुस" किंवा "हरित पट्टा" म्हणून तो भाग व तेथील वन्यप्राण्यांचे जतन मोठ्या काळजीपूर्वक झाले पाहिजे.

जेव्हा जेव्हा मी मुदुमलाईचे अभयारण्य व गिंडीच्या वनाचा विचार करतो तेव्हा तेव्हा मला भारतातील सध्याचे एक नामवंत निसर्गप्रेमी श्री. एम. कृष्णन् यांची आठवण येते. ते मध्यम वयाचे चपळ गृहस्थ असून वर्तमानपत्रे तसेच नियतकालिकांमधून निसर्गावर बरेच लिखाण करतात. ते उत्तम चित्रकार देखील आहेत. तसेच वन्य-प्राण्यांचे उत्तम छायाचित्रकार आहेत. गौर, सांबर, चितळ इ. प्राण्यांची त्यांची छायाचित्रे त्या त्या प्राण्यांच्या कातडीवरील बारकावे दाखवितात. तसेच जंगली हत्तीच्या कातडीवरील प्रत्येक सुरकुतीन् सुरकुती देखील दाखवितात. यावरून प्रत्येक केसन् केस छायाचित्रात टिपणे हे त्यांचे ध्येय असावेसे वाटते.

मी एकदा मद्रासमधील गिंडीच्या वनात त्यांना कॅमेरा वापरताना पाहिले होते. तो कॅमेरा म्हणजे एक मोठीच विलक्षण वस्तू होती. कॅमेऱ्याचा सांगाडा एका कंपनीचा, त्याला जोडलेली दूरदर्शक भिंगे दुसऱ्या प्रकारची आणि इतर भाग तसेच बारीक सारीक उपयुक्त उपकरणे ही सगळी वेगवेगळी असून ती त्यांनी स्वतःच एकमेकांवर एकत्र बसविलेली दिसत होती. मी अगदी शपथेवर सांगू शकत नाही की त्यांनी अक्षरशः बुटाच्या नाडीने ते सर्व एकत्र बांधलेले होते; परंतु मी एवढे मात्र नक्की सांगू शकतो की कुठून तरी विजेच्या तारेच्या रबरी आवरणाला शेवटी धातूचे थोडेसे आवरण असल्यासारखी नाडी डोकावीत होती.

मात्र त्यांची छायाचित्रे मोठी केली असताना देखील फारच छान दिसत. मला वाटते त्यांचे हे सर्व कार्य फक्त द. भारतापुरतेच मर्यादित होते. मात्र ते काहीसे एकाकी कार्यकर्ते होते. सभा, सल्लागार मंडळे यांची त्यांनी कधी फारशी दखल घेतली नाही. परंतु भारताच्या या भागातील वन्यजीवन आणि अभयारण्ये यांतील निसर्गप्रेमी म्हणून त्यांना तोड नाही.

## प्रकरण २ रे

# पेरियारमधील हत्ती

केरळ राज्यात आता जो पेरियार तलाव आहे. तो १० चौ. मैल असून समुद्रसपाटीपासून जवळजवळ ३००० फूट उंचीवर आहे. तो १९०० साली तामिळनाडूला कालव्याने पाणीपुरवठा करण्यासाठी तयार केला गेला. पाटबंधाऱ्याची सोय असलेल्या भागांकडे डोंगरावरील बोगद्यांमधून पाणी वाहते.

इथे समुद्रसपाटीपासून डोंगर सुमारे ६००० फुटांपर्यंत उंच आहेत. ते इंग्लंडमधील सरोवरांच्या प्रदेशाची छान आठवण करून देतात. त्यामुळे येथे त्यांनी खरोखर अद्‌भुत, शांत आणि कोणीही ढवळाढवळ न केलेले असे निसर्गाचे प्रेक्षणीय देखावे उपलब्ध करून दिलेले आहेत. याशिवाय तेथे वन्यप्राण्यांचे आकर्षण आहेच. तेथील रम्य खाडीमधून तुम्हाला मोटरबोटने आतील अगदी सुळक्यापर्यंत, तसेच बेटावर जेथे जंगली हत्ती, गवे, सांबर अगदी खात्रीने पाहावयास मिळतील व केव्हा क्वचित भेकर, रानडुक्कर आणि जंगली कुत्रेदेखील पाहता येतील अशा ठिकाणी देखील जाता येते. एक दोनदा तर ह्या सरोवरातून वाघ देखील दिसलेला आहे.

साधारणतः माझ्या बाबतीत नेहमी घडते तसेच झाले. १९५० मधील माझी ह्या ठिकाणाला दिलेली भेट जरी तितकीशी आरामदायक नव्हती तरी स्मरणीय झाली होती. मला आठवते की अर्ध्या रस्त्यात वाहनाची वाट पाहात राहिल्यामुळे मला पूर्ण एक दिवसाचा उशीर झाला होता. नंतर संध्याकाळी बऱ्याच उशिरा मला सरोवराजवळील वनखात्याच्या विश्रांतीगृहात सोडण्यात आले. मी तीन महिन्यापूर्वीच तेथे येण्याबद्दल कळविले होते तरीही ती जागा कोणी साफसूफदेखील केलेली नव्हती; तसेच तेथे कोणीही नव्हते. थोड्या वेळानंतर चौकीदार आला, परंतु त्याला मल्याळम् आणि तामीळ अशा दोन भाषाच बोलता येत होत्या. त्यामुळे मला काय पाहिजे हे त्याला कळविणे फारच जिकिरीचे झाले.

मला बटाटे, दूध, साखर, चहा इ. सारखी साधनसामुग्री पाहिजे हे कसेबसे कळविल्यानंतर मला अंडी पाहिजेत हे कळविणे मोठे कठीणच होते. शेवटी मी कोंबडी अंडी घालताना जसा आवाज काढते व हालचाल करते त्याची नक्कल करून दाखविल्यानंतर निदान त्याचा प्रतिसाद समाधानकारक मिळाला.

परंतु तेथील अत्यंत सुंदर असे नैसर्गिक देखावे, तसेच तेथील वन्यजीवन ह्या सर्वांमुळे तेथे जरी सुखसोयी नव्हत्या तरी त्याचे मला विशेष काही वाटले नाही.

आताच्या काळात प्रवाशांना काहीच त्रास नाही. माझ्या भेटीनंतर लवकरच येथील राज्य सरकारने सरोवराजवळच एक सुंदरसे हॉटेल बांधले आहे आणि आता वाहतुकीची साधने; तसेच खाण्यापिण्याची व्यवस्था, नोकरचाकर, मोटर लॉँच आणि इतर सुखसोयी यामुळे पेरियार भारतातील अगदी फारच सुधारलेले आणि अतिशय आकर्षक असे अभयारण्य झालेले आहे.

पेरियारबद्दल एकच अगदी न रुचणारी गोष्ट म्हणजे ही जागा अक्षरशः खडकाळ आहे. सरोवर जेव्हा निर्माण केले गेले तेव्हा पूर आल्यामुळे तेथील झाडे बाहेर काढली नाहीत. ही झाडे पाण्यामुळे आता इतकी कठीण झाली आहेत की ती खडकांसारखी भासतात; आणि आता ती बाहेर काढणे फारच खर्चिक

अनुक्रमणिका

बाब आहे. परंतु हे सर्व एखाद्याच्या सहज अंगवळणी पडू शकते शिवाय तेथील निसर्गशोभा त्यामुळे बिघडलेली नाही.

येथील जंगली हत्तींचा विचार करण्यापूर्वी डोंगराळ भागावर चरत असलेल्या किंवा कधी कधी खाली पाण्याच्या कडेला दिसून येणाऱ्या गव्यांबद्दल जास्त सांगता येईल.

पीरमेडू गेम असोसिएशनने (आताचे बरोबर नाव –पीरमेडू वन्यप्राणी संरक्षण सोसायटी) त्यांच्या वन्यजीवनाचे रक्षण करावयास ठेवलेला सेवानिवृत्त वनाधिकारी माझ्याबरोबर होता. त्याचे नाव श्री. ए. डब्ल्यू. वुड. हे वयस्क गृहस्थ आंग्ल–भारतीय असून त्यांना वन्यप्राणी जीवनाचा बराच अनुभव होता. तसेच त्यांना दांडगा उत्साहही होता. गव्यांचा एक कळप पाहिल्यानंतर आम्ही बोटीतून उतरून काहीशा दाट जंगलांतून आवाज न करीता पायीं चालत गेलो. गवे हे फारच दक्ष आणि सावध प्राणी असतात. कळपामधील प्रमुख नर (रक्षक) काही धोका आहे का, ते नेहमीच लक्षपूर्वक पाहात असतो.

त्यावेळेस माझ्या कॅमेऱ्याला दूरवरची दृश्ये टिपण्याचे खास भिंग नव्हते. म्हणजेच एखादे खरोखरचे चांगले छायाचित्र टिपावयाचे असल्यास मला अगदी जवळपर्यंत जाणे भाग होते. वारा गव्यांच्या उलट दिशेने असावयास हवा होता; तसेच मी त्यांच्या दृष्टिपथांत न येता काम करावयास हवे होते. तसेच काही संकट आलेच तर पळून जाण्याकरिता मी मनात वाट आखून ठेवावयास पाहिजे होती. याशिवाय चांगले छायाचित्र टिपण्याकरिता कॅमेरा व दृश्य यांमधील अंतर अशा कितीतरी गोष्टींचा विचार करावयाचा होता. कॅमेऱ्याचे बटन दाबल्यावर छायाचित्र टिपण्यास लागणारा वेळ, भिंगातून कमीजास्त प्रकाश फेकून दृश्य जास्तीत जास्त स्पष्ट दिसले पाहिजे; ह्या सर्व गोष्टींचे मला अवधान ठेवावयाचे होते.

श्री. वुड स्तब्ध राहिले आणि मी पुढे सरपटत गेलो. थोड्याच वेळात एक मोठा नर गवा माझ्या समोरच उभा ठाकला. तो एकसारखा सर्व दिशांनी पाहून घेई अन् नंतर डोके खाली घालून चरावयास लागे. जेव्हा तो डोके खाली घाली तेव्हा मी पुढे सरपटत असे व जेव्हा तो वर पाही तेव्हा मी जागच्या जागी थिजल्यासारखा राहात असे.

मी जवळ पोहोचल्यावर पाहिले, त्या नराच्या थोडे पलीकडेच एक सबंध कळप होता.

त्यांनी मला अजून पाहिले नव्हते; आणि मला त्यांच्या कुटुंबाच्या खासगी जीवनाचे चोरटे दर्शन घडले. तिथे एक मोठा काळाकुळकुळीत नर गवा होता. बहुधा तो कळपाचा प्रमुख असावा. दोन थोडे लहान अन् थोड्या फिकट रंगाचे नर एकमेकांशी दोस्ती ठेवून आपापली शक्ती आजमावताना दिसते होते. ज्येष्ठ–कनिष्ठ संबंध पुन्हा एकदा दृष्टीस पडला. दुसरा आणखी एक, एका मादीशी प्रणयचेष्टा करीत होता. बाकीच्या गडद तपकिरी रंगाच्या माद्या आणि मातकट रंगाचे बच्चे खाली जमिनीवर पहुडले होते.

रक्षक नर चरत चरत माझ्याजवळ आला (छायाचित्र क्र.२) तो माझ्या इतक्या जवळ आला की मला वाटले मी ह्याच क्षणी त्याचे छायाचित्र घेऊन माझ्या अस्तित्वाचीही त्याला जाणीव करून दिली पाहिजे.

त्याने माझ्या कॅमेऱ्याचा “क्लिक” असा आवाज ऐकला अन् तो माझ्यावर दृष्टी रोखीत गर्र्कन वळला. मी जिथल्या तिथेच गोठून राहिलो. नंतर त्याने सावधानतेचा इशारा देण्याकरिता मोठ्याने हंबरडा फोडला; आणि तो देखील कळपात सामील झाला. नंतर सर्व कळप उठला आणि घाईघाईने गवताळ कुरणाच्या पलीकडे असलेल्या जंगलात शिरला. परंतु शेवटी पुन्हा माझ्याकडे एकवार वळून पाहण्याचा मोठा दिलदारपणा मात्र त्यांनी दाखविला आणि मला आणखी एक छायाचित्र घेण्याची संधी मिळाली.

त्या पार्श्वभूमीवर त्यांच्या पाठीच्या मध्यभागावरचा कणा, गुडघ्यापर्यंतचे पांढरे, रेखीव पाय, नाकपुड्या आणि ओठाजवळील फिकट रंगाचा फुगवटा आणि वळलेली बाकदार शिंगे हे सर्व छानदारपणे दाखवीत ते एक मिनिटभर तेथे थांबले. थोड्या वेळाने नंतर जेव्हा ते सर्व जंगलामध्ये दिसेनासे झाले तेव्हा सोनेरी रंगाचे एक नुकतेच जन्मलेले वासरू त्याच्या पायांवर उभे राहिले आणि त्याच्या आईने दुःखावेगाने फोडलेल्या हंबरड्याला साद देत त्यांच्या दिशेने अडखळत गेले..सरोवरावर आम्ही आमची भटकंती चालूच ठेवली होती. साधारण तासाभराने तो सर्व कळप डोंगरमाथ्यावर हळूहळू चढत असलेला दृष्टीस पडला.

दुसऱ्या दिवशी आम्ही पुन्हा “एकांड्या” नर गव्याची छायाचित्रे घेण्याकरिता डोंगर उतरून परत चढलो. मी आणि श्री. वुड डोंगरावर चढल्यानंतर त्या अभयारण्याचा संपूर्ण देखावाच हळूहळू बदलला. अत्यंत रम्य आणि जराही न विस्कटलेल्या अशा डोंगर आणि दऱ्यांच्या घड्या आमच्यापुढे उलगडत गेल्या. अष्टपाद प्राण्याच्या सर्व दिशांना पसरणाऱ्या पायांसारख्या स्पर्शिकांप्रमाणे लांब लांब पसरलेले सरोवरांचे खाडीसारखे भाग जास्त स्पष्ट झाले.

जसे एकांडे हत्ती कधी कधी दृष्टीस पडतात, तसेच एकांडे नर गवे देखील क्वचित दृष्टीस पडतात. कधीकधी ते तापट स्वभावाचे असून धोकादायकही असतात. पूर्वी असे समजत की मारामारी किंवा भांडणे झाल्यामुळे हे नर गवे कळपातून हाकलले जाऊन सक्तीचे एकांडे आयुष्य घालवू लागतात. परंतु आता साधारणतः असे दिसून आले आहे की सबंध कळपाला एकत्रपणे शांततामय जीवन घालविता यावे, म्हणून पूर्ण वाढलेले मस्त नर गवे केव्हा केव्हा स्वतःच कळप सोडून देतात. जर असा नर गवा कळपप्रमुख असेल तर तो त्याला पाहिजे असेल तेव्हा कळपात परत येतो, इतर नर देखील कळपप्रमुखाचे नेतृत्व पाळावयाला तयार असतील तर कळपात पुन्हा दाखल होऊ शकतात.

१९५० मध्ये इकडील डोंगरावर अशा एकांड्या नर गव्याबरोबर घडलेला एक गमतीदार प्रसंग मला आठवतो. श्री. वुड हे एका झाडामागे स्तब्ध राहिले आणि मी एकटा माझा साधाच घडीचा कॅमेरा घेऊन पुढे झालो. जेव्हा जेव्हा तो नर वर पाही तेव्हा मी जागच्या जागीच थबकत असे. त्याने चरण्यासाठी डोके खाली घालेपर्यंत मी काहीच हालचाल केली नाही. नंतर वेळ पडलीच तर बचावाकरिता असावे म्हणून मी जवळात जवळच्या झाडावर माझे लक्ष ठेवून पुढे झालो.

हा भव्य काळा कुळकुळीत नर गवा फारच व्यवस्थित वागला. शेवटी मी अगदी फारच जवळ गेलो तेव्हा त्याने त्याचे डोके मुसंडी मारून वळवले आणि तो जवळच्याच झाडाच्या आश्रयाला धावत गेला.

अनुक्रमणिका

ह्याच डोंगरावरील रस्त्याने जात असताना मला सुंदर परंतु फारच सावध अशा काळ्या लांगूर वानरांचे दर्शन घडले. त्यांच्या सुंदरशा केसाळ कातड्यांमुळे आणि त्यांचे मांस, रक्त व काही इंद्रिये औषधोपयोगी आहेत अशा समजुतीमुळे त्यांची फार मोठ्या प्रमाणावर हत्या झालेली आहे.

त्यानंतर मी पेरियारला कित्येक वेळा गेलो. ह्या सर्वांत १९६१ मधील माझी भेट फारच यशस्वी झाली. तेव्हा मला जास्त चांगल्या कॅमेऱ्याने व दूरवरची छायाचित्रे टिपण्याच्या खास भिंगामुळे एका नर गव्याचे एक फारच छान छायाचित्र घेता आले. मला वाटते अगदी भर जंगलामध्येच उभा असलेला तो नर गवा कळपप्रमुख असावा.

जेव्हा आम्ही त्याला सरोवराच्या काठाला प्रथम चरताना पाहिले तेव्हा नेहमीप्रमाणे आमच्या डिझेलवर चालणाऱ्या छोट्या लॉंचच्या ड्रायव्हरने तिचा वेग प्रथम जवळजवळ अर्धा करून ती गव्याच्या दिशेने सरळ घेतली आणि ती त्या गव्यापासून सुमारे २०० यार्ड अंतरावर आल्यावर तिचे इंजिन बंदच करून टाकले.

गवा चरत असताना लॉंच हळूहळू गव्याच्या दिशेने सरकत होती. त्याने वर पाहिले. त्याच्या तोंडात गवत होते. तो बाकीच्या कळपात सामील व्हावयास अरण्यात शिरण्यापूर्वीच मी त्याचे छायाचित्र घेतले. (छायाचित्र क्र.३)

भारत सरकारच्या टपाल व तार खात्याने नंतर ह्या छायाचित्रावरूनच टपालाचे तिकीट बनविले. हे वन्यप्राण्यांच्या मालिकेत असलेल्या सहा टपालतिकीटांपैकी एक होय.

माझ्या ह्या भेटीतच मी रानडुकरांचे कितीतरी कळप पाहिले (छायाचित्र क्र.८). हे प्राणी भारतात सर्वत्र दिसून येतात. त्यांची मोठ्या प्रमाणावर हत्या होत असल्यामुळे ती फारच सावध झालेली दिसून येतात. अन् त्यामुळे त्यांची छायाचित्रे घेणे फारच कठीण होत चालले आहे. सर्वसाधारणतः पिकांवर धाडी घालण्याच्या त्यांच्या सवयीमुळे ती सर्वच राज्यांनी “उपद्रवी जनावरे” म्हणून जाहीर केलेली आहेत. त्यामुळे ती कोणालाही केव्हाही गोळ्या घालून ठार मारता येतात. ह्याशिवाय ती वाघ, बिबळे तसेच गीरच्या जंगलातील सिंह यांच्या अगदी आवडीचे खाद्य आहेत. अर्थात एखादे भलेमोठे रानडुक्कर वाघसिंहांच्या ताकदीला भारी पडू शकते.

उत्तर भारतात जेथे सपाट, गवताळ कुरणांचे तराईचे भाग आहेत तेथे घोडेस्वार घोडे दौंडवून ह्या डुकरांना भोसकून मारण्याचा तो प्रसिद्ध खेळ अजूनही खेळतात.

पेरियार हे जंगली हत्तींचे माहेरघरच आहे. (छायाचित्र क्र. ४ ते ७). माझ्या प्रत्येक भेटीत मी बऱ्याचदा खाली पाण्याजवळ हे अजस्त्र प्राणी मोठ्या संख्येने पाहिलेले आहेत. एकांडे नर हत्ती देखील अनेकदा दिसतात.

माझ्या शेवटच्या भेटीत मी एक अजस्त्र सुळ्यांचा एकांडा भव्य हत्ती पाहिला. मी माझी मोटरबोट वेग अर्धा करून त्या हत्तीच्या दिशेने घ्यावयास सांगितली. नंतर इंजिन बंद करून बोट त्या हत्तीच्या जवळ

अनुक्रमणिका

हळूहळू सरकत राहिली. तो सुळेवाला शिलेदार एकदम “मदमस्त” होता आणि त्याच्या डोळ्याच्या व कानाच्या ग्रंथीमधून काळसर रंगाचा मद वाहात असलेला मला स्पष्ट दिसला.

‘मस्त’ हत्ती म्हणजे काय याबद्दल मला थोडेसे सांगावयाचे आहे. मदाने ‘मस्त’ झालेल्या हत्तींचा कोणी विशेष अभ्यास केलेला नाही किंवा त्यांचे कोणी विशेष स्पष्टीकरण देऊ शकत नाही.

पाळीव हत्ती वर्षातून साधारणतः एकदा मदाने मस्त होतात; अन् ही अवस्था जवळजवळ तीन आठवडे टिकते. ह्या वेळात ते फारच धोकादायक बनतात. केव्हा केव्हा त्यांच्या स्वतःच्या माहुतला देखील ठार करू पाहतात. ह्या काळांत त्यांना साखळदंडाने बांधून ठेवावे लागते. तसेच त्यांना खाणेपिणे देखाल फार सावधतेने द्यावे लागते. केव्हा केव्हा अशा काम करणाऱ्या पाळीव हत्तींना मदाने मस्ती येण्याच्या सुमारास जास्त काम दिले जाते म्हणजे हा मद आपोआपच ओसरून जातो.

नर हत्ती मदाने ‘मस्त’ झालेले असताना फारच धोकादायक असतात. म्हणून प्राणिसंग्रहालयात किंवा सर्कशीमधून साधारणतः सर्व हत्तीणींच ठेवतात. हत्तीणींना देखील मदाच्या ग्रंथी असतात; आणि त्या देखील वेळोवेळी ‘मस्त’ होतात. परंतु हत्तीणी ‘मस्त’ झाल्या तरी स्वभावाने फार हल्लेखोर अथवा धोकादायक होत नाहीत. मदाने ‘मस्त’ होऊन कपाळावरून मद वाहात असलेल्या अशा कित्येक पाळीव हत्तीणींबद्दल मी ऐकलेले आहे. मदाने भरलेल्या अनेक जंगली हत्तीणींचे दाखले श्री. एम्. कृष्णन् यांनी देखील दिलेले आहेत.

कधी कधी नर हत्तींमध्ये नरमादीच्या समागमापूर्वी भांडणाची तसेच आपल्या प्रतिस्पर्ध्यास त्यावेळेस ठार मारण्याचीही अंतःप्रेरणा निर्माण होते. असेही ‘मस्त’ चे वर्णन केले जाते. परंतु असेही काही दाखले आहेत की ‘मस्त’ नराच्या देखत मादी एखाद्या साध्या (मदाने मस्त नसलेल्या) हत्तीशी समागम करीत असतानाही ‘मस्त’ नर मादीकडे ढुंकूनही पाहात नाही. शिवाय मला असे वाटते की मादीशी समागम केल्यानंतरही केव्हा अशा ‘मस्त’ नरांचा मद ओसरत नाही. मी दोनदा काझीरंगा आणि एकदा पेरियारमध्ये एकंदर तीन वेळा असे मदाने पूर्ण ‘मस्त’ झालेले नर हत्ती पाहिलेले आहेत. परंतु प्रत्येक वेळी ते निरुपद्रवी असे भासले. जराही हल्लेखोर असे भासले नाहीत. श्री.एम.कृष्णन् यांना देखील मदाने ‘मस्त’ झालेले जंगली नर हत्ती विशेष उपद्रवी नसल्याचे आढळून आलेले आहे. (ते फक्त सुळेवाल्या नर हत्तींबद्दलच बोलतात.) याचाच अर्थ सुळे नसलेले हत्ती मदावर येत नसावेत; परंतु काझीरंगा येथे माझ्या पाहण्यात आलेला एक ‘मस्त’ हत्ती बिनसुळ्यांचा होता. असे असू शकेल का की फक्त मदमस्त पाळीव हत्तीच उपद्रवी असतील आणि जंगली नरांवर त्याचा काही विशेष परिणाम होत नसावा ?

सर्वच भारतीय नर हत्तींना सुळे असतात असे नाही. बऱ्याच नरांना सुळे नसतात. त्यांना ‘माखना’ असे म्हणतात. तसे पाहता मला तरी वाटते ईशान्य भारतात ह्या सुळेवाल्या हत्तींचे प्रमाण ‘माखनां’शी अर्धे अर्धे असावे; परंतु द. भारतात सुळेवाल्या हत्तींचे प्रमाण कमी आहे, आणि सिलोनमध्ये तर ते आणखीनच कमी आहे. काही नर हत्तींना सुळे का नसतात याला माझ्या माहितीप्रमाणे तरी काही उत्तर देता येत नाही. ही आनुवंशिकता असावी असे मला तरी वाटत नाही.

श्री. आर. सी. मॉरीस यांनी मला द. भारतातील ‘माखनां’ विषयी बऱ्याच मनोरंजक गोष्टी सांगितल्या. ते नेहमीच शांत असून पाळीव बनू शकतात. ते केव्हाच ‘उद्धट’ बनत नाहीत, परंतु ईशान्य

भारतातील 'माखना' माझ्या माहितीप्रमाणे उद्धट होऊ शकतात. अर्थात सुळे नसले तरी ती काही कमीपणाची अथवा पंगुत्वाची बाब नाही. कारण ईशान्य भारतात मी कित्येक वेळा एकेका कळपात सुळेवाले हत्ती असले तरी ते डावलले जाऊन माखनाकडे कळपाचे नेतृत्व असलेले पाहिलेले आहे. कारण निसर्गतः माखना आकाराने मोठे असून त्यांच्या मानेत, डोक्यात आणि सोंडेमध्ये सुळ्यांची उणीव भरून काढण्यासाठी जास्त बळ असते. मारामारी झाल्यास माखना आपल्या सोंडेने प्रतिस्पर्ध्याचा सुळा देखील मोडू शकतो. अशा एक सुळ्याच्या हत्तीला 'गणेश' असेही म्हणतात.

आफ्रिकेतील हत्तीणींप्रमाणे भारतीय हत्तीणींना सुळे केव्हाच दिसून येत नाहीत.(भारतीय आणि आफ्रिकन हत्तींमधील इतर मुख्य फरक म्हणजे भारतीय हत्ती जवळजवळ एक फूटभर तरी लहान असतात; त्यांचे कानही लहान असतात. आणि त्यांच्या पाठी बर्हिवक्र असतात. आफ्रिकन हत्तींची पाठ आतंर्गोल असते. भारतीय हत्ती त्यांच्या आफ्रिकन बांधवांपेक्षा जास्त हुशार समजले जातात.)

कळपाचा प्रमुख नर हा फक्त कळपांतील इतर नरांवर वर्चस्व गाजवितो. कळपाचे नेतृत्व साधारणतः कळपांतील वयस्क अनुभवी अशा मादीकडे असते; मला वाटते माझ्या ह्या विधानाशी सर्व निरीक्षक सहमत होतील. कळपप्रमुख नर कित्येकदा कळप सोडून देऊन इतर ठिकाणी भटकत राहतो; परंतु त्याच्या मनाला वाटेल तेव्हा त्याला केव्हाही कळपात जाण्यायेण्याची मुभा असते. ईशान्य भारतात जेव्हा जंगली हत्ती पकडले जातात तेव्हा हत्तींना पकडण्यासाठी जे कुंपण तयार केलेले असते त्यामधून असे कळपप्रमुख नर सुटून गेलेले मी पाहिले आहेत. ते नेहमीच एका बाजूला किंवा कळपाच्या सर्वात शेवटी असतात त्यामुळे त्यांना सहज पळून जाता येते.

अर्थात ते हत्तींना पकडणाऱ्यांच्या देखील फायद्याचे असते. कारण जर असा एकदा मोठा नर कुंपणात पकडला केला तर तो फारच त्रासदायक ठरतो आणि केव्हा केव्हा फारच नुकसान देखील करतो.

पेरियारला मी दिलेल्या शेवटच्या भेटीत मी जंगलच्या सुक्या भागातून पाहाताना मला हत्तींचा एक कळप बेटावर पोहत जाताना दिसला. ते सरोवराच्या पाण्यामधून बेटावर जात असल्यामुळे मला त्यांचे अगदी जवळून निरीक्षण करता आले. नेहमीप्रमाणे त्या कळपाचे नेतृत्व एका वयस्क, अनुभवी अशा हत्तीणीकडे होते. पाण्यात पोहून ओले झाल्यामुळे; तसेच सकाळच्या उन्हाची किरणे त्यांच्या पाठीवर पडल्यामुळे ते सर्व लाकडांतून कोरून काढलेल्या भव्य आकृतींसारखे भासत होते. (छायाचित्र क्र. ४)

मी दुपारी त्याच बेटाच्या दुसऱ्या बाजूने गेलो. त्याच हत्तींचा तोच कळप तेथे होता; परंतु आता त्याचा रंग काळाभोर नव्हता तर तो गडद गुलाबी होता.

मी मोसंब्याच्या रसाव्यतिरिक्त कडक असे दुसरे कोणतेच पेय घेतलेले नसल्यामुळे हत्तींचा रंग बदलण्याला दुसरे काहीतरी कारण असावे नाही का? दक्षिण भारतातील आणि विशेषतः सिलोनमधील हत्तींच्या सोंडा, डोकी, कान तसेच शरीराचे काही भाग गुलाबी होतात (आणि त्यावर उदी—काळसर रंगाचे ठिपके राहतात.) कातडीचा रंग जाण्याचे हे प्रमाण वयोमानाप्रमाणे वाढत जाते.

परंतु ह्या कळपाचा रंग बदलला असण्याला हे कारण देखील पुरेसे नाही. त्याचे खरे कारण असे असावे की ह्या बेटावरील मातीच लालभडक आहे आणि हे हत्ती आपल्या शरीराचे तपमान नेहमी थंड ठेवण्यासाठी सोंडांनी माती एकसारखी त्यांच्या पाठीवर फवारत असतात.

मी ह्या कळपाच्या दुपारी घेतलेल्या छायाचित्रात ते हत्ती सरोवराच्या काठावरचे गवत उपटून काढीत आहेत आणि त्यांचे बुंधे आपल्या किंचित् वर केलेल्या पुढच्या पायावर माती झटकण्यासाठी आपटून ते खात असलेले दिसत आहेत. छायाचित्र क्र. ७ मध्ये दिसत असलेला डाव्या बाजूचा हत्ती उजव्या पायावर गवत झटकीत आहे तर उजवीकडील हत्ती डाव्या पायावर ते झटकीत आहे. ही मजेशीर गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे; तेव्हा हे डावं–उजवं प्रकरण माणसांप्रमाणे हत्तींमध्ये देखील दिसून येते म्हणायचे तर. असे हे पाळीव हत्ती काम करीत असताना उजव्या हाताचे, डाव्या हाताचे असे वेगवेगळे दिसून येतात.

[अनुक्रमणिका](#)






९अ. तामीळ नाडूतील वेडनधांगल येथे विणीच्या हंगामात असे अगणित पाणपक्षी दिसतात.
९ब. उघड्या चोचीच्या बगळ्याची एक जोडी घरट्यावर दिसत आहे.


अनुक्रमणिका






१०अ. काही पेलिकन पक्षी ताडाच्या झाडांवर घरटी बांधून होते
१०ब. छोटे पिलू घरट्यातून पडले की त्याचे जन्मदाते त्याला स्विकारत नाहीत.

अनुक्रमणिका



११. ठिपकेवाल्या पेलिकन पक्ष्याचे पिलू अन् पालक

अनुक्रमणिका






१२अ. तीन घरटी-दोन अंड्यासमवेत हा पक्षी उत्साहित झाल्यास चोचीखालची मांसल पिशवी पसरवितो.
१२ब. पिल्लू अन्न खाताना जवळजवळ ह्या मांसल पिशवीत गडपच झाले आहे.

अनुक्रमणिका



१३. जांभळा बगळा अन् पांढरे शराटी एकाच झाडावर घरटी बांधतात-भरतपूर ते सर्व आपल्या छोट्यांना उन्हापासून वाचविण्याच्या प्रयत्नात आहेत.

अनुक्रमणिका



१४. मध्यम बगळा त्याच्या घरट्यावर (त्याच्या डोक्यावर तुरा नाही.)

अनुक्रमणिका



१५. विणीच्या हंगामात छोट्या बगळ्याच्या डोक्यावर शेंडीसारखे लांब पीस उगवते.

अनुक्रमणिका





**१६अ. मासेमारी करण्यात गर्क झालेले पाणकावळे.**
**१६ब. ह्या 'चमच्या' पक्ष्याचे घरटे पाण्याच्या अगदी जवळ होते.**

भारतामधील जंगली हत्तींची प्रजनन शक्ती फारच जास्त म्हणावी लागेल. युगांडामधील "राणी एलिझाबेथ नॅशनल पार्क" येथील हिप्पोपोटॅमसप्रमाणे पेरियारमधील या जंगली हत्तींची संख्या आटोक्यांत ठेवण्यासाठी त्यावर एक दिवस बंधने घालावी लागतील; नाहीतर अतिशय चरल्यामुळे तेथील जमिनीचा कस जाऊन तिची प्रत खालावली जाण्याची शक्यता आहे.

अनुक्रमणिका

उत्तर प्रदेश, बिहार आणि ओरिसा येथील जंगली हत्तींची संख्या वाढत आहे; आणि अशा जंगली हत्तींना पकडून त्यांना शिकविण्याची कला आता जवळजवळ नष्ट होत चालली असल्यामुळे तेथील संबंधित अधिकारी काळजीत आहेत. बंगाल आणि आसाममध्ये मात्र जंगली हत्तींची संख्या आटोक्यात ठेवण्यासाठी अजूनही अशा जंगली हत्तींना पकडून शिकविले जाते. नाहीतर हे जंगली हत्ती पिकाची नासाडी करून फारच हानिकारक ठरतात. म्हैसूर आणि तामीळनाडूत देखील ते अजून पकडले जातात.

भारतात हत्तींची संख्या किती आहे असे काहीजण विचारतील. मला वाटते अजून तरी तशी हत्तींची शिरगणती झालेली नाही; परंतु प्रत्येक राज्याच्या वनखात्याचे अधिकारी अधूनमधून साधारण अंदाज बांधतात. मला वाटते, द. भारतात साधारणपणे ३००० हत्ती असावयास हरकत नसावी. त्यांपैकी पाचएकशे तर नुसत्या पेरियारमध्येच असावेत. सर्व भारतात ७००० हत्ती तरी सहज असतील. नेपाळ आणि पूर्व पाकिस्तानात काही अस्तित्वात असतील.

त्यांची केंव्हाच मोजणी झालेली नसल्यामुळे कदाचित असे अंदाज बांधून त्यांची संख्या सांगणे वावगे ठरेल, परंतु मला तरी वाटते की सध्या उपलब्ध असलेल्या माहितीवरून आणि माझ्या स्वतःच्या अनुभवावरून बांधलेला अंदाज हा अगदी काहीच माहिती उपलब्ध नसण्यापेक्षा पुष्कळच उपयुक्त असा ठरेल; आणि जर कोणी त्यांच्या संख्येबद्दल दुसरे अंदाज घेऊन सकारण पुढे येत असेल तर निदान उपयुक्त अशी माहिती तरी या विषयावर उपलब्ध होईल आणि वन्यजीवनाच्या रक्षणाचा विचार करायची वृत्ती तरी सर्वत्र पसरविली जाईल. आणि कोणी सांगावे? कदाचित् राज्याच्या संबंधित खात्याचे अधिकारी लवकरच हे मोजणीचे काम करावयास उद्युक्त होतीलही.

सिलोनमधील जंगली हत्तींची संख्या सध्या जवळजवळ १६५० इतकी असूनही तेथील वन्यप्राण्यांचे संरक्षण करणारांचे मत आहे की त्यांची संख्या खालावत आहे आणि त्यांच्या जीवितास धोका आहे, याबद्दल मला फारच संदेह वाटतो. ब्रह्मदेशात १९३८ मध्ये सागाच्या जंगलात काम करीत असलेल्या हत्तींचीं संख्या ६००० इतकी होती ती आजमितीला फक्त १५०० इतकीच आहे. याशिवाय मला इतरत्र असलेल्या जंगली हत्तींच्या संख्येबद्दल काही माहिती नाही.

हत्तींशी निगडित अशा अनेक पौराणिक कथा आहेत. सर्वसाधारण वाचकाला मनोरंजक वाटावे म्हणून या कथांचा हत्तीवर लिहिण्यात आलेल्या अनेक पुस्तकांच्या लेखकांनी चांगलाच उपयोग करून घेतला आहे. त्यांपैकी काही विनोदी श्रद्धांचा मी येथे उल्लेख केला तर ते वास्तव ठरेल.

उदाहरणार्थ, किपलिंगच्या पुस्तकांची जरी मी स्तुती करीत असलो तरी त्यात उल्लेखिल्याप्रमाणे जंगली हत्ती केव्हाही नाच वगैरे करताना दिसून येत नाहीत.

हत्ती उंदरांना मुळीच घाबरत नाहीत. तसेच त्यांना घाबरण्याचीही जरुरी नाही. उंदीर जर हत्तींच्या सोंडेत शिरलाच तर तो (शिंकेबरोबर?) बाहेर सहज फेकला जातो.

हत्तींचे आयुष्यमान दीर्घ नसते. कुठचाही हत्ती साधारण ७० वर्षाच्या वर जगल्याचा शास्त्रीय पुरावा नाही.

अनुक्रमणिका

तसेच हत्तींच्या स्मरणशक्तीबद्दलही फारच अतिशयोक्ती केली जाते, परंतु वास्तवात ती काही एखाद्या कुत्र्यापेक्षा किंवा घोड्यापेक्षा फार जास्त नसते. तसेच हत्तीच्या तल्लख बुद्धीची (हुशारीची) देखील फारच अतिशयोक्ती केली जाते; परंतु खरे पाहता ती एखाद्या चिपांझी अथवा ओरांगउट्टान जातीच्या माकडाहूनही कमीच असावी.

हत्तींना सहजपणे घाबरविता येते. त्यांच्या अंगी माणसाळले जाण्याची व मनुष्याकडून कुठल्याही गोष्टी शिकण्याची मात्र फार मोठी शक्ती असते. तसेच ते माणसांची कामे देखील करतात.

इतर प्राण्यांप्रमाणे त्यांना देखील नैसर्गिक मृत्यु येतो. असे नैसर्गिकरित्या मेलेले कितीतरी हत्ती पाहण्यात आलेले आहेत. हस्तीदंताच्या ढिगाऱ्यांची वेगळी खास अशी “हत्तींची दफनभूमी” मात्र कुठेही अस्तित्वात किंवा पाहण्यात आलेली नाही. मरावयास टेकलेला हत्ती साधारणतः पाणी असेल अशा ठिकाणी एकांतवास पत्करतो; आणि निसर्गाचे भंगीकाम करणारे (अर्थात तरस—गिधाडे यांसारखे प्राणी—पक्षी) मृत प्राण्याच्या शरीराची विल्हेवाट काही वेळातच लावून टाकतात आणि उष्ण प्रदेशात वाढणाऱ्या झाडाझुडुपांत ते कुठल्या कुठे गडप होऊन जातात.

मी एकदा आसाममधील मनास नदीजवळ एका जंगली हत्तीचे मृत शरीर पाहिले. पुढल्या खेपेस नदीला आलेल्या पुराबरोबर त्याची हाडे ब्रह्मपुत्रेत किंवा बंगालच्या उपसागरापर्यंत जाऊन पोहोचली असतील.

पेरियारच्या माझ्या शेवटच्या भेटीत मी खाडी संपत आलेल्या ठिकाणी असलेल्या झाडांवर काही गिधाडे बसलेली पाहिली. मी खाडीभोवती सभोवार दृष्टी टाकली, शेवटच्या वळणाजवळ एक जंगली हत्ती नैसर्गिक मृत्यु येऊन मरून पडलेला दिसला— तेथे जवळपास कुठेही माणसांच्या हालचालींचा मागमूसही दिसत नव्हता. तो हत्ती सरोवरांत अर्धवट बुडालेला होता (चित्र.७) गिधाडे त्याचे अस्तित्व नाहीसे करण्यात वरच्या भागाकडे गुंतली होती आणि काही छोट्या माशांच्या झुंडी तेच काम पाण्याखाली करीत होत्या.

तेव्हा अशा प्रकारे जंगलामधल्या एका शक्तिशाली आणि राजासारख्या रुबाबदार व उमद्या प्राण्याचे आयुष्य संपविले जात होते.

अनुक्रमणिका

## प्रकरण ३ रे

# आंध्रमधील पेलिकन

तामिळनाडूमध्ये समुद्रकिनाऱ्याजवळ पॉईट—कॅलिमिअर येथे एक नवीन अभयारण्य तयार झाले आहे. पण मला वाटते की खरे पाहाता ह्या जागेत त्यांना राष्ट्रीय उद्यान करावयाचे होते. मी तेथे केव्हाच गेलेलो नाही, परंतु ती जागा विणीच्या हंगामाव्यतिरिक्त रोहित (फ्लेमिंगो ) पक्ष्यांना खाद्य टिपीत असताना पाहावयाला फारच सुंदर आहे असे मी ऐकलेले आहे. तेथे इतरही बरेचसे पक्षीजीवन दिसून येते आणि मला वाटते की तेथे बरेचसे काळवीटही दिसून येतात.

परंतु तामिळनाडूमध्ये मद्रास राज्यापासून दक्षिणेला ५४ मैल अंतरावर असलेले ‘वेडन्थांगल’ येथे फारच सुंदर पक्षी प्रदेश आहे. (छायाचित्र क्रं. ९) मद्रास वनखात्याने मुख्य रस्त्यापासून अभयस्थळापर्यंत मोटारीने जाता येईल असा उत्तमसा रस्ता तयार करवून घेतला आहे.

ह्या अभयारस्थळात एक छोटेसे जवळजवळ ७४ एकर परिसर असलेले कृत्रिम सरोवर आहे. त्याचे पाणी मातीच्या बंधाऱ्याने धरणासारखे अडवून कालव्यातून सोडलेले आहे. त्यावर भातशेती व इतर पिके घेतली जातात. सरोवराच्या पाण्यात मधून मधून तिवरीची ( बॅरीग्टोनीया ॲक्युटँग्युला ) झाडे वाढलेली दिसतात.

पावसाळ्यानंतर येथील सरोवरात भरपूर पाणी असेल तर थंडीच्या दिवसात म्हणजेच साधारणतःऑक्टोबर ते मार्चच्या दरम्यान ह्या झाडांवरच असंख्य पाणपक्षी आपली घरटी बांधतात.

भारतामध्ये जलपक्ष्यांच्या विणीसाठी दोन गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. त्या म्हणजे पुरेसे आणि कायम पाणी आणि कायम भुकेल्या असलेल्या छोट्या पिलांसाठी पुरेसे खाद्य-म्हणजेच मासे आणि पाण्यातील जीवजंतू यांचा भरपूर पुरवठा. दुसरे म्हणजे मांजरे, मुंगसे (आणि केव्हा केव्हा मनुष्यप्राणी) अशा भक्षकांचा अंडी आणि पिलांना उपद्रव होऊ नये म्हणून पाण्याच्या मधोमध असलेली झाडे.

जेव्हा साधारणतः पावसाळा समाधनकारक असतो तेव्हा भरपूर पाणी असल्यामुळे वेडन्थांगल येथे ह्या दोन्ही गोष्टी भरपूर उपलब्ध असतात. तामीळ भाषेत “वेडन्थांगल” ह्या शब्दाचा अर्थच मुळी “पक्ष्यांचा आसरा” असा आहे.

भारतातील पक्ष्यांचे एक प्रमुख छायाचित्रकार श्री. आर. एस्. पी. बेटस् यांनी १९२६ च्या नोव्हेंबरमध्ये ‘वेडन्थांगल’ (पुन्हा) शोधून काढले. परंतु त्या वर्षी पाऊस फारसा पडला नसल्यामुळे तेथे विशेषसे पाणी नव्हते आणि त्यामुळे विशेष संख्येने पक्षीही नव्हते. १९२८ आणि १९२९ मध्ये मात्र त्यांना तेथे पुष्कळ पाणी आणि पक्ष्यांचे खूपच मोठे थवे दिसले.

वेडन्थांगलबद्दल एक मजेशीर गोष्ट म्हणजे हे प्राचीन काळापासूनच पक्षी अभयस्थल आहे. तेथे जवळच गाव आहे, आणि तेथील रहिवाशांनी शेतजमिनीला पाणीपुरवठा होत असताना वाहात आलेल्या पक्ष्यांच्या विष्ठेचा कसा छान खत म्हणून उपयोग होतो याचे महत्त्व जाणलेले होते.

येथे पक्ष्यांना कोणीही त्रास देऊ शकत नाही किंवा कोणत्याही प्रकारे उपद्रव पोहोचवू शकत नाही. या ठिकाणी पक्ष्यांना अभय असल्याचा कागदोपत्री पुरावा १७९८ मध्ये प्रथम सापडतो. त्या काळातही तेथे पक्षी ठार मारण्यास बंदी होती.

मी वेडन्थांगलला दोन वर्षे जानेवारी महिन्यातच भेटी दिल्या आणि प्रत्येक वेळेस तेथे भरपूर पाणी आणि भरपूर पक्षी घरटी बांधताना दिसले. तेथील झाडे अक्षरशः पक्ष्यांनी आणि त्यांच्या घरट्यांनी; तसेच घरटी, अंडी आणि वेगवेगळ्या आकाराच्या वाढत असलेल्या पिलांनी तुडुंब भरून गेलेली दिसली.

येथे कुठच्याही रंगाचे बंधन नाही, तसेच काळ्यागोऱ्याचा भेदभाव नाही. तुम्हाला हिमाच्या राशीसारखे पांढरे स्वच्छ बगळे, धूसर-काळसर पाणकावळ्यांच्या शेजारी घरटी बांधताना दिसतील (छायाचित्र क्र.१४,१५) छोट्या आकाराच्या पक्ष्यांना मोठमोठे पक्षी छळताना दिसणार नाहीत. उघड्या चोंचीचे करकोचे (छायाचित्र क्र.९) तसेच राखी वंचक (grey heron) यांसारखे मोठमोठे पक्षी पांढऱ्या शराटी (छायाचित्र १३) रातवंचक (night heron), वंचक (ppnd heron) ह्या पक्ष्यांसारख्या छोट्या पक्ष्यांजवळच घरटी बांधून गुण्यागोविंदाने नांदत असलेले दिसतील. तिरंदाज किंवा ज्याला सर्पपक्षी असेही म्हणतात ते देखील येथे दिसून येतात.

येथे कुठच्या भाषा अथवा जन्मकुळीचे बंधन नाही. वरील सर्व जातीचे पक्षी काही भेदभाव अथवा भांडणतंटा न करता एकत्र मुक्तपणे वावरत असतात. मी जेव्हा तेथे होतो तेव्हा फक्त “चमचे” पक्षीच (spoonbill) वेगळी झाडे अडवून बसलेले दिसले.

या पक्ष्यांची घरटी वेड्यावाकड्या काटक्या कुटक्यांनी कशीबशी उभारलेली दिसत होती. त्यांची कोणी रेखीव आखणी केलेली नव्हती की त्यांना आतून सुखकर मऊ असे अस्तर नव्हते. धरणावर किंवा तेथील बांधावर बसून कुणालाही ते पक्षी आणि त्यांची घरटी सहजपणे न्याहाळता येतात. शिवाय बांधावर सावलीसाठी पुष्कळशी झाडे असल्यामुळे अशी भेट सुखदायक होते.

पक्षी जवळून पाहण्याकरिता तसेच छायाचित्रणासाठी जरी तेथे बोटीतून जाता येत असले तरी त्याचा वापर गावकऱ्यांना विशेष पसंत नाही आणि ते त्याला उत्तेजन देत नाहीत. त्यांच्या ह्या अभयारण्याची काळजी घेण्यासाठी आणि त्याची निगा राखण्यासाठी ते एवढी खटपट करतात. त्यामुळे माझ्या तेथील भेटीमध्ये मला जवळून असे काहीच छायाचित्रण करता आले नाही.

म्हैसूर शहराजवळच किंबहुना तेथून केवळ ९ मैलांवरच “रंगनथिट्टू” येथे पक्षीअभयारण्य आहे. त्याचा विस्तार १·६६ चौ. मैल इतका आहे. पूर्वी त्याला “श्रीरंगपट्टण” असे नाव होते. त्यामध्ये पवित्र कावेरी नदीच्या बेटांचा समावेश आहे. प्रवाशांना नदी पार करता यावी म्हणून वनविभागाने टोपलीच्या छोट्याछोट्या नावा ठेवलेल्या आहेत.

येथे जवळजवळ वर्षभर उघड्या चोचीचे करकोचे, पांढरे शराटी, रात वंचक, तिरंदाज, पाणकावळे आणि गायबगळे दिसतात. परंतु त्यांच्या विणीचा हंगाम फक्त जून ते ऑगस्ट ह्या महिन्यांमध्येच मुख्यतः असतो.

अनुक्रमणिका

भारतात पेलिकन पक्ष्यांची वीण कुठे होते हा प्रश्न नेहमी मला सतावीत असे; आणि मी भारतामधील माझ्या सर्व ठिकाणच्या दौऱ्यांवर असताना त्याबद्दल विचारीत असे की हे मोठे पक्षी घरटी बांधताना कुठे दिसतील? मी आसाममध्ये काझीरंगा येथे तसेच मनास नदीकाठी देखील पुष्कळ पेलिकन पक्षी पाहिले. परंतु १९६१ च्या जानेवारीमध्ये काझीरंगा अभयारण्यामध्ये त्यांच्या घरट्यांची वसाहत दिसेपर्यंत तरी ते एक गूढच होते.

१९४६ मध्ये आंध्र प्रदेशात श्री. के. के. नीलकंठन यांनी ठिपकेवाल्या चोचीच्या पेलिकन पक्ष्यांच्या घरट्यांची एक वसाहत शोधून काढली होती. १९५९ मध्ये ते पुन्हा एकदा तेथे गेले होते आणि त्यांनी मला कसे जावयाचे याबद्दल बरीचशी माहिती दिली होती.

तेव्हा मी १९६० च्या जानेवारीमध्ये कलकत्याहून मद्रास मेल पकडली आणि तेड्पल्लीगुडम् येथे उतरलो. तेथून एरडू आणि कोलामुरु अशी दोन गांवे अनु.१२ आणि १५ मैलांच्या अंतरावर आहेत. या दोन ठिकाणी पक्ष्यांची घरटी होती. मी तेथे एका जवळच्याच विश्रांतिगृहात राहिलो आणि घरट्यांचे चित्रीकरण करण्यात तसेच त्यांना न्याहाळण्यात बरेच दिवस घालविले. मला वाटते भारतातील पेलिकन पक्ष्यांचे चित्रीकरण करणारा मीच प्रथम असेन. (छायाचित्र १०-१२)

मला ते सर्व फारच मनोरंजक वाटले. कारण वेडन्थांगल येथे पक्ष्यांना तेथील रहिवाशांनीच एक प्रकारे संरक्षण दिले होते. केवळ त्यांच्या विष्ठेकरिता नव्हे (त्यांना त्याचा उपयोग चांगलाच माहीत होता.) परंतु केवळ सहानुभूती म्हणून आणि सर्वसाधारणतः सर्व भारतीयांच्यात आदरातिथ्य हा एक मोठा गुण आहे म्हणूनही.

“भारताच्या सर्व भागांतील पक्षी दर नोव्हेंबरमध्ये आमच्या येथे येतात आणि त्यांचा आम्हाला काहीच उपद्रव नाही” असे तेथील काही गावकऱ्यांनी मला दुभाष्यांमार्फत सांगितले. (त्यांना तेलगूशिवाय दुसरी कोणतीच भाषा येत नाही.) दुसऱ्या दिवशी मला कळले की मी त्यांना विशेष आवडलो नाही. माझा कॅमेरा, तो ठेवण्याची तिवई, छायाचित्रणाचे काम करीत असताना लपण्याचा तंबू व इतर साधनसामुग्री पाहून ते साशंक झाले होते.

माझ्या बरोबरच्या वनाधिकाऱ्याला त्यांनी सांगितले की तो आपल्या पेलिकन पक्ष्यांचं रक्त शोषायला आलाय्. तेव्हा त्या वनाधिकाऱ्याने मी वन्यप्राण्यांच्या भारतीय मंडळाचा सदस्य असल्याचे त्यांना सांगितले; आणि मी त्या पक्ष्यांना उपद्रव न करता उलट झाले तर एक प्रकारे मदतच करणार होतो असेही सांगितले. तेव्हा त्यांना ते समजलेले दिसले. कारण त्यानंतर मला त्यांचे सहकार्य मिळाले. पाटाचे पाणी व्यवस्थितपणे खेळविलेल्या भातशेतीच्या जवळजवळ २ चौ. मैलापर्यंतच्या भागात विखुरलेली राखी किंवा ठिपकेवाल्या चोचीच्या पेलिकन पक्ष्यांची जवळजवळ १५०० घरटी मला कोल्लामुरू गावाजवळ मिळाली. ही घरटी पाटाचे पाणी खेळविण्यासाठी बांधलेल्या व त्यामुळे शेतीची जमीन विभागणाऱ्या अरुंद बांधांवर असलेल्या झाडांवर होती.

ब्रह्मदेशांतील सिट्टांग नदीच्या काठी ‘ओटस्’ नावाच्या गृस्थाने १८७७ मध्ये पेलिकन पक्ष्यांची मोठी सुप्रसिद्ध अशी वसाहत शोधून काढली होती. त्या जागेचे वर्णन “शांत” असे त्याने केलेले होते. ‘ओटस्’ च्या

शब्दांतील वर्णन पुढीलप्रमाणे होते :— "ह्या जंगलात विणीच्या हंगामात जरी लाखो पेलिकन पक्षी घरटी बांधून वसाहत करून होते, तरी तेथे शांतता असे. जणू काही पेलिकन पक्षी मुकेच असावेत."

आंध्रमधील पेलिकन पक्ष्यांची वसाहत मला अशी आढळली नाही. विणीच्या हंगामात तेथे घरटी बांधून राहिलेल्या पक्ष्यांचा आवाज पाव एक मैल अंतरावरून सहज ऐकू येत असे, आणि जवळ गेल्यास आर्तपणे कण्हण्याचे, मोठ्याने गुरगुरल्याचे, वरच्या पट्टीत कलकलल्याचे तसेच चोचींवर चोची आपटल्याचे, गलबलाटाचे असे अनेक छोटे मोठे आवाज येत. मी हे सर्व ध्वनिमुद्रित करून घेतले.

पहिल्याच दिवशी मी जेव्हा त्या बाजूने एखादे चांगले घरटे मला छायाचित्रणासाठी मिळते का हे पाहात चाललो होतो, तेव्हा अकस्मात टाळ्या पिटण्याच्या झालेल्या आवाजाने माझे लक्ष वेधून घेतले. मी पूर्ण वळून पाहिले आणि माझे सामान घेऊन येणाऱ्या मुलांना पक्ष्यांना घाबरवू नका अशी सूचना दिली. परंतु त्यांच्या निरागसपणे आश्चर्यचकित झालेल्या चेहऱ्यांनी मला काय घडले त्याचा अंदाज आला. वेळोवेळी ह्या पक्ष्यांचे नीट निरीक्षण केल्यावर मला असे दिसून आले की त्यांच्यातील एक पक्षी झाडावर आखडून बसे; डोके मागे करून, चोच उघडी करून आणि नंतर असा टाळ्या पिटल्यासारखा मोठा आवाज येई. ते असे का करीत असावेत हे काही मला माहीत नाही.

पेलिकन् पक्ष्यांच्याच नव्हे तर बहुतेक सर्वच पक्ष्यांच्या आणि सस्तन प्राण्यांच्या अशा कित्येक गोष्टींबद्दल आपल्याला विशेष माहिती नाही. वसाहतप्रिय प्राण्यांचे सामाजिक जीवन अभ्यासणे तसे सोपे आहे. त्याचबरोबर त्यांचे निरीक्षण करणेही अगदी मनोरंजक आहे.

मला नेहमी वाटते की भारतातील जीवशास्त्राच्या कित्येक विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या प्राचार्यांना शहरातल्या त्यांच्या संशोधनशाळा सोडून जरा बाहेर जंगलांत जाऊन अशा प्रकारचा अभ्यास करण्याची भरपूर संधी आहे. अमेरिकेतील तो "माकड तज्ञ" हजारो मैलांचा प्रवास करून बंदिपूरला दख्खनी माकडांचा अभ्यास करण्यासाठी आला होता. तर भारतातल्या भारतात अशा प्रकारचा अभ्यास करणे इथल्या विद्यार्थ्यांना किती सोपे आहे.

ह्या पेलिकन पक्ष्यांची एक विशिष्ट गोष्ट म्हणजे त्याच्या खालच्या जबड्याखाली असलेली मोठी मांसल पिशवी – ही पिशवी पाहूनच एका कवीला छोटंसं काव्य सुचलं. त्याचा अर्थ असा आहे की पेलिकन पक्षी त्याच्या पोटापेक्षा ह्या चोचीतच जास्त खाद्य साठवून ठेवू शकतो.

हा खालचा जबडा दोन लवचिक अशा कमानींनी बनलेला असावा. त्यामुळे चोचीखालच्या मांसल पिशवीच्या उघड्या कातडीला आधार मिळतो. ही मांसल पिशवी पाण्यातून मासे गाळून काढण्यासाठी एखाद्या जाळ्यासारखी उपयोगी पडते; आणि जेव्हा हे पक्षी अर्धगोलाकार उभे राहून मासे पकडतात तेव्हा तर मासे उथळ पाण्याकडे वहावत नेण्याकरिता ही पिशवी चांगलीच उपयुक्त असते. वरच्या जबड्याच्या टोकाला आकड्यासारखा भाग असतो तो मासे पकडताना उपयुक्त होतो.

माझ्या लक्षात आले की पक्षी काहीही कारणास्तव उत्तेजित झाले की ही मांसल पिशवी चोचीखाली ताठ उभी होऊन चोचीला एक प्रकारचा त्रिकोणी आकार येतो.

अनुक्रमणिका

मी माझा लपण्याचा कातडी तंबू टांगून ठेवण्यासाठी एक सोयीस्कर झाड हेरून ठेवले. तेथून खाली जवळच्याच काही घरट्यांमध्ये मी डोकावून पाहू शकत होतो. माझ्या लपणात शिरून मी गुपचूप लपून राहून काही फुटांच्या अंतरावरून त्या पक्ष्यांचे खासगी जीवन अगदी जवळून न्याहाळू शकत होतो.

अशा प्रकारे कातडी तंबूत लपून पक्ष्यांच्या अगदी जवळ असूनही पक्ष्यांना त्याचा गंधही नसण्यात किती मज्जा आहे अन् तो एक अविस्मरणीय अनुभव आहे. माझ्या जागेवरून मी मळकट पांढरी अशी अंडी, नुकतीच अंड्यातून बाहेर पडलेली–पिसे नसलेली पिले; त्याहून मोठी पांढऱ्या शुभ्र पिसांनी भरलेली पिले अन् त्याहूनही मोठी उदीमातकट पिसे फुटत असलेली पिले, हे सर्व पाहू शकत होतो.

प्रत्येक खेपेस मी माझ्या लपणात शिरू लागलो की पक्षी उडत असत. माझ्याबरोबर असलेला माझा मदतनीस मुलगा नंतर दूर जात असे. मग पक्ष्यांना वाटे की मीच दूर गेलो; आणि ते परत येत. मोठे पूर्णपणे पसरलेले पंख अन् पडदे असलेले पाय पुढे झुकले जाऊन ते पक्षी हिंदकळणाऱ्या फांद्यांवर विसावले जात. नंतर वसाहती-तल्या प्रजननाच्या काळांतील पक्ष्यांचे नेहमीचेच उद्योग चालू होत. काही अंडी उबविण्याकरिता त्यावर बसत तर काही छोट्या पिलांना खाणे–पिणे भरवू लागत.

एका फांदीवर मी दोन घरटी पाहिली. परंतु तेथे नेहमीच तीन पक्षी उतरताना दिसत. ज्या दोन पक्ष्यांची ती घरटी होती ते त्या तिसऱ्या “आगंतुक” पक्ष्याला नेहमीच टोचून हैराण करीत. ह्या तिसऱ्या पक्ष्याला कोणीच जोडीदार मिळाला नसावा. ह्या पक्ष्याची मला फारच दया आली. परंतु निसर्गात दुर्बल तसेच दुर्दैवी यांना मुळीच दया मिळत नाही.

पिलांना भरविण्याचे दृश्य अगदी पाहण्याजोगे होते. पाणकावळा व सर्वपक्ष्यांप्रमाणे हे पेलिकन पक्षी आपल्या पिलांना अर्धवट पचन झालेले मासे ओकून काढून भरवितात. पालक पक्षी फारच शांत– जवळजवळ त्याला बरेच वाटत नसल्यासारखा दिसतो. नंतर एखाददुसऱ्या उचकीबरोबर त्याच्या वशांत काहीसे आल्यासारखे दिसते; आणि मग पिलू अगदी हळुवारपणे आणि काळजीपूर्वक खाण्यामध्ये दंग होऊन जाते.

लवकरच पिलाचे डोके आणि मान किंबहुना अगदी छोट्या पिलाचे तर अर्धवट शरीरही पालक पक्ष्याच्या ह्या मांसल पिशवीत बुडून नाहीसे होते (छायाचित्र क्र.१२). काही वेळा तर एकाच वेळी दोनतीन छोटी पिले ह्या मांसल पिशवीत गडप होऊन हावरटासारखी बकाबक खात राहतात. त्यामुळे जादूगाराने तलवार गिळून टाकल्यासारखे वाटते. पालक पेलिकन पक्षी आपल्या पिलांची काळजी घेत असल्याचे प्रत्यक्ष पाहिल्यावर माझ्या लक्षात आले, की हे पेलिकन पक्षी आपल्या पिलांची काळजी घेण्यात अगदी दक्ष असतात.

इंग्रजांमध्ये पूर्वीच्या काळी राजेशाही वंशावळीचे चिन्ह म्हणून हा पक्षी घरट्यावर पंख पसरून उभा असून तो आपल्या रक्तावर पिलांचे पोट भरीत आहे असे होते.

त्याला “कर्तव्यदक्ष पेलिकन” असे शीर्षक देऊन गौरविले होते कारण पालक पेलिकन मनोभावाने हे काम करतात. हे पक्षी आपले रक्त भरवून पिलांना वाढवितात अशी एक पौराणिक कथा देखील आहे. ही

अनुक्रमणिका

गोष्ट, कदाचित् हे पक्षी अर्धवट पचविलेले अन्न पुन्हा ओकून काढून त्यावर पिलांना पोसतात, म्हणून आली असावी.

भारतात मी आणखी एक गोष्ट ऐकली आहे ती अशी की फार वर्षापूर्वी एकदा पालक पक्ष्याने पिले फार गडबड करतात म्हणून जोराने मारले; तर ते पिलू मरून गेले. ते पाहताच पालक पक्ष्याला अतिशय दुःख झाले व त्याने आपली छाती फोडून रक्त काढले व ते त्या पिलावर शिंपडून त्याचा प्राण परत आणला.

परंतु मी स्वतः ह्या पेलिकन पक्ष्यांना उत्तम किंवा पिलांच्या काळजीसाठी वाहून घेतलेले पालक असे काही नावाजणार नाही. कारण तुम्ही जर ह्या पक्ष्यांच्या वसाहतींतून फेरफटका केलात तर तुम्हाला कित्येक छोटी छोटी पिले जमिनीवर टाकून दिलेली दिसतील (छायाचित्र क्र.१०) आणि ही बिचारी पिले वरून कुठे एखादा माशाचा तुकडा पडलेला दिसतो का हे शोधत असताना दिसतात. एकदा ती घरट्यांतून खाली पडली की त्यांना स्वतःचे खाद्य स्वतःलाच शोधावे लागते. त्यांचे आईवडील त्यांची पुढे काहीच काळजी घेत नाहीत.

खाली पडणाऱ्या पिलांतील पुष्कळशी पिले तर मरूनच जातात किंवा कोल्ही—कुत्री त्यांना खातात. त्यांच्यापैकी मोठी झालेली काही पिलेच जगू शकतात.

बाभूळ व ताडामाडाच्या ज्या बहुतेक झाडांवर हे पेलिकन पक्षी वसाहत करून होते तेथे प्रत्येक झाडावर बारा बारा पंधरा पंधरा घरटी दिसत होती. कुठे कुठे तर ही घरटी एक दुसऱ्याला अगदी चिकटून असलेली दिसत होती, त्यामुळे फांदीवर मोठ्या मोठ्या मण्यांची माळच ओवल्यासारखी दिसत होती.

प्रत्येक घरट्यातील २।३ छोटी पिले हिंदोळत व खेळत त्यामुळे बऱ्याच वेळा ती एकमेकांत मिसळत. मी एकदा माझ्या लपणात जात होतो. तेव्हा मी मला मदत करणाऱ्या मुलाला बोलविले व त्याला ही एकमेकांत मिसळलेली पिले वेगवेगळी करून त्यांच्या त्यांच्या घरट्यांत ठेवायला सांगितली, कारण एव्हाना मला ती सर्व ओळखीची झालेली होती.

परंतु तो मुलगा गेल्याबरोबर लगेचच सर्व पिले पुन्हा एकमेकांत मिसळली. परंतु त्यांच्या आईवडिलांना मात्र घरट्यावर आल्यावर आपली पिले कोणती हे बरोबर माहीत असावेसे दिसते.

पेलिकन पक्षी जरी पुष्कळ मोठा आणि दिसावयाला कसातरी बेढब असा असला तरी तो एकदा उडता येण्याइतपत मोठा झाला की अगदी सहज सुंदरतेने उडू लागतो. पाय वरच्या बाजूस घेऊन डोके मागे पंखावर विसावून व मानेच्या पुढच्या भागावर चोच ठेवून तो उडू लागला की मोठा सुंदर दिसतो तो तेव्हा. अगदी थोड्या परिश्रमाने तो हवेत सहज तरंगू शकतो. प्रत्येक दिवशी मी हे पेलिकन पक्षी अनेकांच्या समूहाने हवेत गोल गोल घिरट्या घालत असत, ते पाहात असे. बहुधा नरमादी एकमेकांच्या पाठीमागे गोल गोल घिरट्या घालीत विहरत असतात. गिधाडे ज्याप्रमाणे अशा हवेच्या प्रवाहावर विहरत राहतात तसेच हे पक्षी देखील हवेच्या प्रवाहावर संथपणे विहरत राहतात. लवकरच ते पुष्कळ उंचीवर पोहोचतात.

मला वाटते पेलिकन पक्ष्यांच्या बाबतीत मी नवीनच काहीतरी शोधून काढले आहे. दर दिवशी साधारणतः२॥ ते ३॥ च्या दरम्यान मला असे दिसून आले की काही पेलिकन पक्षी असे समूहाने उंचावर

अनुक्रमणिका

घिरट्या घालण्याचे सोडून देत व मग स्वतःभोवतीच चक्रासारखे गोल गोल फिरत. नंतर मधूनच एकाएकी तो पक्षी हवेतल्या हवेत कसरती करू लागे. अंग मोडून, वळवून, गडगडत खाली आल्यासारखा तर कधी मधूनच पाण्यात सूर मारल्यासारखा – असे अनेक खेळ केवळ मनोरंजनाकरिता ते करीत असावेत.

त्या पेलिकन पक्ष्यांच्या वसाहतीत काही साध्या घारी व नेहमीचेच कावळे होते. परंतु त्याशिवाय तेथे मधूनच कितीतरी विटकरी पांढऱ्या रंगाच्या ब्राह्मणी घारी पेलिकन पक्ष्यांच्या तोंडातून खाली पडलेल्या माशांना पळविण्याकरिता सर्वत्र घोटाळताना दिसत होत्या.

पेलिकन पक्ष्यांची ही वसाहत म्हणजे पक्ष्यांचे अभयारण्य जरी नसले तरी तेथील रहिवासी पारंपारिकतेने येथे भेट देणाऱ्या पक्ष्यांना संरक्षण देऊन त्यांचे स्वागत करतात ही विशेष लक्षात घेण्याजोगी बाब आहे. राजस्थानमध्ये असलेले बिष्णोई पंथाचे लोक त्यांच्या आजूबाजूच्या वसाहतीतील वन्य पशुपक्ष्यांचे तर रक्षण स्वतः करतातच परंतु बाहेरील कोणालाही ते शिकार करु देत नाहीत. भारताच्या इतर भागांतील लोकही जर असे करु लागले, तर भारतातील वन्यजीवनाची इतकी दुर्दशा होणार नाही.

अनुक्रमणिका

## प्रकरण ४ थे

# भरतपूरमधील पक्षी

अलिकडच्या काळात भारतात वन्यपशूंचे संरक्षण करण्याची थोडी का होईना परंतु लक्षात येण्याजोगी जाणीव निर्माण होऊ लागली आहे; आणि ह्याचे एक चांगले प्रतीक म्हणजे पाणथळ जागी विणीच्या हंगामात दिसून येणाऱ्या पक्षांच्या अनेक वसाहती. ह्यांपैकी एकेक वसाहत म्हणजे अनेक जातीच्या असंख्य पक्ष्यांचे एरव्हीचे तसेच विणीच्या हंगामातील नैसर्गिक सहजीवनाचे प्रतीक.

उदाहरणार्थ, अलीकडेच कलकत्त्यापासून दक्षिणेकडे ७० मैलावर सुंदरबन येथे जलपक्ष्यांची एक मोठी वसाहत दिसून आली आहे. ह्या जागेला ‘साजनकली’ असे म्हणतात. ही जागा आता अभयारण्य म्हणून ओळखली जाते. जून, जुलै व ऑगस्ट ह्या विणीच्या हंगामात येथे १५००० पक्षी दिसून येतात असे म्हणतात. परंतु भारतातील अतिशय प्रसिद्ध असे पक्षी अभयारण्य भरतपूरपासून २ मैल अंतरावर आहे. भरतपूर हे राजस्थानमध्ये असून ते दिल्ली च्या दक्षिणेस १०० मैलांवर आहे. या अभयारण्याचे नाव केवलादेव घाना असे आहे. ज्यांच्या हे अभयारण्य ओळखीचे आहे ते याचा उल्लेख ‘घना’ असाच करतात. परंतु ज्यांना भारताची माहिती नाही त्यांना ह्याच्या उच्चारावरून ते आफ्रिकेमधील “घाना” ह्या देशासारखेच वाटेल.

ही जागा पूर्वी भरतपूरच्या राजघराण्यातील सत्ताधाऱ्यांची जंगली बदके मारण्याची अशी राखीव खाजगी जागा होती. भारतातील अनेक सुप्रसिद्ध माणसे म्हणजे अगदी व्हाइसरॉय व त्याच्या हाताखालील बडे बडे अधिकारी येथे अगणित बदके व हंस मारीत असत.

१९१४ साली लॉर्ड हार्डीग्जच्या पार्टीने, म्हणजे एकूण ४९ बंदुकधाऱ्यांनी ४०६२ पक्षी मारले होते. १९१६ च्या नोव्हेंबरमध्ये लॉर्ड चेम्सफोर्डच्या शिकारीत ५० बंदुकधारींनी ४२०६ पक्षी मारले होते. १९३८ च्या नोव्हेंबरमध्ये जेव्हा तेथे लॉर्ड लिन्लियथगो होता तेव्हा ४१ बंदुकींनी ४२७३ पक्षी मारले. ही शेवटची नोंद बहुधा अत्युच्च असावी.

महाराजाने अजूनही, जेथे १५ हून अधिक जातींची स्थलांतरित बदके आणि दोन जातीचे स्थलांतरित हंस पक्षी दरवर्षी हिंवाळ्यात येतात, त्या भागात पक्ष्यांची शिकार करण्याचे हक्क राखून ठेवले आहेत. पेलिकन आणि सैबेरीयन क्रौंच जातीचे पक्षीही तेथे हिंवाळ्यात येतात.

परंतु त्याशिवाय वर्षाच्या इतर महिन्यांत म्हणजे जुलै ते ऑक्टोबरच्या दरम्यान येथे भारताच्या वेगवेगळ्या भागांतून स्थानिक पक्षीही घरटी बांधण्यास जमतात. घाना हे पाणथळ ठिकाणी दिसून येणाऱ्या पक्ष्यांचे अभयारण्य आहे.

प्रत्येक वर्षी ह्या पक्ष्यांच्या विणीचे यशापयश पावसाच्या पाण्यावर, तसेच पाणी धरणात साचवून पाटाने वेगवेगळ्या भागांतून खेळविलेल्या पाण्यावर अवलंबून असते. अलिकडे हे पाणी मुबलक असल्यामुळे हजारो पक्ष्यांना येथे येऊन घरटी बांधून आपली प्रजा वाढविता येते. ह्याकरिता सालीम अली,

[सालीम अलींची “दी बुक ऑफ इंडियन बर्डस्” आणि “इंडियन हिल बर्डस्” (१९४९) अशी दोन फारच चांगली पुस्तके आहेत. दी बुक ऑफ इंडियन बर्ड्स्ची सहावी आवृत्ती १९६१ मध्ये निघाली. त्याचसारखे “दी बुक ऑफ इंडियन ॲनिमल्स्” हे एस.एच. प्रेटर यांचे पुस्तक सध्या उपलब्ध नाही. परंतु त्यांची सुधारित आवृत्ती बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी प्रकाशित करण्याच्या मार्गावर आहे. (ह्या पुस्तकाचे ४ थे प्रकाशन १९८०पासून

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीमध्ये उपलब्ध झाले आहे.] राजस्थानचे महाराज आणि वनखाते यांनी केलेल्या अविरत प्रयत्नांचे आभार मानले पाहिजेत.

मी नेहमीच घाना हे नाव "सालीम अली" यांच्याबरोबर लक्षात ठेवतो; कारणते केवळ भारताचे एक अग्रगण्य पक्षीशास्त्रज्ञ नाहीत तर त्यांनी विशेषतः हे अभयारण्य निर्माण करण्याकरिता तसेच त्याच्या संरक्षणाकरिता फारच कष्ट घेतले आहेत. सप्टें. १९५७, १९६१ व १९६३ ह्या तीन वेळा मी जेव्हा तेथे होतो तेव्हा मला त्यांच्याबरोबर तेथे राहण्याची संधी मिळाली होती. १९५७ मध्ये आम्ही सिंगापूरचे पक्षीशास्त्रज्ञ व उत्तम पक्षीछायाचित्रकार श्री. लोक-वान-थो यांच्याबरोबर तेथील आतिथ्यशील महाराजांचे पाहुणे होतो. १९६१ व १९६३ मध्ये आम्ही अभयारण्याच्या विश्रांतिगृहात होतो. हे विश्रांतिगृह म्हणजे तेथे घरटी बांधून राहाणाऱ्या पक्ष्यांना जवळून पाहता येण्यासाठी महाराजांनी राज्यसरकारच्या वनखात्याला दिलेली भेट होय.

१९५७च्या माझ्या भेटीत श्री. लोक-वान-थो हे कॅमेरा व पक्ष्यांचे छायाचित्रण यांवर बरेच काही बोलले; ते मी काळजीपूर्वक ऐकले कारण ते निश्चितच जगातले एक अतिशय उत्तम पक्षीछायाचित्रकार आहेत. आणि त्यांनी भारतात सालीम अलींच्या बरोबर बरेच काम केलेले आहे. ३५ मि.मि. पेक्षा मोठा कॅमेरा वापरणे केव्हाही चांगले असते असे ते बोलल्याचे मला आठवते. कारण भ्रामक प्रतिमा जितकी मोठी तितके त्यातले बारकावे मोठे केल्यावर उठून दिसतात.

मी ३५ मि.मी. चा कॅमेरा १३५ मि.मी. व २०० मि.मी. च्या दूरपल्ल्याच्या भिंगाबरोबर; तसेच २·२५ × २·२५ इंचाचा कॅमेरा २५० मि.मी. च्या दूरपल्ल्याच्या भिंगाबरोबर असे दोन्ही कॅमेरे वापरीत असे. आपण कुठच्या प्रकारचे छायाचित्रण करीत आहोत त्यावर अवलंबून दोन्ही प्रकारच्या कॅमेऱ्यांबद्दल पुष्कळसे काही सांगता येईल.

प्रत्येक "पीस न् पीस" असेही काहीसे ते म्हणत असल्याचेही मला आठवते. बहुधा तेच त्यांचे ध्येय असावे आणि त्यांच्या छायाचित्रणांतून ते उठून दिसत असे. मी जेव्हा त्यांच्याबरोबर होतो तेव्हा ते प्रदर्शनाकरिता पांढऱ्या शराटी पक्ष्यांचे फोटो गोळा करण्याच्या प्रयत्नांत होते. ह्याकरिता सर्व बारीकसारीक बारकावे देखील बरोबर असावे लागत हे त्यांनी तीन दिवस पक्ष्यांच्या घरट्यांजवळ एकही छायाचित्र न घेता त्यांच्या लपणात बसून काढले त्यावरून दिसून येते. चौथ्या दिवशी मात्र सर्व काही व्यवस्थित जमून आले आणि त्यांनी तीस चाळीस छायाचित्रे घेतली. केवढी अनुकरणीय चिकाटी!

सालीम अली हे सडसडीत यष्टीचे वयस्क गृहस्थ आहेत. आता त्यांचा चेहरा व्यवस्थित, पांढऱ्या शुभ्र दाढीखाली लपलेला आहे. अशा प्रकारच्या भटकंतीवर निघताना ते फारच उपयुक्त वाटतात. कारण ते जेव्हा बरोबर असतात तेव्हा आपल्याला त्यांच्या अतिशय उत्तम अशा पुस्तकात, आपण कुठचा पक्षी पाहिला किंवा त्याचे आणखी वर्णन पाहाण्यासाठी, उगाचच डोकावायला नको. त्यांची तीव्र स्मरणशक्ती आणि भारताच्या सर्व कानाकोपऱ्यांतील अनुभव आपल्याला सर्व उत्तरे आणि त्याबरोबर आणखी काही माहिती ताबडतोब पुरवतील.

सालीम अली भारताचे अग्रगण्य पक्षीशास्त्रज्ञ तर आहेतच याशिवाय ते एक अतिशय अनुभवी असे निसर्गप्रेमी असून त्यांनी भारतातील सर्व प्रमुख महत्त्वाच्या वन्यप्राण्यांचे निरीक्षण करून त्यांची छायाचित्रे व

अनुक्रमणिका

चलत्चित्रे देखील घेतलेली आहेत. त्यांनी वेगवेगळ्या राज्यांतील वन्यप्राण्यांचा अभ्यास करण्यासाठी अनेक दौरे केलेले असून ते सध्या बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपाध्यक्ष आहेत. प्रस्तुत पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वीच ते अध्यक्ष झाले होते. व २० जून १९८७ मध्ये ते निवर्तले.

अभयारण्यात पुष्कळ आडवे तिडवे रस्ते आणि बांध आहेत, आणि तेथून पक्षीनिरीक्षण सहज करता येते. परंतु ज्यांना पक्षी व त्यांची घरटी यांचे जवळून निरीक्षण व छायाचित्रण करावयाचे असेल त्यांच्याकरिता छोट्या, उथळ लोखंडी नावा व त्या चालविणारे नावाडीही उपलब्ध आहेत.

सकाळच्या प्रहरी त्या अभयारण्यांत अशा प्रकारे होडीतून भटकंती करणे हा एक खरोखर अविस्मर-णीय अनुभव आहे. सकाळी सर्वत्र थंडगार असते; आणि सकाळच्या रुपेरी सूर्यकिरणांमुळे सर्वत्र दंवबिंदू नवरत्नांप्रमाणे चकाकत असतात. होडी पाण्यातून जात असताना पाणगवत कापीत जाते.

अधूनमधून पाण्यावर पाणगवत मुळीच दिसत नाही. अशा ठिकाणी गुलाबी, फिकट जांभळ्या, पांढऱ्या शुभ्र, किंचित् पिवळसर अशा अनेक जातींच्या व रंगाच्या कमलिनी फुलांनी भरून गेलेल्या दिसतील. नितळ पाण्याच्या पृष्ठभागावर आणखीही दुसरी पांढरी, पिवळी छोटी फुले हिरव्या दोऱ्यांमध्ये एकमेकात मण्यांसारखी ओवल्याप्रमाणे चकाकत असतात.

या नाजुक आणि विरळ जलवनस्पतींमध्ये पाणकोंबडी, चांदवा, पाणडुबी, जलकपोत अशासारखे स्थानिक पक्षी खाद्याकरिता येतात. तर काही पक्षी केव्हा केव्हा घरटी बांधतात.

जलकपोताचे पाय व त्याची बोटे फारच लांब व निमुळती असतात. त्यामुळे त्याला पाण्याच्या पृष्ठ-भागावर असलेल्या पाणवनस्पतीच्या पानांवरूनही सहज चालता येते. ती पक्ष्याचे वजन सहज पेलू शकतात.

ह्या सर्व देखाव्याची शांतता भंग करतो तो फक्त होडीचा पाण्यातून जाताना होणारा आवाज आणि दूरवरून पक्ष्यांच्या घरट्यातून येणारा सामुदायिक आवाज.

ह्या ठिकाणी जवळून खरोखर चांगले छायाचित्रण करावयाचे असल्यास वापरावयाचे तंत्र म्हणजे दोघे मदतनीस घेऊन अशा दोन होड्या घ्याव्यात. आपल्याला ज्याचे छायाचित्र घ्यावयाचे ते झाड व त्यावरील घरटे निवडावे. त्या ठिकाणी सूर्यप्रकाश दिवसा तसेच दुपारी केव्हा येईल ते व आणखीही इतर गोष्टींचा नीट विचार करून एका होडीवर आपले लपण नीट उभारावे.

होडी नांगरण्यासाठी वापरण्यात येणारी बांबूची डोलकाठी, जी पाण्याखाली जमिनीवर तीन चार फुटांवर रोवून ठेवली जाते, तीच काठी लपण बांधून ठेवण्यास उपयोगी पडते. नंतर तुम्ही आपली सर्व साधनसामुग्री घेऊन आत बसल्यावर घामाघूम होऊन निघता आणि बरोबरचे दोघेजण दुसरी होडी घेऊन निघून जातात.

तुम्ही त्यांना कुठपर्यंत दूर जावयाचे व तुम्ही कोणत्या प्रकारचा इशारा दिल्यावर तुम्हाला परत घेण्यासाठी त्यांनी यावयाचे त्या सर्व सूचना देऊन ठेवाव्यात. माझ्याकडे कॅमेऱ्याचे सर्व सुटे भाग गुंडाळून


अनुक्रमणिका

ठेवण्यासाठी दोन रंगांची कापडे असत. मी लाल कापड काढून घरट्यांतील पक्ष्यांना दिसणार नाही, परंतु त्या माणसांना बरोबर दिसेल अशा बेताने लावले त्यांना समजे की होडी घेऊन त्यांनी अजून दूर जावयाचे आहे. हिरवे कापड लावले की त्यांनी होडी माझ्या दिशेने आणावयाची. कुठलेच कापड नसले की त्यांनी असलेल्या जागीच थांबावयाचे.

माझी ही पद्धत फारच चांगली उपयोगी पडली. जर केव्हा पक्षी छायाचित्रणाकरिता चुकीच्या दिशेने बसलेला असेल किंवा त्याचे डोळे मिटू लागले की मी हिरवे कापड उभारीत असे; म्हणजे माझे मदतनीस होडी माझ्या दिशेने आणू लागत; आणि त्यामुळे पक्षी लगेच सावध होत. ताबडतोब मी त्याचे छायाचित्र घेई व हिरवा कपडा काढून टाकीत असे. होडी तेथेच राही पुन्हा जरुरी वाटल्यास लाल कपडा लावला की होडी दूरवर परतत असे.


माझ्याबरोबर दोघेजण असत. एक मी आसाममधून माझ्याबरोबर आणलेला ‘हरकाम्या’. तो दलदलीच्या प्रदेशातच राहिलेला असल्यामुळे उत्तम नावाडी होता. दुसरा माणूस तिथल्या विभागीय अधिकाऱ्याने मला नावाडी म्हणून दिलेला होता. परंतु त्याने पूर्वी कधी होडी चालविली होती की नाही त्याबद्दल मला शंकाच होती. कारण त्याला होडीचे चाक काय किंवा शीड काय याचा काहीच पत्ता नव्हता; पण एक गोष्ट खरी की तो मनमिळावू व काम करण्यास आनंदी व तत्पर होता.

अनुक्रमणिका




१. सूर्यास्ताने न्हाऊन निघालेला हा गेंडा देखील सोनेरी रंगाचा दिसतोय

अनुक्रमणिका




२. उन्हापासून संरक्षण मिळण्याकरीता नर रंगीत करकोचा पंख पसरुन घरट्यावर उभा आहे. वरच्या फांदीवर पाणकावळा दिसत आहे.

अनुक्रमणिका



३ सारंग पक्षी त्याच्या घरट्यावर दिसत आहे.

अनुक्रमणिका



**४. सांबर वरच्या छायाचित्रात गायबगळा गर्भवती मादीच्या पाठीवर बसलेला दिसत आहे. खालच्या छायाचित्रात नर सांबरांचा कळप दिसत आहे.**

मला खात्री आहे की जमिनीवरील वाहनांची त्याला काहीही माहिती नसावी. त्या दोघांमध्ये सोप्या हिंदीत पुढीलप्रमाणे संभाषण झाले.

“माझा गुडघा जखमी झाला आहे. तो बराच होत नाही.” नावाडी – ज्याला बोटीची काहीएक माहिती नव्हती तो पायाकडे बोट दाखवून म्हणाला. माझा होडी चालविण्यात कुशल असलेला हरकाम्या म्हणाला की, “मग तू डॉक्टरसाहेबांकडे काही तरी औषध माग.” मी विचारले, “कोणते डॉक्टर साहेब”? “सालीम अली डॉक्टर साहेब” माझा हरकाम्या म्हणाला. मी त्यांना सांगितले, “सालीम अली साहेब

अनुक्रमणिका

पक्ष्यांचे डॉक्टर आहेत. औषधांचे नाहीत." नंतर मी माझ्या चहाच्या मळ्यांतील ३० वर्षांच्या कालावधीतील अनुभव आठवून मळ्यांतील डॉक्टर, दवाखाने यावर बोलू लागलो; आणि मलाही औषधांची बरीच माहिती असल्याचे सांगितले. तू माझ्याकडे नंतर ये म्हणजे मग तुझ्या गुडघ्यासाठी औषध देईन असे मी त्याला सांगितले.

नंतरच्या चार दिवसांत माझ्या खोलीच्या बाहेर गरम पाणी, जंतुनाशके, जखमेवर बांधण्याकरिता पट्टी इत्यादी घेऊन तो नावाडी तेथे उभा होता; आणि खरोखरीच जादूसारखा परिणाम दिसून आला, म्हणावयाला हरकत नाही. त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून मला समाधान वाटले. माझ्यावरील त्याची श्रद्धा अगदी आश्चर्य वाटण्याजोगी होती. पाचव्या दिवशी त्याने मोठ्या आनंदाने तो बरा झाल्याचे जाहीर केले- मला वाटले तो ५० टक्केय खरोखर औषधाने आणि ५० टक्के मानसिक उपचाराने बरा झाला असावा. मला देखील त्यामुळे फार बरे वाटले.

मी बहुधा प्रत्येक संध्याकाळी माझी होडी व लपण दुपारच्या छायाचित्रणानंतर तेथेच लावून ठेवीत असे त्यामुळे सर्व रात्रभर व पहाटे देखील पक्ष्यांना त्याची सवय होण्याकरिता भरपूर वेळ मिळत असे. अशी व्यवस्था केल्यामुळे प्रत्येक वेळी माझे दोन्ही मदतनीस दूर निघून गेले की पक्षी लगेचच घरट्याकडे परतत.

लोखंडी होडीत अन् त्या लपणात बसण्याने उन्हाचा कडाका आणि हवेतील आर्द्रता ह्या गोष्टींचा फारच त्रास होई. मी एखादा मिनिटभर छायाचित्रण करी आणि दुसऱ्या मिनिटाला बाहेर येऊन टॉवेलने घाम पुसून घेई. इतका घाम आत येत असे.

लपणाबाहेरील शुद्ध आणि थंड हवेमध्ये आले की कसे सुटल्यासारखे वाटे. बाहेर नेहमीच गार झुळूक येत असे.

पक्षी त्यांच्या पोटाच्या उद्योगाकरिता आतबाहेर करीत व आपल्या पिलांची काळजी कशी घेत ते मी त्या पक्ष्यांच्या नकळत अगदी जवळून पाहू शकत असल्यामुळे मी लपलेलो असतानाची अप्रसन्नता पूर्ण नाहीशी होत असे. माझ्या लपणाच्या समोरील व बाजूच्या खिडक्यांतून मी चारपाच जातीचे पक्षी जवळून पाहू शकत असे. माझा तिवईवर अडकवून ठेवलेला एक कॅमेरा जरी एका ठराविक घरट्याच्या दिशेने टांगून ठेवलेला असला तरी माझ्या दुसऱ्या कॅमेऱ्याने मी जवळपासच्या दुसऱ्या पक्ष्यांची घरट्यांवर असताना छायाचित्रे घेऊ शकत होतो.

आणि वेगवेगळ्या जातीच्या पक्ष्यांची रंगीत व साधी छायाचित्रे घेण्याशिवाय मी मधूनमधून थोडी विश्रांती घेऊन ते पक्षी त्यांच्या वागण्याच्या तऱ्हा यांच्या निरीक्षणाचा स्वादही घेऊ शकत होतो.

वानगीदाखल एक उदाहरण देतो. तेथील फारच सुंदर रंगाची आणि रेखीवपणे विंचरलेल्या पिसांची एक रंगीत करकोच्याची जोडी पाहून माझे फारच मनोरंजन झाले. त्यांचातील एक तो बहुधा नरच असावा- तो घरट्याच्या काठावर मोठ्या ऐटीत काहीएक काम न करता उभा होता. मात्र मधूनच तो स्वतःची पिसे विंचरून सारखी करीत होता. आणि दुसरा त्याचा जोडीदार-बिचारी पक्षीण-जवळजवळ तासभर घरट्याची डागडुजी व आतील व्यवस्था करण्यात गुंतली होती - नंतर ती अंड्यावरही ते उबविण्याकरिता बसली. (रंगीत छायाचित्र पान क्र. २)

मी हे सुंदर रंगीत करकोचे वेडन्थांगल येथे पाहिलेले नाहीत. परंतु त्यांच्या काही जोड्या अलीकडे नव्या दिल्लीचतील प्राणी संग्रहालयात त्यांची वीण वाढविण्याकरिता नेण्यात आल्या आहेत.

चमचा पक्ष्याची (स्पूनबील) जोडी (छायाचित्र क्र. १६) त्यांच्या रिकाम्या घरट्यावर काहीही हालचाल न करता उभी होती. त्याच्याकडे पाहिल्यास असे वाटत होते की ते आता काही तरी कल्पना डोक्यात येते का त्याची वाट तरी पाहात असावेत किंवा आता काही घडणार तरी असावे. आणि खरोखरीच काहीतरी घडले. दुसऱ्या दिवशी त्या घरट्यात एक अंडे होते.

दुसरा "चमचा" पक्षी त्याच्या घरट्यावर बसून अंडे उबवीत होता. त्याच झाडावर तीन फूट खाली एक "छोटा बगळा" त्याच्या घरट्यावर होता. प्रत्येक वेळी जर एखादा पक्षी थोडासा जरी हलला तरी दुसरा प्रक्षोभित होऊन त्याचा डोक्यावरील तुरा वगैरे फुलवून सर्व दिशांनी टवकारून पाहू लागे. "चमचा" पक्षी त्याच्या डोक्यावरील तुरा फुलविलेला असताना पाहावयाला फारच मजेशीर वाटतो.

आणखी दुसरा "चमचा" त्याचा तुरा फुलवून उभा होता. सूर्याच्या उन्हापासून संरक्षण व्हावे म्हणून मोठ्या प्रयासाने त्याने त्याचे पंख आणखी पसरवून अंड्यांना पंखाखाली घेतले. केव्हा केव्हा त्याचा उपयोग न होता अंडी सूर्याच्या प्रखर किरणांच्या तिरीपेखाली येत असत.

छोटे बगळे (छायाचित्र क्र.१५) त्यांच्या विणीच्या हंगामात डोक्यावर उगविलेल्या तुऱ्यामुळे व मऊशार पिसांमुळे प्रखर सूर्यप्रकाशात फारच लोभसवाणे दिसत. अंडे उबवीत असताना दोघे एकमेकांना मधून मधून बाहेर उठून जाण्याची संधी देत असत. सर्व पिसे फुलवून नंतर खाली करून दाखविणे ही बहुधा त्यांची एकमेकाला भेटण्याची तऱ्हा असावी.

त्या सर्व पक्ष्यांमध्ये उदी रंगाचे हेरॉन जातीचे बगळे उडताना व त्यांच्या घरट्यावर परतताना सर्वात जास्त उठावदार वाटत. जांभळे हेरॉन (वंचक) (छायाचित्र क्र.१३) जास्त रंगीत असले तरी त्यांना फारसा तुरा नसतो आणि ते फारच दक्ष असतात. रातबगळे त्यामानाने लहान असून त्यांना खूप लांब पांढरी शेंडी असते आणि त्यांचे डोळे लालभाडक असतात. करढोक ऊर्फ सर्पपक्ष्याची (स्नेकबर्ड) मान खूप लांब व निमुळती असून ती इंग्रजी S या आकाराची असते. निमुळते डोके व भाल्याच्या आकाराची चोच, सर्वच निमुळते; त्यामुळे पाण्याखाली पोहण्याकरिता व मासे पकडण्याकरिता फारच अनुकूल. ते त्यांच्या छोट्यांना पेलिकन पक्ष्यांप्रमाणे व पाणकावळ्यांप्रमाणेच भरवितात. छोटी पिले आईवडिलांच्या घशात खोलपर्यंत माना घालून अर्धवट पचविलेले अन्न (मासे) काढून घेतात.

याउलट उघड्या चोचीचे करकोचे अर्धवट पचविलेले मासे ओकून काढतात व त्यांची पिले नंतर घरट्याच्या तळाशी पडलेले ते मासे बकाबक खातात.

प्रसंगोपात मला येथे सांगावेसे वाटते की उघड्या चोचीच्या करकोच्यांच्या चोची उघड्या आणि बाकदार का असतात, त्याचे गूढ अजून कोणालाच उकललेले नाही. ते जास्त करून गोगलगाई खातात आणि भारतातल्या काही भाषांमध्ये या पक्ष्याला "गोगलगाई फोडणारा" अशा अर्थाचे नाव आहे; परंतु दुसरेही काही पक्षी आहेत की जे गोगलगाई खातात, परंतु त्यांच्या चोची उघड्या व बाकदार नाहीत.

प्रत्येक वेळेस मी जेव्हा त्या जागेपासून माझे लपण व होडी घेऊन दूर जाई तेव्हा थोड्या दूरवर जाऊन पक्षी पुन्हा तेथे कसे येतात हे पाहण्यासाठी थांबून वळून पाहात असे. मी त्या पक्ष्यांचे छायाचित्रण करीत असताना केलेल्या हालचालींमुळे पक्ष्यांना फारसा त्रास झालेला नव्हता हे पाहून मला सुटल्यासारखे वाटे. मी हे छायाचित्रण करीत असल्यामुळे काही घरटी उद्ध्वस्त झाली असतील असे मला वाटत नाही.

पहिल्या वेळेस घाना येथे सालीम अली उघड्या चोचींच्या करकोच्यांच्या छोट्या पिलांच्या पायात कड्या अडकवीत असताना मी त्यांच्याबरोबर होतो. 'लुखीया' नावाचा एक वनरक्षक त्यांना मदत करीत होता. बहुधा पूर्वीच्या जमान्यात तो मोठ्या वन्यपशूंच्या शिकारीवर कोणा मोठ्या फक्त इंग्रजी जाणणाऱ्या अधिकाऱ्यांबरोबर गेला असावा; व तो अधिकारी पुन्हा पुन्हा "लुक हिअर" अशा प्रकारे त्याला बोलाविण्याकरिता पुन्हा पुन्हा ओरडला असावा म्हणून त्याला "लुखीया" हे नाव चिकटले असावे.

१९४७ च्या सप्टेंबरमध्ये एका उघड्या चोचीच्या करकोच्याच्या पायात कडे अडकविलेले होते. तो चार महिन्यांनंतर उत्तर प्रदेशात जवळजवळ ३५० मैल दूरवर दिसून आला. दुसरा एक १६ महिन्यानंतर बिहारमध्ये ५१० मैल अंतरावर दिसून आला.

१९६१ मध्ये घानाला दिलेल्या माझ्या भेटीच्या वेळी सालीम अली छोट्या स्थलांतरित पक्ष्यांना पकडून त्यांच्या पायात कड्या अडकविण्याच्या कामाकरिता आलेल्या तुकडीचे नेतृत्व करीत होते. स्थलांतरित पक्षी अशा प्रकारे स्थलांतर करीत असताना काही रोगांचे जिवाणू आपल्याबरोबर वाहून आणतात का, ते तपासून पाहण्याकरिता 'वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन' व 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' तर्फे एकत्र आयोजित करत असलेल्या वसंत व शिशिर ऋतूंतील कामाचा तो एक भाग होता.

रशियांतील काही भागांमध्ये दिसून येत असलेल्या एक प्रकारच्या जिवाणूंमुळे होणाऱ्या रोगासारखाच रोग म्हैसूर राज्यातील अरण्यामध्ये दिसून आला आहे. ह्या रोगामुळे मानव व माकडे ह्या दोघांनाही फार अपाय होण्याचा संभव आहे. पकडलेल्या काही पक्ष्यांच्या शरीरावर काही बारीक गोचिड्या, उवा इ. सापडल्या असून त्या गोळा करून पुण्याला तपासणीकरिता पाठविण्यात आल्या आहेत. (परंतु इतक्या वर्षातील तपासणीवरून पाहाता आता सिद्ध झाले आहे की अशा प्रकारे कोणत्याही जंतूंचा प्रसार ते करीत नाहीत.)

पक्षी निरीक्षणांतील एक खास रमणीय दृश्य म्हणजे सारस पक्ष्याच्या जोडीचे प्रणयराधनेतील नृत्य (रंगीत छायाचित्र क्र. ३) मोठे पंख पसरवून ते खाली वाकून एकमेकांत अडकवून ते नाचतात – हे दृश्य पाहावयास खरोखर मनोहर व आल्हाददायक वाटते.

सारस पक्ष्याच्या जोड्या आयुष्यभर ठरलेल्या असतात; आणि ते एकमेकांशी फारच एकनिष्ठ असतात. त्यांच्या जोडीतला एक पक्षी मारला गेला तर उरलेला कित्येक आठवडेपर्यंत दुःखात बुडून जातो व एका बाजूला जाऊन रडत राहतो. ह्या भागात असाही समज आहे की तो स्वतः अन्नपाणी वर्ज्य करून एकप्रकारे स्वतःला शिक्षा करून घेऊन दुःखवेगाने मरून जातो.

अनुक्रमणिका

अशा प्रकारे भारतातील अनेक भागांत सुखी सांसरिक जीवनाचे प्रतीक असे समजल्या जाणाऱ्या ह्या पक्ष्याला लोकांनी जिव्हाळ्याच्या भावनेने संरक्षण दिले आहे. त्यामुळे ते गावकरी व इतर प्रवासी यांना न घाबरता खुशाल तेथे वावरतात.

घाना व त्याच्या परिसरात ह्या देखण्या पक्ष्याच्या कितीतरी जोड्यांची वीण होत असते. पाण्यामधील गवताचे ढिगारे व पालापाचोळा हे त्यांची अंडी पाण्याचे वर ठेवण्यास मदत करतात.

१९५७ व ६१ मध्ये दोन्ही वेळा मी त्यांची छायाचित्रे घेऊ शकलो. १९६१ मध्ये मी त्यांची जास्त छायाचित्रे घेण्यात यशस्वी झालो. कारण तेव्हा माझ्याकडे जास्त चांगली सामुग्री होती व लपणात राहण्याचीही मला चांगली सवय झाली होती.

बंधाऱ्यावर उभा राहून मी ह्या पक्ष्यांच्या एका जोडीचे निरीक्षण त्यांच्या घरट्यावर असताना केले. त्यांच्यातील एक पक्षी बसला होता तर दुसरा जवळपास खाणे शोधीत होता. एव्हाना अंडे उबवीत बसलेल्या पक्ष्याला थोडे मोकळे करण्याचा वेळ झाला होता; म्हणून बाजूला खाद्य टिपीत असलेला पक्षी घरट्यावर गेला.

अंडे उबवीत असलेला पक्षी उठला. सूर्याच्या प्रकाशांत फिकट गुलाबी रंगाचे अंडे चकाकले. दुसऱ्या अंड्यातून नुसतेच एक पिलू बाहेर आले होते.

सोनेरी पिवळ्या रंगाचे ते नुकतेच बाहेर आलेले पिलू घरट्याच्या आसपास फिरून बाहेरचे नवे जग पाहात होते. नंतर त्याने पाण्यात उडी मारली व जवळच असलेल्या उंच गवताच्या पुंजक्याकडे ते पोहत गेले.

त्या पिलाच्या आईवडिलांकडून काही धोक्याचा इशारा आल्याबरोबर ते पिलू जिथल्या तिथे स्तब्ध झाले अन् कुठे तरी लपून राहिले – निदान त्या पिलाला तरी वाटले की आपण लपलो आहोत. मला रस्त्यावरून ते सपशेल दिसत होते. कारण मी त्याला तिथे जाताना पाहिले होते. पाण्यातील गवतातून सहजपणे जाणाऱ्याच्या कदाचित् ते नजरेला पडू शकले नसते कारण ते हालचाल अजिबात करीत नव्हते. दुसरा पक्षी अंड्यावर ते उबविण्याकरिता बसला आणि पहिला दूर निघून गेला. त्याने छोट्या पिलाला बोलाविले. पिलू उठून त्याच्या पालकाबरोबर खाद्य शोधण्यासाठी निघाले – पिलाच्या आयुष्यातील हा खाद्य टिपण्याचा पहिलाच अनुभव!

दुसऱ्या दिवशी मी त्या घरट्यापासून सुमारे ४० फुटांवर माझे लपण ठेवले आणि नंतर ते सुमारे ३० फुटांवर आणले. मी छायाचित्रे घेण्याकरिता फूटभर पाण्यात तिच्यामध्ये लपून राहिलो. आत भयंकरच उष्मा होत होता. परंतु इथे ते काही मोठेसे संकट नव्हते. खरे संकट होते जळवांचे.

आता मला जळवांची सवय झाली. त्या विशेष काही उपद्रवी नाहीत. त्या फक्त तुमचे रक्तच शोषून घेतात. पूर्वीच्या काळात तर लोक आपले रक्त कमी करण्याकरिता खूप पैसे देऊन आपल्या शरीराला जळवा डसवून घेत असत. त्या सोडविण्याचे किंवा त्यांना ओरबाडून काढण्याची खरी कला आहे. त्या

जागेवर नुसते मीठ चोळले तरी त्या सहज निघून येतात. त्यामुळे त्या पटकन् मरतात. आणि घरी आल्यावर सर्व अंगावर काही जंतूनाशक द्रव्य चोळले की सर्व काही ठीक होते.

ह्या जळवा पाण्यात चांगल्या पोहू शकणाऱ्या होत्या. त्यासाधारणतः लेखणीपेक्षा थोड्या मोठ्या असाव्यात – अर्थात हा आकार त्या तुमचे रक्त पिऊन फुगण्याअगोदर. मी एक मिनीट त्यांना ओढून दूर फेकण्यात घालवीत असे व दुसऱ्या मिनिटाला माझा कॅमेरा व्यवस्थित बसवून छायाचित्र घेत असे; आणि मेजवानीकडे परत येण्यात जास्त वेळ न दवडता पुन्हा आलेल्या जळवेला ओढून काढण्यात पुढचे मिनीट जाई.

माझ्या छायाचित्रणाचे काम सोपे व्हावे म्हणून मी एका माणसाला बोलाविले. तो पाय दुमडून खाली बसून माझ्यावरील व त्याच्या स्वतःवरील जळवा ओढून काढून टाकीत असे आणि मी छायाचित्रणाच्या कामात मग्न होई.

पाणी स्वच्छ व थोडेसे गरम होते आणि माझ्या कामाचे प्रयत्न इतके फलदायी होते की मला ही सर्व विघ्ने विशेषशी जाणवली नाहीत.

पाणकावळे खाद्य खात असताना निरीक्षण करणे फारच मनोरंजक आहे. (छायाचित्र क्र. १६) ते पाण्यावर तरंगत राहतात. परंतु बदकापेक्षा त्यांचे पुष्कळसे शरीर पाण्याखाली असते. त्यांची फक्त मान व खांदे तेवढेच बाहेरून दिसतात. ते फारच सफाईदारपणे सूर मारतात व पोहतात. छोटे खेकडे, बेडकांची पिले, छोटे बेडूक, मासे अशी त्यांची सर्व शिकार ते पाण्याखाली करतात. छोटा पाणकावळा भारतात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. मोठे व मध्यम आकाराचे पाणकावळे थोड्या कमी प्रमाणात दिसतात.

ह्या भागात मोर तर सर्वत्र आहेत; आणि नर तर दिवसा व रात्री त्यांच्या मियूँ..... मियूँ..... अशा ओरडण्याने आपले अस्तित्व जाणवून दिल्याशिवाय राहात नाहीत. पश्चिम, मध्य व उत्तर भारताच्या बऱ्याचशा भागांमध्ये त्यांना कायद्याने तर संरक्षण दिलेलेच आहे, परंतु तेथील लोकही धार्मिक भावना जपण्याकरिता त्यांना संरक्षण देतात. कारण मोर हा विद्यादेवी सरस्वती, युद्धाचा देव कार्तिकेय आणि योगबलाचे सामर्थ्य असलेला देव सुब्रमण्य यांचे वाहन म्हणून समजला जातो.

हे देखणे पक्षी पाश्चिमात्यांना नवीन असे असले तरी येथे पुष्कळ मोठ्या प्रमाणावर दिसतात आणि सुरक्षिततेमुळे लोकांना न घाबरता मोठ्या दिमाखाने इकडेतिकडे हिंडत असतात. खेड्यापाड्याच्या जवळ तर ते त्यांची घरटी देखील तयार करतात. भारताच्या ईशान्य भागात त्यांना कायद्याने संरक्षण दिले गेलेले नाही आणि ते तेथे फारच तुरळक प्रमाणात आढळतात, परंतु लवकरच त्यांना इथेही कायद्याने पूर्ण संरक्षण दिले जाईल अशी आशा आहे.

इतिहासात अशी नोंद आहे की ग्रीसच्या अलेक्झांडरने भारतातून २०० मोर ग्रीसमध्ये नेले आणि तेथून पुढे ते पक्षी पश्चिम आशिया, उत्तर आफ्रिका, युरोप आणि बहुधा अमेरिकेतही पसरले गेले. मोगल राजे ह्या पक्ष्याच्या अप्रतिम रूपावर फारच भाळले होते आणि त्यावरूनच शहाजहानचे प्रसिद्ध सिंहासन मोराच्या आकाराचे बनविले गेले होते. या सिंहासनाची हात टेकण्याची जागा पाचूने मढविलेली असून तेथे दोन मोरांचा आकार दाखविण्यात आलेला होता व त्याच्यावर जडजवाहीर जडविले होते. प्रसंगोपात इथे

अनुक्रमणिका

सांगण्यास हरकत नाही मोराचा अनेक डोळे असणारा भव्य पिसारा ही त्याची खरोखरची शेपटी नसून फक्त शेपटीवरची लांबलचक झालेली पिसे असतात. लांडोरींपढे नृत्य करताना मोर हा पिसारा उंच उभारून त्याला पंख्यासारखा आकार देतो. त्याच्या तुऱ्यावरील पिसांच्या टोकाला देखील पंख्यासारखा आकार असतो. ब्रह्मदेशात दिसून येणाऱ्या मोराच्या तुऱ्यावरील पिसे मात्र टोकदार असतात.

जंगलांतील मोर व वानरे ह्यांना वाघ किंवा बिबळ्या जंगलात शिकारीवर निघाला असल्याची प्रथम चाहूल लागते आणि ते मग जंगलांतील इतर वन्यप्राण्यांना ओरडून धोक्याचा इशारा देऊन ही मोठी श्वापदे शिकारीवर निघाली असल्याची वर्दी देतात.

दरवर्षी मोराचा पिसारा गळून पडतो व त्यांनी नवीन पिसारा फुटतो. गळलेली पिसे जमवून त्यांचे पंखे तयार केले जातात. बाजारात त्यांना भरपून मागणी असते.

एका संस्कृत श्लोकात "मोरांचा थवा ही देवांची स्तुती आहे" असे म्हटलेले आहे. आणि ह्या स्वप्नससुंदर व रंगीबेरंगी अशा देशात मोराला राष्ट्रीय पक्ष्याचा मान देण्यात आला आहे.

घानाच्या अभयारण्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथल्या कोरड्या भागांमध्ये काळवीट, चितळे आणि इतर काही वन्यप्राणीही दिसून येतात.

येथेच चितळ आणि काळवीट भटकत आणि खेळत बागडत असत. आणि येथेच "इला कॉफलर" हिने हरिणी व तिचे नुकतेच जन्मलेले पाडस यांचे छायाचित्र घेतले होते. मार्च १९५५ मध्ये तिचे इथेच दफन करण्यात आले. भरतपूरजवळ एका गावातील मेळ्याची छायाचित्रे घेत असताना तिला अपघात झाला होता व त्यामध्ये ती मरण पावली. सुरेश वैद्य यांच्या "दि जंगल लाईज अहेड" ह्या पुस्तकात तिची "भारतामधील कॅमेऱ्याने शिकार" ही कथा फारच चांगल्या रितीने चित्रित केली गेली आहे.

वन्यप्राण्यांची छायाचित्रे घेणाऱ्यांत ती जगप्रसिद्ध बाई होती आणि भारतामध्ये असताना तिच्या प्रवासाची आखणी करण्यात, तसेच वन्यप्राण्यांची छायाचित्रे घेणाऱ्याला येथे कोणत्या प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागते याबद्दलच्या सूचना मी तिला देऊन मदत करू शकलो, म्हणून मला अभिमान वाटतो.

अपघात घडण्याच्या महिनाभर अगोदर ती माझ्याबरोबर आसाममध्ये राहिली होती आणि मीच तिले गेंडे, रानरेडे, जंगली हत्ती आणि काझीरंगातील इतर वन्यप्राण्यांची ओळख करून दिली होती. मी तिचे धाडस व उत्साह; तसेच वन्यप्राण्यांचा एखादा वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग व्यवस्थित नीटनेटकेपणाने बसवून त्याची उत्तम छायाचित्रे घेण्याचे कसब, या सर्वांची फार प्रशंसा करतो.

परंतु 'ॲनिमल्स ऑफ आफ्रिका' ह्या पुस्तकापेक्षा 'ॲनिमल्स ऑफ इंडिया' हे पुस्तक तयार करण्यात तिला फारच अडचणी आल्या. मी तिला सांगितले की आफ्रिकेतील वन्यप्राणी संख्येने व विविधतेने फारच समृद्ध असून प्राणी दिवसा व रात्री दोन्ही वेळेस उघड्यावर उन्हामध्येही दिसून येतात, तर भारतातील वन्यप्राणी त्यामानाने कमी असून ते बहुधा दाट झाडाझुडुपात असतात व रात्रीच बाहेर पडतात.

या देशात आल्यावर प्रवासाच्या सुरुवातीलाच चिने मला म्हैसूरमधून एक पत्र लिहिले होते की, “इथले गवत फारच उंच आहे आणि इथली जंगले दाट आहेत आणि मला वन्यप्राण्यांची छायाचित्रे घेण्यात अजून तरी यश आलेले नाही. मला केव्हा केव्हा वाटते की मी माझे पुस्तक कसे पूर्ण करू शकेन?” तिने पोळ (वळू), घरगुती म्हशी, देवळातले माकड, सर्कशीतले प्राणी इ. तिच्या पुस्तकांत व्यवस्थितपणे घालून त्यांची तूट भरून काढली आहे.

तिने वन्यपशूपक्ष्यांवर फारच प्रेम केले. त्यांच्या संगतीत ती भरतपूरजवळ चिरनिद्रा घेत पहुडली आहे. घाना आणि तेथील पक्षी, विशेषतः त्यांच्या विणीच्या हंगामातील त्यांची उभारी, पाहण्याचे भाग्य तिच्या नशिबी नव्हते; तसेच ह्या दृश्यांद्वारे तिला तिच्या कल्पनाशक्तीमची व दयाळूपणाची ग्वाही देणारी सुंदर छायाचित्रे घेण्याचे अत्युच्च कसब दाखविण्याची संधी मिळाली नाही म्हणून मला तिच्याबद्दल सहानुभूती वाटते.

अनुक्रमणिका

**प्रकरण ५ वे**

## कान्हाचा बारासिंगा

भारताच्या नकाशाचा मध्य जर तुम्हाला कुणी दाखवायला सांगितला तर तुम्ही मध्य प्रदेशाच्या पठाराला स्पर्श कराल. हाच पूर्वीचा सेंट्रल प्रॉव्हिन्स.

येथे सातपुड्याच्या उंचसखल रांगा ३००० किंवा त्याहूनही अधिक फूट उंच आहेत. येथील अरण्ये फारच सुंदर व कठीण अशा साल वृक्षांची आहेत. ह्या लाकडाचा रेल्वेचे स्लिपर्स बनविण्याकरिता उपयोग करतात.

ह्या ठिकाणचे वैशिष्ट्य म्हणजे येथे विस्तीर्ण कुरणे आहेत. त्यांना मैदान असे संबोधितात. वेडेवाकडे गवताळ उतार; मधूनच इकडे तिकडे कुठेतरी ठिपक्यासारखी दिसणारी झाडे हे सर्व इंग्लंडमधल्या नैसर्गिक उद्यानांची आठवण करून देणारे आहे. हा अत्यंत सुंदर देखावा पूर्ण करण्यास फक्त हरणेच हवी आहेत आणि येथे हरणे तर आहेतच, कितीतरी – विशेष करून येथील अतिशय प्रसिद्ध अशा कान्हाच्या अभयारण्यात.

हे ९७ चौ. मैलांचे मैदान म्हणजे पूर्वीची राखीव अशी "बंजर व्हॅली." अर्ध्या शतकापूर्वी ही जागा वन्यपशूजीवनाने ओथंबिलेली होती. कान्हाच्या अभयारण्यातील मध्यभागीचे मुख्य मैदान ही भारतातील अशी जागा आहे की तेथे शाकाहारी आणि त्यांवर आपला उदरनिर्वाह करणाऱ्या मांसाहारी अशा दोन्ही प्रकारची जनावरे भर दिवसा देखील उघड्यावर दिसतील अशा आफ्रिकेतील भागांशी मिळती जुळती आहेत. फेब्रुवारी ते जूनच्या दरम्यान भारतीय स्वाम्प डिअर, चितळ, काळवीट आणि गवे – हे सर्व वन्यपशू एखाद्या चौ. मैलाच्या टापूतही दृष्टिपथांत येतात. जुलैमध्ये मात्र पावसाला सुरुवात होते आणि अभयारण्यांतून फरफटका करणे अशक्य होते, म्हणून ते प्रवाशांकरिता बंदच होते.

आफ्रिकेतल्यासारखीच येथेही लक्षात घेण्यासारखी विशेष मनोरंजक गोष्ट अशी की जोपर्यंत तुम्ही तुमच्या जीप किंवा मोटर गाडींमध्ये आहात तोपर्यंत पशू तुमची दखलही घेत नाहीत. तुमचे वाहन तुम्ही अगदी जवळपर्यंत नेऊ शकता. परंतु एकदा का तुम्ही खाली उतरून पायी चालू लागलात की ते वन्यपशू दूर गेलेच म्हणून समजा.

कान्हाच्या अभयारण्यास नोव्हेंबरच्या सुरवातीपासून पुढे भेट देण्यास वेळ योग्य म्हणावी लागेल. कारण तेव्हा पाऊस संपून रस्ते सुकू लागतात. मी तेथे ऑक्टोबरच्या शेवटच्या आणि नोव्हेंबरच्या पहिल्याच आठवड्यात होतो. हिवाळ्यापूर्वीची सुंदर रंगसंगती पाहून मी फारच प्रफुल्लित झालो. पिवळट होत आलेल्या गवतापलीकडे सोनेरी, तांबडट तपकिरी रंगाची झाडे होती व त्याही पलीकडे हिरवेगार रसरशीत, पानांनी गर्द ङरलेले असे साल वृक्ष होते.

मी तेथे जेव्हा एप्रिलमध्ये होतो तेव्हा पिवळे गवत सुकून गेले होते; काही अर्धवट खाल्लेले होते तर काही ठिकाणी जमिनीचा कस वाढविण्याकरिता वनखात्याच्या लोकांनी ते जाळलेले दिसत होते. नवीन गवताचे कोवळे कोंब कुठे फुटत असल्याची पुसट हिरवट छटा दिसत होती आणि तेव्हा साल वृक्ष आपली

पाने बदलीत होते. ही झाडे अर्धवट पानझडी प्रकारची असल्यामुळे केव्हाही पूर्णपणे निष्पर्ण होत नाहीत. जुनी पाने सोनेरी मातकट रंगाची होतात, नंतर गळून पडतात आणि वर्षभर मधून मधून नवी चकचकीत फिकट हिरव्या रंगाची पाने त्यांची जागा घेतच असतात. ह्या सुमाराला अग्नीज्वालेसारख्या दिसणाऱ्या पळसाचा बहर ओसरत आलेला असतो. कुठेतरी मधूनच एखाद-दुसऱ्या फांदीवर सुकत चाललेला एखादा फुलोरा दिसत होता.

साल वृक्षांनी पुन्हा गडद रंगाचा मंदील परिधान केला असताना आणि तेथील मैदाने फिकट हिरव्या रंगाचा गालिचा पुन्हा पसरीत असताना म्हणजेच मे महिन्यातही मी तेथे होतो.

कान्हाचे अभयारण्य तेथील स्वॉम्प डिअर या हरिणांकरिता प्रसिद्ध आहे. हरिणांची ही जात (रंगीत छायाचित्र ४१ व साधे छायाचित्र २०-२२) मध्य, उत्तर व पश्चिम भारतात व नेपाळच्या दक्षिण भागांतच दिसून येते. हे हरीण पाकिस्तान, सिलोन, ब्रह्मदेश किंवा इतर कुठच्याही देशांत दिसून येत नाही. सांबरापेक्षा थोडेसेच लहान असलेले हे 'स्वॉम्प डिअर' बारासिंगा (बारा फाटे असलेला) ह्या नावाने ओळखले जाते. त्याची शिंगे भारदस्त वाटतात; परंतु स्वॉम्प डिअर सारखेच दुसरे एक "काश्मीर स्टॅग" नावाचे हरिण आहे, त्यालाही काही शिकारी लोक "बारासिंगा" असेच म्हणतात.

ही "स्वॉम्प डिअर" जातीची हरिणे उ. प्रदेशातील दलदलीच्या प्रदेशातही दिसून येतात. त्यांना आसाममध्ये "गोंड" असे म्हणतात. विशेषतः अशा दलदलीच्या प्रदेशांत दिसून येणाऱ्या जनावरांचे खूर एकमेकांपासून विलग (फताडे) असतात. त्यामुळे त्यांना दलदलीच्या मऊ जमिनीवरून चालणे अधिक सोपे जाते. परंतु कान्हामधील मैदाने वेडीवाकडी आणि बहुधा सुकी असतात. ही हरणे एके काळी दलदलीच्या भागात असावीत व हल्लीह ती सुक्या प्रदेशांत गेली असावीत असे काहींचे म्हणणे आहे; परंतु हे खरे असावेसे वाटत नाही. कारण माझ्या माहितीप्रमाणे आसाममध्ये दलदलीपासून कितीतरी दूर अशा सुक्या खुरट्या गवताच्या प्रदेशांतही मी ही हरीणे पाहिलेली आहेत ह्या स्वॉम्प जातीच्या हरणांचा एक विशेष म्हणजे ती फक्त नरांचे किंवा फक्त माद्याच असलेले आणि एकाच वयाची जनावरे असलेले असे निरनिराळ्या प्रकारचे कळप करून राहतात (या कळपांना शाळा (स्कूल) असेच संबोधितात.) कान्हाच्या मैदानात तुम्हाला माद्यांचे कळपाच्या कळप दिसतील. मी तर एका कळपात ४३ माद्या पाहिल्या होत्या; आणखी एखाद्या कळपात तुम्हाला सर्व प्रौढ सांबरे खेळीमेळीने एकत्र राहात असलेली दिसतील. तर काही ठिकाणी तुम्हाला एखाद्या वर्षाच्या आतील नरमादी अशा पाडसांचे छोटे छोटे कळप दिसतील. दुसऱ्याही काही जातीची अशी कळपाकळपाने राहाणारी हरणे आहेत आणि मला आठवते की एकदा बेनफोर्डच्या 'ड्युकने' ('आताच्या ड्युक'चे वडील) मला "बोर्बन ॲबे" येथे अतिशय सुंदर असा एक देखावा ब्रिटनमध्ये दाखविला होता. तेथे पेर डेव्हीडची हरणे नर मादी अशी वेगवेगळी व वेगवेगळ्या वयाच्या कळपांत होती.

एप्रिलच्या सुमारास, त्यांच्या समागमाचा हंगाम संपत येत असताना मी एका माद्यांच्या कळपाचा एक नर प्रमुख असलेला पाहिला होता. आणि मला आश्चर्य वाटले की सर्व पूर्ण वाढलेले नर थोड्याच अंतरावर संतोषाने चरत असताना ह्या नराला कळपाचे नेतृत्व कसे मिळाले असावे? मी जरी स्वतः पाहिल्या नसल्या तरी नरांमध्ये मारामाऱ्या नक्कीकच होत असाव्यात. इथल्या वनाधिकाऱ्यांना आणि प्राणीशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना व इतरांनाही या सुंदर हरणांचे निरीक्षण तसेच त्यांच्या सवयींच्या बारकाईने अभ्यास करण्यास कितीतरी चांगली संधी आहे.

अनुक्रमणिका

मी गेल्या खेपेस म्हणजे ६२ च्या मे मध्ये कान्हामध्ये होतो. तेव्हा मी जीपमधून एका पूर्ण वाढलेल्या १६ नर सांबरांचा कळप जवळून न्याहाळत होतो. कळपाच्या प्रमुखाची शिंगे जरी थोडी लहान होती तरी तो वयाने मोठा दिसत होता व सर्व कळप त्याच्या आदेशानुसार हालचाली करीत होता आणि तो सर्व सांबरांमध्ये अधिकार दर्शविणारा असाच उत्कृष्ट नर दिसत होता. एकाएकी दुसरे दोन नर गुरगुरू लागले. एकाने त्याचे डोके खाली वळविले आणि दुसऱ्याने त्याचे आव्हान स्वीकारले. त्या दोघांनी ताकद अजमाविण्याकरिता एकामेकांत शिंगे अडकविली. (छायाचित्र क्र. २२) माझ्याबरोबर असलेल्या अभयारण्याच्या विभागीय अधिकाऱ्यांशी बोलण्याकरिता मी वळलो. हनुवटी हातावर टेकलेली व तोंड दुसरीकडे वळलेले अशा अवस्थेत ते अर्धवट पेंगत होते. मला त्यांची कीव आली. त्यांच्या कामाचे स्वरूप त्यांना फारसे आवडत असावेसे मला वाटत नाही.

मी त्यांना विचारले ती दोन हरणे काय करीत असावीत असे तुम्हाला वाटते?

ते म्हणाले, “ती निःसंशय मारामारी करीत आहेत.”

“अगदी काही खरोखरची मारामारी नाही. आताच त्यांचा मदावर येण्याचा हंगाम संपलेला आहे. मी म्हटले तुम्हाला “पेक ऑर्डर” म्हणजे कळपाची क्रमवारी माहीत आहे कां?” मी पुन्हा विचारले. त्यांनी गोंधळून “नाही साहेब” असे सांगितले. मी ते नीट सविस्तर सांगण्याचा प्रयत्न करीत म्हटले. “कळपाची क्रमवारी म्हणजे नरांमध्ये त्यांच्या सामर्थ्यानुसार असलेला त्यांचा क्रम. ह्याला “पेक ऑर्डर” असे म्हणण्याचे कारण पक्ष्यांमध्ये विशेषतः आपण घरात पाळतो त्या कोंबड्यांमध्ये नर कोंबडे एकमेकांना चोची मारून मारून टोचून आपल्या सामर्थ्यानुसार पहिला, दुसरा असा क्रम ठरवितात.” (ह्याला ‘पेकींग’ असे म्हणतात.)

त्यांना त्यात विशेष रस वाटू लागला. मी त्यांना सांगितले की कळपाने राहाणाऱ्या बहुतेक सर्वच प्राणी किंवा पक्ष्यांमध्ये अशी पद्धत दिसून येते. कळप जर संख्येने खूपच मोठा असेल तर त्यामध्ये गट पडतात व गटागटाचे असे अग्रक्रम ठरतात व मोठ्या कळपातील छोट्या छोट्या गटांची अशी ‘पेक ऑर्डर’ असते. मी पुढे सांगू लागलो, "त्या स्वॉम्प जातीच्या सांबरांमध्ये तो बहुधा ७ क्रमांकाचा सांबर ६ क्रमांकवाल्याला आव्हान देत होता. आता जर ६ क्रमांकवाला पुढे कुठे तरी चालू लागून आपल्या शक्तिसामर्थ्याच्या कसोटीचे आव्हान चुकवू लागला तर त्याचा क्रमांक ७ वा होऊन ७ क्रमांकवाल्याला ६ वा क्रमांक मिळेल. जर ६ क्रमांकवाला आपली जागा टिकवू इच्छित असेल तर त्याला ते आव्हान स्विकारून आपण सामर्थ्यवान असल्याचे दाखवून दिले पाहिजे”. ती सर्व एखाददुसऱ्या मिनिटाची गोष्ट होती. मग सर्वच कळप शांतपणे एकत्र चरू लागला. मला आशा वाटते की रेंज अधिकारी (बिचारे भले गृहस्थ) ह्यामुळे आणखी अशी सांबरे पाहिल्यावर तरी त्यात अधिक रस घेतील.

ड्यूनबर ब्रँडर यांच्या “वाईल्ड ॲनिमल्स इन सेंट्रल इंडिया” ह्या १९२३ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकात ते म्हणतात की स्वॉम्प जातीच्या हरीणांत एप्रिलपर्यंत नर त्यांची शिंगे झाडून टाकीत नाहीत आणि छोट्या नरांची शिंगे तर एप्रिलच्या शेवटापर्यंतही गळत नाहीत. “कदाचित पर्यावरणांतील बदलांमुळे त्यांच्या ह्या शिंगे झाडून टाकण्याच्या सवयीतही बदल झाला असावा का, अशी मला शंका येते, कारण मी जेवढे जेवढे नर मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत पाहिले त्या सर्वांना तेव्हाही चांगली टणक शिंगे होती.

अनुक्रमणिका

आसाममधील स्वॉम्प जातीची हरणे ही स्वतंत्र उपजात असावी. कारण त्यांचे हंगाम काही महिन्यांच्या फरकाने तरी वेगळे असावेत आणि मार्च, एप्रिल व मे ह्या तीन महिन्यांत नरांची शिंगे कोवळी असून त्यावर मऊ दाट मखमलीसारखी लव असते. मला वाटते कदाचित् खूप पावसामुळे नवे हिरवेगार गवत मार्चच्या अखेरीस व एप्रिलच्या सुरुवातीस येत असल्यामुळे हा बदल होत असावा. कारण त्यांच्या खुराकातील असा बदल मध्य प्रदेशात जुलैपर्यंत घडून येत नाही.

ज्यामध्ये मध्य प्रदेशांतील सर्व प्राण्यांच्या नैसर्गिक जीवनाबद्दलची माहिती आहे ते ड्युनबर ब्रँडरचे पुस्तक बहुधा सर्वात चांगले पुस्तक असावे. त्यात आणि अद्यावत पुस्तकांच्या तुलनेत एकच दोष आहे. तो म्हणजे हे पुस्तक जास्त करून शिकारी लोकांच्या दृष्टीकोनांतून लिहिले गेले आहे व छायाचित्रेही जास्त करून ठार मारलेल्या जनावरांचीच आहेत.

यापेक्षा कॅमेऱ्याने चित्र टिपणे कितीतरी कठीण परंतु फारच मनोरंजक असावे!

मला वाटते १९३० च्या सुरुवातीला कान्हाच्या परिसरात छायाचित्रण करणारे 'बेंग्ट बर्ग' हे पहिले स्वीडिश निसर्ग छायाचित्रकार असावेत.

त्यांचे बहुतेक काम फ्लॅशलाईटने किंवा रात्री केलेले आहे. त्यांची वाघाची छायाचित्रे तर अत्यंत देखणी आहेत. मला कोणीतरी सांगितले होते की त्यांच्याकडे जवळजवळ १२ कॅमेरे आहेत. मला वाटते की ते प्लेट कॅमेरे असावेत आणि ते संध्याकाळच्या सुमारास वन्यपशूंच्या मागावर ते लावून ठेवीत आसावेत. दुसऱ्या दिवशी ते सर्व काढून तपासत असावेत. मी असे ऐकले होते की ते त्यांच्या जास्त उजेडाच्या दिव्यांच्या तारा काही वेळा उंचावर लावून ठेवीत त्यामुळे माद्या आणि पाडसे खालून पुढे सटकली जाऊन फक्त नर 'स्वॉम्प डिअर' छायाचित्रासाठी पकडले जात. मात्र मला हे जरा विस्मयकारक वाटते कारण ह्या सांबरांची छायाचित्रे तर दिवसाउजेडी उघड्यावरही सहज घेता येतात.

जास्त उजेडाच्या दिव्यांच्या सहाय्याने छायाचित्रे घेण्यात बरेच तोटे आहेत. छायाचित्र घेण्याच्या ऐन वेळेस तुम्ही जनावर तर पाहूच शकत नाही, कारण तेव्हा तुम्ही बिछान्यावर झोपलेले असता. जनावरे त्यांची तीच छायाचित्रे घेत असतात. त्यामुळे बऱ्याचदा त्यांची चांगली छायाचित्रे निघत नाहीत. कधी रोखून धरलेले पांढरेफटक डोळे तर कधी जनावराचा कॅमेऱ्याच्या अगदी जवळ असलेला भागच तेवढा मोठा येऊन जनावराचे इतर भाग प्रमाणबद्धतेत नसतात. अशाप्रकारे घेतलेली रंगीत चलत्‌चित्रे देखील निकालातच काढावी लागतात.


चितळ किंवा ठिपकेवाले हरीण हे भारतात संख्येने सर्वात जास्त दिसून येते आणि तरीही ते जगातील सर्वात सुंदर दिसणारे हरीण आहे. ह्या हरणांते मोठमोठे कळप दिसून येत नाहीत तर नर, मादी, पाडसे असे सर्व एकत्र एकेका कळपात दिसून येतात. वेगवेगळ्या वयोमानाप्रमाणे त्यांचे आकारही वेगवेगळे असतात. तसेच एकेका कळपांत २ पासून २०० किंवा अधिकांच्या संख्येनेही ती असतात. १९५३/५४ मध्ये जेव्हा मी प्रथम कान्हाच्या, अभयारण्यात भेट दिली तेव्हा ती तेथे फारच मोठ्या प्रमाणात होती. परंतु १९६३ मध्ये त्यांची संख्या फारच कमी झाली होती आणि मला वाटते की तेथील वनाधिकाऱ्यांच्या हे लक्षात न आल्यामुळे असे हळूहळू घडत गेले असावे. दरवर्षी ढोबळ मानाने झालेल्या नोंदणीतील आकडे माझ्या निरीक्षणाला दुजोरा देतील.

| भक्ष्य | १९५८ | १९५९ | १९६० | १९६१ |
|---|---|---|---|---|
| स्वॉम्प डिअर | ५७७ | ४११ | २६० | २५४ |
| चितळ | १७२६ | १५७९ | १२५९ | १२५३ |
| काळविट | ४४ | ५२ | ३८ | ४४ |
| भक्षक | | | | |
| वाघ | ९ | ११ | ७ | १८ |
| बिबळ्या | ४ | ६ | २ | १३ |
| जंगली कुत्रे | १७ | २५ | १७ | २९ |

वरील आकडेवारीवरून भक्षक जनावरांची संख्या वाढलेली दिसून येईल. स्वॉम्प डिअर, चितळ व काळवीट (१९५३ मध्ये तेथे ६३ काळवीट होते.) ह्यांची संख्या वाघ, बिबळ्या व जंगली कुत्रे ह्या सारख्या भक्षकांनी त्यांच्यावर ताव मारल्यामुळे नैसर्गिकरित्या कमी झाली असावी किंवा चोरट्या शिकाऱ्यांमुळेही झाली असावी. मला काही नक्की कळत नाही. परंतु ज्यांच्या ताब्यात कान्हाचे अभयारण्य व तेथील वन्यप्राण्यांचे संरक्षण आणि तेथील भक्षकांचे नियंत्रण करण्याचे कायदे करण्याची जबाबदारी आहे, त्या मध्य प्रदेशच्या वनखात्याने आजच्या या परिस्थितीचे निरीक्षण करणे आवश्यक आहे.

चोरट्या शिकारीसंबंधाने बोलताना मी जेव्हा १९५४ मध्ये कान्हा येथे होतो, तेव्हाचा एक मनाला अस्वस्था करून सोडणारा प्रसंग आठवतो. मी रात्रीच्या वेळी सुमारे ११ वाजता बिछान्यावर पडलो असताना जीप आल्याचा आवाज ऐकला. बरोबर बऱ्याच लोकांचा आवाज ऐकू आला. नंतर जीप गेली. रात्री दोनएक वाजता पुन्हा जीप आली. दुसऱ्या दिवशी सकाळी तेथे जीपही नव्हती आणि कोणी पाहुणे मंडळीही नव्हती. एक तासानेतर मी काही नोकर माणसे एक मेलेले चितळ कापत असताना पाहिले.

अनुक्रमणिका



१७. कान्हाच्या राष्ट्रीय उद्यानात एक नर चितळ गावातून रस्ता पार करीत असताना


अनुक्रमणिका



१८. जांभळ्या शिंजीराची एक मादी भिरभिरली अन् आमच्यापासून काही फूटांवरच घरटे बांधण्यात गर्क झाली

अनुक्रमणिका






१९अ. आताशा भारतात काळवीट कमी होत चालले आहेत. - नर अन् मादी
१९ब. भारतीय प्राणीसंग्रहालयात एक अफ्रिकन चित्ता. भारतीय चित्ता आता समूळ नष्ट झाला आहे.


अनुक्रमणिका



२०/२१. कान्हाच्या राष्ट्रीय उद्यानात स्वाम्प जातीची हरीणे.


अनुक्रमणिका






२२अ. अचानकपणे दुसरे दोन नर एकमेकांशी झुंज घेऊ लागले.
२२ब. वाघ दिवसाउजेडी असा उघड्यावर क्वचितच् दिसतो.


अनुक्रमणिका





२३अ. त्या भव्य राजवाड्यातील एक छोटीशी जागा जेथे पांढऱ्या वाघांचे वास्तव्य होते.
२३ब. भुतासारखा तो वाघ उठला अन् भारदस्तपणे पावले टाकू लागला.





**२४अ. लबाडी अन् लपाछपीच्या डावपेचांमुळे बिबळे वाघ अजूनही टिकाव धरून आहेत**
**२४ब. नेहमीच्या रंगाचे अन् काळे पिलू नेहमीच्या रंगाच्या मादीला झालेले. (ह्यांचा पिता काळा असावा.)**

मी त्यांना विचारले तुम्हाला हे कसे मिळाले? ते जंगली कुत्र्याने ठार मारले होते असे उत्तर मला मिळाले. मला फारच आश्चर्य वाटले. मी ताबडतोब वनखात्याच्या संबंधितांकडे ह्या गोष्टीची खबर दिली पण त्याची विशेष कोणी दखल घेतलीसे वाटले नाही. माझ्या मनातून तो प्रसंग जातच नाही. जगाच्या इतर भागांतील अभयारण्यांचे दरवाजे सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत बंद असतात, तसेच येथेही असावयाला पाहिजेत. समजा, जरी तेथे शिकार होत नाही असे गृहीत धरले तरी दिवसाउजेडी ह्या प्राण्यांचे सुंदर रूप

अनुक्रमणिका

राजरोसपणे पाहता येत असतानाही कोणाला ते रात्री मोटारीच्या दिव्यांच्या किंवा विजेरीच्या उजेडाच चुटपुटते पहावेसे वाटेल?

शाकाहारी प्राण्यांना सावध आणि सशक्त ठेवण्यासाठी तसेच त्यांची संख्याही काबूत ठेवण्यासाठी एका ठराविक संख्येपर्यंत भक्षक जनावरे अगदी आवश्यक आहेतच. तसे पाहता कान्हाच्या अभयारण्याचे ते एक खास वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. येथे भक्षक पशू आपले कार्य व्यवस्थितपणे पार पाडून निसर्गाचा समतोल अगदी व्यवस्थित राखतात. कान्हाच्या जंगलात मी वाघाने मारलेले गवे दोनदा पाहिले होते आणि वाघानेच मारलेले एक मृत सांबरही पाहिले होते. मी येथे जंगली कुत्रे एका चितळाच्या पाठलागावर गेलेलेही पाहिले आहेत आणि एक कोल्हा एकदा छोट्या हरणीच्या पाठी लागलेलाही पाहिला होता.

हरणांच्या व उंदराच्या गटातील प्राण्यांच्या संख्येवर नियंत्रण राखण्याच्या कामात अजगरांचा देखील वाटा आहे. मी एकदा कान्हाच्या अभयारण्यात एक जवळजवळ २० फूट लांब अजगरही पाहिलेला आहे. तो अजगर अंगाचे वेटोळे करून बेशुद्धावस्थेत जमिनीवर पहुडला होता. त्याने बहुधा लपून राहण्याकरिता अंगभर पालापाचोळा पसरवून घेतलेला होता. त्याच्या पोटाच्या भागावरील मधून मधून असलेले फुगवटे त्याने हरीण किंवा तसल्याच प्रकारचे जनावर गिळल्याचे दर्शवीत होते; आणि आता त्याचे हळूहळू पचन होत होते.

ह्याहून सर्वात उत्तेजक असा प्रसंग — मला वाटते की मी एक जंगली कुत्र्यांचा छोटा कळप पाहिला. त्यामध्ये सहा कुत्रे होते. काही मोठमोठ्या खडकांमध्ये एक साल वृक्ष होता. मी जीप सोडून दिली व माझा सिने-कॅमेरा घेऊन मी जंगली कुत्र्यांच्या मागे मागे दबकत दबकत जाऊ लागलो. ते एकामागोमाग एक असे पुढे सटकले. जेव्हा शेवटचा कुत्रा गेला तेव्हा साल वृक्षाखालून एक मोठासा बिबळ्या एकाएकी उडी मारून उठला व पळून गेला. धंद्यातील हेवेदावे (ह्या ठिकाणी शिकारीतील हेवेदावे) — हेच बहुधा कारण असावं की ज्यामुळे त्या कुत्र्यांनी त्या बिबळ्याचा पाठलाग केला असावा आणि बिबळ्या झाडावर लपून बसला असावा.

आता हरणांकडे वळूया. ही हरणे तर सर्वांच्या ओळखीची आहेत. विशेषतः मध्य व दक्षिण भारतात नर हरणे वर्षांच्या वेगवेगळ्या महिन्यात आपली शिंगे झाडून टाकतात. नवीन पाडसे देखील वर्षभरात केव्हाही जन्माला येतात.

पूर्वी कान्हा विश्रांतिगृहाच्या आसपासही चितळांचे मोठमोठे कळप नेहमी दिसत असत. जेव्हा ह्या विश्रांतिगृहात कोणी माणसे नसत तेव्हा ही हरणेच तेथे राहात असत असे मला कोणीतरी सांगितले. एका वनाधिकाऱ्याने मला सांगितले की तो एकदा ऑगस्ट महिन्यात तेथे गेला होता (तसे पाहता तो प्राणी दिसण्याचा विशिष्ट हंगाम नव्हता.) परंतु तेव्हाही त्याने आवारात जवळजवळ दीडशे हरीणे पाहिली आणि त्यातली तीस एक तर परसातच होती.

हे बहुधा खरे असावे कारण १९५३ मध्ये जेव्हा आम्ही दहाजण विश्रांतिगृहाच्या परसात सभेसाठी बसलो होतो तेव्हा एक हरणी ममताळूपणे आवारात आली आणि ती सरळ आमच्या रोखाने पुढे येऊ लागली. ती जेव्हा अगदी जवळ आली तेव्हा थांबली व आमच्याकडे तिच्या निरागस डोळ्यांनी रोखून कान पुढे झुकवून काही क्षण पाहातच राहिली आणि नंतर परत फिरली. मी विनोदाने म्हटल्याचे देखील मला आठवते की येथे रिकामी खुर्ची नाही म्हणून तिला आपल्यात येऊन बसता येत नाही.

अनुक्रमणिका

मला आठवते आमच्यापैकी एकाने बिबळ्याच्या कातड्याचा कोट घातला होता. कारण ती नोव्हेंबरची सुरुवात होती आणि सकाळच्या वेळी तेथे खूपच थंडी असे. नंतर आम्ही गाडीत बसून अभयारण्यांतून फेरफटका केला, परंतु तेव्हा आम्हाला ही चितळे क्वचितच दिसली व साशंकतेने आपला कट्टर शत्रू (बिबळ्या वाघ) दिसल्यावर एकमेकांना जसे इशारे देतात तशी देत आमच्याकडे पाहत असलेली दिसली. बिचाऱ्यांना काय माहीत की तो सद्‌गृहस्थ भारतातील वन्यप्राणी जीवनाचे संरक्षण करणारा होता आणि तो तशा पोशाखांत असला तरी त्यांचा एक चांगला मित्र होता.. लांडग्याच्या पोशाखातील धनगर!

अलीकडे तेथील विश्रांतिगृहाच्या आसपास आणखी तीन मोठे बंगले उठले आहेत; त्यामुळे चितळे मात्र ती जागा सोडून दुसरीकडे गेली.

सुदैवाने कान्हामध्ये १९५३ इतके नसले तरी अजूनही काही काळवीट उरलेले आहेत. (छायाचित्र क्र. १९) आता साधारणतः ४०/४५ काळवीट तेथे असतील. काहीही करून त्यांना वाचविले पाहिजे, कारण पूर्वी इशान्य भारत सोडून सर्वत्र दिसणारे काळवीट आता फारच कमी होत चाललेले आहेत.

जगात चार पायांच्या प्राण्यांमध्ये सर्वात वेगवान असलेल्या ह्या काळवीटांना उघड्या माळरानासारखी अरण्ये आवडतात कारण अशा ठिकाणी त्यांना शत्रूपासून अगदी खात्रीने संरक्षण असते. कान्हा ही काही खास करून काळवीटांची जागा नाही, परंतु ही चाळीसच्या आसपास असलेली काळवीटे ही ह्या अभयारण्याची खूप मौल्यवान् संपत्ती आहे. पुढे कदाचित् त्यांची संख्या वाढूही शकेल.

त्यांना विशेषतः माद्या व पाडसांना हवेत चौखूर उड्या मारताना पाहिल्यावर मला मी आफ्रिकेत पाहिलेल्या ‘इम्पाला’ची (इम्पाला –एक प्रकारचे हरिणासारखे जनावर) आठवण झाली.

काळवीटांसंबंधी बोलताना मला भारतांतील चित्त्यांचाही उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. हा चित्ता काळवीटांवर उपजीविका करणारा – त्यांचा पारंपरिक शत्रू. भारताच्या वन्यप्राणी जीवनासंबंधाने सांगावयाचे तर ही एक शोकांतिकाच म्हणावी लागेल. हा चित्ता आता भारताच्या जन्मभूमीवरून समूळ नष्ट झालेला आहे! (छायाचित्र क्र. १९)

चित्ता किंवा याला “हंटिंग लेपर्ड” असे म्हणतात. (हा बिबळ्या वाघाहून अगदीच वेगळा असतो) पूर्वीच्या काळात तो उ. भारतात सर्वत्र सहज दिसून येई. असे म्हणतात की अकबर बादशहाने (१५५६-१६०५) १००० चित्ते शिकारीसाठी पाळले होते.

भारतातील चित्त्यांचा दुर्दैवी शेवट १९४७-४८ मध्ये हिंवाळ्याच्या सुमारास एका शिकाऱ्याने शिकारीचे सर्व रूढी नियम डावलून क्रूरपणे एकाच भागातील तीन नर मारले तेव्हाच सुरू झाला. ते सर्व नर बहुधा एकाच विणीतले होते असा अंदाज होता. त्यामुळे त्यांचे आईवडील जवळच कोठे तरी (पूर्वीच्या कोर राज्यांत बस्तारच्या उत्तरेस) असतील असे वाटले होते. परंतु त्या भागांतून पुन्हा काही चित्ते दिसून आल्याच्या नोंदी नाहीत.

१९५२ च्या वर्षाऋतूंत मद्रासमधील चित्तूर जिल्ह्यात चित्ता दिसल्याच्या अफवा उठल्या होत्या- परंतु पुढे हे कोणी नक्की असे खात्रीने सांगितले नाही; किंवा भारतात तेव्हापासून चित्ता तेथे अस्तित्वात

अनुक्रमणिका

असल्याच्याही काही नोंदी नाहीत. अशा प्रकारे ज्याला अगदी मामुली अशीही सजीव वस्तू तयार करता येत नाही त्या मानवाने उत्क्रांतीच्या तत्त्वानुसार भारतात उपजला गेलेला तरीही सुप्रसिद्ध आणि सर्वपरिचित असा हा चित्ता समूळ नष्ट केला.

भारतांतून हे प्राणी समूळ नष्ट होण्यापूर्वी देखील काही वर्षे ते येथील प्राणिसंग्रहालयांसाठी खास आफ्रिकेतून आणविले जात. चित्ता समूळ नष्ट होण्याचे एक कारण बहुधा हे असावे की चित्ते पिंजऱ्यांत पकडून केव्हाही त्यांची वीण वाढविण्याचे प्रयत्न करण्यात आले नाहीत. याला मी दोनच अपवाद पाहिले. (एक फिलाडेल्फीया प्राणिसंग्रहालयात १९५७ मध्ये व दुसरा प. जर्मनीतील क्रेफील्ड या प्राणिसंग्रहालयात जन्मलेला नवीन बछडा.)

मी ह्यांसंबंधाने कोल्हापूरच्या महाराजांशी बोललो होतो. ते पाळीव चित्त्यांमुळे तसेच काळवीटांची चित्त्यांकडून शिकार करून घेत असल्यामुळे प्रसिद्ध होते. १९६० मध्ये ते मला म्हणाले की त्यांच्याकडे असलेला शेवटचा आफ्रिकन चित्ता अलीकडेच मेला होता आणि काळवीटही अलीकडे चोरट्या शिकाऱ्यांकडून फार मारले जाऊ लागले होते. पूर्वीच्या काळी भारतीय चित्ता हा आफ्रिकन चित्त्यापेक्षा अशा शिकारीसाठी जास्त चांगला समजला जात असे. त्यांनी चित्त्यांना चांगला व्यायाम मिळावा म्हणून त्यांना एका चांगल्या मोठ्या जंगलात मोकळे सोडले होते तरीही भारतीय किंवा आफ्रिकन कुठचाच चित्ता व्यायला नव्हता. चित्ता नक्कीच काळवीटांइतका जोराने धावू शकत नाही आणि तो फक्त त्याच्या सुरुवातीच्या उड्यांमध्येच त्यांना पकडू शकतो.

त्यांनी मला त्यांच्या पांढऱ्या १२ काळवीटांच्या कळपाबद्दल देखील सांगितले. ते म्हणाले की पूर्ण किंवा अर्धवट पांढऱ्या अशा काळवीटांच्या जोड्यांच्या संततीपासून हा कळप तयार करण्यास मला २५ वर्षे लागली.

रानटी अवस्थेतील चित्ता समूळ नष्ट का झाला? ह्याचे एक नक्की कारण म्हणजे चित्त्याचे नैसर्गिक भक्ष्य काळवीट, चुंकारा, चितळ यांसारखे प्राणी कमी होत गेले व दुसरे म्हणजे मनुष्यवस्ती वाढल्याने शेतीभाती व गुरांना चरण्यासाठी हवी असलेली जागा यांची व्याप्तीही वाढत गेली. ह्या सर्व गोष्टीमुळे चित्ता हळूहळू नाहीसा झाला असावा.

मी अलीकडेच एक अशी नोंद वाचली की भारतीय चित्त्याची जात अजूनही इराणमधील काही सुक्या जंगलांतून अस्तित्वात आहे आणि मला आशा वाटते की ह्याबद्दलचा पुढील तपास ती गोष्ट खरी असल्याचे सिद्ध करील.

माझ्या मागील खेपेच्या कान्हा येथील भेटीत मला खरोखऱ धन्य वाटेल अशी एक बातमी समजली ती म्हणजे भारतातील गवा हा भारदस्त प्राणी येथे मोठ्या प्रमाणावर दिसतो. मी त्यांची छायाचित्रे घेण्यात कितीतरी दिवस आणि संध्याकाळी घालविल्या.

१९५३ मध्ये जेव्हा शिकवलेला पाळीव हत्ती कान्हाच्या जंगलात सोडण्यात आला तेव्हा तेथील हरणे व काळवीट इतके विस्मयचकित झाले; की ते ताबडतोब धोक्याचे इशारे देत पांगून गेले. ही

खरोखरच मनोरंजक गोष्ट आहे. ह्यावरून असे दिसून येते की बहुधा ५० किंवा त्याहूनही अधिक वर्षांपासून ह्या जंगलामध्ये रानटी हत्ती केव्हाच दिसण्यात आलेला नसावा.

मी कान्हामध्ये सांबर, भेकर, वानर व रानडुकरेही पाहिली आहेत. तरसांच्या पावलांचे ठसेही पाहिले आहेत. पक्ष्यांच्या ९० जातींची यादी केली आहे. मोर तर येथे मजेत राहतात आणि त्यांची संख्याही वाढत आहे. लाल जंगली कोंबडी देखील येथे सहज दिसून येते.

ही लाल जंगली कोंबडीच हल्ली आपल्याकडे घरोघरी दिसून येणाऱ्या कोंबड्यांची पूर्वज आहे. ती मध्य, उत्तर व पूर्व भारतात दिसून येते. ती दिसावयास पाश्चात्य देशांत क्वचित् दिसून येणाऱ्या बँटम किंवा झुंजीच्या कोंबड्यासारखी असते. पश्चिम व दक्षिण भारतात ह्या लाल कोंबडीसारखीच राखी जंगली कोंबडी दिसते. ह्या कोंबड्यांची पिसे हौसेने मासेमारी करणारांच्या गळाला माशी (लक्ष्य) म्हणून वापरतात, त्यामुळे ह्यांच्या संख्येवर नीट लक्ष ठेवून त्यांची पिसे परदेशी पाठविण्यावर बंदी घातली आहे.

कान्हा अवघड ठिकाणी वसलेले असल्यामुळे तेथे पोहोचणे कठीण आहे. म्हणून ते एकपरीने फायदेशीर किंवा तोट्याचेही आहे. तुम्ही ज्या दृष्टीकोनांतून त्याकडे पाहाल तसे. ते जबलपूरपासून जवळजवळ १०० मैल दक्षिणेकडे आहे. नागपूर व गोंदीयांपासून कदाचित् १०० मैलाहूनही जास्तच दक्षिणेकडे असावे. पोहोचण्यास अवघड असल्यामुळे ते पर्यटकांच्या गर्दीमुळे बिघडून गेलेले नाही; परंतु अंतर्गत व परदेशी पर्यटकांचे एक खास आकर्षण बनविण्यासाठी पर्यटक खात्याच्या अधिकाऱ्यांना मात्र ते त्रासाचे वाटते. राहण्याची जागा तयार झाली आहे. परंतु वाहतूक व भोजनाची व्यवस्था पुढच्या वर्षापर्यंत तयार होईल असे वाटते.

मला आशा वाटते कीजर कान्हापर्यंत पुढे मागे केव्हा विमानाने जाण्याची सोय करण्यात आली तर निदान विमानतळ कान्हाच्या अभयारण्यापासून काही मैल तरी दूर अंतरावर बांधला जाईल.

कान्हाच्या मैदानाजवळ असलेल्या तळ्याशी निगडीत अशी एक सुंदर परंतु शोकात्मक पौराणिक कथा ऐकावयास मिळते. ह्या तळ्याला ‘श्रावणाचे तळे’ असे म्हणतात. ही कथा साधारणतः अशी आहे. फार पूर्वी दशरथ नावाचा एक राजा झाला. त्याचे राज्य जवळजवळ सर्व भरतखंडात होते. त्याची राजधानी अयोध्या (अलाहाबादजवळ) ही होती. त्याला शिकारीचा फारच नाद होता आणि तो धनुष्य चालविण्यात इतका पारंगत होता की रात्री नुसता आवाज ऐकला तरी त्याच्या रोखाने अचूक नेम मारण्यात तो पटाईत होता.

एकद तो ह्या जंगलातून रात्री जात होता व त्याने आवाज ऐकला. तो आवाज त्याला जंगली हत्ती पाणी पीत असल्यासारखा वाटला. (हरीण की हत्ती? मराठी वाचकांनी ई.पी.जी. ह्या इंग्रजी लेखकाला माफ करावे!) तो आवाजाच्या रोखाने गेला व त्याने नेम धरून बाण मारला. नंतर त्याने कोणा माणसाचा दुःखाने विव्हळण्याचा आवाज ऐकला. तो ताबडतोब लक्ष्याच्या ठिकाणी जाऊन पोहोचला, व पाहतो तो त्याला श्रावण नावाचा मुलगा त्याच्या बाणाने घायाळ होऊन मरत असल्याचे दिसून आले.

श्रावण त्याच्य आंधळ्या आईबापांना पाणी पाजण्याकरिता त्या तळ्यावर आला होता. तो त्यांना तीर्थयात्रेसाठी घेऊन चालला होता. राजा दशरथाने जो आवाज ऐकला होता तो श्रावण त्याच्या कावडीत पाणी भरत असतानाचा होता.

नंतर राजा दशरथाने श्रावणाचे मृत शरीर त्याच्या आईवडिलांकडे नेऊन त्यांची क्षमा मागितली. परंतु श्रावण त्यांचा एकुलता एक पुत्र होता आणि जेव्हा त्यांनी श्रावणाच्या मृत्यूची हकीगत ऐकली तेव्हा शोकाने अत्यंत विव्हळ होऊन त्यांनी देखील प्राण सोडला.

म्हणूनच ह्या तळ्याला 'श्रावणाचे तळे' असे नाव पडले आहे.

अनुक्रमणिका

## प्रकरण ६ वे

# वाघ

उत्तर प्रदेशातील “कॉर्बेट नॅशनल पार्क” सोडले तर भारतात वाघ पाहण्यासाठी दुसरी उत्कृष्ट जागा कान्हाचे अभयारण्य ही म्हणावी लागेल.

भारतात वाघ कित्येक शतकांपूर्वी उत्तर अशिया खंडातून आला. तो बहुधा चीनमधून, हिमालयाच्या पूर्व खिंडीतून ईशान्य बाजूने येथे आला असावा. श्रीलंका सागराच्या पाण्यामुळे वेगळे झालेले असल्यामुळे तो तेव्हा लंकेत पोहचू शकला नाही. वायव्य सरहद्दीवरील रखरखीत प्रदेश व हिमालयाचे उत्तुंग पहाडी प्रदेश सोडले तर तो भारतात सर्वत्र दिसून येतो.

अलीकडच्या काळातील “मांचुरीयन” किंवा “उसूरी” वाघ बराच मोठा असून त्याची कातडीही जाड व लांबलचक असते. भारतातील अति उष्ण व आर्द्र तपमान सहन करू शकण्यासाठी येथील वाघ थोडा लहान व त्यामानाने पातळ कातडी असलेला असा उत्क्रांत झाला आहे. तसेच ह्याला दुसरेही एक कारण असू शकेल. भारतातील भक्ष्य देखील पुरातन काळाच्या प्राण्यांपेक्षा लहान आकाराचे आहे.

येथील वाघचा उल्लेख कधी कधी “रॉयल बेंगॉल टायगर” असा केला जातो हे थोडे चमत्कारिकच वाटते; व शास्त्रीय दृष्ट्या त्या नावाला महत्त्व दिले जात नाही. भारतातील वाघांची एकच उपजात आहे आणि बंगालमध्ये दिसून येणारे वाघ काही आसाम, बिहार किंवा भारताच्या इतर भागात दिसून येणाऱ्या वाघांपेक्षा मोठे किंवा जास्त देखणे असतात असेही नाही. ‘रॉयल’ हा शब्द कसा आला ते काही मला माहीत नाही. कदाचित विंडसरचा राजा जेव्हा वेल्सचा राजकुमार होता तेव्हा त्याने एखादा वाघ मारला असावा त्यावरूनच कदाचित ‘रॉयल’ हा शब्द आला असावा. ‘बेंगॉल’ हा शब्द बरोबर लागू आहे कारण जे ‘टाईप स्पेसीमेन’ (= संग्रहालयातील त्या त्या जातीचे पहिले जमविलेले कातडे) लिनीयसने पाहिले ते बंगालमध्ये मिळालेले असावे. १७५८ मध्ये लिनीयस ह्या संशोधकाने ‘फेलीस टैग्रीस’ असे शास्त्रीय नाव वाघाला दिले. ओघाओघाने येथे हे नमूद केले पाहिजे की अलीकडे वाघाला ‘फेलीस टैग्रीस’ ह्या ऐवजी ‘पँथेरा टैग्रीस’ असे शास्त्रीय नाव दिले गेले आहे.

माजावर येण्याचा हंगाम सोडला तर वाघ साधारणतः एकेकटे राहतात. याशिवाय मादीबरोबर एखादे पिलू असले तर ते मोठे होईपर्यंतच तिच्याबरोबर राहते. वाघाची हद्द ही त्या भागातील थोडीशीच ठराविक अशी जागा नसते तर जेथे वाघ वरचेवर, ठराविक काळात आलटून पालटून, भक्ष्य पकडण्यासाठी जातो ते ठराविक मैलामैलांच्या अंतराचे टापू असतात. दुसऱ्या हद्दीतील वाघ जर एखाद्या वाघाच्या हद्दीत शिकारीसाठी घुसला तर त्या दोन्ही वाघांत भांडणे होतात. एखादे वेळेस दुर्बल असलेल्या वाघाने भांडण करण्याचे टाळले तर गोष्ट वेगळी.

वाघाच्या गंधज्ञानाबद्दल बरेच वादविवाद आहेत. काहींचे म्हणणे असे आहे की वाघाचे गंधज्ञान फारसे तीव्र नसते तर काही ते विधान ताबडतोब खोडून काढण्याकरिता उदाहरणे देखील देतात. खरे पाहता त्याचे गंधज्ञान तीव्र असते. परंतु त्याची दृष्टी व श्रवणशक्ती देखील अतिशय तीव्र असल्यामुळे त्याला गंधज्ञानावरच अवलंबून राहण्याची जरुरी पडत नाही.

अनुक्रमणिका

भारतात वाघ सर्वत्र मोठ्या प्रमाणावर दिसून येत; परंतु अत्याधुनिक व मोठ्या संख्येने उपलब्ध झालेली बंदुकांसारखी हत्यारे, विजेऱ्या, मोटार व जीप गाड्यांचे डोळे दिपवून टाकणारे प्रखर दिवे ह्या सर्व गोष्टींमुळे त्यांची शिकार सोपी झाली व त्यांची संख्या फारच कमी होऊन ते पूर्वीपेक्षा खूपच कमी झाले आहेत. ह्याशिवाय त्यांची संख्या कमी होण्यास आणखी एक कारण आहे ते म्हणजे वाघांची मुंडकी भरून चांगल्या प्रकारे ठेवता येतात (ट्रॉफी). आज घटकेला भारतात ४००० च्या वर वाघ असतील असे मला तरी वाटत नाही. ५० वर्षांपूर्वी येथे चाळीस हजारांच्या वर वाघ होते. भारतातील काही भागांत अजूनही ते बऱ्याच मोठ्या प्रमाणावर दिसत असले तरी मद्राससारख्या काही भागात तर ते फारच कमी होऊ लागले आहेत.

जंगलांतील हरणे, रानडुकरे अशांसारखे त्यांचे नैसर्गिक भक्ष्य कमी होत चालल्यामुळे उरलेल्या वाघांना तसेच बिबळ्यांना देखील जंगलाबाहेर पडून पाळीव जनावरांवर हल्ला करण्याशिवाय गत्यंतर उरलेले नाही. जंगलामध्ये राहून तेथील वन्यपशूंवर उपजीविका करणारे वाघ सडपातळ असतात कारण त्यांना जास्त चपळाईने हालचाली कराव्या लागतात, तर असे पाळीव जनावरांना अलगद उचलणारे वाघ भक्ष्य मिळविण्यास त्यामानाने कमी प्रयास पडत असल्याने सुस्त होतात.

वाघ क्वचितच् अपघाताने चुकून किंवा मुद्दाम होऊन माणसाला मारेल आणि तो त्याला खाणारही नाही; परंतु एकदा का अशा वाघाने माणासाचे मांस खाल्ले तर मात्र त्याला त्याची चटक लागते व नंतर तो नरभक्षक बनतो.

जखमी, अपंगत्व किंवा वृध्दत्व अशा कारणांमुळे बरेचसे वाघ नरभक्षक बनतात; कारण त्यामुळे त्यांना वन्यपशू किंवा पाळीव पशूही मारणे आवाक्याबाहेरचे ठरते. हळूहळू त्यांना माहीत होते की माणूस मारणे फारच सोपे असते. नरभक्षक वाघिणीची पिले मात्र सहसा नरभक्षकच होतात कारण त्यांना तीच सवय लागते व माणसाच्या मांसाची त्यांना चटकच लागून गेलेली असते.

नरभक्षक वाघ खूपच कमी असतात. हजारी तीनचार वाघ नरभक्षक बनू शकतात. जंगलात आपण तसे सुरक्षित असतो. एखादे वेळेस तुम्ही चुकून छोटे बच्चे जवळ असलेल्या वाघिणीजवळ किंवा जखमी अथवा झोपलेल्या वाघाजवळ गेल्याशिवाय सर्वसाधारण वाघ आपल्याला इजा करणार नाही.

एकदा मी उंच गवत असलेल्या भागातून मैल दीड मैल अंतर चालून जात असतानाची गोष्ट आठवते. माझ्या पुढ्यातच थोड्या अंतरावर बहुधा एक गाय चालली होती – पुढचे जनावर चालत असल्यामुळे सळसळणारे गवत मला दिसत होते व त्याचा आवाजही येत होता. ओघाओघाने (सुदैवाने) मी उघड्या जागेवर आलो आणि ती "गाय" तेथे होती – गाय कसली? एक मोठा वाघ!

माझ्या कान्हा येथील मागील भेटीत मी एकदा दुपारी ४·०० वाजता जीपमधून बाहेर जात होतो. माझ्याबरोबर विभागीय अधिकारी होते. आम्ही ४ माणसांना उल्हासित होऊन परतताना पाहिले. त्यांनी गाऱ्यावर असलेला एक वाघ पाहिला होता. आम्ही त्यांना आमचेबरोबर घेतले व सरळ त्या ठिकाणी गेलो.

जीप सोडून देऊन आम्ही अर्धाएक मैल अंतर चालून गेलो. झाडावर काही गिधाडे बसलेली होती – वाघाचे भक्ष्य तेथे असल्याचे हे एक खात्रीपूर्वक चिन्ह! मी सर्वांच्या पुढे होतो. काही अडथळा आलासे

वाटून क्रुद्ध झालेला वाघ त्या उंच गवताच्या कडेकडेने अरण्यात पसार होत असलेला मी पुसटसा पाहिला. तेथे मेलेला एक नर गवा वाघाने अर्धवट खाल्लेला असा दिसत होता. बहुधा आदल्या रात्री वाघाने ही शिकार केलेली असावी. बहुधा त्यामुळेच त्या सकाळी आम्ही ह्या भागातून फिरत असताना एकही गवा आमच्या दृष्टीस पडला नव्हता. मला त्या मरून पडलेल्या देखण्या पशूबद्दल फारच वाईट वाटले. परंतु हा जंगलचा कायदाच आहे. भक्षक आणि भक्ष्य यांचा कायदा – आणि कळपामध्ये नाहीतरी नरांची संख्या नेहमीच जास्त असते.

आता दुपारचे ४–३० वाजले होते. खरोखरचा काळोख पडण्यास अजून दोन तास होते. तेवढ्यातच सर्वत्र काळोख झाला. जीपच्या ड्रायव्हरने सुचविले की विश्रांतिगृहात असलेल्या वनसंरक्षक अधिकाऱ्यांकडे ही बातमी पोहोचविली पाहिजे. मलाही ते पटले.

त्यामुळे मी त्याप्रमाणे विचार करू लागलो. मी जमिनीवरच भक्ष्यापासून थोड्या अंतरावर एखादी आडोश्याची जागा पाहून झुडुपामागे लपून बसेन व विभागीय अधिकाऱ्यांना हवे असल्यास तेही माझ्याबरोबर राहतील. ड्रायव्हर आणि सोबतची चार माणसे बोलत बोलत आवाज करीत जीप घेऊन गेल्यावर वाघ भक्ष्यावर येण्याची चांगली संधी होती. वेळ सूर्यास्ताची असल्यामुळे सूर्याची किरणे सरळसरळ माझ्या कॅमेऱ्याच्या भिंगावर पडली असती म्हणजे छायाचित्रे घेणे शक्य नव्हते, परंतु वाघ मात्र व्यवस्थित निरखून पाहण्याची ही चांगली संधी होती.

माझ्या लहानपणी मी काही वेळा झाडावर बसून भक्ष्यावर आलेला वाघ पाहिलेला होता. आणि हे भारदस्त जनावर येत असतानाच्या अविस्मरणीय साहसी दृश्याचा अनुभव घेतलेला होता आणि आज खाली भक्ष्याजवळ जमिनीवरच बसून तसले साहसी दृश्य बंदुकीच्या गोळीने टिपल्याखेरीज पाहण्याचा अनुभव येणार होता.

मी विभागीय अधिकाऱ्याला माझ्या मनातील विचार सांगितले आणि तुम्हाला माझ्याबरोबर राहण्यास आवडेल का असे विचारले. त्यांच्याकडून गुळमुळीत होकार आला. ते बहुधा पुढ्यात वाढून ठेवलेल्या गोष्टीच्या विचारामुळे नाराज झालेले असावेत.

मला येथे आवर्जून सांगावयाचे आहे की माणसाकडून दुखापत झालेली नसल्यास वाघ हे जंगलातील एक सुरक्षित आणि अत्यंत सुस्वभावी जनावर आहे. मात्र वाघीण आपल्या बछड्यांबरोबर बाहेर पडली असल्यास व त्यांना कोणताही धोका दिसल्यास तिच्यासारखी आग जगाच्या पाठीवर दुसरी कुठचीही नाही. तसेच जखमी झालेला वाघ, मग तो नर असो किंवा मादी, तो केव्हाही आणि कुठच्याही ठिकांणी अत्यंत धोकादायक असतो. नरबळी घेणारा किंवा त्याहूनही भयंकर असा नरभक्षक वाघ अतिशय भयानक व धोकेबाज असतो. असा वाघ असल्यास त्याची सर्वत्र दुष्कीर्ती पसरते.

एकांड्या रानरेड्याबद्दल किंवा हत्तीबद्दल आपण काही सांगू शकत नाही. ते भयंकर धोकेबाज असतात. गेंडा किंवा जंगली डुक्करसुद्धा भयंकर अक्राळविक्राळ असू शकतात. परंतु ह्या ठिकाणी तर भक्ष्यावर येणारा वाघ किंवा वाघीण विशेष क्रुध्द असण्याचे काहीच कारण नव्हते. मी सहसा केव्हाही बेसावध किंवा खोट्या आत्मविश्वासाने जात नसे.

एक ३ फूट उंचसे झुडुप मी निवडले आणि रेंज अधिकाऱ्याला त्यामागे लपून बसावयाला सांगितले. मी आणखी जरा उघड्यावर बसलो; कारण मला माहीत होते की मी हालचाल न करता स्वस्थ बसू शकेन. माझा दोस्त कशी चुळबूळ करेल हे अनुभवावरून मला माहीत होते. परंतु ते झुडुप त्याच्या हालचाली दडवू शकत होते. दुसरी माणसे गेली आणि लवकरच आम्हाला जीपचे इंजिन सुरू झाल्याचा व जीप तेथून गेल्याचा आवाज ऐकू आला.

थोड्या वेळाने काही गिधाडे झाडावरून उतरून खाली जमिनीवर भक्ष्याकडे आली.

विभागीय अधिकाऱ्याने मोठ्या आशाळभूत नजरेने जवळपास असलेल्या एका उंचशा झाडाकडे पाहिले. तेथे आम्हाला सुरक्षिततेने परंतु आखडून बसून वाघ व्यवस्थितपणे पाहता आला असता. मी त्याला निमूटपणे जिथल्या तिथे बसण्याबद्दल बजाविले. त्याची सारखी चाललेली चुळबूळ, भीतीने सर्व दिशांना भिरभिरणारी नजर, आणि अंगाला फुटलेला घाम सारखा पुसणे हे सर्व पाहून मला वाटू लागले की वाघाला ह्याची चाहूल लागेल आणि वाघ बाहेर पडणारच नाही. सूर्याचा गोळा बुडत चालला होता अन् त्यामुळे भक्ष्यावरच त्याची किरणे पडत होती.

जंगलाच्या कडेला थोडी हालचाल झाली. एकंदरीत जागेचा आढावा घेत काहीतरी मोठ्या सावधतेने हलले. हो, तो वाघच होता.........

माझ्याकडे थोडा वेळ सरळ रोखून पाहिल्यावर तो उंच गवतात असलेल्या भक्ष्याकडे येण्याकरिता, मधेच गवत नसल्याने उघड्या पडलेल्या जमिनीच्या पट्ट्यावरून, मोठमोठी पावले टाकीत भारदस्तपणे चालू लागला. मग तिला ..... बहुधा ती वाघीण असावी .... एक थोडासा लहान वाघ येऊन मिळाला. वाघीण व तिच्याबरोबर एक जवळजवळ पूर्ण वाढलेले पिलू असावेसे ते दृश्य होते. ते भक्ष्यापर्यंत आले. ती भक्ष्य आणखी थोडे पुढे फरफटवू लागली; परंतु थोड्या वेळाने थांबली. ते दोघेही निघून गेले – आमच्या अस्तित्वाची मात्र त्यांना जराही चाहूल लागली नव्हती.

ते दोघेही विशेष भुकेले नसल्यामुळे त्यांनी थोडे थांबावयाचे ठरविले. त्यानीच तो अर्ध्याहून जास्त गवा खाल्ला नव्हता का? आणि खरं पहता ती घृणास्पद गिधाडे आपल्या भक्ष्यावरून हाकलून लावण्याकरिता ते लगेच आले होते. म्हणनूच ते एकमेंकापासून थोड्या अंतरावर बसून एखाद्या मोठ्याशा घरगुती मांजरासारखे आपले अंग चाटून चाटून साफ करू लागले.

खरोखरच अप्रतिम दृश्य होते ते! बंदुकीच्या नळ्यांचा आवाज नाही की कानठळ्या बसवून टाकणाऱ्या गर्जनांचा गडगडाट नाही; ह्या सुंदर शांत दृश्याला चिरून टाकणारा कुठचाही आवाज नाही – कुठचेही जखमी किंवा ठार मारलेले जनावर नाही – ह्या प्रक्षेणीय नैसर्गिक दृश्याला कुठचाही अडथळा दिसत नव्हता. भारताच्या अत्यंत भारदस्त आणि भव्य अशा भक्षक जनावरांचा जंगलाचा कायदेशीर व्यवहार इथे दिसत होता.

आता बराच उशीर होत आला होता. त्यामुळे आम्ही आमचे छोटे झुडूप सोडले; त्याबरोबर वाघांनी चटकन् आसऱ्यासाठी पलायन केले. इतक्यात वनसंरक्षक अधिकारी आले. आम्ही आताच अनुभवलेल्या दृश्याबद्दल त्यांना सर्व सांगितले. काळोख चांगलाच पसरू लागल्यामुळे आम्ही विश्रांतिगृहाकडे परतलो.

अनुक्रमणिका

आत्ता घडलेल्या घटनांच्या वेळी ते घाबरले होते का, असे मी रेंज अधिकाऱ्यांना विचारले; आणि त्यांचे त्वरित उत्तर आले "हो, फारच." "का बरे?" मी विचारले. उत्तर आले, "कारण मला वाघांचा असा अनुभव पूर्वी केव्हाच आलेला नव्हता." ह्यावरून असे सिद्ध होते की सर्वच वाघ भयंकर धोकादायक असतात असेच बरेचजण समजतात.

परंतु नंतर संध्याकाळी त्यांनी दुसऱ्यांना ही गोष्ट फारच रंगवून सांगितली. ते किती धैर्यवान व शूर होते – वाघापासून ते किती जवळ होते – आमच्यात व वाघात असलेले सत्तरएक यार्डांचे सुरक्षित अंतर लगेच सातएक यार्डांवर आले. काहीही असो – परंतु माझ्यासारखी त्यांना ही घडलेली सबंध हकीगत फारच मोलाची वाटली ह्यात सर्व काही आले.

मला त्यांच्या रसभरीत व खुमासदारपणे वर्णन करू शकण्याच्या शैलीचा हेवा वाटला. माझी स्वतःची कल्पना-शक्ती मात्र रूक्ष व थिटी आहे. मी जेव्हा त्यांना त्यांच्या मित्राला झालेल्या घटनांबद्दल थोड्या फार गोष्टी सांगताना ऐकले तेंव्हा मला मी माझ्या मित्राकडून एकदा ऐकलेल्या गोष्टीची आठवण झाली – एकदा गावातील काही हौशी शिकाऱ्यांचा घोळका कॅम्पातील शेकोटीभोवती बसून वाघाच्या शिकारीबद्दल गोष्टी करत होता. त्यातील एक वयस्क शिकारी आपल्यासारखे धाडस कोणी केले नसेल असे सांगू लागला. - आपण एकदा एका प्रचंड वाघाबरोबर कशी झुंज दिली आणि शेवटी आपल्याजवळील मोठ्याशा चाकूने वाघाला कसे मारले ...... तो वाघ अठरा फूट नऊ इंच भरला.

वाघाच्या मोजमापाच्या ह्या शेवटच्या वाक्याला बाकीच्यांनी हरकत घेतली. नंतर त्या गोष्ट सांगणाऱ्या माणसाने मोठ्या दिलदारपणे म्हटले की ही गोष्ट फार फार वर्षापूर्वी घडली आणि कदाचित त्यात थोडी चूक झाली असेल आणि वाघ कदाचित खरोखर नऊ फूट अठरा इंच असावा.

मध्य प्रदेशात वायव्येपासून काही अंतरावर शिवपुरी येथे एक उपवन आहे. भारतातील इतर अनेक अभयारण्यांप्रमाणे ही जागा देखील तेथील राजेरजवाड्यांची शिकारीसाठी राखीव अशी होती. १९४७ मध्ये जेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि पूर्वीची संस्थाने जेव्हा नवीन राज्यघटकांमध्ये विलीन झाली तेव्हा शिवपुरीला पूर्वीच्या ग्वाल्हेरच्या महाराजाने जे संरक्षण दिलेले होते ते एकाएकी थांबले व तेथे जास्तच चोरट्या शिकारी होऊ लागल्या.

ह्या वेळेस सांबर, नीलगाय, चितळ, चिंकारा आणि दुसरे बरेचसे वन्यप्राणी मोठ्या प्रमाणावर मारले गेले. मी जेव्हा १९५७ च्या मे मध्ये प्रथम ह्या भागाला भेट दिली तेव्हा हे सर्व वन्यजीवन पुन्हा एकदा आपोआप आपली घडी बसविताना दिसत होते. उपवनाच्या सुपरिटेंडेंट साहेबांनी मला सांगितले की त्यांनी अत्यंत काळजीपूर्वकपणे आजूबाजूच्या जंगलांतून 'हाक्यां' च्या मदतीने येथील विखूरलेले प्राणीजीवन हा उपवनाच्या ६१ चौ. मैल विभागात वळवून वळवून व्यवस्थितपणे वाढीस लावले.

दर दिवशी मला काही चिंकारा, देखणे काळवीट, अत्यंत सुंदर असे चेस्टनटच्या फळाच्या रंगाचे गझेल (एक प्रकारचे हरीण) तसेच चितळ, सांबर, नीलगायी वगैरे दिसत होत्या. त्यावरून अशाप्रकारे वन्यजीवन वाढविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना यश आलेले दिसत होते. मोर तर सर्वत्रच दिसत होते; आणि नर्तक किंवा नंदननाचण ह्या पक्ष्यासकट ओणखीही कितीतरी जातीचे पक्षी दिसत होते. एकदा आम्ही पाचएक जण तेथेच उघड्यावर खुरट्या झुडुपांच्या जागेत उभे राहून काहीतरी बोलत होतो तेव्हा मी एक

जांभळ्या सूर्यपक्षाची मादी उडून तेथेच भोवऱ्यासारखी भिरभिरून आमच्यापासून काही फूट अंतरावरच तिचे अपुरे असलेले घरटे बांधीत असलेली पाहिली (छायाचित्र १८) मी सर्वांना जेथे होते तेथेच उभे रहावयास सांगून माझा कॅमेरा शोधावयास गेलो. परिणामी मला हा पक्षी घरटे बांधीत असताना किती तरी चलत् चित्रे व नुसती स्थिर चित्रेही अगदी जवळून घेता आली.

शिवपुरी येथील गावाजवळचे व जंगलातील दृश्य कान्हापेक्षा अगदी वेगळे आहे. येथे जास्त करून पानझडी वृक्ष दिसतात. मार्च ते जून ह्या काळात तेथे उन्हाळा असतो त्यामुळे सर्व जागा सुकून गेलेली दिसते. त्याला अपवाद तेथील सुंदर कृत्रिम तळी व वर्षभर पाणी असणारे एकदोन झरे. जुलैमध्ये पावसाला सुरुवात होते आणि साहजिकच ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये उन्हाचा कडाका जाणवतो. जंगलातील काही भाग खडकाळ व वैराण असे आहेत, परंतु अशीच जागा वाघांना आवडते. याच भागातून मोठमोठे वाघ मारल्याच्या कितीतरी नोंदी दिसून येतात. परंतु मी स्वतः वाघ आणि बिबळेदेखील मोजण्याच्या बाबतीत फारच काटेकोर आहे, कारण कुणालाही ही मापे अवास्तव वाढवून सांगण्याची चांगली संधी मिळते. मेलेल्या प्राण्याचे बरोबर मोजमाप पुढीलप्रमाणे घेतले पाहिजे. मेलेले जनावर जमिनीवर पसरावे त्याच्या नाकाच्या टोकाजवळ एक लाकडी पट्टी ठेवावी व शेपटीच्या शेवटच्या टोकाला दुसरी पट्टी ठेवावी. नंतर जनावर तेथून काढून टाकून मग त्यामधील अंतर मोजावे. भारताच्या काही भागात मला असे सांगण्यात आले की तेथे जनावरांच्या अंगाला असलेल्या वक्राकार जागांवरूनही मोजमाप घेतले जाते, आणि मोजपट्टी (टेप) मऊ भागात जितकी जास्त दाबावी तितकी वाघाची लांबी जास्त होते.

पूर्वीच्या काळी असा समज होता की व्हाइसरॉयसारख्या महत्त्वाच्या माणसाने मोठ्यात मोठा वाघ मारावा; म्हणून मोजमाप करीत असताना अशा मोठ्या माणसांचे त्याकडे थोडे दुर्लक्ष झाले की (मी त्यांना याचे ‘श्रेय’ देतो.) शिकारीची व्यवस्था पाहणारी माणसे वाघाचे ताणून ताणून आणि मऊ भागात जितके दाबून माप घेता येईल तितके दाबून घेत. त्यामुळे वाघाचे मोजमाप चांगलेच मोठे येई. मला एका प्रसिद्ध शिकाऱ्याने सांगितले होते की अशा व्हाईसरॉय लोकांसाठी ११ इंचाचा फूट असलेली खास टेप वापरली जाई.

शिवपुरीपासून जवळच एका दगडावर १९१६ मध्ये लॉर्ड हार्डीग्जने मारलेल्या मोठ्यात मोठ्या अकरा फूट साडेसहा इंच लांब वाघाची नोंद आहे. थोडेच पुढे आणखी एका दगडावर अकरा फूट साडेपाच इंचाचा वाघ १९२४ मध्ये लॉर्ड रीडींगने मारल्याचीही नोंद आहे. मला आश्चर्य वाटते.

महाराजा व त्यांची पाहुणे मंडळी सुरक्षित ठिकाणी बसून वाघ भक्ष्य खात असताना पाहू शकतील असे एक भोजनालयवजा विश्रांतिगृह शिवपुरी येथे आहे. येथे १००० मेणबत्त्यांचा उजेड पडेल इतक्या शक्तीचा एक विजेचा दिवा आहे. त्याची शक्ती पाचपासून एक हजार पर्यंत कमीजास्त करता येते. त्यामुळे छायाचित्रे घेता येतात. वाघाने आपले भक्ष्य ताब्यात घेतल्यावर हा उजेड पाचपासून एक हजारपर्यंत हळूहळू १०/१५ मिनिटांत वाढविला जातो; त्यामुळे वाघाच्या लक्षात हा उजेड पटकन् येत नाही.

मी ही जागा माझ्यासाठी वापरली नाही. परंतु मी एका वनाधिकाऱ्याने ती जागा वापरावयास मिळण्यासाठी परवानगी घेतल्याची गोष्ट ऐकली. एका वाघिणीने पहाटे तीन वाजता एक जनावर मारले. शिकाऱ्याने उजेड ५ पासून १००० पर्यंत वाढविला. त्यानंतर वाघीण गेली व ४ छोट्या पिलांना घेऊन आली. ते सर्वजण भक्ष्य खाऊ लागले.

इतक्यात एक मोठा नर वाघ अनपेक्षितपणे तेथे आला. वाघिणीने घाईघाईने आपली पिले जवळपासच्या जंगलात लपविली आणि ती परत अडथळा आणणाऱ्या वाघाच्या समाचाराला आली. वाघ जसा भक्ष्याच्या जवळ जाऊ लागला तसतसे तिने एकदा भक्ष्य आणि वाघ यांच्यामध्ये तर एकदा तिची पिले व वाघ यांच्या मध्ये राहून वाघाला बराच वेळ युक्तीने पिले व भक्ष्य या दोहोंपासून दूर ठेवले. बराच वेळ असा गेला. नंतर त्या वाघाने मिश्किलपणे ह्या चवताळलेल्या वाघिणीकडून उगाचच धोका नको बुवा असा विचार करून तो भुकेलेला होता तरी त्या भक्ष्याचा नाद सोडून देण्याचे ठरविले. नंतर ती वाघीण जवळच्याच काटेरी जाळीजवळ गेली. तेथून तिने आपली पिले काढून भक्ष्याजवळ आणली. त्या वनाधिकाऱ्यापासून काही फूट अंतरावरच हे नाटक घडले. परंतु त्याने त्याची काही छायाचित्रे घेतली की नाही ते मात्र मी ऐकले नाही.

शिवपुरी उद्यानाचे सुपरिटेंडंट विजयसिंग मला वाटते वन्य प्राणीजीवनाचे अत्यंत माहितगार गृहस्थ असावेत. शिवाय या विषयांत त्यांना खरोखरच रस असावा. आम्ही पुष्कळ वेळपर्यंत चर्चा केली. मार्शल टिटोंसाठी त्यांनीच काही दिवसांपूर्वी वाघांची योजना केली होती व त्यांनी मला त्यासंबंधी सर्व सांगितले. त्यांना जर एक महिन्यापूर्वी कळविले तर ते कमीत कमी एक वाघ तरी तुम्ही सांगितलेल्या वेळेत त्या ठिकाणी अगदी दिवसा देखील आणू शकतात. असे करण्याकरिता ठराविक अंतराअंतराने एखादा रेडा भक्ष्यबळी म्हणून बांधला जातो. तो जसा लहानमोठा असेल त्याप्रमाणे तेथे एक किंवा दोन वाघ येतात.

असे जिवत भक्ष्यबळी वाघ, सिंह किंवा बिबळ्यांसाठी बांधावेत किंवा बांधू नयेत ह्या पूर्वीपासूनच्या वादापासून मी दूर राहिलेले बरे. मी स्वतः त्याच्याशी सहमत नाही किंवा त्याला भक्कम असा विरोधही मी करू शकत नाही. ही जी रूढी हजारो वर्षांपासून चालत आली आहे ती पटवून घेण्याकडे माझा कल आहे. काहींना ते अत्यंत क्रूर वाटेल. परंतु अशा लोकांना मला सांगावेसे वाटते की या बाबीचा सर्व बाजूंनी विचार केला तर तिच्या बाजूने व विरुद्ध अशा दोन्ही प्रकारे बोलता येईल. त्यामुळे निःपक्षपाती दृष्टिकोन स्वीकारावा लागेल. माणुसकीच्या दृष्टीने पाहता जनावर बांधलेले असल्यामुळे आपल्यापुढे काय वाढून ठेवलेले आहे हे नक्की माहीत नसल्यामुळे अत्यंत घाबरून गेलेल्या व व्याकूळ परिस्थितीत असते व त्याला स्वतःची सुटकाही करून घेता येत नाही असे वाटणे खरे पाहता चूक आहे.


शहरात राहून आरामखुर्चीत बसून अशा गोष्टी वाचणारा माणूस कदाचित् असेच म्हणण्याला दुजोरा देईल की वाघाला देखील राहण्याचा हक्क आहे, व त्याकरिता त्याला आठवड्यातून दोनदा तरी असे जिवंत जनावर मिळाले पाहिजे. जंगलातून गवत खाणारी शाकाहारी जनावरे कमी होत चालली आहेत त्यामुळे साहजिकच वाघ बाहेर येऊन पाळीव जनावरे मारलेच; शिवाय वाघासारखा प्राणी अत्यंत वेगळा असा असल्यामुळे तो संधी मिळाल्यास वयस्क, कृश अशा जनावरांकडे दुर्लक्ष करून चांगली धष्टपुष्ट व कोवळी जनावरेच मारणार. तसेच भारतात रेड्यांपासून बकऱ्यांपर्यंत सर्व प्रकारची पाळीव जनावरे फारच मोठ्या प्रमाणावर आहेत व नाहीतरी ती झाडझाडोरा, गवत-पाचोळा खाऊन इथले कितीतरी भाग उ. आफ्रिका आणि मध्यपूर्वेकडील देशांप्रमाणे वैराणच करीत असतात; आणि जेव्हा असे भक्ष्यबळी पाहिजे असतात तेव्हा कुचकामी रेडेच त्यांच्या मालकांकडून विकले जातात; त्यांची मौल्यवान उपयुक्त जनावरे तर त्यांच्यापासून हिसकावून घेतली जात नाहीत; याशिवाय असे भक्ष्यबळी बांधले असताना देखील बहुधा ते चरत किंवा कडबा शांतपणे (?) रवंथ करीत असताना दिसतात व त्यांना विशेष क्लेष न पोहोचता चटकन् मृत्यू येतो. याउलट एवीतेवी त्यांना कत्तलखान्यापर्यंतचा लांबलचक उन्हाने तापलेला, धुळीने भरलेला रस्ता

तुडवावाच लागला असता आणि मृत्यू फार तर एक दोन दिवसांनी पुढे ढकलला गेला असता आणि यामुळे तर त्या जनावराच्या कष्टात आणखीनच भर पडली असती.




**५ (अ) उघड्या कुरणामध्ये नर वाघ उभा दिसत आहे.**
**(ब) दिल्ली प्राणीसंग्रहालयात ५ वर्षाचा राजा दिसत आहे. (रेवा येथील पांढरा वाघ)**


अनुक्रमणिका



६(अ) गीरच्या जंगलातील भारतीय सिंह
(ब) एक सिंहीण तीन महिन्यांच्या छाव्याबरोबर

अनुक्रमणिका






२५ (अ). जंगली गाढवं ३४ मैल वेगाने देखील धावू शकतात. (दूरवर मृगजळ दिसत आहे.)
२५(ब). ह्या कळपात ३ माद्या देखील होत्या.


अनुक्रमणिका





२६अ. गीरच्या जंगलात प्रमुख शिकारी (मधला,त्याच्या दोन सहकाऱ्यांसमवेत.)
२६ब. मालधारी त्याच्या म्हशींबरोबर (केंव्हा सिंहाचे हेच भक्ष होते.)

अनुक्रमणिका





२७. भुकलेल्या सिंहीणी अन् छाव्यासाठी भक्ष सोडून हा मोठ्या आयाळीचा सिंह इथे आलेला दिसत आहे.

अनुक्रमणिका




२८/२९. पसरत चाललेल्या संध्याछायामध्ये अन् तिचे चार छावे त्यांची भक्ष्यावर पाळी येण्याची वाट पहात आहेत.






३०अ. एका सिंहीणीला तीन छावे होते.
३०ब. जरी ही शिकार सिंहीणीने केलेली होती तरी सिंहाने शिकारीचा कबजा घेतला.


अनुक्रमणिका






३१अ. भक्ष्यावर एक सिंहीण अन् तिचे छावे
३१ब. मोठा गुरगुराट झाला अन् त्यासरसशी सिंहीण भक्षावरून ताबडतोब उठली.

अनुक्रमणिका




३२. कॉर्बेट नॅशनल पार्क येथे हिमालयाच्या पायथ्याजवळील देखावा. (पर्यटक नसताना ह्या बंगल्यात वाघ झोपत ऐकीवात आहे.)

अनुक्रमणिका



७ हिमालयाच्या उंच शिखरावरून नदिचा उगम

अनुक्रमणिका



**८. लाल पांडा हिमालयामध्ये दिसून येतो.**

मी हे वरील सर्व मुद्दे केवळ एवढ्याचसाठी मांडले आहेत की जर मी ते सर्व पूर्णपणे टाळले असते तर मी स्वतः टीकेला पात्र ठरलो असतो. ती मी टाळली आहे.

मी विजयसिंग यांचेकडून एक समाधानकारक गोष्ट ऐकली ती म्हणजे, मार्शल टिटो यांनी वाघाला मारण्याची त्यांना देऊ केलेली संधी नाकारली. त्याऐवजी त्यांनी त्याची चलत्‌चित्रे मात्र आवर्जून घेतली कारण त्यांना व त्यांच्याबरोबर असलेल्या मंडळींना एकाच ठिकाणी चार वाघ आलेले दिसले. मात्र त्या चारांपैकी एकही वाघ कॅमेऱ्याशिवाय दुसऱ्या कशानेच टिपला गेला नाही.

अनुक्रमणिका

जिम कॉर्बेट ह्या एका उत्तम निसर्गप्रेमी शिकाऱ्याने स्वतः वन्यप्राण्यांचे जास्त छायाचित्रण केलेले नसले आणि तो जरी भारताच्या इतर भागांतून जास्त फिरलेला नसला तरी त्याच्या “कुमाऊँचे नरभक्षक” ह्या पुस्तकात तो जे लोक बंदुकीऐवजी कॅमेऱ्यानेच जनावरे टिपतात त्यांनाच शाबासकी देताना दिसतो.

तो लिहितो ....... “शिकाऱ्याला एखाद्या जनावराची चांगली छायाचित्रे घेता येणे हे त्या जनावराचे मुंडके कापून भरून त्याची ट्रॉफी मिळविण्यापेक्षा जास्त समाधान देते. याशिवाय सर्वच वन्यजीवनप्रेमी लोकांना अशी छायाचित्रे आवडतात. “ट्रॉफी” मध्ये ज्या माणसाने ती स्वतः मिळवलेली असते त्यालाच फक्त रस असतो.”

मला वर्तमानपत्रांतील एका मजकुरामध्ये वाचल्याचे आठवते की जिम कॉर्बेटने १९४० ह्या दशकाच्या सुरुवातीला लॉर्ड वॅव्हेल ह्या व्हाइसरॉयला सांगितले होते की भारतातील वाघ कदाचित् दहाएक वर्षात समूळ नाहींसा होईल.

जिम कॉर्बेटच्या ह्या भाकिताला जवळजवळ २० वर्षे होत आली (आता चाळीस) परंतु अजूनही येथला वाघ समूळ नष्ट झालेला नाही. जसजशी वर्षे जात आहेत तसतशी त्यांची संख्या कमी होत चालली आहे, परंतु तरीही भारताच्या भूमीवर अजूनही तो टिकून आहे ह्याचे श्रेय वाघाच्या धूर्तपणाला व तो ज्या अतिदाट जंगलामध्ये राहतो त्या प्रदेशाला दिले पाहिजे. मला वाटते, मनुष्यवस्ती फार वाढत चालल्यामुळे त्यांची संख्या कमी होणे साहजिकच आहे. परिस्थितीमुळे कदाचित् यापुढे तो फक्त प्राणिसंग्रहालये आणि काही राष्ट्रीय उपवने किंवा अभयारण्यांतूनच दिसून येईल, ते देखील राज्यसरकारला अशा चांगल्या जंगलातील जागा पूर्णपणे नीट राखता आल्या तरच.

वन्यप्राणी जीवनाचे रक्षण करणारे सर्व लोक व मी स्वतः सध्या अशा प्रकारे भारतात वाघांची शिकार करण्याला बंदी घालण्याचे कार्य करीत आहोत. वाघ काही ठराविक वसाहतीत सहज वाढू शकतात (त्यांची उत्पत्ती होऊ शकते). २/३ बच्चे काही ठराविक कालाच्या अंतराअंतराने उपजविणारी वाघीण त्या ठराविक टापूतील वाघांची सख्या वाढवीत असते. त्यामुळे अशा वेळेस त्यांना मारून त्यांची संख्या काबूत ठेवावी लागते.

ह्याशिवाय शिकारीचे नियम पाळून, शिकारीचे परवाने धारण करणाऱ्यांनाच शिकार करण्यास हल्लीच्या माहितगार वन्यजीवन संरक्षकांकडून अशा शिकारीच्या खेळाला उत्तेजन दिले जाते कारण त्यामुळे अत्यंत उपयुक्त असा पैसा कररूपाने मिळतो. याशिवाय अशा हौशी शिकाऱ्यांमुळे चोरट्या शिकाऱ्यांना एक प्रकारचा धाक राहून आळा घातला जातो. काही असेही वन्यप्राणीसंरक्षक आहेत की ज्यांना प्राणी-पक्षी हौसेखातरही शिकार करून मारणे अजिबात आवडत नाही; परंतु त्यांना आधुनिक शहरातून कोणी विचारत नाही कारण पुष्कळ मोठ्या प्रमाणावर असलेले वन्यप्राणी खरे पाहता पुष्कळ पैसा कररूपाने मिळवून देतात. शिवाय वन्यप्राण्यांची संख्या भरमसाठ वाढू लागली तर तिलाही नियंत्रित करणे आवश्यक आहे.

१९६१ च्या वसंत ऋतूत एकदा ब्रिटनची राणी जेव्हा भारताला भेट द्यावयाला आली होती तेव्हा ह्या राजेशाही भेटीत तिच्याबरोबर असलेल्या मंडळींनी वाघ मारला. “फॉना प्रिझर्व्हेशन सोसायटीने काही महिन्यांपूर्वी त्याची चौकशी करण्याकरिता मला लिहिले होते की अशा भेटीत वाघ मारणे हे नैतिक दृष्ट्या तसेच प्राणीसंरक्षण करण्याच्या दृष्टिकोनातून ठीक होते का? परंतु मला याचे आश्चर्य वाटले. मी त्यांच्या

चौकशीला उत्तर दिले की वाघ हा काही भारतातील संरक्षण मिळावे ह्या गटातील प्राणी नाही; आणि अशा प्रकारे राजेशाही मंडळींनी भारतात वाघ मारणे हे स्कॉटलंडमध्ये एखादे हरीण मारण्यासारखे आहे. त्यामुळे यावर इतका आक्षेप घेण्याची जरुरी नाही.

भारतात एखादी बडी पाहुणे मंडळी आल्यास अजूनही त्यांना पूर्वापार परंपरेने वाघाची शिकार करण्याचे आमंत्रण देण्यात येते. शिवाय एखाद्या भागातील वाघ जर फार कमी झालेले नसतील तर तेथे शिकार करण्यात काहीच वावगे नाही. [अर्थात आजमितीला हे शक्य नाही. मूळ पुस्तक १९६४ मध्ये प्रकाशित झाले होते. तेव्हा वन्यप्राणी संरक्षणाचे कायदे अगदी शिथिल होते. ] जर धुमाकूळ घालणाऱ्या वाघांना ठार मारण्यास असे हौशी शिकारी नसते तर राज्यसरकारला पुष्कळ पैसे खर्च करून धंदेवाईक अशा वाघांचा संहार करावयाला बोलवावे लागले असते.

याउलट अशा राजेशाही मंडळींबरोबर आलेल्या काही लोकांनी नेपाळमध्ये एखाद्या गेंड्याच्या मादीची हत्या केली असती तर मात्र ती फारच दुःखदायक गोष्ट ठरली असती कारण नेपाळमध्ये गेंड्याला पूर्णपणे संरक्षण दिलेले आहे आणि विशेषतः गाभण मादीला तर जास्तच संरक्षण दिले पाहिजे. परंतु आपल्याला हे मान्य करावेच लागेल की ह्या ठिकाणी त्यांच्या बड्या यजमानांनी बहुधा गेंडा ही राजेशाही शिकार मानून त्यांना भेट देऊ केली असेल; परंतु राजेशाही पाहुण्यांनी गेंडा मारल्यास ते बरे दिसणार नाही म्हणून त्यांनी त्याला नकार दिला असावा.

अनुक्रमणिका

## प्रकरण ७ वे

# बिबळ्या वाघ

कान्हा शिवपुरी ही दोन ठिकाणी जरी वाघ बघावयास उत्तम असली तरी भारतात बिबळ्याला मात्र त्याचे स्वतःचे असे विशिष्ट ठिकाण नाही. बिबळे वाघ सर्व भारतभर मोठ्या प्रमाणावर विखुरलेले आहेत. ते वायव्येकडील सुक्या तसेच अगदी विरळ जंगलांतूनही आढळतात. भारतात बिबळ्याच्या बऱ्याच उपजाती आढळतात म्हणजे ठराविक भागातील राहणीमानावरून त्यांच्यात थोडेथोडे फेरफार असलेले दिसून येतात; आणि साधारणतः सुक्या व उघड्या भागांतील जंगलांतून आढळणाऱ्या बिबळ्यांचा रंग थोडा फिकट असतो व जनावर लहान असते.

भुरा किंवा बर्फाळ प्रदेशांत दिसून येणारा बिबळ्या दिसावयाला अत्यंत सुंदर असतो, तो फक्त हिमालयातील जास्त उंचीच्या भागांत तसेच काश्मीर, सिक्किम येथील बर्फाळ प्रदेशांतच दिसून येतो. हा सर्वसाधारण बिबळ्यापेक्षा थोडा लहान असतो परंतु त्याची शेपटी थोडी जास्त लांब असते. दुसऱ्या एका जातीला 'क्लाऊडेड लेपर्ड' असे म्हणतात. हा इतर जातीपेक्षा फारच वेगळा असतो. त्यांच्या अंगावर ढगांच्या आकारासारखी नक्षी असते. तो फार दाट झाडाझुडपांत राहत असल्यामुळे फारच कमी प्रमाणात दिसतो. परंतु उ. भारतात मात्र तो फार दुर्मिळ नाही. मी देखील त्याला कित्येक वेळा पाहिलेला आहे.

जंगली जनावरे पुरेशी मिळत नसल्यास गाईगुरे व इतर पाळीव प्राणीदेखील मारता यावेत म्हणून साधारणतः वाघ जंगलाच्या अगदी आतील बाजूस न राहता कडेकडेनेच राहतात; तसेच बिबळे देखील पुष्कळदा जंगले सोडून गावाजवळच्याच खुरट्या झुडुपांच्या रानांत दबा धरून राहतात. वाघांपेक्षा गावाच्या सीमेवर राहणाऱ्या बिबळ्यांची संख्या बरीच जास्त असावी कारण त्यांचे भक्ष्य वासरे, बकऱ्या, कुत्री, कोंबड्या व अशाच प्रकारचे लहान आकाराचे प्राणी हे असते व ते गावात त्यांना सहज मिळते.

कदाचित् ह्याच कारणास्तव बिबळे वाघ हे पट्टेवाल्या वाघापेक्षा जास्त सफाईदार व लबाड असावेसे वाटते. बिबळे लपून राहण्यात फारच पटाईत असतात आणि ते जेव्हा त्यांच्या लपून राहण्याच्या जागेवरून बाहेर पडतात तेव्हाही माणसाकडून देखील मारले जाण्याचा धोका टाळू शकतात. ते पट्टेवाल्या वाघापेक्षा नक्कीच जास्त धोकेबाज असतात. पेनीसिलिनसारख्या आधुनिक औषधांचा शोध लागण्यापूर्वी वाघापेक्षा बिबळ्यांकडून ओरबडली गेलेली माणसे रक्तविषबाधेमुळे जास्त मृत्युमुखी पडत असत, कारण बिबळ्यांच्या सवयी जास्त घाणेरड्या असतात. शिवाय त्यांच्या नखांखाली असलेल्या बोटाच्या त्वचेमध्ये जास्त घाण अडकून राहिलेली असते व त्यामुळे तेथे विषारी द्रव्ये तयार होतात.

मी दिवसाढवळ्यादेखील बिबळे दबा धरून मोठ्या लबाडीने बसलेले पाहिले आहेत. परंतु ते साधारणतः रात्री आपण गाडीतून वगैरे जात असल्यास जास्त मोठ्या प्रमाणावर दिसतात. मी चहाच्या मळ्यात काम करीत असताना सुरुवातीच्या दिवसात एकदा रात्री जेवण्याच्या पार्टीहून माझ्या एका मित्राबरोबर घरी परतत होतो. तेव्हा आम्ही त्या एकाच रात्रीत ३ वेगवेगळे बिबळे वेगवेगळ्या ठिकाणी पाहिले. पहिला रस्त्याच्या मध्येच आमच्याकडेच तोंड करून बसलेला होता. त्यामुळे आम्हाला त्याला भीती दाखवावी लागली. दुसऱ्याच्या तोंडात आताच मारलेले एक बकरे होते. माझा गाडी चालवीत असलेला मित्र गाडी थांबवून खाली उतरला आणि त्या बिबळ्याकडे गेला. गाडीच्या पुढच्या मोठ्या

अनुक्रमणिका

दिव्यांच्या प्रकाशाने तो बिबळ्या जरा घाबरलेला दिसत होता. एव्हाना त्या बिबळ्याच्या तोंडातून ते बकरे खाली पडले होते; ते माझ्या मित्राने घेतले व आम्ही पुन्हा गाडीकडे आलो. ते अजूनही गरम लागत होते. ते बकरे आम्ही त्याच्या विस्मयचकीत झालेल्या मालकाला नेऊन दिले.

तिसरा बिबळ्या आम्ही आमच्या बंगल्याकडे परतल्यावर आवारातच पाहिला. माझ्याकडे एक पाळलेला छोटा बिबळ्या होता. तो आकाराने जवळजवळ माझ्या लॅब्राडोर जातीच्या कुत्र्याएवढा होता. ते दोघेही खेळत असत. हा बिबळ्या कुत्र्याच्या दोनचार साखळ्या एकाला एक जोडून एका बिजागरीचे झाकण असलेल्या पेटीशी बांधून ठेवला होता. त्याला पाहिजे असेल तेव्हा तो त्या पेटीत जाऊन बसू शकत असे. आम्ही पाहिले तेव्हा रात्री ११ वाजता जंगलातील एक पूर्ण वाढलेला बिबळ्या माझ्या पाळलेल्या बिबळ्यावर दबा धरून येत होता. आणि सुरक्षिततेकरिता आम्हाला त्याला गोळीं घालावी लागली.

केव्हा केव्हा बिबळे अशा चहाच्या मळ्यांतील काही रांगांत पहुडलेले असतात. चहाची पाने खुडणाऱ्या बायका जसजशा पुढे सरकत जातात तसतसे ते पुढे पुढे सरकत जाऊन दुसऱ्या टोकापर्यंत जाऊन सटकून जातात. परंतु अशा दोन तीन रांगांतून बायका पुढेमागे सरकत असल्या तर मात्र त्याला आपला पाठलाग केला जात आहे असे वाटून तो रागाने शेवटच्या क्षणाला त्याच्या आवाक्यात असलेल्या कुणावरही स्वसंरक्षणासाठी हल्ला करतो. मी ज्या चहाच्या मळ्याचा मॅनेजर होतो तेथेही अशा घटना घडलेल्या आहेत आणि अशा जखमी माणसांना माझ्या दवाखान्यांत उपचारार्थ नेल्यावरही आठवड्याच्या उरलेल्या दिवसांमध्ये मला मळ्यावर कामास कोणी माणसे मिळणे फारच कठीण होई. ज्या टापूंत काम चालू करावयाचे असेल तो सर्व भाग, बायका तेथे काम करावयास येण्यापूर्वी मी स्वतः हातात बंदूक घेऊन पुढे उभा राहून माझ्या मागे ढोलकी बडवून काही माणसांकडून पिंजून काढीत असे.

साधारणतः बिबळे क्वचितच नरभक्षक होतात; परंतु ते जेव्हा नरभक्षक होतात तेव्हा मात्र ते अत्यंत भयंकर उपद्रवी ठरतात. मला एका जिल्ह्यातील एक बिबळ्या भयंकर संहारक झाल्याचे समजले. तो नियमितपणे ६ ते १० वर्षांची मुले व मुली ठार मारून खाऊ लागला. शेवटी तो माझ्या एका मित्राने बंदुकीने ठार मारला. मी स्वतः एकदा दाट जंगलात एका बिबळ्याचा पाठलाग केला होता. त्या बिबळ्याने एका माणसाला ठार मारून ओढून फरफटत नेल्याच्या रक्ताच्या खुणा तेथील जमिनीवर वाढलेल्या छोट्या झुडुपांवर स्पष्ट दिसत होत्या. ह्या बिबळ्याला मी शेवटी मारलेच, परंतु तो खरोखरचा नरभक्षक नव्हता. कारण काही बिबळे केव्हातरी क्वचितच् एखादे मूल किंवा माणूस मारतात. परंतु त्यांना नरभक्षक वाघासारखी नरमांसाची चटक लागत नाही.

आज भारतातील बिबळ्यांची मोजणी करण्याचा प्रयत्न करावयाचा असल्यास खरोखरच अत्यंत धाडशी माणसांशी जरुरी आहे. पण मला वाटते की ते पट्टेवाल्या वाघापेक्षा थोडे जास्त आहेत. बहुधा ते सहा-सात हजार असावेत. मात्र पन्नास वर्षांपूर्वी हीच संख्या याच्या दसपट असावी.

अंगावरील केस ताठ उभे राहतील अशा वन्यप्राण्यांशी मुकाबला झालेल्या चित्तथरारक गोष्टींची कितीतरी पुस्तके भारतात आहेत. ह्या पुस्तकांचे लेखक तसेच प्रसिद्ध असल्याशिवाय त्यामधील मजकूर कितपत तथ्य असेल कोण जाणे. भारतात जे लोक अल्प काळासाठी राहिले ते स्वतः अत्यंत निसर्गप्रेमी असल्याशिवाय त्यांच्यावर विश्वास ठेवणे कठीण.

अमेरिका व तशाच इतर देशांत दूरदर्शनकेंद्रावरून प्रस्तृत केल्या जाणाऱ्या काही छोट्या सनसनाटी चित्रपटांमध्ये बिबळे किंवा वाघ दाखविले जातात. असे चित्रपट बनविणारे निर्माते वाघ किंवा बिबळ्याचे हल्ले किंवा त्यांच्या जोरदार मारामाऱ्या दाखविल्याच पाहिजेत असे समजतात. मला विशेषतः एक प्रसंग आठवतो. त्यामध्ये एका माणसाची बिबळ्याशी गाठ पडून त्यांची मारामारी होते व त्यांची ही मारामारी बरोबरीची अशी होतच नाही. कारण मला मागहून कळले की त्या बिबळ्याची नखे काढून टाकण्यात आलेली होती व दातही घासून कमी करण्यात आलेले होते. बहुधा त्याला गुंगीचे औषधही देण्यात आलेले होते. अशा मारामारीच्या चित्रीकरणाकरिता वाघ किंवा अस्वले विकत किंवा भाड्याने देणारा गृहस्थही मला माहीत आहे.

मी एका दुसऱ्या चित्रपटात पाहिले की बंदिस्त व दुःखी वाघाची एका पाळीव सिंहाशी गाठ पडते आणि तो मनात नसताना त्याच्याशी मारामारीला सुरुवात करतो. जंगलात खरोखर असे घडणे अशक्यच आहे, कारण भारतातल्या गीरच्या अरण्यात, जेथे सिंह दिसतात त्यांच्या आसपास कुठेही वाघ दिसून येत नाहीत. आणखी दुसऱ्या एका चित्रपटातला वाघ एका अजगराशी गाठ पडण्यापूर्वी कित्येक महासागर पोहून गेला होता. नंतर त्या दोघांमधील मारामारीचे चित्रण होते.

जंगलातील खरोखरच्या वन्यप्राण्यांमधील क्वचित होणाऱ्या मारामाऱ्या पाहणे नक्कीच खूप चित्तथरारक असे असते, परंतु बहुधा त्यांचा शेवट अत्यंत करुण असतो. कारण बऱ्याच वेळा ह्या मारामाऱ्या त्याच जातीच्या दोन नरांमध्ये होतात. ह्या मारामाऱ्या एक वाघ दुसऱ्या वाघाला, एक सांबर दुसऱ्या नर सांबराला, किंवा एक नर गवा दुसऱ्या नराला ठार मारून टाकावे ह्याच उद्देशाने करतात; व त्यांचा शेवट बहुधा पराजित नराच्या मृत्यूनेच होतो.

अलीकडे अशा प्रकारे सनसनाटी उत्पन्न करणारे छोटे चित्रपट दाखविण्यावर बरीच बंदी घालण्यात आली आहे. मला आठवते १९५७ मध्ये अमेरिकन नॅचरल हिस्ट्री म्युझियमच्या चित्रपटांच्या संग्रहालयातील अधिकारी मला सांगत होता की ते हल्ली असे सनसनाटी चित्रपट कितीही खरोखरचे असले तरी स्वीकारीत नाहीत, कारण ते पाहणारांच्या मनात वन्यप्राण्यांबद्दल गैरसमज उत्पन्न होण्याचा कल राहतो.

मला स्वतःला इतर बऱ्याच खरोखरच्या निसर्गप्रेमी लोकांप्रमाणे सुंदरशा जंगलातून विशेषतः एकट्यानेच भटकून जंगलातील वन्यपशूपक्ष्यांचे दररोजचे जीवन व त्यांच्या हालचाली न्याहाळून पाहण्यात फारच मजा वाटते.

**प्रकरण ८ वे**

## रेवामधील पांढरे वाघ

वाघ तसेच बिबळ्या यांच्यांतील क्वचितच दिसून येणाऱ्या पूर्ण पांढऱ्या किंवा काळ्या जनावरांबद्दल मला नेहमीच आकर्षण होते आणि जेव्हा मी काही वर्षांपूर्वी मध्य प्रदेशातील रेवाच्या महाराजांनी एक पांढरा नर वाघ पाळला असल्याचे ऐकले, तेव्हा मला तो केव्हा पाहावयाला मिळतो असे झाले होते आणि १९५९ च्या सुरुवातीला जेव्हा मी वर्तमानपत्रात वाचले की ह्या पांढऱ्या वाघाशी समागम होऊन एका वाघिणीला चार पांढरे बच्चे झाले आहेत; तेव्हा तर मला वाघाचे हे एकमेव विशिष्ट कुटुंब पाहण्याची परवानगी मिळावी म्हणून पत्र लिहिण्याचा मोह टाळता आला नाही.

ह्या पांढऱ्या वाघांबद्दल लिहिण्यापूर्वी मला वाटते की काळे वाघ, पांढरे बिबळे तसेच सहज दिसून येणाऱ्या काळ्या बिबळ्यांबद्दल विवेचन करणे रास्त होईल.

मला वाटते की मी अधिकारवाणीने असे विधान करू शकतो की अगदी काळाकुळकुळीत वाघ केव्हाही जन्मल्याने पाहण्यात नाही. अशा अनेक नोंदी मिळाल्या, परंतु नंतर कसून शोध घेता त्यात काही तथ्य नसल्याने आढळून आले. काळ्या वाघाचे एकही कातडे पुराव्यादाखल केव्हाच मिळालेले नाही.

सर्वसाधारणतः दिसून येणाऱ्या वाघ केव्हा काळा वाघ म्हणून समजला जाण्याला काही कारणे आहेत. त्यांपैकी एक कारण म्हणजे फेब्रुवारी-मार्च ह्या दिवसांत जंगलात गवत सुके झाल्यामुळे आगी लागतात, वाघांना जमिनीवर गडबडा लोळण्याची सवय असते. त्यामुळे जळलेल्या गवताची काळी राख त्यांच्या अंगाला लागते. दुसरे कारण म्हणजे असे : द्युनबार ब्रँडरच्या पुस्तकात लेखकाने एक मोठा वाघ आपले भक्ष्य खात असताना रक्ताने माखून निघालेला पहिला होता. त्यावरून तो लिहतो : " लाल रक्त लगेच काळे पडते आणि जर मी ते सर्व पाहिले नसते आणि नुसताच वाघ तेव्हा पाहिला असता तर मी काळा वाघ पाहिल्याचे अगदी खात्रीपूर्वक सांगितले असते."

अशाप्रकारे मिळालेल्या काळ्या वाघाच्या नोंदीमध्ये १८८९ मध्ये एका शिकाऱ्याने केलेली नोंद "चितगांवचा काळा वाघ" या नावाने फारच प्रसिद्ध आहे. परंतु ही घटना घडल्याला ४३ वर्षे झाल्यानंतर हा प्रसंग वर्णन केला गेला आहे. शिवाय त्याचे चार सोबती ह्या प्रसंगाचे काहीच वर्णन देत नाहीत. ह्या वाघाचे कातडे बहुधा सडून गेल्यामुळे व्यवस्थित टिकवून ठेवता आले नाही. शिवाय ही घटना मार्चमध्ये घडलेली होती. त्यामुळे तिच्यावर फारसा विश्वास ठेवता येत नाही.

काळे बिबळे मात्र भारताच्या दक्षिण व पूर्व भागात त्याचप्रमाणे ब्रह्मदेश व आग्नेय आशियामधील बारमाही पावसाच्या प्रदेशात बऱ्याचदा दिसून येतात.

भारतातील काही भागांत वाघाला ( टायगर ह्या इंग्रजी शब्दाला ) "बाघ" असे म्हणतात. परंतु "मांजराच्या" कुटुंबातील सर्वच प्राण्यांना तसे संबोधितात. किंबहुना इथले लोक पट्टेवाला वाघ, ठिपकेवाला वाघ असे छोट्या आकाराच्या मांजरापर्यंत ह्या कुटुंबातील सर्व प्राण्यांना संबोधितात. ह्यावरून १९३६ मध्ये "दिब्रुगढचा काळा वाघ" कसा पकडला गेला व तो कसा काळा कुळकुळीत असून १२ फूट लांब

अनुक्रमणिका

व ३॥ फूट उंचीचा वगैरे होता हे सर्व पुरेसे (?) सिद्ध होते. त्या जनावराची कातडी कलकत्त्यामधील ज्या विक्रेत्याने खरेदी केली त्याच्याकडे जेव्हा ७ फूट लांबीचे साधे काळ्या बिबळ्याचे कातडे येऊन थडकले तेव्हा त्याला फारच धक्का बसला असेल. ह्या घटनेवर लंडनचे एक प्रसिद्ध प्राणीशास्त्रज्ञ आर. आय. पोकॉक यांनी शेरा मारला तो असा की "वाघासारख्या जनावराची झाली तरी बारा फूट लांबी म्हणजे फारच अव्वाच्या सव्वा वाढवून सांगितली गेली. इतक्या मोठ्या जनावराला आपलं वजन पेलण्यालाठी मग 'बिलियर्ड' च्या खेळाच्या टेबलासारखे मध्ये आणखी दोन पाय असायला हवेत......."

मी एकदा काळा बिबळ्या जंगलात त्याच्या नैसर्गिक अवस्थेत पाहिला होता; ते चोरटेपणाचं अन् धूर्तपणाचं हुबेहुब जिवंत रूप होतं. तो त्याच्या पोटावर पुढे सरपटत होता प्रथम मला तो एक मोठा काळा साप असावा असे वाटले. माझी अगदी किंचित हालचाल झाली अन् तो झटकन पसार झाला.

अंधूक प्रकाशांत काळा बिबळ्या अगदी काळाकभिन्न वाटतो. स्वच्छ सूर्यप्रकाशांत काळ्या बिबळ्याच्या अंगावरील गडद काळे ठिपके त्याच्या अंगाच्या मुळच्या काळ्या रंगावरूनही सहज वेगळे ओळखू येतात. असल्या काळ्या बिबळ्याचे मढवून ठेवलेले कातडे फिकट होऊ शकते व ते मातकट रंगाचे होते.

काळे बिबळे हे नेहमीच्या बिबळ्याच्या जातीचे असतात; परंतु त्यांच्यामध्ये काळ्या रंगाचे द्रव्य जास्त प्रमाणात असते. काळेकुट्टपणा हे भुरेपणाच्या विरुद्ध आहे. (काळेकुट्टपणा असणे म्हणजे मेलॅनीन नावाचे रंगद्रव्य कातडीखाली जास्त प्रमाणावर असते तर भुरेपणामध्ये हे द्रव्य अजिबात नसते.) काळ्या नर बिबळ्याचा संयोग काळ्या मादीशी झाला असता होणारे बच्चे नक्कीच काळेकुट्ट असतात. परंतु नर किंवा मादी ह्यांपैकी एक काळाकुट्ट व एक नेहमीच्या रंगाचा असल्यास दोन्ही प्रकारचे बच्चे पैदा होऊ शकतात. दोन्ही सर्वसाधारण रंगाच्या नरमादीलाही जर त्यांच्या वंशजांमध्ये तसे काळे रंगद्रव्य जास्त प्रमाणावर असल्यास मधूनच एखादा काळाकुट्ट बच्चा होऊ शकतो. मी स्वतः एका सर्वसाधारण रंगाच्या बिबळ्याच्या मादीला एक साधा व एक काळाकुट्ट बच्चा असल्याचे दोनदा पाहिले आहे. (छायाचित्र क्र. २४)

१९४७ मध्ये कलकत्त्याच्या 'स्टेट्स्मन्' ह्या दैनिकाकरिता मी एक लेख लिहिला होता. त्यामध्ये पांढरा बिबळ्या कुणी पाहिला आहे का, असे विचारले होते. ह्या लेखाच्या संदर्भात काही वर्षानंतर लंडनच्या "दी फील्ड" ह्या दैनिकांत बातमी आली होती, ती अशी की : हे जे कातडे आहे ते पूर्णपणे भुरेपणाचे उदाहरण नसून कातडीखाली असणारे मलॅनीन नावाचे द्रव्य (ज्यामुळे कातडीला काळा रंग प्राप्त होतो) कमी असल्याचे उदाहरण आहे. ह्या कातडीवर काळी रिंगणे नसली तरी जरा गुलबट शेंदरट रंगाचे ठिपके अधूनमधून दिसतात त्यामुळे हे कातडे 'टॉर्टीजशेल्ड कॅट' सारखे वाटते. हा बिहारमधील पाटण्याजवळच्या एका संस्थानाजवळ मारला गेला होता.

१९५३ मध्ये "दी फील्ड" ह्याच दैनिकात छापून आलेली दुसरी बातमी एका भुरकट बिबळ्याबद्दल होती. लंडनमधील प्राणिसंग्रहालयात १९१०/११ च्या सुमारास पश्चिम पर्शियामधून हा बिबळ्या आणला गेला होता. ह्याला उन्हाळ्यात पुसटसे का होईना असे पट्टे दिसत. ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या सुमारास त्याच्या हिवाळ्यांतील लांब केस असलेल्या कातडीवरील ठिपके इतके पुसटले गेले की संध्याकाळच्या सुमारास ते दिसेनासे होत. (ठिपके लक्षात येत नसत.)

आता पांढऱ्या वाघांबद्दल पाहू. भुरकट रंगाच्या पांढऱ्या वाघांची विश्वास ठेवण्याजोगी अनेक उदाहरणे देता येतील. विशेषतः आसाम, बंगाल, बिहार येथील भागांतून तसेच रेवाच्या राजघराण्यातून असे वाघ आढळल्याचे खात्रीपूर्वक ठासून सांगता येईल. ह्यांच्यामध्ये मळकट पांढऱ्या किंवा पिवळट पांढऱ्या अशा मूळ रंगापासून ते त्याच्यावरील उदी किंवा चॉकलेटी रंगापर्यंतच्या छटांचे पट्टे दिसतात.

अशा खऱ्या भुरेपणाची फक्त एकच नोंद आहे. कूच बिहारच्या राजघराण्यांत १९२२ मध्ये जवळजवळ पूर्ण वाढ होत आलेले २ बच्चे मारले गेले होते. त्यांचे डोळे गुलाबी होते.

बाकीच्या सर्व नोंदीमधील वाघ अर्धवट भुरे किंवा फिकट रंगाचे होते. केव्हा केव्हा असे चमत्कारिक वाघ "लाल वाघ" म्हणून समजले जातात.

आसाममध्ये एक चहाचा मळा आहे; त्याला "बोगाबाघ" किंवा "पांढरा वाघ" असे नाव आहे. कारण ह्या शतकाच्या सुरुवातीला तेथे दोन पांढरे वाघ दिसून आले होते. ह्यांपैकी दुसरा वाघ नागा जातीच्या लोकांनी मारून चहाच्या मळेवाल्याकडे एका संध्याकाळी आणला होता. त्या नागा जातीच्या माणसाला दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत तेथेच राहावयास सांगितले होते. दुसऱ्या दिवशी जेव्हा चहाच्या मळेवाल्याने नीट निरखून पाहिले तेव्हा त्याच्या नजरेला अतिशय कसोशीने शोध घेत असलेला पांढरा वाघ दिसला. (हे दुसरे उदाहरण होय.) तेव्हा त्याच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. साहेबाच्या नजरेतील आश्चर्य पाहून तो नागा माणूस शरमिंदा झाला; व तो क्षमायाचनेच्या सुरात सांगू लागला, "हे कातडे पांढरे आहे हा काही माझा दोष नाही. मी हे जनावर मारले तेव्हा असेच होते."

इथल्या काही भागांतून अशी खोटी समजूत आहे की पांढरा वाघ मारला असता तो मारणारावर दुर्दैव ओढवते. तो शिकारी देखील मरतो. आसाममधील काझीरंगाच्या दक्षिण हद्दीवर असलेल्या एका निष्णात शिकाऱ्याने एकदा दोन भुरकट वाघ मारले. व्हॅन इंजेन ह्या म्हैसूरमधील कातडे कमाविणाऱ्या प्रसिद्ध माणसाने १९२८ मध्ये त्यांचे "लालवाघ" असे वर्णन केले आहे.

त्यानंतर दीड वर्षांनी जेव्हा ब्रह्मपुत्रेला पूर आला होता तेव्हा तो शिकारी काही आपदग्रस्त गावकऱ्यांना वाचविताना बुडाला. त्या सर्व मंडळीमध्ये तोच एकटा पट्टीचा पोहणारा होता. त्याच्या मदतनीसाला पोहता येत नसतानाही तो तेथे असूनदेखील वाचला. त्याने मला सर्व काहाणी सांगितली. त्या मळ्यावरील मजूर लोक शेवटी म्हणालेच की हे सर्व त्याने पांढरे वाघ मारले म्हणूनच झाले व त्याला प्राण गमवावे लागले.

परंतु ह्या शिकाऱ्याने एका नरक्षभक वाघाला देखील मारले होते. आणि इकडे अजून दुसरी एक जबरदस्त खोटी समजूत आहे की नरभक्षक वाघाला मारणारा नुसता शिकारीच नव्हे तर त्याचे मदतनीसही नरभक्षक वाघाचेच बळी होतात. ह्या कारणास्तव अशा रहिवाश्यांकडून नरभक्षक वाघाची पुरेशी माहिती देखील मिळणे कठीण होते.

भारतातील सर्व पांढऱ्या वाघांमध्ये आता मध्यप्रदेशात विलीन करण्यात आलेल्या रेवाच्या संस्थानिकांचे वाघ फार प्रसिद्ध आहेत. तेथील राजवाड्यात ठेवण्यात आलेल्या नोंदीमध्ये गेल्या ५० वर्षात आठाहून अधिक पांढऱ्या वाघांच्या नोंदी आहेत.

अनुक्रमणिका

१९५१ मध्ये दुसरा एक नऊ महिन्यांचा पांढरा बच्चा रेवाच्या महाराजांनी पकडला होता. परंतु त्यानंतर रेवाच्या जंगलातून दुसरे पांढरे वाघ सापडल्याच्या नोंदी नाहीत. ह्याची हकीगत पुढीलप्रमाणे :

एका मोठ्या शिकारीच्या वेळेस एक वाघीण तिच्या नऊ महिन्याच्या ४ बच्च्यांना घेऊन त्या टापूतून निघाली. त्यांपैकी ३ बच्चे नेहमीप्रमाणेच होते, परंतु एक बच्चा पांढरा होता. तो इतरांहून मोठा व शक्तिमान दिसत होता. तो पांढरा बच्चा गोळी घालून मारण्यात न येता त्याला पिंजऱ्यात पाणी ठेवून पकडण्यात आले. ते दिवस भर उन्हाळ्याचे होते आणि ती जागाही अगदी सुकी, रखरखीत होती.

हा पांढरा नर बच्चा पिंजऱ्यातही चांगला जोमाने वाढू लागला. दुसरी रेवाच्याच जंगलात पकडलेली साधी वाघीणही त्याच्याबरोबर ठेवण्यात आली होती.

आता काही वाचक मला विचारतील की मी स्वतःला निसर्गप्रेमी आणि निसर्गसंरक्षक समजतो; तर अशा प्रकारे दुर्मिळ प्राण्यांना पकडून पिंजऱ्यात ठेवण्याला माझा विरोध कसा नाही. परंतु ह्याचे उत्तर सोपे आहे पहा: वन्यप्राण्यांचे काही अति दुर्मिळ प्रकार नष्ट होण्याशिवाय त्याला दुसरा कोणता पर्याय आहे?

यापूर्वी जंगलातील काही अतिदुर्मिळ प्राणी अशा प्रकारे पिंजऱ्यात ठेवून त्यांची प्रजोत्पत्ती करवून नाहीसे होण्यापासून वाचविले गेले आहेत. नंतर ते वेगवेगळ्या ठिकाणी पसरविण्यात आले. पेर डेव्हिडचे हरीण, युरोपियन बायसन, पांढऱ्या शेपटीचा 'नू' हवाई बेटातील हंस ही काही ठळक उदाहरणे नजरेसमोर येतात.

जर रेवाच्या जंगलांतील हा पांढरा बच्चा त्याच्या वंशाचा शेवटचाच वारस असला व तो असा पकडून ठेवला नसता तर कुणा शिकारीत धन्य मानणाऱ्या शिकाऱ्याच्या अथवा चोरट्या शिकाऱ्याच्या गोळीला नक्कीच बळी पडला असता.

आता जेव्हा हा पांढरा बच्चा वयात आला तेव्हा त्याचा एका साध्या वाघिणीशी समागम घडवून आणून तीन वेळा त्यांना बच्चे झाले. ही सर्व पिले सर्वसाधारण वाघांप्रमाणेच होती. तेव्हा ही जी वाघीण एकही पांढरा बच्चा उपजवू शकली नाही. तिला बदलून तिच्यापासून दुसऱ्या खेपेस उपजविली गेलेली एक वाघीण ह्या पांढऱ्या वाघाबरोबर (तिच्याच वडिलांबरोबर) ठेवण्यात आली.

१९५८ च्या ऑक्टोबरमध्ये तिने प्रसविलेले चारही बच्चे त्यांच्या वडिलांप्रमाणेच पांढरे शुभ्र होते. त्यांच्या सर्व पांढऱ्या अंगावर राखाडी-उदी रंगाचे पट्टे असून पावलांचे तळवे गुलाबी रंगाचे होते. डोळे हिमासारखे निळसर होते-हे अर्धवट भुरे अशा वाघांचे उदाहरण. मला त्यांचे फोटो काढावयाचे होते. महाराजांनी मला मोठ्या आदराने रेवाला बोलावून त्यांचे फोटो घेऊ दिले, ह्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. कारण अशा प्रकारे त्यांनी फारच थोड्या माणसांना परवानगी दिली होती.

१९५९ च्या एप्रिलमध्ये त्यांचा खासगी चिटणींस अरीमर्दन सिंग मला तेथे पोहोचल्याच्या दुसऱ्या दिवशी अतिथीगृहात सकाळीत मला भेटला आणि त्याने मला रेवापासून १२ मैलांवर असलेल्या गोविंदगढ ह्या ठिकाणी गाडीतून नेले. तेथे उन्हाळ्यासाठी बांधलेल्या परंतु आता वापरात नसलेल्या एका खूप मोठ्या राजवाड्यात तो पांढरा वाघ व त्याचे सबंध कुटुंब राहत होते. (रंगीत चित्र २३) हा राजमहाल १५

वर्षापासून वापरात नव्हता आणि तो आता अर्धवट गडासारखा अथवा पडिक वाड्यासारखा, फावल्या वेळी भटकावयास जावे, अशा माळरानावरील वास्तुसारखा झाला होता. त्यामध्ये अगणित खोल्या होत्या. राजाच्या नकळत त्याच्याबरोबर आलेल्या दीडएक हजार पाहुण्यांचीही व्यवस्था तेथे सहज करता येत असे; असे मला सांगण्यात आले. इतका मोठा तो राजवाडा होता.

मी त्या राजवाड्याचे लयास गेलेले वैभव पाहात होतो. कित्येक वर्षांपूर्वीच्या राजांची शक्ती व वैभव माझ्या डोळ्यांपुढे चमकून गेले. मला ते सर्व नाट्यमय भासले परंतु पूर्वीची शिस्त बदलली होती.

पांढरे वाघ कसे दिसतील कोण जाणे. मी भुरकट रंगाच्या वाघांची कातडी वस्तुसंग्रहालयातून तसेच काही खासगीरित्या कातडी जमा करणारांकडे पाहिली होती. आणि ह्यांपैकी काही वाघ फिकट पिवळसर अंगाचे भुरकट मळकट पट्ट्यांचे होतील अशी आशा बाळगून होतो. अर्थात हे फक्त प्राणीशास्त्रांती एका आवडीपोटीच.

नंतर मी तेथील सौधावरून पुढेपर्यंत पसरलेल्या छायेच्या कोपऱ्यावर पाहू लागलो; एरव्ही महालाच्या आजूबाजूचा हा भाग सूर्यप्रकाशाने भरलेला असे. माझ्याकडे एक भुतासारखा फारच अक्राळविक्राळ असा पांढरा वाघ रोखून गुरगुरून पाहात होता.

तो खरा होता का? ह्या प्रश्नाचे उत्तर वाघानेच ताबडतोब दिले. तो उठला आणि त्याने काही पावले मोठ्या भारदस्तपणे टाकली. नंतर आवारात आमच्या बाजूने चालून येऊन त्याने मोठ्याने डरकाळी फोडली. ही थरकाप करून सोडणारी डरकाळी त्या जुन्या महालाच्या सर्व रिकाम्या खोल्या-खोल्यांमधून तसेच सर्व व्हरांड्यांतून दुमदुमली. (छायाचित्र क्र. २३)

लांब लांब पावले टाकीत नंतर तो बऱ्याच पुढच्या कोपऱ्यापर्यंत गेला आणि आमच्यावर त्याने पुन्हा एकदा कटाक्ष टाकला. पुन्हा एकवार त्याने त्या गगनभेदी डरकाळीचे प्रक्षोभित प्रात्यक्षिक करून दाखविले. त्या अतिशय भारदस्त वन्यपशूला पाहून मोठ्या प्रशंसेने व आजूबाजूच्या त्या एकंदरीत ऐतिहासिक वास्तुकडे एक प्रकारच्या आदरवजा दबदब्याने भारून जाऊन मी काही क्षण कशाकरिता तेथे आले तेच विसरून गेलो. परंतु नंतरचे दोन तास मात्र मी माझ्या कॅमेऱ्याने छायाचित्रे टिपण्यांत घालविले.

आम्ही एका मोकळ्या भागातून आणखी दुसऱ्या गच्चीत गेलो. ते जणू पूर्वी माद्यांच्या कळपाचेच आवार असावे. तेथे मला एक नेहमीच्या रंगाची मादी व तिचे पांढरे चार बच्चे असे अविस्मरणीय दृश्य दिसले. त्यापैकी १ नर व ३ माद्या होत्या. ते जवळजवळ ६ महिन्यांचे होते. ते दृश्य म्हणजे फारच विरोधाभासासारखे वाटत होते. एक देखणी शेंदरट रंगावर काळे पट्टे असलेली मादी आणि तिचे चार पांढरे बच्चे-अगदी त्यांच्या एकमेव पित्यासारखे....

ते देखील अगदी स्वप्नातल्यासारखे वाटत होते. परंतु त्यांच्या अत्यंत दणकट हालचाली व खिलाडूपणा पाहून ते खरोखरचे दृश्य असल्याची खात्री पटली.

महाराजांकडे तळ्यातून पाणी पंपाने खेचून काढण्याकरिता तसेच दर दिवशी ५२ पौंडाच्या बकऱ्याचे मांस त्यांना खावयाला घालण्याकरिता व ह्या वाघाच्या कुटुंबाची एकंदर काळजी घेण्याकरिता

चार माणसे होती. ह्या सर्वांकरिता एकंदर पुष्कळच खर्च येई. त्यामुळे महाराज ह्या खर्चात काटकसर कशी करता येईल व ह्या पांढऱ्या वाघांचा आपल्या भारताला फायदा मिळून त्यांचा खर्चही कायमपणे कसा परस्पर भागविता येईल ह्याचा विचार करीत होते.

मला शक्य झाल्याबरोबर मी 'जेनीटिक्स' ह्या विषयाच्या प्राचार्यांना (बहुधा ते ह्या विषयांतील जगप्रसिद्ध प्राचार्य होते) पत्र लिहिले होते. त्यांनी मला लिहिले की अशा प्रकारच्य पांढऱ्या वाघाचा (रीसीसीव्ह म्युटंट) जेव्हा त्याच्याच नेहमीच्या रंगाच्या अपत्याशी (वाघिणीशी) संबंध घडवून आणला जातो तेव्हा साधारणतः निम्मी पांढरी व निम्मी नेहमीच्या रंगाची पिले जन्मण्याची शक्यता असते. अशा प्रकारच्या चारही बच्चे पांढरे निपजण्याच्या शक्यतेचे प्रमाण १६:१ असे असते. (नाणेफेक करून जसे एकामागोमाग चारही वेळा काटा मिळणे जितके कठीण तितकेच हे देखील कठीण.)

ह्यानंतर त्याच वाघ-वाघिणीला १९६० मध्ये ३ बच्चे झाले. त्यापैकी २ पांढरे नर बच्चे व एक नेहेमीच्या रंगाची मादी होती.

त्याच वर्षी नंतर पहिल्या वेळच्या ४ बच्च्यांमधील १ पांढरी वाघीण वॉशिंग्टन येथील नॅशनल झुऑलॉजीकल पार्कमध्ये नेण्यासाठी खरीदण्यांत आली. अमेरिकन ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशनने तेथील अध्यक्षांना युनायटेड स्टेट्स्‌मधील मुलांकरिता ही खास भेट पाठविली. ह्या वाघिणीचे नाव "मोहिनी" असे आहे.

१९६२ च्या मार्चमध्ये तिसऱ्या खेपेस ती वाघीण गोविंदगढ येथे प्रसूत होऊन तिला एक नर व एक मादी असे दोन पांढरे बच्चे झाले. १९६० पासून भारत सरकारने भारतातून पांढऱ्या वाघांच्या निर्यातीवर बंदी घातली; आणि तेव्हापासून महाराजांना असा एखादा पांढरा वाघ परदेशांत विकता येऊ न शकल्यामुळे त्यांचा खर्च भागविणे फारच कठीण जाऊ लागले.

भारत सरकारने ह्या पांढऱ्या वाघांचा खर्च भागवावा याकरिता काही काळपर्यंत वाटाघाटी चालू होत्या. शेवटी ह्या वाटाघाटींमधून काही निष्पन्न होणार नाही असे वाटून हे सर्व वाघ पुन्हा जंगलात सोडून द्यावे अशा निर्णयापर्यंत महाराज आले. त्यामुळे आम्हाला फारच वाईट वाटले. कारण अशा प्रकारच्या सुखसोयींमध्ये वाढलेले असल्यामुळे त्यांना जर का कुठच्याही प्रकारच्या जंगलामध्ये सोडून दिले तर ते तेथील दुसऱ्या जंगली वाघांच्या मारामारीत किंवा एखाद्या शिकाऱ्याच्या बंदुकीला सहज बळी पडतील. भारतात एकही अभयारण्य किंवा राष्ट्रीय उपवन इतके मोठे नाही की ज्यामध्ये हे वाघ अगदी सुरक्षितपणे सामावून घेतले जातील.

मला स्वतःला असे फारच वाटते की अशा प्रकारच्या दुर्मिळ व सुंदर प्राण्यांची काळजी घेण्याची जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे. नव्या दिल्लीतील झुऑलॉजीकल पार्क ही जागा त्यांपैकी कमीत कमी एक जोडी तरी ठेवण्याकरिता आदर्श जागा आहे व गोविंदगढ येथे एकंदर वातावरण राहण्याकरिता व प्रणयाराधनेकरिता अत्यंत चांगले असल्यामुळे त्या सर्व पांढऱ्या वाघांच्या कुटुंबाला तेच घर पुढेही चालू ठेवावे. ब्रिटनमध्येही काही राजघराण्यांच्या जागा अशाप्रकारे नॅशनल ट्रस्टने हाती घेतलेल्या आहेत.

अनुक्रमणिका

सुदैवाने १९६३ च्या सुरुवातीलाच महाराजा व भारत सरकार यांच्यातील वाटाघाटींना यश आले. त्यामधील करारानुसार ११९६२ मध्ये जन्मलेली पांढऱ्या वाघांची एक जोडी ब्रिस्टॉल प्राणिसंग्रहालयाला निर्यात करता येणे महाराजांना शक्य झाले. ह्या बच्च्यांची नावे चंपा आणि चमेली अशी होती. ती लंडनला विमानातून आली व ब्रिस्टॉलला १९६३ च्या जूनमध्ये येऊन पोहोचली. ती भावंडे असल्यामुळे कुटुंबातल्या कुटुंबातील समागम टाळण्याकरिता मला वाटते ब्रिस्टॉल प्राणिसंग्रहालयाचे अधिकारी दुसरा एक नेहमीच्याच रंगाचा त्यांच्याहून बराच मोठा असा बच्चा खरीदणार आहेत; म्हणजे त्या पांढऱ्या बच्च्यांमधील एकाचा त्याच्याशी समागम होईल.

१९६० मध्ये जन्मलेले २ पांढरे नर बच्चे प. बंगाल सरकारला आधीच विकले गेले होते आणि ते आता कलकत्त्याच्या प्राणिसंग्रहालयात आहेत. त्यांचे नावे नीलाद्री व हेमाद्री अशी आहेत.

बाकीचे राहिलेले सर्व पांढरे वाघ आता नव्या दिल्लीतील प्राणिसंग्रहालयाची मालमत्ता आहे. फक्त मोहन सर्व पांढऱ्या बच्च्यांचा पिता, सुकेशी- पहिल्या प्रसूतीतील एक पांढरी वाघीण-जिने सर्व पांढऱ्या बच्च्यांना जन्म दिला होता, ती गोविंदगढ येथे आहेत. करारानुसार असे ठरले की यापुढे जे पांढरे बच्चे जन्मतील ते सर्व गोविंदगढच्या महाराजांनी व भारत सरकारने सारखे वाटून घ्यावेत.

सध्या नव्या दिल्लीतील प्राणिसंग्रहालयात पहिल्या प्रसूतीतील एक नर व मादी बच्चे आता जवळजवळ ५ वर्षांचे झालेले आहेत. (प्रस्तुतचे मूळ पुस्तक १९६४ मध्ये प्रकाशित झालेले होते हे लक्षात घ्यावे.) त्यांची नावे राजा व राणी अशी आहेत.

मी १९६३ च्या ऑक्टोबरमध्ये तेथे गेलो होतो आणि मला राजाचे छायाचित्र घेता आले. (छायाचित्र क्र. ५)

अनुक्रमणिका

**प्रकरण ९ वे**

## कच्छच्या रणांतील रानगाढवे

मुंबईच्या उत्तरेकडील आणि थोडेसे पश्चिमेच्या बाजूस काही उत्तम वन्य भाग आहेत. कच्छचे मोठे रण; कच्छचे छोटे रण आणि सिंहाकरिता प्रसिद्ध असलेले गीरचे जंगल.

प्रथम आपण जेथे वसंत ऋतूंत असंख्य रोहित पक्षी अंडी घालवयास जमतात ते कच्छचे मोठे रण पाहू. अर्थात ही वीण आदल्या पावसाळ्यात पडलेल्या पावसाच्या पाण्यावर आणि घरटी बांधण्याकरिता लागणाऱ्या इतर सर्व गोष्टीच्या उपलब्धतेवर अवलंबून असते.

अजूनपर्यंत मला तिथे जाणे जमलेले नाही. कारण एकंदर प्रवास खूपच लांब आणि कटकटीचा आहे; शिवाय राहुट्यांचे सामानसुमान आणणे—नेणे व नोकरचाकर मिळणे फारच कठीण आहे. कच्छमध्ये जावयाचे असल्यास 'भुजवरून जावे लागते; ह्याशिवाय ते रोहित पक्षी तेथे घरटी बांधावयास आले आहेत किंवा येणार नाहीत हे देखील माहीत असावे लागते. ही माहिती मिळणे देखील मुष्किलीचे असते. कारण ह्या भागात कोणाच्या वसाहती नाहीत.

याशिवाय कित्येक मैलचे मैल पाण्यावर मिठाचा बराच थर असलेली अशी खार जमीन तट्टावरून किंवा उंटावरून तुडवावी लागते. पिण्याचे पाणी, तंबू आणि इतर सर्व सामान बरोबर वाहून न्यावे लागते. थोडक्यात म्हटले तर तिकडील वनखात्याच्या अधिकारी वर्गाच्या मदतीने व्यवस्थितपणे सर्व योजना आखून हा प्रवास करावा लागतो.

मी १९६० च्या मार्चमध्ये "सालीम अली" बरोबर तेथे जाणार होतो; परंतु दुसऱ्या काही आधीच योजलेल्या भेटीगाठींमुळे मला तेथे जाणे रद्द करावे लागले. सालीम अलींनी हे रोहित पक्षी पूर्वी बऱ्याच वेळा पाहिलेले होते आणि अनेक मनोहर व रंगीबेरंगी अशा पक्ष्यांनी भरून टाकणारे हे दृश्य त्यांना नेहमीच आश्चर्यकारक असे वाटत आलेले होते.

मी त्यांचा ह्या रोहित पक्ष्यांवर असलेला चित्रपट पाहिलेला होता. तो खरोखर फारच मनोरंजक होता. त्यामध्ये मला विशेषतः छोट्या छोट्या अनेक पिलांना सांभाळणाऱ्या काही मोठ्या पक्ष्यांचे दृश्य फारच आवडले. ह्यामध्ये काही मोठे पक्षी छोट्या छोट्या अनेक पिलांची निगा "बेबीसिटींग" करणाऱ्या 'दायां' प्रमाणे करीत होते; आणि त्यांचे खरोखरचे आईवडील मात्र तेव्हा खाद्य शोधण्याकरिता बाहेर गेलेले होते.

१९६० मध्ये बहुधा प्रथमच रोहित पक्ष्यांच्या वसाहती जवळ गुलाबी पेलिकन पक्ष्यांनी वसाहत केली होती. ह्या गुलाबी पेलिकन पक्ष्यांची पिले मात्र अगदी काळीकुट्ट होती. मात्र मी आंध्र प्रदेशांत पाहिलेल्या 'स्पॉटेडबिल्ड पेलिकन' पक्ष्यांची पिले हिमासारखी पांढरीशुभ्र होती.

कच्छच्या मोठ्या रणाच्या जवळच कच्छचे छोटे रण आहे; हे देखील हजारो चौरस मैल असे पसरलेले लोणारी मातीचे रखरखीत वाळवंटच आहे. पावसाळ्यामध्ये तिथल्या नद्या भरून गेल्यामुळे नद्यांचे पाणी जमिनीवरून वाहते. त्या पाण्याने व ईशान्येकडून समुद्रावरून जोराने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे समुद्राचे

अनुक्रमणिका

पाणी काही अंशी जमिनीवर पसरविले जाते. अशा दोन्ही प्रकारे पाणी जमिनीवर पसरविले गेल्यामुळे तेथील जमीन १/२ फूट पाण्याखाली बुडून जाते.

परंतु नोव्हेंबर ते जून ह्या सुक्या महिन्यांमध्ये तेथे पाणी मुळीच नसते; आणि जर तुम्ही स्पंजासारख्या दलदलीत वाढलेल्या वनस्पतींचे गडद भाग सोडलेत तर मोटारीने हा भाग सहज ओलांडू शकाल. छोट्या रणाच्या कडेच्या काही भागात मिठागरे आहेत. जमिनीत खणलेल्या काही खड्ड्यांमध्ये समुद्राचे खारे पाणी लोटले जाते. पाण्याचे बाष्पीभवन झाल्यावर मीठ गोळा केले जाते.

छोट्या रणात पावसाळ्याच्या दिवसांत इकडे तिकडे विखुरलेली काही बेटे दृष्टीला पडतात. पावसाळा संपल्यानंतर असे लक्षात येते की ह्या मुळच्या टेकड्या आहेत. ह्यावर काही घासगवत व झाडे वाढतात. ही इतर सपाट जमिनीवरील खुरट्या झुडुपांप्रमाणेच आहेत. ह्या बेटांबर व मुख्य सपाट जमिनीवर भारतीय रानगाढवे दिसून येतात. (चित्र क्र. २५)

ही भारतीय रानगाढवे भारताच्या वायव्येकडील भागात व ईशान्येकडे पूर्वी खूप मोठ्या प्रमाणावर दिसून येत. माझ्या माहितीप्रमाणे आता पर्शियामध्ये एकही रानगाढव उरलेले नाही; व पाकिस्तानमध्येही क्वचित काही उरलेली असतील. भारताच्या वायव्येकडील भागातील उरलेली रानगाढवे आता फक्त छोट्या रणामध्येच दिसून येतात.

सालीम अली १९४६ मध्ये तेथे गेले होते आणि त्यांनी ह्या गाढवांबद्दल बरीचशी उपयुक्त अशी माहिती आणली होती. १९६० मध्ये त्यांनी पक्ष्यांच्या स्थलांतराचा अभ्यास करावयाला चांगल्याशा जागा शोधण्याकरिता कच्छच्या छोट्या रणाला पुन्हा भेट दिली; तेव्हा तेथील काही रानगाढवे काही गूढ रोगांमुळे मेली असल्याचे त्यांना आढळून आले. १९६१ च्या शेवटला द. आफ्रिकेतील घोड्यांना होणारा एक प्रकारचा रोग भारतातील त्या भागात पसरल्याच्या नोंदी मिळाल्या.

१९५२ मध्ये "इंडियन बोर्ड फॉर वाईल्ड लाईफ"ने "भारतीय रानगाढवे" ही नामशेष होऊ घातलेल्या [हे प्राणी म्हणजे भारतीय सिंह, बर्फाळ प्रदेशांतील बिबळ्या, वाघाटी, चित्ता, गेंडा, भारतीय रानगाढव, काश्मिरी सांबर, कस्तुरी मृग, छोटे रानडुक्कर, मोठा माळढोक पक्षी, गुलाबी डोक्याचे बदक व पांढऱ्या पंखाचे जंगली बदक होत.] १३ वन्यप्राण्यांच्या यादीत घातली. त्यानुसार त्यांना संपूर्ण संरक्षण मिळाले. परंतु मला वाटत नाही की ह्या प्राण्यांच्या रक्षणासाठी खरोखर काही केले गेले असेल.

म्हणून मी लंडन व स्वित्झर्लंड येथील "सर्व्हायवल सर्व्हिस कमिशन ऑफ दी इंटरनॅशनल युनियन फॉर दी कॉन्झर्व्हेशन ऑफ नेचर" (ही संस्था I.U.C.N. म्हणून ओळखली जाते.) या संस्थेला लिहून कळविले होते की त्यांनी तेथे जाऊन रानगाढवांची सध्याची परिस्थिती कशी आहे त्याचा तपास करावा. साधारणतः त्याच वेळेस १९६१-६२ मध्ये "वर्ल्ड वाईल्ड लाईफ फंड" ही संस्था देखील अस्तित्वात आली आणि त्यातील पैशातून आसामपासून गुजरात राज्यापर्यंतच्या माझ्या प्रवासाच्या खर्चाची तरतूद मंजूर करण्यात आली.

गुजरातचे मुख्य वनसंरक्षक अधिकारी श्री. हरीसिंग यांनी मला पूर्ण सहकार्य देण्याचे वचन दिले; आणि अपेक्षिल्याप्रमाणे त्यांनी खरोखरच सर्व काही केले. मी गाडीतून ठरलेल्या ठिकाणी उतरल्यापासून

कच्छचे जिल्हा अधिकारी आणि **'ध्रागध्रा'**चे (हे नाव उच्चारण्यास मला फारच कठीण जाई) विभागीय अधिकारी यांनी माझी फारच उत्तम काळजी घेतली.

ठरल्याप्रमाणे १९६२ च्या फेब्रुवारीत मी माझे फारच मनोरंजक असे ६ दिवस श्री. आर. के. राठोड व पी. जी. जोशीपुरा यांच्याबरोबर तीन वेगवेगळ्या ठिकाणी तळ ठोकून आणि रानगाढवांचा जितका करता येईल तितका तपास करण्यांत घालविले.

मला वाटते तिबेटमधील कियांग नावाची रानगाढवे सोडली तर हीच काही खरोखरची जंगली अवस्थेतील रानगाढवे आता जगात उरली असावीत. ह्या कियांगबद्दलही अलीकडे फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. सिरियामधील रानगाढवे आता बहुधा नामशेष झाली असावीत; आणि ईजिप्त व उत्तर आफ्रिकेतील रानगाढवे बहुधा माणसाळलेली आहेत. किंबहुना ती पाळीव गाढवेच पुन्हा जंगली अवस्थेत जाऊन रानगाढवांसारखी झालेली असल्याची दाट शक्यता आहे.

म्हणूनच भारतातील ह्या रानगाढवांना खूप महत्त्व दिले पाहिजे. शिवाय ही फारच सुंदर उमदी अशी जनावरे असून ती बारा हात उंचीची (जवळजवळ ४८ इंच) आहेत. ही उंची पाळीव गाढवांहून फारच जास्त आहे. पाळीव गाढवे जेमतेम सव्वानऊ हात (म्हणजे फक्त ३७ इंच) उंच असतात. ती पाळीव गाढवांमध्ये केव्हाच मिसळत नाहीत किंवा त्यांच्याशी त्यांचा समागमही होत नाही. तरी ह्या पाळीव गाढवांचे वंशज ईजिप्तमधील रानगाढवे होती.

त्यांचा रंग वाळूसारखा चकचकीत असून त्यांच्या मानेवर आयाळ असते व पाठीवरील पट्टा चेस्टनटच्या फळाच्या रंगाचा असतो. पोटाकडे पांढरा व खांद्यावर, खोगीराच्या बाजूस व पुठ्ठ्याच्या बाजूस जरा फिकट मातकट असा रंग असतो. ही गाढवे आजूबाजूच्या पर्यावरणाशी मिसळून जातात. त्यांचे कान लहान असून ते झेब्र्याच्या कानासारखे असतात. पूर्वी ही रानगाढवे तेथे हजारोंच्या संख्येने होती आणि ती स्वसंरक्षणास समर्थ होती. परंतु दोघा वनाधिकाऱ्यांबरोबर मी काळजीपूर्वकपणे एकेका वसाहतींतून त्यांची मोजणी केली. तेव्हा ती फक्त ८६० च भरली आणि कदाचित दहाएक पाकिस्तानात असावीत.

त्यानंतर मी "झुऑलॉजीकल सर्व्हे, डिपार्टमेंट ऑफ पाकिस्तान" च्या डायरेक्टरांना प. पाकिस्तानात असलेल्या त्या दहा बारा रानगाढवांची अधिक माहिती मिळविण्यासाठी पत्र लिहिले व त्यानुसार त्यांनी सविस्तर खुलासा केला की क्वचित काही थोडीशी रानगाढवे इकडे तिकडे भटकत असल्यास तेवढी सोडून येथील सर्व भागांतून बहुधा ही रानगाढवे नामशेष झालेली आहेत.

काही रानगाढवे कच्छच्या मोठ्या रणाच्या पूर्वेकडील भागातून भारत व पाकिस्तान यांच्या प्रदेशाच्या मधली आंतरराष्ट्रीय सरहद्द ओलांडून चरण्याकरिता त्यांना वाटेल तेव्हा जातात.

परंतु ती राहण्याकरिता व त्यांच्या प्रजोत्पत्तीच्या काळात भारताकडील सरहद्दीकडेच जातात कारण त्यांना तिकडे कोणाकडून फारसा उपद्रव न होण्याची शक्यता जास्त वाटल्यामुळे तेथे जास्त सुरक्षित वाटते. अशा प्रकारे ह्या रानगाढवांना राजकारणाच्या जातीपातीच्या अथवा धर्माच्या बंधनांची बेडी नसल्यामुळे ती दोन्ही बाजूंकडून जे काही चांगले मिळण्याजोगे असेल ते घेत एकमेकांना मदत करीत रानोमाळ भटकत असतात.

अनुक्रमणिका

१९६० साली ‘सुरा’ या रोगाने बरीचशी रानगाढवे कच्छच्या छोट्या रणात मेली असावी आणि मला वाटते काही १९६१ च्या नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये “साऊथ आफ्रिकन हॉर्स सिकनेस” या रोगाने मेली असावीत. कारण मला ती मेल्याच्या बातम्या मिळाल्या आणि एक प्रेत देखील पाहावयाला मिळाले. पाळीव घोडे आणि गाढवे यांना होणारे रोग हेच त्यांचे खरे शत्रू होत. एरव्ही त्यांचे पारंपारिक शत्रू म्हणजे लांडगे; आणि ते त्या भागातून आता जरी अगदी नामशेष झालेले नसले तरी पुष्कळच कमी झालेले आहेत.

तसे पाहता हे खरोखरच भयानक असे प्राणी-लांडगे-आता भारताच्या उ. प्रदेशातील, अगदी आतील जेथे पोहोचता येणे देखील कठीण, अशा दाट जंगलातूनही आताशा नामशेष होत चालले आहेत. याच भागांतून पूर्वी लांडग्यांनी वाढविलेल्या मुलांची उदाहरणे ऐकीवात होती आणि आताही तसा एक मुलगा लांडगे वाढवीत असल्याची नोंद आहे.

ही नोंद लखनौच्या बलरामपूर हॉस्पिटलमध्ये असलेल्या रामूची आहे. त्याला १९५३ मध्ये तेथे आणण्यात आले तेव्हा तो जवळजवळ नऊ वर्षाचा होता. त्याला लांडग्यानी वाढविलेला मुलगा असे म्हणण्यास सबळ कारणे होती. कारण त्याच्या शरीराच्या हालचाली व सवयी लांडग्यासारख्याच होत्या. तो कच्चा मांसाशिवाय काहीही खाण्यास तयार नसे. १९५९ मध्ये त्याला “प्लूरसी” झाली आणि त्याचे निदान “बोव्हीन प्लूरसी” म्हणजे “खूरधारी प्राण्यांना होणारी प्लूरसी” असे झाले. हा रोग म्हणजे प्राण्यांपासून झालेला क्षय रोगाचा संपर्क होय. त्यानंतर त्याला बरे करण्यात आले.

१९६२ मध्ये तेथील डॉक्टर मंडळींनी त्याला माणसाळवण्याचे प्रयत्न जवळजवळ सोडून दिले व त्यानंतर ते त्याला निदान कच्चे मांस खाण्यापासून तरी कसे परावृत्त करता येईल इतकाच विचार करू लागले.

मी स्वतः मात्र ह्या गोष्टीवर विश्वास ठेवू शकत नाही की एखादा लांडगा मुलाला जखम झाल्याशिवाय त्याच्या गुहेपर्यंत कसा नेऊ शकेल आणि जरी समजा एखादे मूल लांडगिणीच्या गुहेपर्यंत कसेबसे इजा न होता सुखरूप पोहोचले तरी लांडगिणीला फार महिने दूध येत नाही. तेव्हा इतक्याशा दुधावर ते मूल कसे पोसले जाईल? आणि तिच्या पुढील प्रसूतीच्या खेपेसही तिची पिले ह्या मुलाला वाढविताना किती तरी अडथळे आणतील.

किपलींगच्या रोम्युलस आणि रेमुस तसेच मौग्ली यांच्याबद्दलच्या चमत्कारिक आणि सुरस कथा वाचल्यानंतर मोठ्या नाखुशीने मला कटू व कानाला फारसे गोड लागणार नाही परंतु सत्य असे अनुमान करावे लागत आहे की, अशा प्रकारची अनेक ठिकाणाहून सुटका करून आणलेली; लांडग्यांनी वाढविलेली मुले (रामू रेल्वेच्या फलाटाजवळ सापडला होता.) म्हणजे त्यांच्या आईवडिलांनी ती मुले मूढासारखी (मूर्खपणाने वागणारी) असल्यामुळे सोडून दिलेलीच मुले असावीत.

कच्छच्या छोट्या रणातील आजूबाजूचे रहिवासी तिथल्या रानगाढवांना त्रास देत नाहीत. ते शाकाहरी लोक आहेत आणि त्यांना जीवनाच्या पवित्र्यतेबद्दल फारच आदर आहे. ते इतके धार्मिक आहेत की टोळधाडीने त्यांच्या पिकांचा फडशा पाडला तरी त्या टोळांना मारुन न टाकता फक्त हुसकून लावावे एवढेच ते मागतात. ही रानगाढवे जेव्हा रात्री त्यांच्या पिकांमध्ये घुसतात (असे अनेकदा घडते) तेव्हा

अनुक्रमणिका

गावकरी त्यांना फक्त हुसकून लावतात, त्यांना केव्हाही ठार मारीत नाहीत किंवा इजा अथवा दुखापत करीत नाहीत.

वन्यप्राणी संरक्षणाकरिता काही करावे या हेतूने मी अनेक ग्रामसेवकांकडे चर्चा केली. गीरच्या जंगलातील गावकरी त्यांच्या गाईगुरांना सिंहाने ठार मारून टाकले तरी सहनशीलतेने ते समजून घेतात; कारण त्यांना माहीत आहे की ह्या जंगलातील सिंह ही राष्ट्राची फार मोठी मालमत्ता आहे. आसाममधील काझीरंगा अभयारण्याच्या आजूबाजूचे गावकरी त्यांच्या भातशेतीत घुसलेल्या गेंड्यांना देखील शांतपणे हुसकून लावतात.

त्यांच्याकडून या गोष्टीला फारच चांगला प्रतिसाद मिळाला आणि ग्रामपंचायतीच्या सभासदांनी मला सांगितले की त्यांनी ह्या रानगाढवांना केव्हाच त्रास दिलेला नव्हता. शिवाय जगातील एक क्वचितच दिसून येणाऱ्या वन्यप्राण्याची जात भारताच्या ह्या भागात दिसून येते ह्या गोष्टीचा त्यांना मोठा अभिमान वाटतो.

ही रानगाढवे जेव्हा संधी मिळेल तेव्हा रात्रीची पिकांमध्ये घुसतात, परंतु दिवसा मात्र ती ह्या रणातील काही बेटांवर किंवा समुद्रकिनाऱ्यावर जी काही खुरटी झुडूपे तुरळक कुठे गवताचे पुंजके दिसल्यास त्यावरच चरतात. ती फारच बुजरी व दक्ष असून माणसांची जरा जरी चाहूल लागली की दूर पळून जातात. कच्छच्या उघड्या सपाट रणावर चौखूर धावता येत असल्यामुळे त्यांना संरक्षण मिळते. ती त्यांच्या वेगामुळेच शत्रूपासून सुरक्षित आहेत.

पूर्वीच्या काळी घोड्यावर बसून त्यांचा पाठलाग करून त्यांना भाल्याने मारण्यात येत असे; किंवा घोड्यावरून त्यांना पकडण्यात येत असे. परंतु एका घोडेस्वाराला हे जमत नसे, अनेक ताज्या दमाचे घोडेस्वार अंतराअंतरावरून त्यांचा पाठलाग करून ह्या वेगाने धावणाऱ्या रानगाढवांना दमवीत असत. अलीकडे जीपमधून त्यांचा पाठलाग सहज करतात.

एका बातमीदाराने मला हसत हसत सांगितले की काही पोलीस एकदा जीप घेऊन शेतीत शिरलेल्या रानगाढवांना हुसकून लावण्यासाठी आले तेव्हा रानगाढवे कच्छच्या रणात अशी चौखूर उधळली की पोलिसांची जीप मागे पडली. गाढवे पुढे आणि पोलिसांची जीप मागे; त्यानंतर थोड्याच वेळात पोलीस मागे परतू लागले तेव्हा पोलीस पुढे व गाढवे त्यांचा पाठलाग करीत मागे येत असल्याचे दृश्य दिसले.

अशा प्रकारे चौखूर धावत असताना गाढवांचा वेग ताशी ३२ ते ३४ मैल असू शकतो. ती थकल्यावर त्यांचा वेग कमी म्हणजे ताशी २८ मैल इतका होतो. त्यांचे बरेचसे फोटो मी जीपमधूनच ती ताशी ३२ ते ३४ मैल वेगाने पळत असतानाच घेतलेले आहेत. कारण ती चरत असताना मला त्यांच्या फारसे जवळ जाऊन फोटो घेता येणे शक्य झाले नाही.

दुसऱ्या दिवशी आम्ही १०/२० रानगाढवांचे छोटे छोटे कळप पाहिले. त्यांपैकी एकट्या रानगाढवाचे मी एक झुडुपाच्या जाळीआड लपून राहून छायाचित्र घेण्याचा प्रयत्न केला. मी लपलेलो असताना आमच्यातील दुसरी माणसे त्या रानगाढवाला माझ्या दिशेने हाकलण्याचा प्रयत्न करीत होती.

अनुक्रमणिका

अशा प्रकारे पुष्कळ वेळा निष्फळ प्रयत्न झाले. कारण ते गाढव फारच हुषार होते. त्यामुळे त्याला माझ्या बाजूला वळविण्यात त्यांना यश आले नाही.

शेवटी मला असे वाटू लागले की मीच "गाढव" आहे आणि ज्या वन्यप्राण्याला मी माझ्या चित्रपट्टीवर पकडू इच्छित तो प्राणी फारच चपळ आणि हुषार असावा. नंतर मी जीपमध्ये परतून ती गाढवे ताशी ३२ ते ३४ मैल वेगाने धावत असतानाच कॅमेऱ्याच्या 'शटर' चा वेग १/१००० सेकंद इतका ठेवून त्यांचे छायाचित्र घेतल्यावर मला माझे "मी" पण परत मिळाल्यासारखे वाटले.

ह्या रणातील अनेक भागांत धूसर उष्ण हवेमुळे सर्वच वस्तू वर उचलल्यासारख्या वाटतात. बऱ्याचदा मुख्य जमिनीच्या किनाऱ्याकडील भाग व बेटे जणू काही आकाशांत तरंगत आहेत असा भास होतो. किंवा काही भागात नक्कीच पाणी आहे असे वाटून तेथे, प्रतिबिंब दिसल्यासारखे वाटते. वर्षाच्या ज्या दिवसांत जेव्हा हे रण पूर्णपणे सुके रखरखीत असते तेव्हा कधी कधी त्या गाढवांचे देखील प्रतिबिंब पाण्यात पडल्यासारखे वाटते. जींजुवाडा या मोठ्या गावात मला एक प्राण्यांचा डॉक्टर भेटला. तो गाई, गुरे, घोडे, गाढव यांसारख्या पाळीव जनावरांच्या रोगांवर काही औषधे देत असे.

मी त्याला मुद्दामच थोडे गंभीरतेने विचारले की तुम्ही ह्या रानगाढवांना द. आफ्रिकेतील घोड्यांच्या रोगांवरील प्रतिकारक लस का टोचत नाहीत?

आपण त्यांना माझ्या दवाखान्यात घेऊन या आणि मग मी त्यांना ती लस टोचेन त्यांनी लगेच विनोदाने उत्तर दिले. मी त्यांच्यापासून रोगप्रतिकार करण्याची शक्ती व त्यावरील औषधी उपाययोजना या बद्दल बरेच काही शिकलो.

दुसऱ्या दिवशी ध्रांगध्रा येथे मला भेटलेल्या प्राण्यांच्या अधिकाऱ्याने मला त्याहीपेक्षा जास्त माहिती दिली. शेवटच्या दिवशी मी माझे लपण ज्या ठिकाणी रानगाढवांचा कळप पाणी पिण्यासाठी नक्की येईल अशा एका गोड्या पाण्याच्या छोट्या तळ्याच्या बाजूला वाढलेल्या उंच गवतात लपवून ठेवले. मी कळप जवळून निरखून पाहावयास मिळेल अशा आशेत होतो. परंतु रानगाढवांचा कळप फारच हुषार होता.

त्या माझ्या लपणात भर दुपारच्या उन्हात आखडून बसून निरर्थक वेळ दवडावा लागल्यामुळे पुन्हा एकवार मीच "गाढव" असल्याचे मला पटले. ती दुसरी (खरोखरची) गाढवे मात्र थोड्याच अंतरावर क्षितिजकडेला शांत परंतु दक्ष अशा पहारेकऱ्यासारखी एकत्र उभी होती.

पुन्हा एकवार रणामध्ये चौखूर धावणाऱ्या गाढवांच्या बरोबरीने जीपमधून दौड केल्यावर मला माझा गळून पडलेला अभिमान परत मिळाल्यासारखे वाटले. मला वाटते ह्या गाढवांना असे चौखूर उधळणे आवडत असावे!

अनुक्रमणिका

**प्रकरण १० वे**

## गीरच्या जंगलातील सिंह

सिंह भारताच्या वन्यजीवनांतील एक प्रमुख वन्यप्राणी म्हणून ओळखला जातो; आणि तरीही त्याच्याबद्दल अनेकांना फारशी माहिती नाही. एकेकाळी तो उत्तर भारतातले पूर्वेकडील भाग सोडले तर सर्वत्र दिसून येई. तसेच दक्षिणेकडे नर्मदा नदीपर्यंतही तो दिसत असे.

भारतात गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत तो पुष्कळच मोठ्या प्रमाणावर दिसून येई असे खालील उदाहरणांवरून म्हणता येईल. एका शिकाऱ्याने ३०० सिंह मारल्याची नोंद आहे. त्यापैकी ५० तर दिल्लीच्या आसपासच्या भागांत मारलेले होते. दुसऱ्या एका शिकाऱ्याने एकापाठोपाठ तीन वर्षांत ८० सिंह मारले होते. तो घोडदळाचा मुख्य अधिकारी होता. त्याने घोड्यावरून उघड्या माळरानात सिंहांचा पाठलाग केला होता.

१८८० किंवा १८८४ च्या दरम्यान भारतात जुनागढच्या राज्यातील गीरचे जंगल सोडून दुसरीकडे कुठेही सिंह आढळेनासे झाले. सिंह वाघासारखा लबाड किंवा कपटी नसून त्याला वाघासारख्या दाट जंगलाची जरुरी नसल्यामुळे तो शिकाऱ्यांच्या बंदुकीला बळी अगदी सहजपणे पडला. विशेषतः शिकाऱ्यांच्या हातात जेव्हा जास्त आधुनिक शस्त्रास्त्रे पडली त्यामुळे तर हे असे होण्यास फारच मदत झाली. शिवाय सिंह दिवसा किंवा रात्री केव्हाही बाहेर पडतो. []वाघ पूर्णपणे निशाचर आहे.

भारतात अगदी पूर्वीपासून वाघ होता की सिंह होता यावर फारच वादविवाद झाले. प्रस्तुत पुस्तकात पूर्वीच केलेल्या विवेचनानुसार वाघ भारतात आग्नेयेकडून हिमयुगानंतर आला. आताशा बहुतेक निसर्गतज्ञ सिंहच भारतात वाघाच्या आधीपासून अस्तित्वांत होता असे मानतात. काही लोक असे समजतात की सिंह सर्व भागांतून नष्ट होऊन आता फक्त गीरच्या जंगलातच उरला असण्याला वाघच कारणीभूत आहे. परंतु हे खरे नाही. आशिया खंडातील कित्येक भागांत जेथे वाघ अस्तित्वातही नव्हते अशा ठिकाणांहूनही सिंह नाहीसा झालेला आहे.

याशिवाय पूर्वी जेथे वाघ आणि सिंह दोन्ही एकत्रितपणे आढळून येत असत तेथेही ते एकमेकांच्या सहवासांत येणे शक्य नाही. कारण ते अगदी वेगवेगळ्या प्रकारच्या जंगलांत व वेगवेगळ्या पर्यावरणांत राहतात. सिंहांना रहावयाला उघडी, सुकी, खुरट्या झुडुपांची जंगले आवडतात तर वाघ दाट झाडे-झुडुपे व गवत असलेल्या जंगलात राहतात.

आणि पूर्वीच्या काळी जरी समजा एकाच जंगलात असल्यामुळे एखादे वेळेस वाघ आणि सिंह कधी अचानक एकत्र आले तरी काही त्यांच्यामध्ये लगेच मारामाऱ्या होतीलच असे काही नाही. शक्य असल्यास ते एकमेकांना टाळण्याचा प्रयत्न करतील.

आणि जरी समजा वाघा-सिंहात एखादेवेळी मारामारी झाली तरी त्यात वाघच नक्की जिंकणार असे समजणे चुकीचे आहे. दोन्हीही जनावरे साधारण सारख्याच आकाराची व वजनाची आहेत.

भारतीय सिंहांची संख्या इतकी कमी होण्याचे कारण फक्त मानवच होय. मानवाने त्यांची हत्या केल्यामुळेच हे झालेले आहे. आफ्रिकेतीलही कित्येक भागांत असे घडलेले आहे.

भारतीय सिंहाच्या रक्तात आफ्रिकन सिंहाचे रक्त मिसळले असल्यास एक चुकीचा समज येथील काही भागांत आहे. मी ह्यावर संशोधन केलेले आहे आणि त्यावरून ते चुकीचे असल्याचे दिसून आले आहे. ह्या चुकीच्या विधानाला दोन कारणे असावीत.

यांपैकी एक असे की बहुधा १८९० मध्ये जेव्हा क्लेरन्सचा राजपुत्र (५ व्या जॉर्ज राजाचा भाऊ) गीरच्या जंगलात सिंह मारण्यासाठी आला तेव्हा ह्या शिकारीची योजना आखणारांनी शिकार सफळ व्हावी म्हणून येताना आफ्रिकेतून काही सिंह गुपचुप बरोबर आणले असल्याच्या अफवा आहेत. असे म्हणतात की ते त्यांनी अरब लोक आफ्रिकेतून गुलामांना आणीत असत त्या जहाजांमधून आणले होते.

मी सर्व बाजूंनी चौकशी केलेली आहे आणि अशा प्रकारच्या काही नोंदी मला कुठेही मिळालेल्या नाहीत किंवा असे काही घडल्याच्या काही ऐतिहासिक गोष्टीही ऐकिवात नाहीत. आणि मला असे नक्की वाटते की ह्या अफवांवर विश्वास ठेवण्यात काही अर्थ नाही. कारण त्यावेळेस काही भारतात सिंह इतके कमी नव्हते. शिवाय उघड्या माळरानासारख्या गीरच्या जंगलांत सिंहाना शोधून काढणे मुळीच कठीण नाही. शिवाय पूर्व आफ्रिका ते जुनागढ इतका प्रवास करण्याला जहाजाला २ महिने तरी लागतील. शिवाय हा प्रवास फक्त थंडीतच करावा लागेल आणि त्या सिंहांना प्रवासात जिवंत ठेवण्याकरिता मांसाचा किती मोठा साठा लागेल ह्याची कल्पना तरी करा.

शिवाय परदेशांतून आयात करताना खूप दूरचा प्रवास केल्यामुळे थकलेल्या अशा ह्या सिंहाना इथल्या गीरच्या सिंहांनी सहज ठार मारले असते. त्यामुळे आफ्रिकेतून इथे सिंह आणले गेले ह्या अफवेवर विश्वास ठेवण्यात काही अर्थ नाही.

ही अफवा उठण्याचे कारण म्हणजे बहुधा “क्लेरन्सच्या राजपुत्राने १८९० मध्ये केलेली शिकार” ह्या पुस्तकातील उतारा पुढीलप्रमाणे आहे :

दिवस उगवताच दिवाणांनी मला दिलेली भेट. ते मला सांगायला आले होते की राजपुत्रांनी गीरमधील सिंह न मारता त्या रात्री जुनागढहून पाठविलेले २ सिंह पिंजऱ्यातच ठेवलेले होते; त्यांनाच जंगलात सोडावे आणि मग शिकार करताना मंडळींच्या बाजूस त्यांना ठार मारण्यासाठी हाकलावे. अर्थातच कर्नल केनेडींनी किंवा मी देखील दिवाणाच्या ह्या सूचनेला अनुमती दिली नसती .... त्यामुळे ही सूचना फेटाळली गेली आणि ते सिंह त्यांच्या मुळच्या घरी जुनागढला, परत करण्यात आले. मला आश्चर्य वाटते की ते सिंह सुटल्यावर कसे वागले असते?

भारतीय सिंहाच्या रक्तात आफ्रिकन सिंहाचे रक्त मिसळले आहे ह्या चुकीच्या समजाला दुसरेही एक कारण असू शकेल की ग्वाल्हेरच्या महाराजांनी १९१६ च्या सुमारास आफ्रिकन सिंहाच्या ३ जोड्या खरीदल्या होत्या. ह्या जोड्या पुढे राजस्थानमधील शिवपुरी येथे सुट्या सोडण्यात आल्या. परंतु त्यांना पिंजऱ्यात पुष्कळ काळ राहिल्यामुळे माणसांचे भय वाटेनासे झाले म्हणून त्यांना लवकरच ठार मारण्यात आले. ह्या सिंहांपैकी कुठचेही सिंह गीरच्या जंगलापर्यंत पोहोचले नसतील.

अनुक्रमणिका

आफ्रिकन व भारताय सिंहांच्या डोक्याच्या कवटीमध्ये थोडा फरक आहे. त्यावरून त्यांच्या दोन उपजाती ठरविल्या गेल्या आहेत. आफ्रिकेतील सिंहाची जात "पँथेरा लिओ लिओ" अशी आहे व भारतीय जातीला "पँथेरा लिओ पर्सिका" असे म्हणतात.

मी स्वतः त्यांच्यात काही फरक पाहिलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे: भारतीय सिंहांच्या शेपटीला केसांचा लांब झुपका असतो. गुडघ्यावरील केसही जास्त ठळकपणे दिसून येतात आणि पोटाला असलेल्या वळ्या उठून दिसतात. शिवाय लहान असताना त्यांच्यावर ठिपके कमी असतात.

१९६२ च्या जुलैमध्ये केनियाच्या रॉयल नॅशनल पार्कचे डायरेक्टर "मर्वीन कोयी" यांना मी अमेरिकेत भेटलो आणि आम्ही आमच्याकडील भारतीय व आफ्रिकन सिंहांच्या छायाचित्रांची तुलना केली. भारतीय सिंहांच्या गुडघ्यावरील जास्त केस व शेपटीच्या केसांचा लांब झुपका या फरकाशिवाय ते जास्त जाडसरही असतात. तसेच आयाळ असलेल्या (नर) भारतीय सिंहांच्या डोक्याची कानापासून ते नाकाच्या शेंड्यापर्यंतची लांबी जास्त असते. मात्र त्याच्या डोक्यावर केस कमी असतात.

सर्वसाधारणतः आफ्रिकन सिंहाला त्याच्या भारतीय भाऊबंदापेक्षा नक्कीच जास्त आयाळ असते; परंतु मला वाटते हे मुख्यतः हवामानांतील फरकामुळे असावे. मी केनिया आणि टांगानिकामध्ये पाहिलेले सर्व सिंह समुद्रसपाटीपासून ६००० फूट उंचीवर असलेल्या पठारावर पाहिलेले आहेत; तर गीरचे अभयारण्य समुद्रसपाटीपासून केवळ २०० ते ४०० फूट उंचीवर आहे. शिवाय तेथे हिवाळा सोडला तर एरव्ही फारच गरम असते.

भारतीय सिंहाला थोडी कमी आयाळ असण्याचे आणखी एक कारण म्हणजे पूर्वीच्या काळी कोणीही खास पाहुणे शिकार करावयास आल्यास त्यांच्यासाठी अगदी चांगले मोठे, भारदस्त, खूप आयाळ वगैरे असेलेले सिंह निवडले जात. असे मोठे आयाळ असलेले सिंह बहुधा मारले जात त्यामुळे सिंहांचा दर्जा खालावत गेला.

जाता जाता मला येथे असे नमूद करावेसे वाटते की, अगदी खास असे काही प्रमुख पाहुणे असल्यास पूर्वीच्या काळी त्यांनी मारलेले सिंह मोजण्याची खास अशी पध्दत होती असे मी ऐकले. सिंहाचे पुढचे पंजे जितके बाहेर खेचता येतील तितके ओढले जात व नंतर त्याच्या सुरुवातीपासून ते पुढचे पाय त्यानंतर नाकावरुन ते सर्व वक्राकार भागावरून ते शेपटीच्या टोकापर्यंत असे माप घेतले जाई.

आफ्रिकन व भारतीय सिंहामध्ये दुसरा फरक म्हणजे आफ्रिकेतील काही टक्के पूर्ण वाढलेल्या नर सिंहाना देखील आयाळ नसते; परंतु वयात आलेल्या सर्व भारतीय नर सिंहांना आयाळ असतेच असते.

काही जण विचारतील "तर मग काही ठराविक निसर्गनिरीक्षकांनी लिहिलेल्या "गुजराथमधील बिनआयाळीच्या सिंहा" बद्दल काय? १८३३०/३४ मध्ये हे वर्णन लिहिलेले होते आणि याचे शीर्षक तर फारच फसवे आहे. त्यामध्ये लेखक एका फारच दुबळ्या सिंहाचे वर्णन करीत होता; शिवाय त्यामध्ये त्याने "आयाळ नसलेला सिंह" हे वर्णन फक्त तौलनिक दृष्ट्याच लिहिलेले आहे. फक्त इतकेच सांगण्याकरिता की आफ्रिकन सिंहापेक्षा भारतीय सिंहाला कमी आयाळ असते.

अनुक्रमणिका

ब्रिटिश म्युझिअम ऑफ नॅचरल हिस्ट्रीच्या आर. आय. पोकॉक यांनी म्हटले आहे की लेखकाचे, 'आफ्रिकन सिंहाना जास्त लांब आयाळ असते' असे मत, त्याने पिंजऱ्यात ठेवण्यासाठी जमविलेले लांब आयाळीचे सिंह पाहिले असतील किंवा तेव्हा युरोपमध्ये त्याने केप कॉलनी किंवा अल्जेरियातील पूर्ण वाढीचे सिंह पाहिले असतील, त्यावरून झाले असावे.

माझ्या तेथील तीन भेटींमधील स्वानुभवावरून मी अगदी खात्रीने सांगू शकेन की गीरच्या जंगलात मी पाहिलेले सर्व पूर्ण वाढलेले सिंह भरपूर आयाळ असलेले होते. फक्त मी पूर्व आफ्रिकेत पाहिलेल्या सिंहांपेक्षा त्यांना किंचित कमी आयाळ असेल.

आता भारतातील सिंहांच्या संख्येविषयी पाहू. १८८० पासून १९०० पर्यंतच्या काळात गीरच्या जंगलात फक्त डझनभर किंवा त्यांच्या आसपास इतकेच सिंह उरले होते असे म्हणतात. ह्या शतकाच्या सुरुवातीला जेव्हा लॉर्ड कर्झन तेथे सिंहाच्या शिकारीकरिता जाणार होता तेव्हा त्याने सिंहांची संख्या इतकी कमी झालेली ऐकून शिकारीचे आमंत्रण स्वीकारले नाही. एवढेच काय पण त्याने जुनागढच्या नबाबांना ह्या सिंहाना अगदी जातीने संरक्षण देण्याची विनंती केली. त्यामुळे जसे त्याने देशातील पुराणवस्तूंचे जतन करून मोठेपणा मिळविला होता तसाच ह्याही बाबतीत त्याला मोठेपणा मिळाला.

परंतु १९५६ च्या जानेवारीमध्ये गीरच्या जंगलात भेटलेल्या नवानगरच्या जामसाहेबाने मला सांगितले की त्यांच्या कुटुंबातील मंडळींना गीरमधील सिंह चांगलेच परिचित होते आणि ते अधूनमधून नेहमी त्यांच्या शिकारीला जात असत. तो म्हणाला की ह्या शतकाच्या सुरूवातीला त्याला तेथे १०० च्या वर सिंह असल्याचे खात्रीने माहीत होते.

तेथे आता अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच सिंह उरलेले आहेत असे तो जुनागढचा नबाब बहुधा मुद्दामच सर्व लोकांमध्ये बोलला असावा. कारण प्रत्येक ब्रिटिश व्हाइसरॉय किंवा कमांडर-इन्-चीफ, मुंबईचा गव्हर्नर, राजकुमार आणि कोणीही आलतू फालतू देखील आपल्याला असे शिकारीचे आमंत्रण मिळावे अशी आशा बाळगून असत.

१९५० मध्ये सिंहाच्या पायांचे ठसे मोजून एक ढोबळ शिरगणती करण्यात आली होती आणि तेव्हा असे आढळून आले की गीरच्या ५०० चौ. मैलांच्या जंगलात २४० सिंह असावेत.

१९५५ मध्ये अशाच प्रकारे आणखी एक शिरगणती करण्यात आली. त्यानुसार तेथे २९० सिंह असावेत असे अनुमान काढण्यात आले. ह्या शिरगणत्या राजकोट येथील राजकुमार कॉलेजचे मुख्याध्यापक श्रि.एम.ए.विंटर-ब्लॅथ यांच्या देखरेखीखाली आयोजित केल्या होत्या. आता गुजराथमध्ये जे काही वन्यजीवन दिसून येते त्यामध्ये त्यांनी फारच रस घेतला होता.

विंटर-ब्लॅथ यांना आर.एस.धर्मकुमारसिंहजी [अनुवादकाची तळटीप— धर्मकुमारसिंहजींचे १९८६ मध्ये निधन झाले. ते खरोखरच वन्यप्राण्यांचे रक्षणकर्ते होते. माळढोक पक्ष्याचे त्याच्या घरट्यावर असतानाचे छायाचित्रही त्यांनी टिपले होते. असे छायाचित्र अगदी थोड्यांना मिळाले असेल.] ह्यांनी मदत दिली. मी धर्मकुमारसिंहजीना नेहमीच भारताच्या पश्चिमेकडील वन्यजीवनाशी निगडित असे समजतो कारण ते एक अतिशय अनुभवी असे निसर्गप्रेमी व वन्यप्राण्यांचे छायाचित्रकार आहेत.

अनुक्रमणिका

त्यांनी भारतीय वन्यप्राणीजीवन जतन करण्याकरिता पुष्कळच कार्य केले. ते १९५२ पासून "इंडियन बोर्ड फॉर वाइल्ड ॲनिमल्स ॲंड बर्ड्स्" ह्या मंडळाचे खासगी उपकार्यवाह होते. आम्ही जेव्हा जेव्हा भेटत असू तेव्हा आम्ही भारतातील वन्यप्राणी व पक्षी यांबद्दल व अशाच विषयांवर बोलत असू. कारण आम्हाला दोघांनाही त्यात फारच रस होता.

यापुढील सिंहशिरगणती १९६३ पर्यंत झाली नव्हती, त्यानंतर तर ते अगदी फारच जरुरीचे झाले होते, कारण तेव्हा गीरच्या जंगलाच्या कडेकडेच्या भागांमध्ये ज्यांची गुरे सिंहांनी मारली होती त्या क्षुब्ध झालेल्या गावकऱ्यांनी बऱ्याच सिंहांना विष घालून मारल्याच्या बातम्या मोठ्या प्रमाणावर येत होत्या. अलीकडच्या काळात अशाप्रकारे विष घालून मारलेल्या सिंहांची संख्या ६ पासून १०० पर्यंत बदललेली ऐकिवात आहे तेव्हा उरलेल्या सिंहांची संख्या २८० पेक्षा थोडी जास्त असावी. हेही नसे थोडके!

गुजरात राज्य सरकार लवकरच गीरचे हे जंगल अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यान म्हणून जाहीर करील अशी अपेक्षा आहे; [गीरचे जंगल अभयारण्य म्हणून १९६५ साली जाहीर करण्यात आले आहे.] त्यामुळे भारताचे राजचिन्ह असलेल्या ह्या सिंहाला पुढील काळात व्यवस्थितपणे जगू शकण्याची संधि मिळेल.

गीरच्या जंगलात एवढे तरी सिंह तग धरून राहण्याला पूर्वीच्या जुनागढच्या राजघराण्यांतील संस्थानिक कारणीभूत आहेत. ते मुस्लिम असून त्यांना नबाब या नावाने ओळखले जाई. ते काही खरोखर वन्यप्राण्यांचे संरक्षण करावे अशा मताचे होते असे नव्हे, कारण तेव्हा येथील वन्यप्राण्यांचे खरोखरच संरक्षण करण्याची जरुरी आहे अशी जागृती भारतात केवळ शिकाऱ्यांच्या फायद्याकरिता ते राखले जावेत याव्यतिरिक्त होती असे मला तरी वाटत नाही.

काश्मीरमधले सांबर व नेपाळमधले गेंडे यांना ज्याप्रमाणे शाही शिकारीचे प्राणी असे मानले जाई, त्याप्रमाणे सिंहाना जुनागढच्या संस्थानात मानले जाई.

मला असे सांगण्यात आले होते की भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा जुनागढचा नबाब भारतात आला असता, परंतु त्याच्या दिवाणाने – जो प. पाकिस्तानातील सिंधचा रहिवासी होता त्याने-त्याला पाकिस्तानात जावयास सांगितले. कारण जुनागढमध्ये जास्तीत जास्त हिंदू लोक असून ते भारताच्याच बाजूने आहेत असे वाटल्यावरून मग नवाब कराचीला पळून गेला.

तो कुत्र्यांचा फारच शौकीन होता. प्रथम मला असे कळले की जेव्हा तो कराचीला गेला तेव्हा त्याने स्वतःबरोबर त्याच्याकडे असलेले सर्व सात-आठशे कुत्रे नेले. बायका मात्र निम्म्याशिम्म्याच (फक्त ४ च) नेल्या. आता सध्या सासनगीरला कामाला असलेला परंतु पूर्वी नवाबाच्या खासगीत कामाला असलेला एक माणूस म्हणाला की नवाबाकडे जरी एकेकाळी सात-आठशे कुत्रे पाळलेले होते तरी भारताच्या स्वातंत्र्यपूर्तीच्या काळात त्यांच्याकडे फक्त २५०/३०० कुत्रेच उरले होते आणि त्याने कराचीला फक्त ४ कुत्रे व चारातील तीन बेगमा नेल्या. चौथी बेगम दुसऱ्या दिवशी त्याच्या मागोमाग गेली.

अजूनही गीरमध्ये पूर्वीच्या राजेशाही थाटाच्या व इमानाच्या खाणाखुणा दिसतात. उदा. कित्येक शिकारी आता जरी वनखात्याकडे रक्षक, रखवालदार किंवा पहारेकरी म्हणून कामाला असले तरी ते मोठ्या अभिमानाने "JF" पूर्वीचे जुनागढ फॉरेस्ट अशी पितळी अक्षरे असलेला बिल्ला लावून फिरतात.

अनुक्रमणिका

ओघाओघाने सांगावयाचे की भारताचा हा भाग ज्याला सौराष्ट्र असे म्हणतात, त्याला राजेरजवाड्यांचे व संस्थानिकांचे माहेरघरच म्हणावे लागेल. ह्या छोट्या भागात जवळजवळ २०२ संस्थानिक होते.

भारताच्या पूर्वेस आसाममध्ये मात्र असे राजेरजवाडे अथवा संस्थानिक नसत, तेथे फक्त काहीच बडे जमीनदार राजे असत.

गीरचे जंगल ही फारच सुंदर व रंगीबेरंगी जागा म्हणावी लागेल. जंगल ह्या शब्दाने जो अर्थ अभिप्रेत होतो तशी ती जागा नाही. हा एक बराच मोठा जवळ जवळ पाचएकशे चौ. मैलांचा टापू अर्धवट सुका असा आहे. त्यावर अधूनमधून काटेरी झुडुपे आहेत. ती आफ्रिकेची आठवण करून देतात. जंगलात मधूनच साग आणि दुसरी काही हलक्या प्रतीच्या लागडांची झाडे दिसून येतात.

जंगलात अधूनमधून जिकडे तिकडे सर्वत्र गावे व शेती पसरलेली आहे. तसेच धंदेवाईक गुराख्यांच्या पुष्कळ गाई म्हशी, शेळ्यामेंढ्या विखुरलेल्या आहेत. या गुराख्यांना इकडे “मालधारी” असे म्हणतात. (छायाचित्र क्र. २६)

जेव्हा तेथे नीलगाई, सांबरे, चितळे आणि रानडुकरे (हे सिंहाचे एक अत्यंत आवडीचे खाणे आहे.) असे सिंहाचे खाद्य पुरेसे नसते तेव्हा सिंह तेथील पाळीव जनावरांवर किंवा मालधारी लोकांवर झडप घालतात. सुदैवाने येथील लोक आपल्या गाईगुरांच्या मालमत्तेतील काही भाग अशाप्रकारे गडप होण्याला रुळले आहेत आणि ते ह्याला “धंद्यातील संकटे” असे समजतात. ह्या भागातील गुरांना जो चांगला चारा मिळतो त्याच्या बदल्यात ही किंमत केव्हा केव्हा मोजावी लागते असे ते मानतात त्यांच्यापैकी कित्येक जण आता सांगतात की जर अशी गाईगुरे सिंहाकडून मारली गेली तर नवाब त्याची नुकसानभरपाई देत असे, परंतु अशी कुठचीही नोंद दफ्तरी असल्याचे आढळत नाही. नवाब बहुधा त्याच्या मनाला वाटेल तेव्हाच काही बाबतीत पैसे देत असावा.

१९५६ च्या जानेवारीमध्ये मी गीरला प्रथम गेलो. ह्या सुमारास पावसाळ्यात भरपूर उगवणारे बरेचसे गवत गुरांनी खाल्लेले होते व उरलेले फिकट पिवळे पडत चालले होते. पळसाची आकर्षक झाडे अग्नीज्वाळेच्या रंगाच्या फुलांनी भरून गेल्यामुळे त्यांच्या ऐन उमेदीत असल्यासारखी भासत होती. असंख्य पक्षी त्यांच्या फुलांतील मध चोखून घेत होते. क्वचितच् लांबवरून एखाद्या सिंहाची गर्जना कानी पडत होती. खरंच, ती जागा अगदी प्रणयरम्य वाटत होती.

वन्यप्राणी जीवनावरील सभेच्या निमित्ताने आम्ही दहाजण तेथे जमलो होतो. आम्ही तेथील तेव्हाच्या सौराष्ट्र राज्याचे राज्यप्रमुख नवानगरचे जामसाहेब यांचे पाहुणे होतो.

जामसाहेबांनी बराच प्रवास केलेला असून त्यांचे वाचनही दांडगे होते. शिवाय ते प्रसंगवर्णन उत्तम रंगवून सांगू शकत होते. मी त्यांचे “नवाब आणि त्यांचे सिंह” यावरील संभाषण अतिशय लक्षपूर्वक ऐकले व त्यांच्यापासून बरेच शिकलो देखील.

अनुक्रमणिका

एक दिवस दुपारच्या जेवणाच्या सुमारास आम्ही नुकतीच कॉफी घेऊन सभेला सुरुवात करीत होतो तेव्हा त्यांच्या हाताखालचा एक वनाधिकारी आत येऊन त्यांच्याशी काही तरी कुजबुजला. “सिंह” ते म्हणाले. मग माझ्याकडे वळून ते म्हणाले, “तुम्ही या”. नंतर त्यांनी आणखी दोघातिघांना बोलाविले.

माझ्याकडे पाहून त्यांनी अगदी निश्चयी स्वरात आज्ञा केली, “बरोबर कॅमेरे नकोत”. भारताच्या ह्या भागात बहुधा कॅमेऱ्याबद्दल बरेच गैरसमज आहेत.

मी काय करावे? आयुष्यातील माझे एक अतिशय मनोरंजक उद्दिष्ट भारतांतील वन्यप्राण्यांची खरोखर वैशिष्ट्यपूर्ण अशी काही चित्रे टिपण्याचे होते; आणि ही एक सिंहाच्या छायाचित्रणाची दुर्मिळ अशी संधी होती. मी भारताच्या अगदी पूर्वेकडून पश्चिम टोकाकडे इतक्या लांबवर आलो होतो. “बरोबर कॅमेरे नकोत” ही आज्ञा माझ्या यजमानांकडून - ती देखील राज्यप्रमुखांकडून आली होती.

बऱ्याच विचारपूर्वक मी माझा एक कॅमेरा तेथेच ठेवून माझ्याबरोबर एक ३५ मी. मी. लांब पल्ल्याचे भिंग असलेला कॅमेरा व दुसरा चलत्‌चित्रपटाचे चित्रीकरण करण्याचा कॅमेरा असे फक्त दोनच कॅमेरे घेण्याचे ठरविले.

आम्ही सर्व जवळजवळ बाराजण त्या खुरटी झुडुपे असलेल्या जंगलाच्या उद्दिष्ट स्थळी पोहोचलो. तेथून पुढे पायीच झाडाझुडुपाच्या फांद्या पाचोळ्यामुळे खडबडीत झालेल्या भागातून चालत निघालो. तेव्हा जामसाहेबांनी माझे कॅमेरे, त्यांची वेगवेगळी उपकरणे, तिवई इ. सर्व पाहिले. त्यांनी माझ्याकडे कटाक्ष टाकला, परंतु त्या कटाक्षात नाखुशीने जरी असले, तरी थोडे हास्य होते त्यामुळे मला सुटल्यासारखे वाटले.

त्यानंतर आम्ही भक्ष्यावर बसलेल्या सिंहाचा एक कळप पाहण्यात जवळजवळ १ तास घालविला. त्या कळपात एक मोठ्या आयाळीचा सिंह, एक छोटा सिंह आणि ३ सिंहिणी होत्या. दुर्दैवाने सिंह काही अंतरावर होते. छायाचित्रणाकरिता ते फारच आवाक्याबाहेर होते. जामसाहेबांनी हे सिंह किती धोकादायक आहेत ते गावकरी तसेच इतर लोकांवर एकदोनदा ह्या सिंहानी केलेल्या हल्ल्याची उदाहरणे देऊन सांगितले. अलीकडेच एका सिंहाने एक बैलगाडी घेऊन चाललेल्या माणसावर हल्ला केला होता आणि एका सिंहिणीने तिच्या छाव्यांसह ३ माणसांचा पाठलाग केला. त्यांच्यापैकी एकाला तर ओरबाडून देखील काढले.

मी ह्या “लायन शो”चे जवळजवळ २०० फूट फिल्मचे चलत्‌चित्रण केले. त्या रात्रीचे जेवण करीत असताना जामसाहेब माझ्याकडे वळून म्हणाले, माझी तुम्हाला एक विनंती आहे. आपण आज जे “लायन शो”चे छायाचित्रण केलेत त्याची एक प्रत कृपया मला द्याल का? त्यावरून मला कळले की त्यांचा आज्ञाभंग करूनही सर्व काही व्यवस्थित आहे.

त्यानंतर रोज रात्रीची जेवणे झाली की आम्हाला गाडीच्या पुढच्या प्रखर दिव्यांच्या उजेडांत सिंह पाहण्यास नेण्यात आले. परंतु ह्या प्रकारचे मनोरंजन मला आवडले नाही. कारण सिंह आमच्याकडे घाबरुन एकटक पाहात असत. त्यामुळे मी काहीही छायाचित्रण करू शकलो नाही.

अनुक्रमणिका

आमच्या शेवटच्या दिवशी मला छायाचित्रणाची चांगली संधी मिळून मला सिंहाचे जवळून छायाचित्रण करता आले. मी श्री. एम्. डी. चतुर्वेदी यांच्याबरोबर संध्याकाळी सिंहाचा गारा पाहावयाला गेलो. काही सिंहांनी गावांतील दोन बैल मारले होते आणि शिकाऱ्यांनी आम्हाला मागे बसता यावे म्हणून सिंहाच्या व आमच्यामध्ये फांद्या वगैरे ठेवून साधारणसा पडदा तयार केला होता.

आता मला चतुर्वेदींबद्दल जास्त माहिती येथे द्यावी लागेल; कारण त्यांचे व्यक्तिमत्त्व लक्षात राहण्याजोगे होते. ते "इन्स्पेक्टर जनरल ऑफ फॉरेस्ट" ह्या हुद्यावरची पहिली भारतीय व्यक्ती होते. भारतांतील वन्यप्राण्यांचे संरक्षण व जतन केले गेले पाहिजे असे सरकारी पातळीवरून पटवून देणारे ते पहिलेच भारतीय होते. त्यांनी १९५२ मध्ये जेव्हा "इंडियन बोर्ड फॉर वाइल्ड लाईफ" ची स्थापना केली तेव्हा त्यांच्याच उठावदार व्यक्तिमत्त्वामुळे तसेच त्यांच्या वन्यप्राणीजीवनांतील आवडीमुळे त्यांना भारताच्या सर्व राज्यातील प्रतिनिधींमध्ये याविषयीची धडाडी व आवड उत्पन्न करणे शक्य झाले.

कर्नल बर्टन यांच्याप्रमाणेच चतुर्वेदी हे जुन्या काळातील निसर्ग जतन करणारे होते. ते अतिशय उत्तम शिकारीही होते. ते स्वतः म्हणाले की, "बहुधा शिकारीच, जो प्राण्यांना मारतो, तोच त्यांच्यावर फार प्रेम करतो आणि त्यांचे जतन करण्यासाठी प्रयत्नही करतो. ही विश्वास न बसण्यासारखी असली तरी खरी गोष्ट आहे". ते अधिकारवाणीने असेही बोलत, "जोपर्यंत एखाद्याने वाघ मारलेला नाही तोपर्यंत तो माणूस जंगलाच्या एखाद्या भागाचा वनाधिकारी म्हणून काम पाहण्यास लायक काही." पूर्वीच्या काळी जेव्हा वाघ पुष्कळ मोठ्या संख्येने येथे अस्तित्वात असत तेव्हा हे ठीक होते. म्हणजेच वरील संभाषणाचा सारासार अर्थ असा की वाघ ठार मारण्यासाठी जंगलाची व तेथील पर्यावरणाची चांगली माहिती असावयास लागते. परंतु आता एकेका वनाधिकाऱ्याला प्रत्येक वर्षी वाघ मारायला मिळेल असे पूर्वीइतके काही वाघही उरलेले नाहीत.

मला वाटते तेव्हा सेवानिवृत्त झालेल्या चतुर्वेदींना सिंहाची शिकार करण्यास फारच आवडले असते; परंतु त्यांना शेवटी त्यांनी अलीकडेच मिळविलेल्या नवीन कॅमेरा व दूर पल्ल्याच्या भिंगावरच समाधान मानावे लागले. आम्ही काही वेळ त्या फांद्यांनी तयार केलेल्या पडद्याआड थांबलो परंतु त्या संध्याकाळी एकही सिंह तेथे भक्ष्यावर आला नाही. ते तेथेच जवळपास कोठे तरी असावेत. आम्ही त्यांना ऐकू शकत होतो.

म्हणून आम्ही ते दोन मेलेले बैल आमच्या ठिकाणाजवळ फरफटत आणून एका बाभळीच्या झाडाला चांगल्या मजबूत दोरखंडाने बांधले. नंतर आम्ही रात्री घरी परतलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही त्या जागेवर गेलो. आमच्या बरोबरच्या शिकाऱ्यांनी आम्हाला आवाज न करता जाता यावे म्हणून त्या रस्त्यावरील सागाची सुकी गळून पडलेली कुरकुरीत पाने बाजूला करून तो साफ करून ठेवला होता. गिधाडे सर्वत्र होती. काही आकाशात बऱ्याच कमी उंचीवर गोल गोल घिरट्या घालीत होती तर काही झाडांवर स्थिरावली होती. गारा झालेल्या प्राण्याच्याही अवती भोवती काही गिधाडे होती.

आम्ही वरच्या बाजूला आपापल्या जागेवर पडद्याआड जवळजवळ ४५ मिनिटे बसलो होतो. तेव्हा तेथे त्या २ बैलांच्या उरलेल्या मांसावर सहा सिंह येताना पाहिले. ते सबंध रात्र त्यावर ताव मारीतच होते.

अनुक्रमणिका

त्यामुळे गिधाडांकरिता फारसे काही उरलेले नव्हतेच. त्या कळपात दोन मोठ्या सिंहिणी व ४ मोठे छावे होते.

रात्रभर खाल्ल्यामुळे ते फारसे भुकेले नव्हते. फक्त त्यांना ते उरलेले मांस गिधाडांनी खावे ही कल्पना सहन होण्यासारखी नव्हती. ते परत परत उरलेल्या गाऱ्यावर येत होते. केव्हा एकेकटा, केव्हा दोघे तर केव्हा तिघे. उगाचच, त्या गिधाडांना हाकलविण्याकरिता! आम्ही त्या बैलांना दोरखंडाने घट्ट बांधून ठेवले होते. त्यामुळे त्या सिंहाना ते दाट जंगलात फरफटून नेता येत नव्हते. मी पूर्व आफ्रिकेतही असेच पाहिले होते. एक भरपूर आयाळ असलेला सिंह त्याने अर्धवट खाल्लेल्या जिराफाजवळ पुनःपुन्हा येत असे – उगीचच, गिधाडांना हाकलून देण्याकरिता!

छाव्यांपैकी दोन मोठे छावे नर होते. त्यांना आयाळ येऊ लागली होती. सिंह सारखे येत; गिधाडांना हाकलून देत व पुन्हा जंगलांतील सावलीत आडोश्याला जात. सिंह गेल्यावर संधी मिळताक्षणीच गिधाडे खाली येत.

सिंहांनी बऱ्याच वेळा माझ्या चलत्‌चित्रपटाच्या कॅमेऱ्याचा आवाज ऐकला आणि ते आमच्या दिशेने येऊ लागले. त्यांच्यापैकी एकजण तर हा कसला विलक्षण आवाज येतोय्‌ याचा अंदाज घेण्याकरिता फारच जवळ आला. मी साधेच भिंग लावून त्यांचे छायाचित्रण करीत होतो-दूर पल्ल्याचे भिंग लावलेलेच नव्हते – इतके ते जवळ होते.

मला सिंहाची मुळीच भीती वाटत नव्हती, कारण मला माहीत होते, सिंहाना आमच्या उपस्थितीची हरकत वाटण्याचे काहीच कारण नव्हते. परंतु मला हे कबूल करावेच लागेल का आमच्याच मागे आमचे संरक्षण करण्यासाठी त्यांच्या जुन्यापुराण्या बंदुका भरून सज्ज करून बसलेल्या दोघा शिकाऱ्यांबद्दल मात्र मी साशंक होतो.

सुमारे पाऊण तासानंतर गिधाडे नाहीशी झाली. सर्व काही शांत होते. सिंह पुनःपुन्हा तेथे येण्याचे थांबले होते आणि गिधाडे व कावळे देखिल का निघून गेले याचे मात्र मला आश्चर्य वाटते, परंतु याचे उत्तर मला लवकरच मिळाले.

एक रानमांजर तेथून गाऱ्याकडे सावधगिरीने व थोडेसे घाबरटपणाने सटकले. ती सिंहाची शिकार असल्याचे ह्या रानमांजराला कळल्यामुळे ते घाबरले होते. परंतु सर्व गिधाडे नाहीशी झाली होती. ती गिधाडे ह्या छोट्या रानमांजराला सहा सिंहांपेक्षा जास्त घाबरली होती.

त्या एकंदरीत अतिशय सनसनाटी सकाळचा शेवट मोठा मनोरंजक झाला होता. आम्ही सिंहाची कितीतरी छायाचित्रे घेतली.

“मला तर मी सिंहाची चांगलीच शिकार केली असे वाटले!” श्री. चतुर्वेदी भावनावेगाने अगदी भारावून बोलले.

अनुक्रमणिका

१९६० च्या नोव्हेंबरमध्ये मी गीरच्या जंगलात दुसऱ्यांदा गेलो. I.U.C.N. ने मला ह्या वेळेस शिफारस करून पाठविले होते. काही गावकऱ्यांच्या म्हशी व गाईगुरे सिंहांनी ठार मारल्यामुळे प्रक्षुब्ध झालेल्या गावकऱ्यांनी सिंहांना विष घातले अशा उठलेल्या बातम्यांमध्ये किती तथ्य आहे हे पाहण्यासाठी मला तेथे पाठविण्यात आले होते.

पावसाळा काही आठवड्यांपूर्वीच संपल्यामुळे गवत अजूनही दाट होते; परंतु त्यामुळे दाट गवतांतून सिंह नजरेस पडणे फार कठीण होते. मला वाटले होते की अजूनही गवत हिरवेगार असेल म्हणजे रंगीत छायाचित्रांमध्ये हिरव्या पार्श्वभूमीवर पिवळेधमक सिंह चांगलेच उठून दिसतील. परंतु पावसाळ्यानंतरच्या त्या काही आठवड्यांतच उन्हाने ते सर्व गवत सुक्या घासाच्या –पिवळ्या रंगाचे झाले होते.

मी पहिल्या दिवशी वनाधिकाऱ्याबरोबर जीपमधून तसेच पायी बराच प्रवास केला तेव्हा आमच्या दृष्टीस छाव्यांसकट ११/१२ सिंहांचा एक कळप पडला. दुसऱ्या दिवशी काही इतर मंडळींनी "लायन शो" ठरविला होता आणि मलाही तेथे जाण्याचे आमंत्रण देण्यात आले; परतु शेवटी दुपारी कितीतरी उशिरा एकच सिंहीण आली. तिसऱ्या दिवशी "शिकाऱ्यांनी" पहिल्या दिवशीचा तो कळप दुसऱ्या ठिकाणी शोधून काढला; आणि आम्ही त्या मेलेल्या रेड्याचा उरलेला गारा तेथे आणून एका काटेरी झाडाला बांधून ठेवला.

मी गाऱ्यापासून पन्नासएक फूट अंतरावर एका बाभळीच्या झाडाच्या तोडलेल्या फांदीआड आडोश्याकरिता थोडेसे गवत असलेल्या जागी जमिनीवर बसलो. साधारण ११ वाजता आणि पुन्हा दुपारी सिंहीण बाहेर आली आणि गाऱ्याचा वास घेऊन थोडी निराशेनेच गेली. प्रत्येक वेळेस ती थोडी बुजत असावी. गारा गिधाडांनी खाऊन टाकू नये म्हणून आम्ही तो झाकून ठेवून दुपारच्या जेवणाकरिता विश्रांतिगृहात गेलो व दुपारी परत तेथे आलो.

दुपारी ४-३० वाजता मी परत छोट्या फांद्याआड गवतामागे माझी जागा धरली. हे गवत तीन फुटांपेक्षा कमी उंचीचेच असावे. त्यामध्ये मी अर्धवटच लपून राहू शकत होतो. वनाधिकारी व बंदुकीने सज्ज असलेले शिकारी माझ्याबरोबर राहिले. दुसरे दोघे शिकारी - एक बकरा ( भक्ष्यबळी ) घेऊन तेथेच होते. त्या बकऱ्याच्या ओरडण्याने आकर्षित होऊन गाऱ्यापाशी सिंह यावेत या उद्देशाने ते तेथे उभे होते. जणू काही ती जेवणासाठी वाजवलेली जिवंत घंटाच ! बकरा खरोखरी त्या सिंहाना खाण्याकरिता नव्हता. सिंह बाहेर आल्याबरोबर त्याला दूरवर नेण्यात आले असते. त्यामुळे सिंह आणखी उघड्यावर आले असते.

नंतर संध्याकाळच्या उन्हात एक भरपूर आयाळ असलेला सिंह बाहेर आला आणि गाऱ्यावर बसला. तो माझ्याकडे तोंड करून बसला होता. माझ्यापासून केवळ ५० फूट अंतरावर. दुपारी तो चांगलाच झपलेला असावा. कारण आता त्याने मिनिटा मिनिटाच्या अंतराने सहा वेळा जांभया दिल्या. मी त्याचा पसरलेला मोठा व जबरदस्त जबडा आणि मोठे तीक्ष्ण दात व्यवस्थित पाहिले.

नंतर तो उठला व लांब लांब पावले टाकीत भारदस्तपणे गाऱ्याजवळ आला. आल्याबरोबर तो मेलेला रेडा खेचून ओढून नेऊ पाहात होता; परंतु तो दोरखंडाने घट्ट बांधलेला असल्यामुळे नेऊ शकला नाही. नंतर त्याने त्या रेड्याचा नाद सोडला आणि तो सरळ माझ्या रोखाने आला. (छायाचित्र क्र.२७) क्षणभर मला त्याचा प्रचंड जबडा आणि तीक्ष्ण दात आठवले. मला वाटले आता मीच त्याचे पुढचे भक्ष्य होणार.

अनुक्रमणिका

मला फक्त एका गोष्टीची काळजी वाटली की शिकाऱ्याने १२ बोअरची बंदूक भरून सज्ज केली होती; परंतु मला नक्की समजेना की बंदुकीतून सुटलेला बार फक्त हल्ला करू पाहणाऱ्या सिंहाला घाबरविण्याकरिता असेल की त्यामुळे तो बिथरून आणखी चवताळेल.

परंतु माझ्या प्रश्नार्थक मुद्रेला वनाधिकाऱ्यांकडून उत्तरादाखल हावभाव आले की सर्व काही ठीक आहे. बहुधा आम्हाला जसे आमचे आसाममधले सर्व गेंडे वेगवेगळे नावानिशी माहीत होते तसे त्यांना त्यांचे सिंह माहीत असावे.

त्याच क्षणी माझ्या पुढ्यातच तीसएक फुटांवर पाच मोठे छावे आले. ते जिज्ञासापूर्वक एकमेकांकडे आणि वेळेपूर्वीच तयार असलेल्या भोजनाकडे पाहात होते. सिंह छाव्यांच्या जवळून जाताना त्याने एका छाव्याला मोठ्या प्रमाने हुंगले आणि तो माझ्याजवळ केवळ १० फुटांवर आला. नंतर तो माझ्या जवळून गेला आणि मी ज्या झाडाखाली बसलो होतो त्याच झाडाच्या सावलीत २० एक फूट अंतरावर बसला. आम्हाला त्याच्या श्वासोच्छ्वासही नीट ऐकू येत होता.

क्षणार्धातच एक मोठी सिंहीणही गाऱ्यावर आली व अधाशासारखी बकाबक खाऊ लागली. आणखी दोन सिंहिणी व दोन मोठे बच्चे तेथे डावीकडे आले; परंतु मी बऱ्याच वेळानंतर त्यांना पाहिले. ते सात बच्चे बहुधा त्या दोन सिंहिणींचे होते. एकीचे चार अन् दुसरीचे तीन. आणखी तिसरी सिंहीण गाभण होती. भव्य आयाळीचा तो सिंह ह्या सर्व छाव्यांचा पिता असावा.

माझ्या अवती भोवती ११ सिंह होते. मी मावळत्या सूर्यप्रकाशांत शक्य तितकी चांगली छायाचित्रे घेत राहिलो. दूरवरून आणखी दोन सिंहांच्या गर्जना ऐकू आल्या.

एक छावा गाऱ्याच्या फारच मध्ये घुसला तेव्हा एक सिंहिणीने त्याला एका सेकंदातच तिच्या पुढच्या जबरदस्त पंजाने फटकारून खाली पाडले.

सिंहांना मी व माझे दोघे सहकारी सहज सारखे दिसत होतो, कारण आम्ही पर्यावरणात मिसळून जाण्यासाठी जेथे लपून बसलो होतो ते गवत, फांद्या वगैरे आम्हाला फक्त गुडघ्यांपर्यंतच झाकत होते. माझ्या एका कॅमेऱ्याचा जरा मोठ्यानेच "क्लिक्" असा आवाज येई आणि त्याची त्यांना सवय होईपर्यंत प्रत्येक वेळेला असा आवाज झाला की ते माझ्या दिशेने जळजळीत नजरेने पाहात.

मी जमिनीवर असून संरक्षणाकरिता माझ्याकडे काहीही नव्हते; म्हणून हा 'लायन शो' जास्त धाडसी आणि उत्साही असा मला वाटला. मला खात्रीने वाटते की मी त्या सिंहांना काहीच अपाय केलेला नव्हता किंवा त्यांच्या कुठल्याही बाबतीत ढवळाढवळ किंवा शिरकाव केलेला नव्हता म्हणून त्यांनी मी मनुष्य असूनही धोकेबाज नाही अशाप्रकारे मला स्वीकारले होते. आफ्रिकेच्या राष्ट्रीय उद्यानात सुरक्षिततेकरिता गाडीमधून मी जे सिंहाचे छायाचित्रण केले होते त्यामध्ये इतकी सनसनाटी मला वाटली नव्हती.

फिकट होणाऱ्या संध्याप्रकाशांत मी जे शेवटचे छायाचित्र घेतले ते एक सिंहीण व चार छावे गवतामध्ये बसून गाऱ्यावर जावयाला आपल्याला केव्हा संधी मिळेल त्याची वाट पाहात होते. ते सर्व मला

फार जवळचे आणि मैत्रीचा संबंध असल्यासारखे वाटले. त्या सिंहाच्या चेहऱ्यावर मांजरीसारखे हावभाव असल्यासारखे वाटले [छायाचित्र क्र. २८-२९] (ओघाओघाने मला सांगावेसे वाटते की नंतर मी जेव्हा म्हैसूरमधील कातडे कमाविणाऱ्या सुप्रसिद्ध व्हॅन इंजेन यांना माझी छायाचित्रे दाखविली तेव्हा त्यांच्यातील एका भावाने शेरा मारला की, “बहुधा इ. पी. जी. हे व्हॅन इंजेनकडे येऊन त्यांनी हे पाच पेंढा भरलेले सिंह उसने नेऊन त्या गवतात बसविले होते!”)

मी पुरेशी छायाचित्रे घेतली असे मला वाटते. एव्हाना बकऱ्याला घेऊन दूरवर जाऊन आमच्यासाठी थांबलेले दुसरे दोघे शिकारी आम्हाला येऊन मिळाले.

ते अभिमानाने म्हणाले, “साहेब, तो सिंह तर तुमच्यापासून केवळ दहा फुटांवरच होता.”

१९६२ च्या फेब्रुवारीमध्ये कच्छमधली रानगाढवे पाहून परतत असताना मी तिसऱ्यांदा गीरला गेलो. वर्षाच्या ह्या सुमारास सर्व गवत वाळून जाऊन नाहीसे झालेले असते. त्यामुळे उघड्यावर सिंह पाहणे किंवा त्यांची छायाचित्रे घेणे सोपे जाते.

गीर विभागाचे मुख्य वनाधिकारी श्री. बी. के. झाला हे ह्या खेपेस मजबरोबर होते. ते त्यांच्या जुनागढ येथील मुख्य कचेरीतून सासन गीरला येऊन इथल्या विश्रांतिगृहात माझ्याबरोबर काही दिवस राहिले. श्री. झाला हे साधारण तरुण वयाचे असले तरी त्यांना बराच अनुभव होता. त्यांना वन्यप्राण्यांची आवडही होती. त्यामुळे आम्ही बराच वेळ गीरचे जंगल, जरी त्याच्या आसपास गाव, गावकरी, शेती, वाहतुकीचे मोठे रस्ते इ. सर्व असले तरी त्याचे राष्ट्रीय उद्यानात कसे रूपांतर करता येईल यावर सुरस चर्चा केली.

मी जेव्हा जेव्हा अशा भटकंतीवर निघतो तेव्हा बहुधा मी त्या भागातील पूर्वी घेतलेल्या पशुपक्ष्यांची छायाचित्रे तेथील वनाधिकाऱ्यांना तसेच इतरांना दाखविण्याकरिता बरोबर नेत असे. ह्या वेळेस माझ्याकडे मी १९६० मध्ये गीरच्या जंगलाला दिलेल्या भेटीच्या वेळची छायाचित्रे होती.

छायाचित्रणासाठी अगदी एखादी फांदी जरी थोडीशी पुढे डोकावीत असली तरी ती देखील सारखी करण्याबद्दल मी फार दक्ष असे म्हणून एक शिकारी त्याबद्दल कुरकुरत होता. खरे पाहता त्याला देखील कॅमेऱ्याचेच वावडे होते. येथे अगदी राजापासून नोकराचाकरांपर्यंत सर्वांनाच कॅमेरा मनापासून आवडत नसे. परंतु ह्या वेळेस जेव्हा मी १९६० मध्ये घेतलेली छायाचित्रे त्यांना दाखविली तेव्हा सर्व शिकाऱ्यांना आनंद झाला आणि ते म्हणाले की आता आम्हाला याची आणि चांगल्या छायाचित्रकारांची महती समजली.

आम्ही तेथे पोहोचल्या दिवशीच दुपारी एक पाहण्याजोगा “लायन शो” आयोजित करण्यात आला. प्रथम गाऱ्यावर एक सिंहीण आली. नंतर तिला तिचे ३ महिन्याचे छोटे तीन छावे येऊन मिळाले. (छायाचित्र क्र. ३०) त्यानंतर एक मोठा सिंह शिकार खाण्यासाठी आला. (छायाचित्र क्र. ३०) तेव्हा सिंहीण आणि तिचे छावे जंगलात परतले. दुसरी एक सिंहीण तेथेच जवळ होती ती माजावर आली होती. त्यानंतर आम्ही तो सिंह तिच्याबरोबर समागम करताना पाहिला. तेथे जवळच आणखी एक सिंहीण तिच्या दोन छोट्या छाव्यांबरोबर होती, परंतु ती गाऱ्यावर आली नाही.

दुसऱ्या दिवशीची सकाळ मी श्री. झाला यांच्याबरोबर इकडे तिकडे जंगलात भटकण्यांत घालविली. आम्ही निलगाई, चितळे आणि डुक्करे पाहिली. मला वाटते १९५६ च्या माझ्या पहिल्या भेटीनंतर त्यांच्या संख्येत वाढ झाली असावी. ही खरोखरच फार चांगली गोष्ट आहे. कारण १९४७ मध्ये नवाब इथून गेल्यावर येथे वन्यपशुपक्ष्यांची फारच कतल झाली आणि हे शाकाहारी पशू फारच कमी झाले. म्हणजेच सिंहाचे तेथील नैसर्गिक अन्न (भक्ष्य) कमी झाले.

दुपारी मी शिकाऱ्यांबरोबर आदल्या दिवशीचे सिंह पाहावयास गेलो. तो सिंह आणि माजावर आलेली सिंहीण तेथे नव्हती. परंतु त्या दुसऱ्या दोन सिंहिणी व त्यांचे एकंदर पाच छावे मात्र तेथे होते. मी त्यांच्याबरोबर तेथे २ तास घालविले. आमच्याबरोबरच्या बकऱ्याच्या ओरडण्याने त्या सिंहिणींना आकर्षित करून ठेवले होते. मी चालत चालत त्यांच्या अगदी जवळ केवळ २० फुटांवर गेलो.

जोपर्यंत मी त्या सिंहिणी व त्यांचे छावे यांच्या मध्ये नव्हतो तोपर्यंत त्या सिंहिणी मुळीच धोकादायक नव्हत्या. मात्र केव्हा केव्हा ते छावे इकडे तिकडे हुंदडत माझ्या दुसऱ्या बाजूस येत. अशा वेळेस मला त्या सिंहिणी व त्यांचे छोटे छावे यांच्या मध्ये मी येऊ नये म्हणून फारच काळजीपूर्वक हालचाली करून पलीकडच्या बाजूस जावे लागे.

तिसऱ्या दिवशी शिकाऱ्यांनी मला सांगितले की तोच नर सिंह आणि तीच छावेवाली सिंहीण त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी पाहिली. मला सिंह अथवा सिंहीण यांपैकी कोण पाहायचंय? मी छावेवाली सिंहीण पाहावयाचे ठरविले. कारण पशुपक्ष्यांची छोटी पिले जगात कोणालाही फारच आवडतील आणि मी देखील त्याला अपवाद नव्हतो.

श्री. झाला निवडणुकीच्या कामात गुंतले होते म्हणून मी दोन शिकारी व वनविभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर गेलो. जीप सोडून देऊन आम्ही थोड्या काटेरी झुडुपे असलेल्या जंगलातून घुसलो आणि तेथे आम्हाला ती एकच नव्हे तर दोन्ही सिंहिणी त्यांच्या ५ छाव्यासकट दिसल्या. दुसऱ्या सिंहिणीचे छावे पहिलीच्या छाव्यांच्याच वयाचे – अडीच एक महिन्याचे होते.

आता साधारण ११ वाजले होते आणि उघड्यावर सूर्याचे उन्ह फारच जाणवत होते. सिंहीण व छावे यांचे गारा खाणे आटोपले होते. ते जवळच्याच सावलीत आराम करीत पहुडले होते. मी देखील गाऱ्यापासून चाळीसएक फुटांवर बाभळीच्या झाडाखाली काटेरी बारीक फांद्यांमागे माझी जागा पगडली. माझ्याबरोबरचे बाकीचे थोड्या अंतरावरच दूर राहिले. छावे खेळत होते.

माझ्याजवळ येऊन विभागीय वनाधिकारी म्हणाला, "चला आपण विश्रांतिगृहात जेवणासाठी जाऊया." दुपारचा १ वाजला होता. दोघे भुकेलेले शिकारीही त्यांच्या घरी दुपारच्या जेवणासाठी जाण्याच्या तयारीत होते.

त्या सिंहांकडे बोट दाखवून मी म्हटले, "हेच माझे जेवण आहे. मला इकडेच राहावयाचे आहे दिवसभर" आणि मी तसेच केले. संध्याकाळचा अंधार पडेपर्यंत मी अन्नपाणी काहीही न घेता तसाच राहिलो. विभागीय वनाधिकारी जेव्हा संध्याकाळी परत तेथे आला तेव्हा त्याने माझ्यासाठी चहा व बिस्किटे आणली. परंतु इतका वेळ मी जे सिंहांना डोळे भरून पाहिले तीच मला मोठी मेजवानी होती.

अनुक्रमणिका

दुपारी थोडे थोडे खाण्यासाठी त्या दोन्ही सिंहिणी एकेकट्या गाऱ्याकडे आल्या. एकीचे तीन व दुसरीचे दोन असे पाचही छावे खेळत असताना तसे भक्ष्य खाताना एकत्र मिसळून होते; परंतु ते जेव्हा आपल्या आईचे दूध प्यावयास जात तेव्हा मात्र ते बरोबर आपापल्या आईकडेच जात.

केव्हा केव्हा ते छावे भटकत भटकत माझ्या दिशेनेही येत. एकदा तर त्यांच्यातील एक माझ्या अगदी जवळ आला, परंतु सुदैवाने तो माझ्या दुसऱ्या बाजूस गेला नाही (त्या सिंहिणी एका बाजूला, मी मध्ये व तो पलीकडच्या अंगास असा आला नाही.) म्हणून बरे. एक सिंहीण माझ्यापासून केवळ २० फूट अंतरावर झोपली होती. माझ्या मागे जो शिकारी होता तोही झोपी गेला होता. फक्त मी आणि ते छावेच जागे होतो.

ते सिंह पाहण्यासाठी मला भरपूर वेळ मिळाला. त्या एका सिंहिणीचे तीन छावे अगदी वेगवेगळ्या स्वभावाचे होते. एक साधारणतः आईकडेच राही; दुसरा एक फारच धाडसी होता; तर तिसरा स्वतःशीच एखाद्या फांदीच्या तुकड्याशी अथवा काटकीशी देखील खेळत बसे. मला आफ्रिकेतील सुप्रसिद्ध सिंहीण 'एल्सा' ची आठवण झाली. तिला तीन अगदी वेगवेगळे छावे झाले होते. जॉय ॲडमसनच्या पुस्तकात त्यांचे अगदी सुंदर वर्णन केलेले आहे.

मधूनच सिंहीण "म-हम्" असा आवाज काढी म्हणजे पिलांनी तिच्यापासून थोडे दूरवर खेळण्यास हरकत नाही; परंतु हलका गुरगुरल्यासारखा आवाज काढला म्हणजे तो धोक्याचा इशारा समजून हालचाल न करता जिथल्या तिथे गुपचूप राहावे. ही गोष्ट माझ्या लक्षात आली. नंतर मी शिकाऱ्यांना त्या सिंहिणीने काढलेले इशाऱ्याचे आवाज काय होते ते विचारले. त्यांनी त्यांची बरोबर नक्कल करून दाखविली. सिंहांना आकृष्ट करण्यासाठी रेडा किंवा बकऱ्याच्या ओरडण्याचा आवाजही शिकाऱ्यांना बरोबर काढता येतो.

दुपारी तीनएक वाजता कावळे रडल्यासारखा आवाज येऊ लागला त्यामुळे झाडांवर गिधाडे जमली. झोपलेली सिंहीण उठली आणि तिच्याकडून धोक्याचा इशारा मिळाल्यामुळे निरनिराळ्या ठिकाणी असलेली पिले जागच्या जागी स्तब्ध झाली.

नंतर माजावर आल्यामुळे भडकलेली व भुकेली अशी ती तिसरी सिंहीण तेथे गाऱ्यावर सावधपणे प्रकटली. दुसऱ्या दोघी सिंहिणी व त्यांचे छावे तिचे खाणे चाललेले पाहात होते. ती फारच धोकादायक व उपद्रवी वाटत होती. जागे झालेले शिकारी मी तेथून दूर जावे म्हणून सुचवीत होते.

जेव्हा ही उग्र भडकलेली सिंहीण गाऱ्यावर बसून तो खात होती तेव्हा एक छावा तेथे गेला. तिने रागावून गुरगुराट केला आणि ती सिंहीण खाताखाता त्या छाव्याजवळ जाऊन त्याला क्रूरपणाने चावली. नंतर तिने त्याला तिकडेच जमिनीवर वेदनेने कळवळत सोडले. तिचे खाणे पुन्हा सुरू झाले. त्या छाव्याची आई धोका पाहताच उभी राहिली; परंतु तिने काही प्रतिकार केला नाही. छावा बिचारा उठला व लंगडत त्यांच्या आईकडे गेला.

थोड्या वेळाने आणखी एका छाव्याने गाऱ्याजवळ जाण्याचे धाडस केले. ह्या वेळेस ती आणखीनच खवळली आणि छाव्याला कडकडून चावली. दोन्ही सिंहिणी (छाव्यांच्या आया) त्या दुर्दैवी छाव्यांच्या

संरक्षणाकरिता धावून गेल्या. आता त्या सिंहिणीमध्ये मारामारी होणार हे जाणून शिकाऱ्यांनी मला आणखी जवळजवळ १५ फूट तरी मागे जाण्याची विनंती केली.

खवळलेल्या सिंहिणीचे खाणे अव्याहत सुरूच होते. मधून मधून ती रागावून गुरगुराट करीत असे. आता दुपार टळत आली होती. बाभळीच्या झाडाच्या सावल्या लांब लांब होत चालल्या होत्या. सुदैवाने मी छायाचित्रणाकरिता योग्य दिशेने सर्व हालचाली केलेल्या होत्या. ती सिंहीण आणि गारा दोन्हीही मावळत्या सूर्यकिरणांच्या पिवळ्याधम्मक प्रकाशांत न्हाऊन निघाले होते.

पाच छावे पुन्हा आपापल्या आयांकडे जमले होते. ती दोन्ही कुटुंबे त्या क्रुद्ध सिंहिणीकडे पाहात होती. तिचे खाणे अजूनही चालूच होते. गिधाडे आणि कावळे आपल्याला काही उरलेसुरलेले मिळेल काय या आशेत झाडांवर शांतपणे बसून होते. पलीकडे लांबवरच्या टेकडीमागे सूर्य संध्याछायेची थंड शांत तिरीप ठेवून नाहीसा झाला.

शिकाऱ्याने माझे खांदे घुसळले. तिकडे उजवीकडून ह्या सर्व चित्रपटावर तो आयाळवाला सिंह हळूच भकरदस्तपणे लांब लांब पावले टाकीत अवतरत होता.

त्या सिंहाने बहुधा लांबूनच आकाशात घिरट्या घालत असलेल्या व झाडांवर बसलेल्या गिधाडांवरून गारा कोठे आहे हे ओळखले असावे. क्रुध्द सिंहिणीने देखील त्यावरूनच गरा शोधून काढला असावा. आता सर्व कळप पुन्हा एकत्र आला होता.

सिंह गाऱ्याकडे पाहात खाली बसला. परंतु फक्त एक मिनिटभरच. त्याच्या पोटात भूक प्रज्वलित झाली; तो त्या क्रुध्द सिंहिणीला डरण्यासारखा नव्हता. तो ताबडतोब गाऱ्याकडे गेला आणि त्याने त्या सिंहिणीकडून गाऱ्याचा ताबा मिळविला.

थरकाप उडविणारा गुरगुराट तेथे ऐकू आला आणि ती सिंहीण गारा सोडून सरळ मी जेथे कॅमेरा घेऊन दबा धरून बसलो होतो त्या रोखाने आली. (छायाचित्र क्र.३१) सिंहाने गारा जवळजवळ फस्त केला होता. दुसरी सिंहीण तिच्या छाव्यांबरोबर पाठीमागे बसलेली होती. तिचा जबडा उघडलेला होता आणि ती फारच खुशीत दिसत होती. कारण छाव्यांचे वडील आले होते आणि त्यांनी त्या उपद्रवी सिंहिणीला वठणीवर आणले होते.

एक सिंहीण रागावून सरळ माझ्या रोखाने येत असून दुसरी तिच्या उजव्या हाताला जात असताना मी घाईघाईने आणखी दोन साधी छायाचित्रे घेतली. नंतर ती माझ्यापासून जवळच खाली बसली.

दाट काळोख पसरण्यापूर्वी मी परत फिरण्याआधी एक अत्यंत सुंदर देखावा पाहिला. तो सिंह गाऱ्यापाशी बसला होता आणि त्याचे पाच छावे गाऱ्याचे लचके तोडून मोठ्या मजेने त्याचा अस्वाद घेत होते. त्यांच्यापासून काही फूट अंतरावरच तिघी सिंहिणी अर्धवर्तुळाकार पहुडल्या होत्या.

## प्रकरण ११ वे

# कॉर्बेट नॅशनल पार्क

१९५२ मध्ये म्हैसूरमध्ये भरलेल्या “इंडियन बोर्ड फॉर वाइल्ड लाईफ” सभेच्या सुरुवातीच्या चर्चासत्रांत भारतातील सिंहांना उत्तर भारतात कुठेतरी अभयारण्य मिळावे म्हणून आम्ही शिफारस केली होती. हेतू हा की म्हणजे निदान सर्वच अंडी एकाच टोपलीत नकोत. जर काही रोग किंवा इतर संकटे भारताच्या ह्या पश्चिम टोकाकडे (गीरच्या जंगलात) आली तर इथले सर्वच सिंह समूळ नाहीसे होतील.

हे नवे घर पूर्वी सिंह ज्या ज्या भागात दिसून येत असत त्या भागामध्ये असावे; कारण पर्यावरण साधारण त्यांना तिथे अनुरूप असावयास हवे. शेतीकरिता जंगलाची मोठ्या प्रमाणावर तोडमोड होत असल्यामुळे इथली स्वाभाविक परिस्थिती देखील फारच झपाट्याने बदलत असून हवामानांतही फरक होत आहे.

उत्तर प्रदेश राज्यसरकारने याकरिता एक अभयारण्य तयार करावयाचे ठरविले आहे. त्याचे नाव “चंद्रप्रभा” म्हणजे “चंद्राच्या किरणांचे तेज.”

हे अभयारण्य वाराणसीपासून —पूर्वीचे बनारस —काशी—४३ मैल दूरवर आहे. १९५७ च्या डिसेंबरमध्ये ठरल्याप्रमाणे तेथे गीरच्या जंगलातून एक सिंह व दोन सिंहिणी सोडण्यात आल्या, त्यांपैकी मोठ्या मादीने लवकरच एका बच्च्याला जन्म दिला. परंतु हा छावा १९५८ च्या जूनच्या सुमारास चोरट्या शिकाऱ्यांनी मारला.

१९६० मध्ये दुसऱ्या छोट्या सिंहिणीला दोन बच्चे झाले परंतु ती त्या दोन्ही छाव्यांना घेऊन बिहारमध्ये गेली. नंतर ती पुन्हा उत्तर प्रदेशात आली परंतु तेव्हा तिच्याबरोबर एकच छावा होता. हा छावा १९६२ मध्ये मृतावस्थेत आढळला. त्याच्या मृत्यूचे कारण समजले नाही परंतु त्याची चौकशी चालू होती.

१९६२ च्या जानेवारीमध्ये वयस्क सिंहिणीने पुन्हा एका छाव्याला जन्म दिला. दुसरीने १९६२ च्या फेब्रुवारीत २ छाव्यांना जन्म दिला. तेव्हा १९६३ च्या मेमध्ये सिंहांची एकूण संख्या ७ झाली होती व ६४ मध्ये ती ११ वर जाईल असे गृहीत धरले गेले होते.

हा प्रयोग कितपत यशस्वी ठरेल किंवा नाही हे इतक्या लवकर सांगता येणे शक्य नाही. मला वाटते की ह्या भागांत सिंहाशी बरोबरी किंवा भागीदारी करण्याकरिता वाघ नाहीत आणि जंगली कुत्रे क्वचितच शेजारच्या बिहारमधून रस्ता ओलांडून वाराणसीच्या जंगलातून जाताना दिसतात. सिंहांना भक्ष्य म्हणून जंगलातील शाकाहारी जनावरांशिवाय तेथे सर्वत्र अगदी अभयारण्यातही, पाळीव जनावरांचे कळपदेखील खूपच मोठ्या प्रमाणावर आहेत. हा असा उपयुक्त व मजेशीर असा प्रयोग हाती घेतल्याचे श्रेय उ. प्रदेश राज्यसरकारला दिले पाहिजे. ह्या धाडसी प्रयोगाला मी सुयश चिंतितो.

ह्या राज्याच्या अगदी उत्तरेस “राजाजी” आणि “कान्सू” अशी दोन अभयारण्ये आहेत. मी ही दोन्ही पाहिली आहेत आणि मला ती आवडली देखील. परंतु दुर्दैवाने राजाजी अभयारण्यात जेथे

भारतातील अगदी उत्तम वन्यप्राणी जीवनाला साजेसे दाट अरण्य आहे आणि पूर्वी व्हायसरॉयकरिता शिकारीसाठी मुद्दाम राखीव जंगल होते तेथे मी असताना ‘गुजर’ जातीचे लोक आपली गाईगुरे चरावयास नेत असत.

हे गुजर लोक म्हणजे गाईगुरे चारावयास नेणारे भटक्या जमातीचे लोक. ते आपली गाईगुरे पावसाळ्यात पहाडांवरील कुरणांवर चरावयास नेतात आणि हिवाळ्यात त्यांना पायथ्याशी खुल्या मैदानात आणतात. अशा प्रकारे त्यांना गाईगुरे राखीव जंगलातच काय पण अभयारण्यातही चरावयास नेण्यास परवानगी देण्यात आली आहे ही गोष्ट अगदी कीव करण्याजोगी आहे.

राजाजी अभयारण्याच्या थोडे नैऋत्येकडे हिमालयाच्या पायथ्याशीच प्रसिध्द कॉर्बेट नॅशनल पार्क आहे. (छायाचित्र क्र.३२). हे राष्ट्रीय उपवन वाघांसाठी फार प्रसिद्ध आहे. १९३५ मध्ये झालेले हे उपवन तेव्हाचे पहिलेच राष्ट्रीय उपवन होते व तेव्हाच्या उत्तर प्रदेशाच्या सर माल्कम हॅले ह्या गव्हर्नरच्या नावावरून त्याला ‘हॅले नॅशनल पार्क’ असे नाव देण्यात आले होते.

१९५४ च्या एप्रिलमध्ये मी ह्या सुंदर जागेला भेट दिली आणि ८ दिवस तेथे राहिलो. मला तेथे जावेसे नेहमीच वाटत असे कारण भारतातल्या ह्याच भागात एफ.डब्ल्यू. चॅम्पियन यांनी वन्यप्राणी जीवनाचे छायाचित्रण केलेले होते; व येथेच जिम कॉर्बेट हा निसर्गप्रेमी, नरभक्षक वाघ व बिबळ्यांचा संहारक म्हणून प्रसिद्धीला आला.

एफ. डब्ल्यू. चॅम्पियन यांनी दोन अतिशय सुंदर पुस्तके प्रकाशित केली. त्यांपैकी पहिले १९२७ मध्ये “विथ ए कॅमेरा इन टायगर–लॅंड” आणि दुसरे लागोलागच प्रसिध्द झालेले -“दि जंगल इन सनलाईट अँड शॅडो” त्यांच्या वन्यप्राण्यांच्या छायाचित्रांनी ही पुस्तके भरलेली आहेत; अणि त्यातली जरी काही चित्रे वन्यप्राण्यांनी स्वतःच घेतलेली असली (रात्री प्रखर उजेडाचे दिवे लावून घेतली गेलेली) तरी पुष्कळशी दिवसा उजेडी त्यांच्या नैसर्गिक अवस्थेत व स्वाभाविक प्रदेशातही घेतलेली आहेत.

तसे पाहता चॅम्पियन हे भारतातील वन्यप्रण्यांचे छायाचित्रण करणारे पहिलेच गृहस्थ असावेत. त्या वेळेस त्यांच्या पुस्तकांनी माझ्यावर नक्कीच चांगला प्रभाव पाडला होता.

१९३८ मध्ये रजेवरून माझ्या घरून परतत असताना बोटीवर त्यांची भेट घडण्याची संधी मिळाल्यामुळे मी फारच खूष होतो. आम्ही भारत व तेथील वन्यजीवन यांवर चर्चा केली. तेव्हा ते म्हणाले की गेंडे, रानरेडे अशा तऱ्हेचे मजेशीर वन्यजीवन जे उत्तर प्रदेशात दिसून येत नाही ते आसामसारख्या ठिकाणी दिसते व अशा जागेत मी राहात असल्यामुळे त्यांना माझा फार हेवा वाटतो.

१९४७ मध्ये वनखात्यातील नोकरीमधून निवृत्त झाल्यावर श्री. चँपियन यांनी भारत सोडला व ते उत्तर टांगानिका येथे गेले. तेथील वनखात्यात ते नोकरीस राहिले. त्यांनी मला एका पत्रात लिहिले होते की येथे वन्यप्राण्यांचे छायाचित्रण करणे फारच सोपे आहे. येथे बहुसंख्य जनावरे उघड्या माळरानातच असतात आणि आपल्याला पुष्कळशा राष्ट्रीय उपवनांत किंवा अभयारण्यांत मोटारगाडीत बसून त्यांच्या जवळ जाऊन सहज छायाचित्रे घेता येतात. मला तर सिंहाचे छायाचित्रण करून आता अगदी कंटाळा

आलाय. सिंह मोटरगाड्यांकडे अगदी ढुंकून देखील पाहात नाहीत. यामुळे मी माझ्या भारतांतील मित्रांबद्दल (वाघांबद्दल) उसासे सोडतोय. त्यांचे छायाचित्रण करणे सहजासहजी शक्य होत नाही.

नंतरच्या पत्रातही त्यांच्या पत्नीसह ते भारताच्या ज्या प्रदेशांत मोठ्या आनंदाने राहिले होते त्या भारतातील जीवनाची परत परत आठवण येते असे त्यांनी लिहिले होते आणि या ठिकाणी ज्यांनी आपले ऐन उमेदीतील आयुष्य घालविले आणि ज्यांना आता फक्त ब्रिटनमधल्या कडाक्याच्या गारठ्यात चपला घालून आणि उबेसाठी शेगड्या जवळ ठेवून आपले उर्वरित आयुष्य घालवावे लागते अशा त्यांच्या सारख्या अनेक वृद्ध व्यक्तींना देखील असेच वाटत असेल. त्यांना इथल्या कठीण परंतु रोमांचकारी आयुष्याची आठवण येत असेल.

सेवानिवृत्त झाल्यावरही मला येथेच भारतात राहावयाला मिळाले आहे व जे काही वन्यप्राणीजीवन अजूनही उरले आहे त्याचा अभ्यास करण्याकरिता मला माझा वेळ कारणी लावता येत आहे; यास्तव मी स्वतःला फारच नशीबवान समजतो.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळांत म्हणजे १९३०/४० च्या सुमारास भारतातील वन्यप्राणीजीवनाचे संरक्षण करण्याचे प्रयत्न जिम कॉर्बेट व उत्तर प्रदेश येथील एका संघटनेनेच केले. (उत्तर प्रदेश म्हणजे पूर्वीचा युनायटेड प्रॉव्हीन्स) मी त्यांच्याशी पत्रव्यवहार करून "भारताचे वन्यप्राणीजीवन" ह्या त्या काळी प्रकाशित होत असलेल्या नियतकालिकासाठी लेख लिहिले.

दुर्दैवाने हे नियतकालिक फारसे लोकप्रिय झाले नाही आणि ह्याच सुमारास दुसरे महायुद्धही सुरू झाले. १९३९ ते ४५ च्या युद्धकाळात युद्धकालीन सामुग्री बनविण्याकरिता भारतांतील पुष्कळशा जंगलांची तोडझोड करण्यात आली आणि सैनिकांनीही जीपगाड्या व हातात नवीन धर्तीच्या स्वयंचलित बंदुका आल्यामुळे येथील वन्यप्राण्यांचा पुष्कळ संहार केला. याशिवाय नेहेमीप्रमाणे चोरट्या शिकारी सर्व भारतभर होतच राहिल्या.

चोरट्या शिकारी होत असूनही हॅले नॅशनल पार्क त्यातल्या त्यांत कसेबसे थोडेसे सुरक्षित राहिले. परंतु मी जेव्हा तेथे होतो तेव्हा एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने मला सांगितले की ह्या उपवनात शिरणाऱ्या जवळजवळ सर्वच कंत्राटदारांच्या लॉऱ्यांमध्ये बंदूक असेच. जंगलातील अतिशय मौल्यवान असे लाकूड आणि त्यापासून कररूपाने मिळणारा पैसा अत्यंत जरुरीचा आहे. ह्याशिवाय राज्यसरकार काही करू शकत नाही तेव्हा जंगलामध्ये लाकूडतोडीचे काम चालणे अपरिहार्य आहे.

भारतातल्या इतर अनेक सुंदर जंगलांप्रमाणे ही जागा देखील पोहोचण्यास अत्यंत कठीण आहे. पश्चिमेकडील कोटद्वारा किंवा पूर्वेकडील रामनगर ह्या रेल्वेच्या प्रमुख स्थानकांवर पोहोचण्यासाठी देखील अनेक गाड्या बदली कराव्या लागतात. नंतर तेथून जवळजवळ ३० मैलांचा नाल्यांच्या बांधावरील खडतर प्रवास मोटारगाडीने करावा लागतो—तो देखील फक्त पावसाळ्याव्यतिरिक्तच करता येतो.

जून ते नोव्हेंबर ह्या पावसाळ्याच्या दिवसांत तेथे पोहोचता येणे अजिबात शक्य नाही. ह्या महिन्यांत तेथे कोणीही राहात नाही. अगदी वनखात्याचे पहारेकरी किंवा चौकीदारही, कारण येथील अनेक नाले व ओहोळ यांवर एकही पूल नसल्यामुळे ह्या जागेचा बाहेरील जगापासून संपर्क अगदी तुटला जातो.

अनुक्रमणिका

या जागेच्या सौंदर्याने मला अगदी मोहून टाकले. ह्या उपवनाच्या उत्तरेकडील भागातून रामगंगा नावाची नदी वाहते. थंडीच्या दिवसांत हिचे पाणी अगदी स्फटिकासारखे शुभ्र व थंड असते. नदीच्या किनारी फिकट हिरव्या रंगाच्या छटांची शिसवाची झाडे आहेत. मी या नदीच्या उथळ पाण्यात छोटे 'मशीर' (ह्याला काही वेळा 'इंडियन सामन' असेही संबोधिले जाते) आणि 'इंडियन ट्राऊट' जातीचे मासे पाहिले आहेत; तर खोल पाण्यातील मोठे मोठे मशीर व गूंच (ह्याला गोड्या पाण्यातील शार्क असे म्हणतात) आपल्या पाण्याने ओल्या झालेल्या कातड्या सुकवायला वरच्या व खालच्या काठाला उन्हात आलेले; वरच्या दगडांवरून तुम्हाला दिसतील. वेगवेगळ्या आकाराची कासवे उन्हात पहुडलेली किंवा पाण्यामध्ये पोहत असलेलीही दिसतात.

१९५४ मध्ये येथे लांब नाकाडाची मासे खाणारी गरीयाल जातीची सुसर आणि छोट्या नाकाडाची मगर ह्या दोन्ही जाती दिसून येत. आताशा ह्या मगरी येथे दिसतात की नाही ह्याची मला खात्री नाही. कारण सर्व भारतभर त्या आता दुर्मिळ होत चालल्या आहेत आणि अलीकडे तर त्या संरक्षित प्राण्यांच्या यादीत घालण्यात आल्या आहेत.

रामगंगेची दरी जेथे रूंदावते तो भाग पाटलीडून ह्या नावाने प्रसिद्ध आहे. हिमालयाच्या पायथ्याशी जेथे जेथे अशा पसरट दऱ्या आहेत त्या भागाला तेथे 'डून' असे म्हणण्यात येते.

पाटलीडून समुद्रसपाटीपासून सुमारे १२५० फूट उंचीवर आहे. हा प्रदेश गवताळ असून ते चितळांचे व भेकरांचे माहेरघरच म्हणावे लागेल. येथे मधून मधून स्वॉम्प जातीची हरणे देखील दिसतात. इकडे तिकडे मधूनच गुलाबी रंगाच्या फुलांनी भरून गेलेला कांचन, कळ्यांनी व नवीन महॉगनीच्या रंगाच्या फिकट हिरव्या तकतकीत पानांनी भरून गेलेली कुसुमाची झाडे आणि पळसाची विखुरलेली झाडे ह्या भागाच्या सृष्टीसौंदर्यात आणखीनच भर टाकतात.

आणि सर्वत्र साल वृक्ष....हे त्यांची पाने बदलून टाकीत होते. पाने सोनेरी रंगाची झालेली होती. मधूनच कुठे तरी हिरवट छटा त्यावर दिसत होत्या. एकंदर देखावा असा दिसत होता की हेमंत आणि वसंत ऋतूंच्या शोभेचे सुंदर मिश्रण सर्वत्र पसरलेले आहे. भारतात असे दृश्य बऱ्याचदा दिसून येते.

बक्सारच्या बरोबर खाली जेथे नदी 'डून' (पसरट दरी) सोडून सपाटीवरून वाहू लागते तेथे दरड आणि गुहा आहेत. त्याच्या खालून नदी वाहते. या ठिकाणाला सागरताल म्हणतात व तेथे दरवर्षी देव आंघोळीला खाली उतरतात अशी एक आख्यायिका आहे; आणि दरवर्षी जानेवारीत ही पोहोचण्यास दुर्घट अशी जागादेखील पाचसहाशे भाविकांनी भरून जाते. मकरसंक्रांतीच्या सणाच्या दिवशी हे भाविक ह्या पवित्र जागेत आंघोळ करण्यासाठी इतका कठीण व दुर्घट प्रवास करून येतात.

जवळजवळ प्रत्येक दिवशी मी सांबर, चितळ, भेकरे, रानडुक्कर, वानरे, लाल तोंडाची माकडे, मोर आणि लाल जंगली कोंबड्या पाहात होतो.

एखाद्या आठवड्यापूर्वीचे जंगली हत्तींच्या पायाचे काही ठसे पाहावयास मिळाले; परंतु बहुधा ते हत्ती दुसरीकडे निघून गेले असावेत.

अनुक्रमणिका

विश्रांतिगृहाच्या जवळच मी कोल्हे पाहिले. ते बहुधा मनुष्यवस्तीच्या आसपास दिसून येतात व ते गावसफाईचे उपयुक्त काम करतात. ते मारावयास सोप्या अशा कोंबड्या किंवा एखादे आजारी हरीण अशा प्राण्यांवर उपजीविका करतात. ओघाओघाने असे सांगवेसे वाटते की कोल्हे जंगलांतील इतर प्राण्यांना वाघाच्या किंवा बिबळ्याच्या उपस्थितीची जाणीव करून देताना “फ्यू” अशी शिटी घालतात आणि जंगलच्या गोष्टींमध्ये तर अशीच एक सुरस कथा सांगितली जाते की “फ्यू...” हा एक ठराविक कोल्हा वाघ शिकारीला बाहेर पडताना त्याच्या खुशमस्कऱ्याप्रमाणे नेहमी त्याच्या बरोबर असतो व रस्त्यात काहीही धोका असल्यास त्याची आगाऊ सूचना तो वाघाला देतो.

सांबर देखील वाघ जवळपास असल्यास धोक्याची सूचना एक ठराविक प्रकारचा वेगळा आवाज काढून देते. हा आवाज जोराने ओरडल्यासारखा पू...क् किंवा “धांक” अशा वेगवेगळ्या प्रकारे ओळखला जातो. वाघ आपल्या उपस्थितीची जाणीव करून देण्याकरिता काही आवाज काढतो का, याची मला माहिती नाही. परंतु बरेच लोक म्हणतात तो तसे करतो. तसे असल्यास ते केवळ योगायोगानेच असेल. बरेच लोक समजतात तसे फसवून सांबराला बोलावण्याकरिता नसेल. हे उपवन वाघांकरिता प्रसिद्ध आहे. माझ्या तेथील वास्तव्याच्या दुसऱ्या दिवशी तेथे एक गारा झालेला होता. मी कालन् नावाच्या माझ्या माहुताबरोबर अनारकली ह्या हत्तिणीवर आरूढ होऊन निघालो. अनारकली म्हणजे डाळिंबाच्या फुलाची कळी. ह्या दोघांचीही नावे माझ्या चांगली लक्षात आहेत. कारण माझ्या माहितीप्रमाणे तो माहुत आणि शिकविलेली ती हत्तीण ह्या दोघांची जोडी फारच सुंदर जोडी म्हटली पाहिजे.

गारा जेथून फरफटत नेलेला होता त्या रस्त्याचा आम्ही माग धरला. काही फूट अंतरावरच एक सांबराची मादी आर्त स्वरात शीळ घालीत होती. धोक्यात तो इशाराच. आम्हाला देखील आसपास जवळच दबा धरून असलेल्या वाघाचा वास येत होता.

लवकरच आम्ही माचण बांधले आणि मी दिवसाच त्यावर चढून बसलो. गाऱ्याचा व एकंदर परिस्थितीचा शोध घेण्यासाठी वाघ आला, परंतु त्या दाट जंगलांतून मला त्याचे ओझरतेच दर्शन झाले. त्या रात्री त्याने सर्व गारा संपवून टाकला.

तीन दिवसांनंतर पाटरपाणी येथे हत्तीवरून जात असताना सकाळी दहा वाजता एक मोठा वाघ आम्ही अकस्मात पाहिला. आम्ही सुकलेल्या नाल्यावरून जात असताना तो आम्हाला गुपचूप पाहत होता. त्याचे फक्त डोकेच तेवढे दिसत होते. बाकीचे सर्व शरीर गवतात लपलेले होते आणि त्याच्या मागे सरळसोट पहाड उभा होता.

त्याला मी माझ्या सिने—कॅमेऱ्याने टिपल्यावर आम्ही आणखी जवळ सरकलो. माझ्या अपेक्षविरुद्ध तो पाठीमागेच असलेल्या गवतात लपला आणि त्या दुर्घट अशा पहाडावर चपळाईने व सफाईदारपणे अदृश्य झाला.

मी माझ्या माहुताला (कालन्ला) ताबडतोब अनारकलीला पहाडाच्या दुसऱ्या बाजूला वळवून घेण्यास सांगितले. तसे वळल्याने कदाचित् आम्हाला पलीकडच्या जंगलात पुन्हा तो वाघ पाहण्याची संधी मिळाली असती. आम्ही घाईघाईने मोठमोठी पावले टाकीत निघालो. वाघही तसेच मोठमोठे अंतर कापीत बाजूच्या सालवृक्षांच्या जंगलाकडे परतला.

आम्ही वळलो आणि आमनेसामने आलो. एकमेकांपासून फक्त पंधराएक फूट अंतरावर होतो आम्ही.

तो भव्य आणि भारदस्त नर वाघ होता. त्या दाट जंगलांतून आणि जाळीच्या दाटीमधून आम्हाला नीट निरखून पाहण्याकरिता तो खाली बसला. अनारकलीने तिचे कान फडफडविले आणि ती पाने खाऊ लागली. काहीच फूट अंतरावर बसलेल्या या वाघाची तिने दखलही घेतली नाही. ती मुळीच घाबरली नव्हती.

मला येथे सांगावेसे वाटते की शिकविलेले तसेच जंगली हत्ती देखील साधारणतः वाघांना फार भितात, एक प्रकारच्या आंतरिक प्रेरणेने तसेच अनुभवाने देखील त्यांना माहीत झालेले असते की मांजराच्या जातीतील हे मोठे प्राणी त्यांचा मोठ्या व तीक्ष्ण नख्या व दातांमुळे फारच धोकादायक असतात. हत्तीची सोंड फारच नाजूक व संवेदनाक्षम असते. सोंडला जखम झालेली असताना वेदना आणि जखमेपासून होणारे दुष्परिणाम यामुळे हत्ती भुके—तहानेने देखील मरून जाईल.

शिकविलेल्या शंभर हत्तींपैकी अवघा एखादाच हत्ती तसेच शंभर माहुतांमध्ये एखादाच तशा निधड्या छातीचा माहुत वर आरूढ झालेला असताना वाघाच्या इतक्या जवळ जाईल.

त्या वाघाची चांगली स्पष्ट छायाचित्रे मिळावी म्हणून मी आणखी थोडे पुढे चलण्यासाठी माहुताच्या खांद्यावर हलकेच थोपटून थोडा इशारा दिला. अनारकलीने ताबडतोब आज्ञा पाळली आणि ५ मिनिटे आम्ही व वाघ एकमेकांना चांगले निरखून पाहात होतो.

सिने—कॅमेऱ्याच्या फर्र...... फर्र..... अशा आवाजाची त्या वाघाला मुळीसुद्धा पर्वा वाटली नाही. तो बहुधा जंगली हत्ती असावा असे त्या वाघाला वाटले असावे. कारण जंगली हत्ती तसा आवाज केव्हा केव्हा करतात. परंतु जेव्हा आमच्या बरोबरचा मदतनीस मुलगा काहीसे बोलला तेव्हा मात्र तो वाघ अचानकपणे उडी मारून उठला आणि जवळच्याच हिरव्या झुडुपांच्या जाळीतून एखाद्या भयानक केशरी रंगाच्या ज्वाळेसारखा नाहीसा झाला.

खरोखर ते एक अविस्मरणीय दृश्य होते. माहुताच्या चेहऱ्यावर हसू फुलले.

त्याने अभिमानाने विचारले,“हत्तीण आज्ञाधारकपणे आणि चांगली वागली?”

मी मनापासून उत्तर दिले,“मी अजूनपर्यंत आरूढ झालेल्या सर्व हत्तीहत्तिणींमध्ये खरोखर उत्तम प्रकारे ती वागली.” कारण जेव्हां वाघ एकदम उडी मारून उठला तेव्हासुद्धा अनारकली जराही डगमगली नव्हती.

माझ्या ह्या उपवनाला दिलेल्या भेटीनंतर लगेचच मी कलकत्त्याच्या ‘स्टेटस्‌मन्’साठी एक लेख लिहिला. त्याचे शीर्षक होते “हेले उपवनांतील तो वाघ.” काही महिन्यानंतर मला लॉर्ड हेले यांच्याकडून एक पत्र मिळाले. त्यामध्ये त्यांनी माझा लेख त्यांना अतिशय आवडला असल्याचे लिहिले होते. “मला माझ्या काही गोड गतस्मृतींची आठवण होते. मागच्या महिन्यात मला जिम कॉर्बेट यांच्याकडून पत्र आले

होते. त्यामध्ये त्यांनी मला आम्ही दोघांनी बरोबर मिळून रामगंगेमध्ये केलेल्या मासेमारीची आठवण करून दिली होती. त्यांनी पत्रात म्हटले होते की एका किनाऱ्यावरून मी १८ मासे आणि थोड्या खाली उथळ पाण्यामधून त्यांनी १२ मासे मारले होते, आणि आमची शिकार आमच्या तंबूकडे उचलून नेण्याकरिता तीन माणसे लागली होती.

आम्हा दोघांनाही पुन्हा ते दिवस काही करून पुन्हा अनुभवावयाला मिळावेत असे वाटते. “गालीलीच्या समुद्रावरील सेंट पीटर आणि त्यांचे दुसरे मच्छिमार अनुयायी नक्कीच असा एक दिवस स्वर्गात स्वर्गदूतांबरोबर आखतील अशी मला आशा वाटते.”

माझ्या त्या लेखाचे कात्रण मी केनियामध्ये असलेल्या जिम कॉर्बेट ह्यांना पाठविले; आणि त्यांच्याकडून १९५५ त्या फेब्रुवारी महिन्यात पुढील उत्तर आले.

“हे अभयारण्य तयार करण्याकरिता शिकारीची हौस असलेल्या लोकांकडून फारच विरोध होता; आणि लॉर्ड हेले गेल्याबरोबर जिल्ह्याच्या अधिकारी वर्गाने मिळून सल्लामसलत करून ह्या अभयारण्याचा विस्तार १८० चौ. मैलांवरून १२५ चौ. मैल इतका कमी केला. आता उ. प्रदेश सरकार वन्यप्राण्यांच्या संरक्षणामध्ये रस घेत असल्यामुळे मला आशा वाटते की तो ५५ चौ. मैलांचा टापू राष्ट्रीय उपवनामध्ये समाविष्ट होण्याची शक्यता आहे. तुमच्या लेखामुळे लोकांमध्ये वन्यप्राण्यांच्या संबंधाने जागृती व आवड निर्माण होण्यास खूपच मदत झाली आहे, कारण ‘स्टॉकले’ यांनी मला त्याची एक प्रत पाठवलीच, परंतु त्याबरोबरच मला जगाच्या इतर अनेक भागांतूनही पुष्कळ प्रती लोकांनी पाठविल्या. हे चांगले कार्य असेच चालू ठेवा. कारण वन्यप्राण्यांना मित्र अगदी कमी व शत्रू अनेक आहेत.”

हे पत्र मला लिहिल्यानंतर थोड्याच अवधीत जिम कॉर्बेट मरण पावले. मी उत्तर प्रदेशच्या मुख्य वन्यप्राणी संरक्षक अधिकाऱ्यांना तो ५५ चौ. मैलांचा टापू उपवनात समाविष्ट करण्याच्या बाबतीत ते कात्रण पाठविले. मला आशा वाटते की ते आणि उ. प्रदेश राज्यसरकार ही सुंदर जागा कमी न करता तेथील वन्यप्राण्यांना पूर्ण संरक्षण देण्याकरिता अगदी अटोकाट प्रयत्न करतील. आज मितीला कॉर्बेट नॅशनल पार्कचा विस्तार २०० चौ. मैल आहे.

आता त्या अभयारण्याच्या सीमारेषेच्या खालीच रामगंगा नदीवर धरण बांधण्याचे योजिले आहे. त्यामुळे तयार होणारे तळे अभयारण्याचा जवळजवळ १८ चौ. मैल इतका भाग व्यापून टाकील. हे तळे अभयारण्याच्या विभागीय अधिकाराखालीच राहावे याकरिता मी व उ. प्रदेशचे मुख्य वन्यप्राणी संरक्षक अधिकारी यांनी खूप प्रयत्न केला.

जिम कॉर्बेट ह्या अत्यंत उत्तम अशा शिकारी, निसर्गप्रमी व लेखकाच्या चिरस्मृतीकरिता १९५७ मध्ये ह्या उपवनाला “कॉर्बेट नॅशनल पार्क” असे नवीन नाव देण्यात आले.

अनुक्रमणिका

## प्रकरण १२ वे

# काश्मिरी सांबर

जगाच्या पश्चिमेकडील भागात अत्युच्च पर्वतांच्या रांगामध्ये अतिशय भव्य, सुंदर असे सृष्टीसौंदर्य दडून बसले आहे. (रंगीत चित्र क्र.७) तेथे काही मजेशीर वन्यप्राणी देखील दिसून येतात.

ज्यांनी उ. अमेरिकेतील अप्रतिम, सुंदर अशी उपवने व बागा पाहिल्या आहेत ते देखील काश्मीरमधील पर्वत, नद्या व दऱ्याखोरी पाहून विस्मयचकित होऊन त्यांची फारच स्तुती करतात. मी स्वतः१९५७ मध्ये कॅनडा व अमेरिका या देशांना भेटी देऊन आलो तेव्हा तेथील "ग्रँड टेटॉन नॅशनल पार्क" मधील रानटी फुले माझ्या स्मृतिपटलावरील पूर्वीच्या आठवणींपेक्षाही जास्तच टवटवीत वाटली परंतु मी काश्मीरला परतल्यावर पृथ्वीतलावरील हे नंदनवन पाहून मला फारच विस्मय वाटला.

मी काश्मीरला कित्येक वेळा भेटी दिल्या आहेत. तेथील एप्रिल—मे मधील अगदी स्वच्छ चुरचुरीत उन्हं मी पाहिली आहेत. या काळांतच अल्पाईन फुले; क्राऊन इम्पीरीयल लिली (एक प्रकारची कमलिनीची फुले) आणि रानटी आयरीस यांच्याशी निसर्गाच्या सृष्टीसौंदर्याच्या स्पर्धेत आपल्याला मानाचा तुरा मिळावा म्हणून चुरस लावण्यास सज्ज झालेली असतात; नंतर रानगुलाब पहाडांच्या बाजूला फुलावयाला लागतो.

मी ऑगस्ट व सप्टेंबरमधील तेथील ऐन उन्हाळा पाहिलेला आहे. ह्या दिवसांत उंचावरील भागाला दिलेल्या भेटी अविस्मरणीय ठरतात. मोगल सम्राटांनी येथे लावलेल्या चिनार वृक्षांची चकाकती लालभडक पाने ऑक्टोबर—नोव्हेंबरच्या सुमारास गळून पडत असतानाचे मनोहर दृश्य मी पाहिले आहे. या दृष्याचे वर्णन करावयास शब्द थिटे पडतात. त्यांचे वर्णन शब्दांच्या पलीकडे आहे.

"पृथ्वीतलावर जर कोठे स्वर्ग असेल तर तो इथे आहे, इथे आहे, इथेच आहे!" असे एका मोगल कवीने म्हटले आहे त्याच्याशी कोणी सहमत होणार नाही अशी मला कल्पनाही करवत नाही.

श्रीनगर समुद्रसपाटीपासून सुमारे ५००० फूट उंचीवर असून ते काश्मीरच्या खोऱ्यात वसलेले आहे. ते बहुधा सुके असून फारसे सुंदर नाही. परंतु पर्वत आणि नद्यांच्या दऱ्याखोऱ्यांवरील भटकंती सुरू करण्याची हीच जागा असून ते अगदी जरुरीचे असे मोक्याचे ठिकाण आहे. येथे जंगलात कुठेही विश्रांतिगृहात किंवा कापडी तंबूमध्ये देखील तळ ठोकून निसर्गाच्या अत्यंत रमणीय देखाव्याचा शांतपणे सुखद अनुभव घेता येतो.

युद्धानंतरच्या माझ्या काश्मीरमधील भेटीमध्ये मी तेथे दिसून येणाऱ्या काश्मिरी सांबराचे संरक्षण करण्यासाठी काही करता येईल का, ते पाहात होतो. (छायाचित्र क्र. ३४-३५) हे सांबर 'युरोपियन रेड डिअर' सारखे येथे सहज दिसून येते. ह्या प्राण्याला काश्मीरच्या महाराजांकडून पूर्वापार "राजेरजवाड्यांची हौसेने करावयाची शिकार" म्हणून संरक्षण मिळालेले होते.

अनुक्रमणिका

५० वर्षापूर्वी तेथे जवळजवळ ५००० काश्मिरी सांबरे होती, आणि १९४७ मध्ये फक्त २००० च्या आसपास उरली होती.

नंतर भारत पाकिस्तान यांच्या फाळणीच्या वेळेस रातोरात सर्व बदल घडून आले आणि काश्मीरवर पाकिस्तान हक्क सांगू लागले. ह्या मतभेदांमुळे त्या दिवसांत येथील वन्यप्राणीजीवनाचीही फारच नासधूस झाली आणि काश्मिरी सांबरांची संख्या तर अतिशयच खालावून ३०० च्या आसपास आली. दाचीगाम अभयारण्यांतील रानडुकरांची संख्या देखील खूपच रोडावून फक्त २१३ डुकरांवर आली. परंतु मी १९५७ मध्ये जेव्हा तेथे गेलो तेव्हा ती जवळजवळ ५० वर होती आणि मला त्यांच्यापैकी काहींची छायाचित्रे घेता आली.

त्या वर्षाच्या एप्रिलमध्ये मी काश्मिरी सांबरांची शिरगणती विभागीय अधिकाऱ्यांच्या मदतीने केली तेव्हा मला वाटते ती ४०० पर्यंत वाढली होती.

हिवाळ्यात येथील हरणे त्यांची उंचावरील उन्हाळ्यांतील कुरणे सोडून खाली अगदी दाचीगाम अभयारण्याच्या खालच्या भागापर्यंत व नजीकच्या प्रदेशापर्यंत त्यांच्या हिवाळ्यातील कुरणांमध्ये येतात. १९५७-५८ च्या सुमारास एका विभागीय अधिकाऱ्याने ढोबळ मानाने केलेल्या शिरगणतीनुसार त्यांची संख्या ५५० च्या आसपास भरली.

मी जेव्हा १९६० च्या नोव्हेंबरमध्ये तेथे होतो; तेव्हा ह्या काश्मिरी सांबरांची माहिती असलेल्या अनेक जणांकडे चर्चा केली असता तेथे फक्त २५० च सांबरे उरलेली आहेत असे मी अनुमान बांधले.

१९६२ च्या ऑगस्टमधील माझ्या तेथील दुसऱ्या भेटीत तर आणखीनच निराशाजनक बातमी ऐकावयास मिळाली. तेथे केवळ १७५ ते २०० च्या आसपास सांबरे जिवंत होती. हिमाचल प्रदेशांतील उत्तर छांब जिल्ह्यात अजूनही ती काही संख्येने आढळतात आणि त्यांना उत्तम संरक्षण दिले आहे असे म्हणतात.

ह्या काश्मिरी सांबराला शिकारी लोक बाराशिंगा असेही म्हणतात. मार्च, एप्रिलच्या दरम्यान त्यांची शिंगे गळून पडतात.

१९५७ च्या एप्रिलमध्ये जेव्हा वसंत ऋतूंतील फुले उमलतात आणि त्यांचे रंग हिवाळ्यांतील उरल्यासुरल्या हिमाला छेदून झळाळू लागतात तेव्हा मी दाचीगामच्या खालील भागात ह्या सांबरांची छायाचित्रे घेतली होती. त्याच्या गोड स्मृती माझ्या मनःपटलावर अजून आहेत.

आणि त्याच वर्षी सप्टेंबरमध्ये मी एका दरीतून ६००० फुटांवरून ११००० फूट उंचीवर चढून गेलो तेव्हा तेथे अल्पाईन कुरणे आणि निळ्या पाईन वृक्षांची व बर्चच्या झाडांची जंगले उ. दाचीगामच्या संगरगुलू ह्या प्रदेशाजवळ दृष्टीस पडली. (छायाचित्र क्र.३३) अधुनमधून हरीणे दृष्टीस पडत ती रानफुलांच्या देखाव्यात आणखीनच भर घालीत. ही रानफुले आता सुकू लागली होती.

नोव्हेंबरच्या सुमारास जेव्हा ही सांबरे दाचीगामच्या खालच्या भागात उतरू लागतात तेव्हा त्यांना पुन्हा कठीण, मजबूत शिंगे आलेली असतात. एक भव्य शिंगे असलेला मोठा नर सांबर माझ्या दृष्टीस

पडला. त्याच्या कळपात अनेक माद्या, पिले व पाडसे असून ते सर्व झुडुपांच्या गर्द दाटीमधून चाललेले असताना माझ्या दृष्टीस पडले. ते दृश्य मी केव्हाही विसरणे शक्य नाही. त्यांचे छायाचित्र घेणे शक्य नव्हते परंतु मी त्यांना जवळून अगदी मन भरून पाहून घेतले. त्यांना पाहात राहून त्यांच्या कौटुंबिक जीवनाचा अभ्यास करणे मला किती तरी आवडले असते. मला वाटते त्यांचे राहणीमान देखील बरेचसे युरोपमधील रेड डिअरप्रमाणेच असते. येथे कळपाचे नेतृत्व माद्यांकडेच असते. नर वेगवेगळे राहतात. किंबहुना त्यांचे काम आपली प्रजा वाढविण्याखेरीज दुसरे काही नसते.

मला असे सांगण्यात आले की एकेकाळी महाराजा अशा काश्मिरी सांबरांचा छोटासा कळपच पाळीत असे. त्यांना पाळणे अगदी सोपे असते आणि ती सहज माणसाळता येतात. मला वाटते त्यांची संख्या वाढविण्याकरिता पुन्हा एकदा असे प्रयोग करून पाहावयाला हवेत.

काश्मीरमधील एरीन दरी, सिंधू नदी, सोनमर्ग लिडार दरी, बिंघ्री नदी, बियास ही सर्व नावे आठवून माझ्या गतस्मृतींना काय गोड उजाळा मिळाला आहे.

ह्यामध्ये शेवटी सांगितलेल्या नद्यांचे पाणी देसू अभयारण्यांच्या जवळून वाहते. तेथे एकदोन काश्मिरी सांबर अधूनमधून आढळतात. जंगलामध्ये ह्या काश्मिरी सांबरांचे शत्रू म्हणजे काळे अस्वल व बिबळे होत (छायाचित्र क्र. ३६) हे केव्हा केव्हा सांबरांच्या छोट्या पाडसांना मारतात. दाचीगाम किंवा त्याच्या आजूबाजूच्या भागात असे प्रकार दिसून येतात. याखेरीज मानव चोरट्या शिकारी करून तसेच आपली पाळीव जनावरे ह्या कुरणांमध्ये मोठ्या संख्येने घुसवून कुरणे नष्ट करतो व त्यामुळे तो (अशा दोन्ही प्रकारे) ह्या सुंदर हरीणाच्या नाशाला जास्त कारणीभूत झाला आहे.

ह्या सांबरांच्या उन्हाळ्यांतील अगदी वरच्या पातळीवरील चरण्याच्या जागांवरही हे "बक्रवाला" लोक त्यांच्या गाई, शेळ्या, मेंढ्या हे सर्व घेऊन जातात व तेथे अशी एकही जागा सोडीत नाहीत की जेथे त्यांची गुरे चरत नाहीत. याशिवाय त्यांच्याकडे सांबरे मारता येतील अशा बंदुकी व शिकारी कुत्रे देखील असतातच.

माझ्या काश्मीरमधील त्यानंतरच्या प्रत्येक भेटीत मी शक्य तितक्या चातुर्याने ज्यांच्या अधिकारक्षेत्राखाली हे सांबर येतात त्या अधिकाऱ्यांना हे सांबर व त्यांचे राहणीमान (पर्यावरण) जतन करण्याबद्दल समजावून सांगितले.

१९६० व १९६२ मध्ये मला IUCN व IBWL तर्फे ह्या कामाकरिता पाठविले होते; तरी त्या अधिकाऱ्यांना हे समजावून सांगण्याच्या कामी मला विशेषसे यश आले नाही. यामध्ये मला, किंवा ज्या वनधिकाऱ्यांनी खरोखर हे वन्यप्राणी जतन करावयाचे त्यांना, कितपत दोषी ठरवायचे ते मला सांगता येत नाही; परंतु मी कितीतरी धोरणीपणाने त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की जर हे काश्मिरी सांबर नष्ट झाले तर तो काश्मिरचा आणि पूर्ण जगाचा देखील एक प्रकारे तोटाच आहे.

देशाची भरभराट व्हावी व तेथील लोकांच्या रहाणीमानाचा दर्जा सुधारावा या गोष्टींना नेहमीच जास्त महत्व दिले जाते. ती एक मोठीच समस्या आहे. याशिवाय काश्मिरचा जो भाग भारतात आहे त्या भागाला भारताच्या इतर राज्यांपेक्षा "खास वागणूक" दिली जाते.

ह्यामधील दुसरी एक समस्या म्हणजे दाचीगाम १९५७ पासून ३ वेगवेगळ्या खात्यांच्या अधिकारकक्षाखाली येत होते. ते पुढीलप्रमाणे —(१) मत्स्यसंवर्धनखाते (कारण दाचजीगामच्या खालच्या भागांतील झऱ्यांमध्ये ट्राऊट जातीचे मासे आढळतात व तेथे या ट्राउट जातीच्या माशांची वीण कृत्रीम रीतेने वाढविण्यात येण्याचे केंद्र आहे.) (२) वनखाते व (३) मनोरंजन आणि करमणूक खाते.

वन्यप्राणी आणि ते जेथे आढळतात ते अभयारण्य हे सर्व वनखात्याच्या अधिकार कक्षेखाली येणे हे कायद्याला अनुसरून आहे. कारण वनखात्यात वनसंरक्षक अधिकारी असतात; आणि वन्यप्राण्यांचे संरक्षण करणे हे त्यांचे कामच आहे; आणि अभयारण्यामध्ये तसा जंगलाचा बराच भाग आहे.

मी जेव्हा १९५७ च्या एप्रिलमध्ये दाचीगामच्या खालच्या भागात हरिणांची पुष्कळशी छायाचित्रे घेण्याकरिता राहिलो आणि त्याच वर्षी सप्टेंबरमध्ये जेव्हा दाचीगामच्या वरील भागत हरणांची चरण्याची कुरणे धुंडाळण्याकरिता कित्येक दिवस पर्वतांवरून हिंडलो तेव्हा मला मत्स्यसंवर्धन केंद्राचे डायरेक्टर श्री. जी. एम्. मलीक यांच्याकडून व वनखात्याकडूनही फारच सहाय्य मिळाले.

जवळजवळ ५० वर्षांपूर्वी ब्रिटनमधून मातकट रंगाचे ट्राऊट जातीचे मासे येथे काश्मीरमध्ये आणण्यात आले होते. अशाप्रकारे एखाद्या नवीन जातीच्या प्राण्याची पैदास करणे किती किफायतशीर असते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे; आणि त्यांच्या मूळच्या देशापेक्षाही ते इथे जास्त चांगल्या प्रकारे वाढत आहेत. त्यांचा आकारही चांगलाच मोठा असून ते मजेसाठी मासेमारी करणाऱ्या लोकांना चांगलीच करमणूक उपलब्ध करून देत आहेत. या ट्राऊट जातीच्या माशांची मौजेखातर शिकार करणे अगदी व्यवस्थित सुरळीतपणे चालू आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षाही अशी मासेमारी आता जास्त व्यवस्थित चालू आहे. काश्मीरमधून हे ट्राऊट उ. पंजाबमधील कुलूचे खोरे व भूतान या जागींदेखील नेऊन त्यांची जोपासना करण्याचे प्रयत्न चालू आहेत. नेपाळमध्ये देखील त्यांचा प्रसार केला जाईल, अशी मी अपेक्षा करतो.

काश्मीरमधील खालच्या पहाडी रांगांवर हिमालयांतील काळे अस्वल दिसून येते. याच्या छातीवर इंग्रजी “v” या अक्षराची पांढरी खूण असते. उ.भारताच्या अनेक जंगलांतूनही हे काळे अस्वल दिसून येते; परंतु दक्षिणेकडे “स्लोथ” जातीचे अस्वल मोठ्या प्रमाणावर सर्वत्र दिसते. पर्वतांवरील उंच पातळीवरच्या प्रदेशांत तांबडे अस्वल दिसून येते. काळ्या अस्वलांपेक्षा तांबड्या अस्वलांकडून काश्मिरी सांबरांना कमी धोका असतो. तिबेटमध्ये दिसून येणारे निळे अस्वल आणखी वर आग्नेयेकडे दिसून येते. त्याची कमावलेली कातडी केव्हा केव्हा यती’ ची कातडी म्हणून ओळखली जाते. सर्वच प्रकारची अस्वले (त्यांना त्रास दिल्यास) धोकेबाज असतात. केव्हा केव्हा तर ती काहीही पूर्वसूचना न देता अचानक हल्ला करतात. त्यांच्याशी सावधगिरीनेच वागावयाला पाहिजे.

दाचीगामच्या उत्तरेकडे मी तांबडे अस्वल व छोटे कस्तुरीमृग पाहिलेले आहेत. नर कस्तुरीमृगाची कस्तुरी मिळविण्याकरिता हिमालयाच्या पायथ्याकडील सर्व भागांतून ह्याची मोठ्या प्रमाणावर शिकार झाली आहे. आधुनिक जगांतील सर्व सुवासिक प्रसाधने बनविण्याकरिता कस्तुरीचा फारच उपयोग केला जातो. नरांना शिंगे नसतात, परंतु त्यांचे सुळे बरेच मोठे असून विशिष्ट प्रकारे बाहेर आलेले असतात. हे भेकरांच्या सुळ्यांपेक्षाही मोठे असतात. काश्मीरच्या उंचीवरील भागात पूर्वेकडे भव्य व अतिसुंदर “मोनाल फेझंट” (मोराच्या जातीचा पक्षी) तसेच ‘चकोर’, तित्तरे आणि दुसरेही कितीतरी मजेदार पक्षी दिसतात.

अनुक्रमणिका

पावसाळ्याच्या शेवटाला व उन्हाळ्याच्या सुरुवातीला काश्मीरमध्ये ह्या सर्व आल्हाददायक वातावरणांत छायाचित्रण करण्यास उत्तम संधी असते. भारतांतील अनेक उत्तम पक्षीछायाचित्रकारांनी ह्या ठिकाणी सुटीचे दिवस मजेत काढलेले आहेत आणि परिणामतः त्यांनी इतकी सुंदर छायाचित्रांनी भरलेली व सर्वांना आवडतील अशी पुस्तके निर्माण केली आहेत.

सालीम अली आणि लोक—वॉन—थो ह्यांनी येथे कितीतरी वेळा पक्ष्यांचे छायाचित्रण केलेले आहे. आर.एस्.पी. बेट्स् आणि इ.एच.एन.लौथर यांनी देखील पूर्वी बरेच छायाचित्रण येथे केलेले होते. त्यातील काही सुंदर म्हणजे नर्तक व पिलक पक्षी त्यांच्या घरट्यावर बसलेले असतानाचे छायाचित्रण.

ह्या प्रकरणांत जरी मी हिमालयाबद्दल सांगत असलो तरी मला शपथपूर्वक सांगितले पाहिजे की माझी मर्यादा उ. दाचीगाममध्ये फक्त १२००० फुटांपर्यंतच आहे. तरुण व धाडसी गिर्यारोहकांना योग्य अशी जगाच्या ह्या भागात आणखी कितीतरी उंच अशी शिखरे आहेत की जेथे दुर्मिळ प्राणी पाहावयास मिळतात व त्यांचे छायाचित्रणही करता येते.

ह्या उंचीवरील भागात शापू किंवा उरीयल, नयन, भारल, सेरु, गोरल अशा अनेक जातींचे पहाडी बकरे व रानबकरे यांच्या वसाहती दिसून येतात.( छायाचित्र क्र. ३६ पहा) हिमबिबळे (Snow leopard) ह्यांच्यावर उपजीविका करतात.

पूर्वीच्या काळात ह्या उंचावरील भागांतील प्राण्यांची दबा धरून शिकार करण्याकरिता व त्यांच्या उत्तम कातड्यांचे नमुने गोळा करण्याकरिता बरेचसे धाडसी व उत्साही शिकारी— बहुधा सैन्यातील अधिकारी— अशा दौऱ्यांवर जात असत. या विषयावर कितीतरी उत्तम पुस्तकेही आहेत. ह्यांपैकी एक अतिउत्तम पुस्तक १९३६ मध्ये लेफ्टनंट कर्नल सी. एच. स्टॉकले यांनी प्रकाशित केले. त्याचे नाव— "स्टॉकींग इन दी हिमालयाज अँड नॉर्दन इंडिया" असे आहे."

स्टॉकले हे एक अतिशय उत्तम निसर्गप्रमी असून ते अशा वन्यप्राण्यांची शिकार करणारे एक उत्तम शिकारी होते. त्यांनी अनेक वन्यप्राण्यांची त्यांच्या नैसर्गिक वातावरणांत छायाचित्रेही घेतली होती परंतु ते काही "चॅम्पियन" यांच्यासारखे छायाचित्रकारांच्या मालिकेत बसू शकत नव्हते. जिम कॉर्बेट यांच्यासारखे ते सेवानिवृत्त होऊन केनिया येथे गेले व १९५५ मध्ये कैलासवासी झाले. 'ब्रिटीश म्युझियम फॉर नॅचरल हिस्ट्री' च्या आर.आय्. पोकॉक ह्या गृहस्थांना Fauna of India हे पुस्तक लिहिताना त्यांनी कितीतरी माहिती पुरविली होती.

कॉर्बेट यांची व माझी कधी भेट झाली नाही तशीच स्टॉकले यांचीही झाली नाही, परंतु आमचा पत्रव्यवहार मात्र पुष्कळच होता. कारण त्यांनी हा देश सोडला तरी तेथील वन्यप्राणीजीवन कसे काय आहे व त्याची वाढ आणि जतन कसे होत आहे याबद्दल जाणून घेण्याची त्यांना फारच इच्छा होती.

अलीकडच्या काळात फारच थोडी माणसे इतक्या उंचीवरील प्राणीजीवन पाहण्यास किंवा त्याची शिकार करण्यास जातात. परंतु ह्या वन्यप्राण्यांची संख्या भारत-पाकिस्तान सीमारेषेवरील सैन्याच्या अधिकारी लोकांच्या तसेच उत्तर सीमेजवळील तिबेटमधील चिनी लोकांच्या सैन्याच्या हल्लेखोर कृत्यांमुळे फारच कमी झाली असावी.

अनुक्रमणिका

तरुण आणि धाडसी माणसांना अशा ठिकाणी जाऊन निरीक्षण करून येथील जे काही उरलेले वन्यजीवन आहे त्याची छायाचित्रे घेऊन नोंद करण्यास कितीतरी संधी उपलब्ध आहेत. सैन्यातील अधिकारी वर्गालाही असे शिक्षण घेण्यास कितीतरी अमूल्य संधी आहेत. त्यामुळे त्यांना स्वतःला तसेच सैन्यालाही फायदा होईल. शिवाय निसर्गाची कितीतरी मजेशीर व उपयुक्त माहितीही उपलब्ध होईल.

अनुक्रमणिका

## प्रकरण १३ वे

# उत्तर पंजाब ते नेपाळ

काश्मीरपासून दक्षिणेकडे तसेच पूर्वेकडे प्रवास करीत असताना वन्यप्राणीजीवनाचे संरक्षण विशेषतः पंजाब आणि हिमाचल प्रदेशाच्या आसपास मोठ्या प्रमाणावर अंमलात आणले जात असल्याचे मला आढळून आले आहे.

उत्तर पंजाबमध्ये काश्मीरच्या जरा दक्षिणेकडे नीलगायी आणि रानडुकरे दिसून येतात. हिंदू धर्मामध्ये गाईला पवित्र मानण्यात येऊन तिला संरक्षण देण्यात आले आहे. नीलगाय ह्या शब्दातील 'गाय' ह्या शब्दामुळे नीलगायीला देखील पूर्ण संरक्षण मिळाले आहे. खरोखर पाहता हा प्राणी काळवीटाच्या जातीचा आहे. याउलट काही हिंदू रानडुकराचे मांस खातात परंतु मुसलमान धर्मीय लोक मात्र डुकराच्या मांसाला अजिबात शिवत नाहीत.

१९४७ मध्ये फाळणीच्या वेळेस काय घडले त्या गोष्टी माझ्या कित्येक काश्मिरी मित्रांनी मला सांगितल्या. जेव्हा पाकिस्तानमधील हिंदू फाळणीनंतर भारताच्या नव्या हद्दीत व भारतातील मुसलमान पाकिस्तानात जात होते तेव्हा ह्या वन्यप्राण्यांना देखील शांततापूर्वक जिणे जगता यावे म्हणून जणू काही आंतरिक प्रेरणा उत्पन्न झाली होती. पुष्कळशा नीलगाई पाकिस्तानची हद्द ओलांडून भारतात आल्या तर भारतांतील डुक्करे त्यांच्या सुरक्षिततेसाठी पाकिस्तानात गेली.

पंजाबच्या अगदी उत्तरेकडे कांग्रा व कुलूचे खोरे आहे. ते त्याच्या नैसर्गिक सौंदर्याकरिता सुप्रसिद्ध आहे. परंतु मी जेव्हा १९५७ मध्ये कुलूच्या खोऱ्यात होतो तेव्हा मला तेथे व अगदी पर्वतप्राय प्रदेशांतही अगदीच कमी वन्यप्राणीजीवन उरले असल्याचे सांगण्यात आले. बियास नदीला वारंवार येणाऱ्या जोरदार पुरांमुळे ट्राऊट जातीचे मासेदेखील तेथून अगदी कमी झाले असल्याचे मला आढळून आले.

१९६१ च्या सप्टेंबरमध्ये जेव्हा मी हिमाचल प्रदेशांत होतो तेव्हा तेथे वन्यप्राणी संरक्षणाचे कायदे जारीने अंमलात आणले जात असल्याचे मला आढळून आले. मला असे कळले की माझ्या ओळखीचे एक निसर्गप्रेमी व वन्यजीवन संरक्षक लेफ्टनंट गव्हर्नर एकदा या जिल्ह्यात दौऱ्यावर होते. रात्रीच्या जेवणाच्या वेळेस त्यांना एक पक्षी शिजवून वाढण्यात आला. त्यांनी हे काय आहे म्हणून विचारले. "जंगली कोंबडी" असा जबाब आला आणि ती त्यांच्या एका स्थानिक हितचिंतकाकडून आलेली भेट होती. बहुधा त्या हितचिंतकाला त्यांच्याकडून काही कामाची मेहेरनजर हवी असावी. हे सर्व वन्यप्राण्यांची शिकार करण्यास बंदी असल्याच्या हंगामात घडले होते.

असा हा शिकार करता न येण्याच्या वेळातील घडलेला गुन्हेगार पक्षी तेथून ताबडतोब हलविण्यात यावा आणि शिकारीसाठी बंद असलेल्या वेळात नियम मोडणाऱ्या त्या 'दात्या' ला चांगली समज देण्यात यावी असे त्यांनी फर्माविले. भारताच्या सर्व भागातून जर सरकारी अधिकाऱ्यांनी वरील उदाहरण डोळ्यासमोर ठेवून असे अधिकारवाणीने कर्तव्य बजाविले आणि बंद हंगामात हरिणे व सर्व शिकार होत असलेल्या पशुपक्ष्यांना संरक्षण दिले तर भारतातील वन्यपशुपक्ष्यांना संरक्षण मिळून त्यांचे जतन होण्यास फारच मदत होईल.

अनुक्रमणिका

मी हिंमाचल प्रदेशात असताना जवळजवळ १०,००० फूट उंचीवरचा तारादेवी पर्वत पालथा घातला. उत्तरेकडील सिमल्याच्या बाजूचे उतार विशेष अवघड नसून तेथे जंगल बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आहे; परंतु दक्षिणेकडील उतार मात्र खडकप्राय असून उजाड आहेत. मी तेथे भटकंती करीत असताना कितीतरी कालीज फेझंट (मोराच्या जातीचा एक पक्षी) पाहिले.

पुढ्यात सरळसोट उतार असलेल्या अशा वरच्या खडकांवर आखडून बसून 'ग्रिफॉन' व 'लॅमार्जीअर' जातीची मोठी गिधाडे हवेच्या प्रवाहावर गोल गोल घेत असलेली पाहताना मोठी मजा वाटत होती. तेव्हा मी के. एल. मेहता नावाच्या तरुण आणि उत्साही वन्यप्राणीसंरक्षकाबरोबर होतो. आम्हाला आमच्या खाली ३/४ हजार फुटांवर एखादा छोटासा ठिपका गोल गोल चक्रावत जाताना दिसे. निमिषार्धात तो आमच्या दृष्टीपुढून नाहीसा होई.

नंतर दुसरा आणखी एखादा पक्षी आमच्या जवळून सहजगत्या उडून पलीकडच्या पर्वतशिखरांवरून पर्वतमाथ्यावर नाहीसा होई.

ही हिमालयातील गिधाडे ज्यांना एका लेखकाने मला वाटते "उडते ड्रॅगन" असे संबोधिले आहे; त्यांच्या पंखाची एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतची लांबी जवळजवळ ९ फूट भरते. ते पक्षी येथे डिसेंबर ते मार्चपर्यंत आपली घरटी करतात. हे पक्षी पूर्णपणे मृतोपजीवी आहेत व ते केव्हाही कुठच्याही जिवंत प्राण्यांना मारीत नाहीत. मेलेल्या प्राण्यांच्या मांसावर उपजीविका करणाऱ्या घारी, गिधाडे यासारख्या इतर पक्ष्यांसारखेच तेही केरकचरा, उष्टी खरकटी, मेलेले प्राणी इ. सर्व खाऊन साफसफाईचे काम फुकट करतात. त्यामुळे ते पूर्वेकडील राहणीमानाचे एक आवश्यक घटक आहेत.

जिम कॉर्बेटमुळे अमर झालेल्या अगदी पूर्वेकडील कुमाऊँ टेकड्यांमधील नैनितालमध्ये मी फक्त एकदाच गेलो होते. तरीही मला नंदादेवी शिखर आणि पर्वताच्या इतर हिमाच्छादित रांगांचे दर्शन झाले. पहाटे ५-३० वाजल्यापासून मी उत्तरेकडील आभाळ निरखित होतो; परंतु खाली उतरलेल्या ढगांनी सर्व देखावा झाकाळून टाकला होता. न्याहारी घेत असताना ढगांचा पडदा छेदला गेला आणि सर्व उत्तुंग शिखरांची बर्फाच्छादित टोके सकाळच्या उन्हाच्या किरणांनी चमचमू लागली. माझी न्याहारी अर्धवट राहिली हे सांगावयाला नकोच. पंधराएक मिनिटांनी पुन्हा सर्व देखावा ढगांच्या झिरझिरीत पडद्याने झाकला गेला.

नंदादेवी जेथे आहे तो २५६४० फूट उंचीचा भाग व आणखी एक भारताच्या भागातील उंच प्रदेश हे सर्व एक अभयारण्य आहे. मलां वाटते अमेरिकेसारखे असे पर्वतावरील राखीव जंगलाचे भाग भारतामध्ये फक्त येथेच आहेत.

पर्वतमाथ्यावर दिसून येणारे वनस्पती व प्राणीजीवन हिमालयाच्या इतर कोणत्याही भागापेक्षा येथेच जास्त मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

हे अभयारण्य उत्तर प्रदेश वनखात्याच्या विभागाकडे येते. दुर्दैवाने येथे गावातीलच रहिवाशांकडून मोठ्या प्रमाणावर चोरट्या शिकारी होत असल्याचे सबळ पुरावे आहेत; आणि ह्या चोरट्या शिकारी देखील

नामशेष होऊ घातलेल्या कस्तुरीमृगाच्या! ह्या अतिमौल्यवान अशा हरणाचे संरक्षण करण्याची संधी आहे ती वाया जाऊ नये.

ह्या पुस्तकातून मला नेपाळ वगळता येणे शक्यच नाही. कारण तेथे भारतीय एकशिंगी गेंडा मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. (छायाचित्र क्र. ५१-५६) तेथे पूर्वीच्या “राणा” राज्यात गेंडे व वाघ यांना “राजेशाही शिकार” म्हणून संरक्षण दिलेले होते. १९५१ मध्ये जेव्हा राजेशाही संपली तेव्हा तेथील प्रसिद्ध अशा चितवनच्या डून मध्ये फारच मोठ्या प्रमाणावर चोरट्या शिकारी होऊ लागल्या. राजकारणाची घडी अजून नीट बसली नव्हती. टेकड्यांवरून निर्वासितांच्या झुंडीच्या झुंडी येतच असत त्यामुळे वन्यप्राण्याच्या जतनाला हे फारसे अनुकूल नव्हते.

नेपाळमधील गेंड्यांची स्थिती फारच गंभीर झाली होती; आणि १९५९ च्या पावसाळ्यात मला आय्. यू. सी. एन. ने सांगितल्यावरून तेथे जाऊन ह्या मोठ्या प्रमाणावर बेकायदा शिकार झालेल्या प्राण्याची परिस्थिती पाहणे भागच पडले. मला तेथे फक्त ३०० च्या आसपासच गेंडे उरलेले दिसले. बेकायदेशीर शिकाऱ्यांबरोबरच शेतीकरिता आणि गुरेचराईकरिता परवानगी दिल्यामुळे कितीतरी भागांतून गेंड्याच्या वसाहती नष्ट झाल्यामुळे गेंड्याची परिस्थिती आणखीनच गंभीर झाल्याचे मला आढळून आले.

नेपाळमधील गेंडा जणू जवळजवळ भूमीगतच झाल्याचे मला आढळून आले. तेथील राजांनी कितीतरी गेंड्यांची शिकार केली होती. (मला असे समजले होते की एका राणाने एक महिन्यात ९७ गेंडे मारलेले होते.) याशिवाय बेकायदा शिकार करणाऱ्यांकडून त्यांना इतका उपद्रव पोहोचला होता की ते गेंडे दिवसा देखील तेथील खुरट्या झुडुपांच्या दाट जाळ्यांमध्ये लपून राहात आणि अशा उपद्रवांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करीत.

१९२० च्या सुमारास गेंड्यांच्या शोधात हत्तीच्या पाठीवरून माझ्या दोघा साथीदारांबरोबर फिरत असताना माझ्यावर गेंड्यांनी हल्ला चढविला होता. एकदा आमचा हत्ती दाट जंगलातून वाट काढीत असताना आम्ही मातीने ढवळलेल्या मोठ्याशा खोलगट खड्ड्यांसमोर येऊन ठेपलो. पाहतो तर त्यात चार गेंडे डुंबत होते. त्यामधील दोन-एक आई व तिचे छोटे पिलू असे होते.

एक मादी आमच्यावर चालून आली; त्याबरोबर आमच्या हत्तीचे डोके बिथरले आणि तो सैरावैरा धावू लागला. सर्व धावपळीत माझी टोपी आणि कॅमेऱ्याच्या भिंगाचे झाकण कुठेतरी पडले. ती मादी नंतर तिच्या कुठेतरी अदृश्य झालेल्या त्या पिलाच्या शोधात निघून गेल्यावर आम्ही आमच्या हरवलेल्या वस्तू शोधायला गेलो.

हत्तीला माझी टोपी पट्कन् मिळाली आणि त्याने ती सोंडेने उचलून मला वर दिली; परंतु त्या भिंगाचे झाकण मात्र पट्कन दिसण्यासारखे नसल्यामुळे ते शोधण्याकरिता आम्हाला हत्तीवरून खाली उतरावे लागले. आम्ही खाली जमिनीवर असताना गेंडा कुठून तरी उगवला आणि आमच्यावर एकदम चाल करून आला.

आमच्यापैकी एकजण पटकन् सरसर झाडावर चढला. पण मी आणि माझ्या दुसऱ्या साथीदाराने तर सर्वच उच्चांक मोडून, घाबरल्यामुळे मोठ्याने चीत्कारत असलेल्या आमच्या हत्तीची शेपटी पकडून हत्तीवर सरसर चढून बसण्याचा विक्रमच केला.

दुसरा एक प्रसंग – मी एका हत्तीवर बसलो होतो. आमच्या हत्तीच्या मागोमाग थोड्याथोड्या अंतरावर दुसरे दोन हत्ती होते. मी कुठे गेंडे दिसताहेत का म्हणून गवताळ भागात पाहात होतो, आणि शेवटी माझ्याकडे पाठ करून उभा असलेला एक गेंडा मला दिसला. माझा हत्ती मोठ्याने आवाज करीत त्याच्या आणखी बराच जवळ सरकला. मी त्याचे छायाचित्र घेतले. इतके झाले तरीही तो गेंडा अजिबात वळला किंवा सरकला नाही. इतकेच काय पण त्याने माझ्या दिशेने ओझरता दृष्टिक्षेपही टाकला नाही. मी फारच चकित झालो.

मी माझ्या माहुताला हत्ती आणखी थोडा जवळ नेण्यास सांगितले. तेव्हा मात्र तो गेंडा गर्कन् वळला आणि चाल करून आला; आणि इतका वेळ गवतात लपून राहिलेले त्याचे नवजात अर्भकही त्याला येऊन मिळाले.

कितीही शिकवलेले हत्ती असले तरी ते गेंड्याला घाबरतातच. आसाम व बंगालमधील वनखात्याचे हत्ती गेंड्याच्या कित्येक महिन्यांच्या जबरदस्तीच्या सहवासाने आणि माहुत चांगला असेल तरच खात्रीलायक वागतात. माझ्या मते नेपाळमधील हत्ती भारतातील हत्तींपेक्षा जास्त चांगले ताब्यात ठेवता येतात. चढाई करणाऱ्या गेंड्यावर उलट प्रतिहल्ला करण्यासही त्यांना शिकविलेले असते. त्यामुळे अशा खात्रीलायक हत्तीवर बसल्यास हा हल्ला वर बसलेल्या माणसांना विशेष जाणवत नाही.

आता तसेच घडले होते: गेंडा आणि माझा हत्ती रागाने एकमेकांसमोर अगदी जवळजवळ उभे ठाकले. नंतर गुलाबी रंगाच्या आपल्या पिलाला घेऊन ती गेंड्याची मादी थोडी पाठीमागे सरकली.

त्याच क्षणी पाठचे दोन हत्ती जवळ आले आणि त्यांच्या माहुतांनी आम्हाला ओरडून सांगितले की तेथे जवळपास आजूबाजूला कोठेतरी वाघ दबा धरून बसला असावा कारण त्यांच्या हत्तींनी वाघाचे सानिध्य लक्षात येताच हत्ती जसे त्यांच्या सोंडांची टोके जमिनीला चिकटवून कर्कश्य स्वर काढतात तसे स्वर खात्रीने काढले होते.

त्या गेंड्याचे ते विशिष्ट वागणे आता मला स्पष्ट झाले होते. आमच्याकडे न पाहता तो उलट दिशेने पाहात का एकाग्र झाला होता आणि पिलू देखील गवतात का लपवून ठेवले होते. वाघ त्या पिलाच्या मागावर होता. वाघाला गेंड्याचे छोटे पिलू (किंवा हत्तीचेही) म्हणजे मोठी मेजवानीच!

त्या क्षणी गेंड्याच्या मादीने पुन्हा हल्ला चढविला; आणि पुन्हा जोरदार चढाई करून ती आली. माझ्या हत्तीनेही प्रत्येक वेळी प्रतिहल्ला केला. गवत फारच घट्टघट्ट वाढले होते. माझा माहुत फारच रागावून जोरजोराने हातवारे करून दुसऱ्या माहुतांवर मोठमोठ्याने ओरडून त्यांना चूप राहण्यास फर्मावीत होता कारण “साहेब” (मी) छायाचित्रण करीत होते!

अनुक्रमणिका

ह्या सहसा न मिळणाऱ्या प्रसंगाची छायाचित्रे घेण्यासाठी मी अगदी त्या कठीण परिस्थितीतही जोराचे प्रयत्न करीत होतो. मला माझ्या उत्तेजित झालेल्या माहुताचा हवेत हातवारे करणारा एक हात वारंवार खाली करून मग त्या एकमेकांवर हल्ला करणाऱ्या गेंड्याचे व हत्तीचे छायाचित्रण ते गवत कमी असलेल्या ठिकाणी आल्यावर करावे लागत होते. परिणामी मला वाटते अजूनपर्यंत उपलब्ध असलेल्या छायाचित्रांमध्ये गेंड्याच्या नवजात अर्भकाचे त्याच्या आईबरोबरचे असे हे पहिलेच छायाचित्र असावे. (छायाचित्र ५५) एव्हांना वाघ कुठेतरी पळून गेला होता.

माझ्या तिथल्या त्या भेटीनंतर नेपाळहून आलेल्या 'रिपोर्टावरुन असे दिसून येते की मी ह्या गेंड्यांना संरक्षण द्यावे व महेंद्र राष्ट्रीय उपवनाचा विस्तार वाढवावा अशी जी शिफारस केली होती तिचा काहीच उपयोग झाला नव्हता. तसेच सुप्रसिद्ध चितवनच्या दरीमधीलही परिस्थिती आणखीनच खालावली होती. तेथे गेंड्यांची संख्या ३०० वरून १६० वर आल्याची नोंद होती.

पुन्हा मला नेपाळला जाण्यास सांगण्यात आले. ह्या वेळेस लंडनच्या फॉना प्रिझर्व्हेशन सोसायटीने आणि खाटमांडूमधील मुख्य वनसंरक्षक अधिकाऱ्यांनी माझ्या स्वागताच्या सर्व सोयी केल्या होत्या. ही दुसरी भेट १९६३ च्या वसंत ऋतूंत घडली आणि मला वाटते की अलीकडे जे कायदे आणि उपाययोजना यांत फेरफार झाले होते त्यामुळे तिथे उपयुक्त बदल घडला होता. १९६० मध्ये कमी कमी होत जाऊन गेंड्यांची संख्या जी १६० वर आली होती ती १९६२ मध्ये १८५ पर्यंत आली आणि त्यांचे नीट संरक्षण व्हावे म्हणून मी आणखीही काही नवीन शिफारशी केल्या.

मी नेपाळ सरकारला नेपाळच्या नैऋत्येकडील भागांत असलेल्या उरलेल्या रानरेड्यांनाही संरक्षण देण्याची आग्रहाची विनंती केली; कारण हा सुंदरसा प्राणीही आसपासच्या देशांतून म्हणजे भारताच्या विशेषतः बिहार—बंगालसारख्या भागांतूनही पूर्ण नाहीसा झालेला आहे.

लेसर पांडा किंवा रेडपांडा या नावाने ओळखला जाणारा सुंदरसा प्राणी (रंगीत चित्र क्र.८) बऱ्याचशा संख्येने दरवर्षी नेपाळमधून कलकत्त्यात परदेशांतील प्राणिसंग्रहालयात विकण्यासाठी पाठविला जातो. हे प्राणी फारच सुंदर असून चेस्टनट फळासारख्या लाल रंगाचे असतात. त्यांच्यावर मधून मधून पांढरे पट्टे असतात. ते येथील ६००० ते १२००० फूट उंचीच्या मध्यम डोंगराळ भागातील भरपूर बांबू वाढणाऱ्या घनदाट जंगलाचे रहिवासी आहेत. त्यांच्या नैसर्गिक अवस्थेतील एकंदर राहणीमानाबद्दल फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. खरे तर मला त्यांचे नेपाळी नाव व ते कुठे दिसू शकतात हे शोधून काढण्यास खूप खटाटोप करावा लागला. ते सिक्कीम, भूतान व नेफा सरहद्दीच्या भागातही आढळतात. प्राणिसंग्रहालयात ते फारच आकर्षक दिसतात आणि भारताच्या प्रधानमंत्र्यांचे, जवाहरलाल नेहरूंचे [अनुवादकाची तळटीप – प्रस्तुतचे मूळ पुस्तक १९६४ मध्ये प्रकाशित झालेले होते तेव्हा जवाहरलाल नेहरू पंतप्रधान होते. किंबहुना पुस्तकाचे निवेदन जवाहरलाल नेहरूंनीच लिहिले आहे.] आवडते पाळीव प्राणी आहेत.

अनुक्रमणिका

**प्रकरण १४**

# प्राणी – कल्पनेतले आणि खरोखरचे

तीन वर्षांपूर्वी मी सिक्कीमच्या महाराजकुमार यांना भेटलो आणि आम्ही वन्यप्राणी संरक्षणावर चर्चा केली. मी आता सिक्कीममध्ये खरोखरचे रानटी "याक" जातीचे प्राणी किती उरले आहेत त्याबद्दल विचारले. त्यांनी नंतर चौकशी करून मला लिहिले की काही याक गोलोक पर्वतरांगावरील आम्ने मचान (मार्चेन पोग्रा) या भागात अजूनही तग धरून आहेत. ते आकाराने फारच मोठे आणि धष्टपुष्ट आहेत. केव्हा केव्हा त्यांचा पाळीव याक माद्यांशी संयोग होतो व त्यापासून बलवान आणि मोठी संतती निर्माण होते.

अगदी खरोखरचे रानटी याक बहुधा हिमालयाच्या व तिबेटच्या पठाराच्या पलीकडच्या पर्वतराजींवर आढळून येत असावेत. परंतु मला या प्राण्यांबद्दल काही विशेष माहिती नाही.

तिबेटमधील चुंबी दरीत, भातानच्या पूर्वेकडे तसेच ईशान्य तिबेटमध्ये "शोऊ" जातींचे लाल हरीण रहिवासी होऊन राहिलेले आहे. ह्या सुंदरशा हरीणाला सिक्कीममधील सांबार असेही म्हणतात; कारण चुंबी दरीमधील वनस्पती, झाडे इ. एकेकाळी सिक्कीमचाच एक भाग होती.

१९२५ मध्ये ब्रिटिश म्युझियममधील फादर लुड्लो यांनी 'लिंग मोथांग' या भागात ३ माद्या पाहिल्या होत्या, परंतु त्यानंतर येथून हे प्राणी नाहीसेच झालेले आहेत. त्यानंतर ह्या दरीतून हे प्राणी दिसून आल्याच्या काही नोंदी नाहीत; आणि आताच्या सिक्कीममध्ये पूर्वी कधीही हे प्राणी अस्तित्वात नव्हते.

फादर लुडलो यांनी मला पत्रांतून कळविले होते की उ.भूतानमधून "शोऊ"नक्कीच नाहीसे झाले होते. १९३३ आणि १९४९ मध्ये ते जी. शेरीफ यांच्याबरोबर भूतानमध्ये पश्चिमेपासून पूर्वेकडे सर्वत्र हिंडले होते. परंतु १९६२ मध्ये त्यांनी असे ऐकले की अलीकडेच वायव्य भूतानमध्ये एक "शोऊ" पाहण्यात आला होता आणि मी त्याच्याबद्दल आणखी माहिती मिळविण्याच्या प्रयत्नांत आहे.

श्री. लुडलो यांनी त्यांच्या सविस्तर पत्रात मला असेही कळविले होते की ईशान्य तिबेटातींल त्सारी जिल्ह्याला त्यांनी शेरीफबरोबर १९३६, १९३८ व १९४६-४७ च्या सुमाराला हिवाळ्यात दिलेल्या भेटीच्या वेळी तेथे "शोऊ" बऱ्याच मोठ्या संख्येने दिसून आले होते. सुबानसिरी नदी आणि तिच्या उपनद्या जेथे भारताच्या नेफा या सरहद्दीवरील प्रदेशात प्रवेश करतात तेथे 'त्सारी' जिल्हा आहे. तेव्हा ह्या नेफा प्रदेशात थोडेसे "शोऊ"असण्याचा संभव आहे. हा प्राणी समूळ नष्ट होण्यापासून अजूनही वाचविता येण्यासारखा आहे.

"शोऊ" हे एक सुंदर भव्य हरीण आहे. काश्मिरी सांबराहूनही मोठेसे. ह्या लाल हरीणांच्या दोन्ही जातींमध्ये थोडा फरक आहे -"शोऊ"च्या शिंगाचा बाक तिसऱ्या फाट्यात पुढे झुकलेला असतो त्यामुळे शिंगाचा जवळजवळ वरचा अर्धा भाग तोंडावर झुकलेला वाटतो.

भूतान सोडण्यापूर्वी मला "ताकिन" ह्या प्राण्याचा उल्लेख करावाच लागेल. (छायाचित्र क्र. ३९) बकऱ्यासारखा दिसणारा परंतु काळवीटाच्या जातीतील हा सर्वात मोठा प्राणी. ताकिन हा एक ओंगळ

बोंगळ दिसणारा प्राणी आहे. त्याची खांद्यापर्यंतची उंची जवळजवळ दहा हात भरते. नर-मादी यांच्या रंगात बराच फरक असतो, तसेच वेगवेगळ्या वयोमानाप्रमाणे व पोटजातींमध्ये तसेच भूतान, नेफा, द. चीन आणि उ. ब्रह्मदेश या वेगवेगळ्या ठिकाणी दिसून येणाऱ्या प्राण्यांच्या रंगामध्ये बरेचसे फेरफार दिसून येतात.

बहुधा नर सोनेरी-पिवळे असतात आणि जुन्या काळांतील ग्रीक पुराणातील गोष्टीतल्या जेसनच्या "सोनेरी लोकरीच्या मेंढी" चा उगम ह्यांच्यापासूनच झाला असावा. वयस्क नरांचा रंग गडद होतो. माद्या साधारण राखाडी रंगाच्या असतात. पूर्ण न वाढलेल्या माद्या गडद राखाडी असतात. छोट्या प्राण्यांची शिंगे साधारण सरळ वाढतात; परंतु जसजसे त्यांचे वय वाढू लागते तसतशी त्यांची शिंगे बाहेरच्या बाजूला वाढून खाली झुकू लागतात; परंतु त्यांची टोके मात्र वर वळून वाढतात. नर व माद्या दोघांनाही शिंगे असतात; परंतु नरांची शिंगे मोठी असतात.

मी जेव्हा भूतानचे पंतप्रधान (राजा) जिग्मे दोर्जी यांना भेटलो तेव्हा त्यांनी मला सांगितले की, उ. भूतानमध्ये पुष्कळ ताकिन आहेत. त्यांनी पुढे असेही सांगितले की तेथील काही भाग तर राष्ट्रीय उपवने म्हणून जाहीर करण्यासही हरकत नाही. ते पुढे म्हणाले की, त्यांनी दोन जातींचे ताकिन पाहिले आहेत. एक छोटे व सरळ शिंगाचे आणि दुसरे मोठ्या आकाराचे. परंतु मला वाटले की ते अपूर्ण वाढीचे व पूर्ण वाढलेले असे प्राणी वेगवेगळ्या गटांत त्यांनी पाहिले असावेत.

नेफा सरहद्दीच्या उंच पहाडी प्रदेशांत सर्वत्र 'ताकिन' दिसून येतात – विशेषतः मिश्मी टेकड्यांवर ते बहुधा वरच्या बर्फाळ रेषेच्या आसपास राहतात; परंतु जास्त करून थंडीच्या दिवसांत ते खारवणासाठी आणि गरम पाण्याभोवती पायथ्याकडील प्रदेशांत जमतात.

उ. ब्रह्मदेशात अलीकडे कितीतरी 'ताकिन' पकडण्यात आले होते आणि त्यांच्यापैकी एक न्यूयॉर्कमधील ब्रॉक्स येथील प्राणिसंग्रहालयात पाठविण्यात आला होता. दुसरा पेकिंगच्या प्राणिसंग्रहालयात तिथे अगोदरच असलेल्या नर ताकिनला जोडीदार म्हणून गेला. मला वाटते सबंध जगातील दुसऱ्या कुठच्याही प्राणिसंग्रहालयात आणखी ताकिन नाहीत.

दुर्मिळ प्राण्यांच्या संबंधात बोलताना कदाचित् मला असे विधान करावे लागले की मध्य हिमालयात नवीन चमत्कारिक अशा "यती" नावाच्या प्राण्याचे अस्तित्व असेलसे मला वाटत नाही. १९६०-६१ च्या नेपाळच्या दौऱ्यात सापडलेली "कातडी आणि टाळू" ही रानटी हिममानवाची असावीत असा दृढ समज होता; परंतु ती शेवटी अनुक्रमे तिबेटमधील निळे अस्वल आणि सेरु नावाच्या प्राण्यांची असावीत असे सिद्ध झाले.

१९६३ च्या मार्चमधील माझ्या नेपाळच्या शेवटच्या भेटीत मला तेथील वनखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की "यती" हा प्राणी कायद्यानुसार पूर्ण संरक्षित प्राण्यांच्या यादीतून काढून टाकण्यात आला आहे. ह्या प्राण्याची संख्या वाढल्यामुळे तो अशा पूर्ण संरक्षित प्राण्यांच्या यादीतून काढून टाकला आहे की आणखी काहीं कारणांमुळे हे वाचकांनी स्वतः ठरवावे.

पुराणांतील आणखी दुसरा प्राणी "बुरु" हा देखील खरोखरचा अस्तित्वात होता असे मला वाटत नाही असे मला वाटत नाही. ह्या "बुरु" ला नेफामधील डाफ्ला व दुसऱ्या जमातीचे लोक "राक्षस" असे

समजतात. मला असे सांगण्यात आले की १९४० मध्ये एका वरिष्ठ आय. सी. एस. अधिकाऱ्यांनी त्यांच्या मुलीसह ह्या जमातील भेट दिली. त्यांच्याबरोबर आसाम रायफलचे काही सैनिक संरक्षणाकरिता होते. सर्व तुकडी तेथील दलदलीच्या मठ्या प्रदेशांत पोहोचली. तेथे मातीचे ढिगाऱ्यासारखे काही उंचवटे होते. त्यामध्ये पूर्वी अस्तित्वात असलेल्या परंतु शेकडो वर्षांपूर्वी नष्ट झालेल्या काही मोठ्या प्राण्यांच्या हाडांचे सांगाडे असल्याचा समज होता. आय. सी. एस. साहेबांनी तेथील रानटी जमातीच्या लोकांना ते खणून त्यात काय आहे ते पाहावयाचे आहे असे सांगितले.

ते करावयास तेथली माणसे कचरू लागली. ते म्हणले, “आम्ही असे केले तर आमच्यावर अरिष्ट येईल. ”

त्या अधिकाऱ्यांनी आसामी सैनिकांना ते खणावयास लावले. काही दिवसांनंतर त्या अधिकाऱ्यांची मुलगी आजारी पडली आणि तिला तातडीने खाली इस्पितळात नेण्यात आले, परंतु तेथे तिचे निधन झाले.

नंतर ह्या टेकड्यांवर लंडनच्या सुप्रसिद्ध “डेली” ने दौरा केला. ते येथील ह्या दलदलीच्या टेकड्यांवर कुठे जिवंत “बुरु” दिसतो का ते पाहात होते, परंतु त्यांना काहीच मिळाले नाही. शेवटी उन्हातान्हांतून हिंडल्यामुळे काळवंडलेल्या चेहऱ्यावर दाढ्यामिश्या वाढलेल्या अशा अवस्थेत ते परतले आणि सर्व हकीकतीचे इत्यंभूत वर्णन करणारे पुस्तर प्रकाशित झाले.

मला आठवते की बहुधा १९४८ च्या वसंत ऋतूंत अगदी विस्मयचकित होण्यासारख्या जिवंत राक्षसांच्या काही नोंदी प्रकाशित झाल्या होत्या, त्यामधील राक्षस ९० फूट लांब व जाडीला ४० फूट असा हळूहळू चालणारा होता. तो चालत असताना झाडांचे बुडखे खाई. ह्या अद्‌भूत आणि विस्मयचकित गोष्टीमुळे दारंगा जिल्ह्यातील रहिवासी व चहाच्या मळ्यांतील मजूर लोक फारच सावधान झाले. ही अफवा बहुधा बुरु शोधण्याच्या दौऱ्याचाच एक परिणाम असावी.

मला नाही वाटत की असा काही प्राणी आता अस्तित्वात असेल. परंतु अगदी पुराणकाळी असा मोठा प्राणी अस्तित्वात असून तो कित्येक वर्षांपूर्वीच नष्ट झाला असण्याची दाट शक्यता आहे. मात्र अजूनही तो हिमालयाच्या ह्या भागांतील रानटी जमातीच्या लोकांमध्ये वर्षानुवर्ष पिढ्यान् पिढ्या सांगण्यात आलेल्या पुराणकथा, लोककथा यातून अस्तित्वांत असावा.

नागा, मिखीर आणि ब्रह्मपुत्रा नदीच्या दक्षिणेकडे असलेल्या दुसऱ्या टेकड्यांवर जेथे जेथे असे भटक्या जमातीचे लोक आहेत त्यांच्या येथे असे चमत्कारिक प्राणी (परंतु अजूनपर्यंत काही कोणी खरोखरचा असा प्राणी पाहिलेला नाही) बहुधा गूढ आणि जावयास कठीण अशा ठिकाणी अस्तित्वात असल्याच्या अनेक लोककथा आहेत.

सिक्कीम, भूतान आणि नेफा येथील सर्व भव्य आणि मोठ्या प्रदेशांतून सर्वत्र अतिशय सुंदर असे वनस्पतीजीवन व प्राणीजीवन दिसून येते. परंतु मागासलेल्या व काहीही सुधारणा नसलेल्या, शिवाय रानटी जमातीचे लोक राहात असलेल्या (हे लोक रानटी जमातीचे असले तरी त्यांचे आयुष्य फारच मनोरंजक आणि विविधरंगी आहे), अशा ह्या भागात सामान्य माणसाला जाणे फारच दुरापास्त आहे. ह्या भागांत जाऊन तो पाहून आलेले जे काही थोडे लोक आहेत ते खरोखरीच भाग्यवान म्हणावे लागतील. ह्या

अनुक्रमणिका

भागातील वनस्पती जीवनाला आता जरी सुरक्षितता मिळाली असली तरी सध्याचे तेथील सेनाधिकारी आणि दळणवळण अधिकारी काही विशेषकरून वन्यप्राणी जतन करण्याबद्दल विशेष जिव्हाळ्याचा दृष्टीकोन असलेले नाहीत.

हॉर्नड् फीझंट, मोनाल व ब्लड फीझंट यांच्यासारखे मोराच्या जातीतील कितीतरी सुंदर पक्षी येथे राहतात. वेगवेगळ्या प्रकारच्या ऑर्किड व रोडोडेंड्रॉनच्या जाती तर स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्यावाचून विश्वास बसणार नाहीत इतक्या आहेत. ज्यांनी सेला पर्वतरांगांच्या दक्षिणेकडे वसंत ऋतूत फुललेली रोडोडेंड्रॉनची झाडे पाहिली आहेत त्यांनी तर त्याचे वर्णन अगदी बहारदार केले आहे. पर्वताच्या सर्व रांगा तर चारपाच रंगाच्या छटांनी फुललेल्या झाडांनी भरून जातात. मला माहीत असलेल्या कै. एफ्. किंग्डन वॉर्ड यांच्या पुस्तकात ह्या भागाचे वर्णन अतिशय सुंदर केलेले आहे. लुडलो आणि शेरीफ यांच्या साच्यातलाच हा गृहस्थ. येथील वनस्पतीजीवनाचा शोध घेणारा पहिलाच. त्यांनी सुद्धा तिबेट आणि उ. ब्रह्मदेश येथे बराच काळ घालविला आणि ह्या भागांवर पुस्तके लिहिली.

मी सरकारी हुद्यातील अधिकारी नसल्यामुळे मला हिमालयाच्या पायथ्याशी उगम पावणाऱ्या काही ठराविक नद्यांच्या काही ठराविक भागांतूनच फिरावयास परवानगी होती.

मला नेफा सरहद्दीवरील अधिकाऱ्यांनी १९६१ च्या नोव्हेंबरमध्ये येथील भागातून फिरण्यासाठी परवानगी देऊन पुष्कळ सहाय्य देखील दिले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्यामुळे सालीम अलींबरोबर चीन सरहद्दीच्या अगदी जवळ ब्रह्मपुत्रा नदीच्यावर तुतींग ह्या भागात मी जाऊ शकलो. (ही ब्रह्मपुत्रा येथे सियांग ह्या नावाने ओळखली जाते. प्रथम ती त्सांगपो व नंतर दिहांग बनते.)

ह्या भागात वाहने जाण्यासाठी मार्ग नाही आणि पायथ्याच्या पासीघाटपासून वरपर्यंत पायी जाण्यास १४ दिवस लागतात. परंतु आम्ही डाकोटा विमानाने ४० मिनिटांत हा प्रवास केला. विमानातून आसाम बंदुकधारी सैन्याचे आणखीही इतर “वेगवेगळ्या श्रेणीचे” उतारू नेले गेले... पेट्रोल व तेलाचे डबे, गव्हाचे पीठ, तांदूळ यांसारखे धान्य, पुष्कळशा मेंढ्या आणि बकऱ्या! अर्थात ह्या मेंढ्या व बकऱ्या त्यांच्या मांसाकरिता.

ह्या विमानाला दरवाजा नव्हता – बहुधा माल चटकन् चढविता वा उतरविता यावा म्हणून जे मोठेसे भगदाड होते त्यामधून आम्ही भराभर मागे टाकले जाणारे दाट झाडीने भरलेले पर्वत अगदी जवळून पाहात होतो. १९५० मध्ये झालेल्या भयंकर भूकंपाच्या खुणा आम्ही पाहिल्या. त्या पर्वताच्या सबंध बाजू फुटून निघालेल्या होत्या, परंतु त्या आता नवीन उगवलेल्या वनस्पती व झाडींनी हळूहळू झाकून टाकल्या जात होत्या. लवकरच उत्तरेकडे दोन्ही बाजूला हिमाच्छादित पर्वत शिखरे दिसू लागली; आणि पुढे खोलवर सरळसोट दरीत सियांग नदीचा प्रवाह!

पुढचे चार दिवस सालीम अलींनी पक्षी निरीक्षणांत आणि ह्या भागात स्थलांतरित पक्ष्यांच्या स्थलांतराचा अभ्यास, उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीमध्ये, पक्ष्यांच्या पायात कडी अडकवून करता येण्याची कितपत शक्यता आहे हे शोधण्यात घालविला. वसंत आणि शिशिर ऋतूंतील काही ठराविक आठवड्यांत पक्ष्यांचे उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे स्थलांतर होते असे आम्हाला समजले. विशेषतः जंगली कोंबड्या पू. पाकिस्तान काचर, मणीपूर व उ. बर्मा अशा मार्गाने येथील तळ्यांना भेटी देतात.

अनुक्रमणिका

ह्या भागांतील वन्यजीवन जेवढे शक्य होईल तेवढे शोधून काढण्याच्या कामी मी व्यग्र होतो आणि वर्षाच्या वेगवेगळ्या भागात “ताकिन” कुठे सापडतात त्या पर्वतांवरील ठराविक खाचा मला दाखविण्यात आल्या होत्या. “ग्लँग”ची देखील छायाचित्रे घेता आली. (छायाचित्र ३८) ग्लँग हा प्राणी बहुधा पाळीव गाय व पाळीव याक ह्या दोन प्राण्यांच्या समागमातून तयार झालेला असावा. मला नक्की वाटते की हे प्राणी लडाखपासून भूतानपर्यंत तिबेटच्या सरहद्दीवर सर्वत्र दिसून येतात; आणि त्या भागात ते “जू” म्हणून ओळखले जातात व ते ओझी वाहण्याच्या कामी उपयोगांत आणले जातात.


हे ग्लँग तिबेटमधल्या निर्वासित लोकांनी उत्तरेकडून येथे आणले आणि सरकारी दुभाषांनी ते विकत घेतले. ते छोटे आणि रंगाने काळे पांढरे असे होते.

मी तेथे विशेषेकरून दिसून येणाऱ्या “गायाल” ह्या प्राण्याचा देखील शोध घेतला आणि त्याची छायाचित्रे देखील घेतली. (छायाचित्र ३७) ह्या प्राण्यामध्ये मला नेहमीच विशेष रस वाटत असे. हा प्राणी दिसावयास बराचसा गव्यासारखा (गौर ह्या प्राण्यासारखा) असतो परंतु त्यातला मुख्य फरक गायालची शिंगे सरळ असतात; तर गव्याची वळलेली असतात. पूर्वी त्यांच्या ‘बोस फ्रॅंटिलस’ व ‘बोस गौरस’ अशा दोन ठराविक वेगळ्या जाती होत्या, परंतु आता गवा ही फक्त रानटी जात व गायाल ही त्याच प्राण्याची पाळीव अथवा माणसाळलेली जात असे मानले जाते.

तेव्हा असे दिसते की “गायाल”हा प्राणी त्या नाहीशा झालेल्या रानटी जातीच्या पाळीव जातीशी आलेल्या संबंधातून निर्माण झालेला उरलेला प्राणी असावा किंवा तो रानगव्यांच्या व पाळीव गाईंच्या संबंधातून तयार झालेला एक संकरीत जातीचा प्राणी असावा (कदाचित् चौथ्या किंवा पाचव्या पिढींनंतर ते तशाच नवीन जातीला जन्म देऊ शकतात).

अलीकडे नंतरचे विधान जास्त बरोबर असल्याचे समजले जाते; परंतु गंमत अशी की मध्य व दक्षिण भारतात जेथे गवे अगदी सहज दिसून येतात आणि तेथील रहिवासी व आदिवासी जातीच्या लोकांकडे नेहमीच गाई पाळलेल्या असतात; तरी तेथे गायाल हा प्राणी अजिबात दिसत नाही.


‘गायाल’ किंवा ‘मिथून’ ह्याही नावाने ह्या भागात ओळखला जाणारा हा प्राणी भारताच्या आग्नेय भागात आणि उ. ब्रह्मदेश ह्याच प्रदेशांत दिसून येतो.



३३. उन्हाळ्याच्या दिवसात काश्मीरी सांबर दाचीगामच्या वरच्या भागातील पहाडी भागात दिसून येतात.


अनुक्रमणिका






३४अ. हिवाळ्यात काश्मीरी सांबर दाचीगामच्या खालच्या भागात येतात.
३४ब. मादी सांबर अभयारण्यातील एक झरा ओलांडताना.

अनुक्रमणिका



३५. शरद ऋतूच्या सुरूवातीला सांबराच्या माद्या पहाडी प्रदेशात जातात.

अनुक्रमणिका






३६अ. गोरल - एक प्रकारचा रानबकरा.
३६ब. कस्तुरीमृग - कस्तुरीसाठी ह्याचा मोठ्या प्रमाणावर नाश झाला. (त्याचे सुळे ऊठून दिसत आहेत.)
३६क. हिमालयातील काळे अस्वल.


अनुक्रमणिका






३७अ. मिथून किंवा अर्धवट रानटी असे 'गायाल'
३७ब. ह्या पाळीव मिथूनवरचे काळे ठिपके बहुधा पाळीव गुरांशी संबंध आल्यामुळे आले असावेत.

अनुक्रमणिका




३८. पाळीव याक आणि गाई यांच्या संबंधातून हा 'ग्लँग' तयार झाला.

अनुक्रमणिका



३९. भारत - ब्रम्हदेशच्या सरहद्दीवरील ही ताकीन आता न्यूयॉर्कच्या प्राणीसंग्रहालयात आहे.

अनुक्रमणिका



**४०. तुतींग जवळील सियांग नदीवरील हा बांबूचा पूल बहुधा जगातील सर्वात लांब पूल असावा. पलीकडे ताकीन जेथे आढळतात तो देश दिसत आहे.**

नेफा सरहद्दीवरील मिश्मी टेकडीवर मी अर्धवट रानटी अशा 'मिथून' प्राण्यांचा कळप पाहिलेला आहे. यांमध्ये नर, माद्या आणि बच्चे सर्व एकाच रंगाचे व रूपाचे होते. म्हणजेच मला असे म्हणावयाचे आहे की हे प्राणी बरोबर त्यांच्या जातीला म्हणजे स्वतःसारख्या अपत्याला जन्म देणारे आहेत. सरळसोट शिंगे सोडली तर ते अगदी गव्यासारखेच दिसतात. ह्या अर्धवट रानटी मिथुनांचे कळप पर्वतांवर चरण्यासाठी

भटकत राहतात परंतु रात्री गावाकडे आपोआप परततात. त्यांना मीठ फारच आवडते. ह्याच कारणाकरिता ते बहुधा नियमितपणे गावांकडे परतत असतात.

काही लोक म्हणतात की मिथून प्राण्याच्या माद्या रानगव्यांच्या नरांबरोबर संभोग करतात परंतु भारताच्या आग्नेयेकडील ह्या सर्व पर्वतप्राय भागांतील खेड्यात मी पाहिलेले आहे की मिथून हे प्राणी जास्त करून पाळीव गाईबैलांबरोबर संभोग करतात. पाळीव गाईंशी आलेल्या संबंधातून असे दिसून येते की पाठोपाठच्या पिढ्यांमध्ये जास्त जास्त पांढरट रंग सर्वत्र दिसून येतो. मी अशा वेगवेगळ्या अवस्थांमधील प्राण्यांची छायाचित्रे घेतलेली आहेत.

मिथून हे प्राणी शेत नांगरण्यासाठी किंवा गाडीला किंवा ओझे वाहण्यासाठी जुंपलेले दिसून येत नाहीत. तसेत त्यांच्या माद्यांचेही कोणी दूध काढील असल्याचे माझ्या माहितीत नाही. ते एक प्रकारे इस्टेटीचा भाग म्हणून समजले जातात. पैशाची देवाण घेवाण करण्यासाठी त्यांचा उपयोग केला जातो. लग्नाच्या वेळी असे अनेक “मिथून” वरपक्षाकडून वधूपक्षाला हुंडा (आहेर) म्हणून द्यावे लागतात. क्विचित् प्रसंगी धार्मिक कार्याचे वेळेस मिथून हा प्राणी बळी दिला जातो.

तुतींगपासून जवळच सियांग नदीवर झुलता पूल आहे. एक दिवस मी त्यावरून पलीकडे गेलो. हा पूल साधासुधा नाही. तो जंगलामधील वेताच्या लांब लांब काड्या कापून केलेला आहे. त्याची लांबी ७८० फुटांवर असून तो बहुधा जगातील सर्वात लांब असा वेताचा पूल असावा. (छायाचित्र ४०) आपण त्यावरून चालू लागलो की आपल्या हालचालीने तो हलू लागतो आणि वाऱ्यानेही झुलतो आणि त्याच्या खाली भव्य अशी नदी खळखळ वाहते.

सुप्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञ व रानटी जमातींच्या सुधारणेसाठी नेफा येथील अधिकाऱ्यांचे सल्लागार डॉ. वेरीयर एल्विन हे मला म्हणाले की हा पूल ओलांडून जाण्याची कल्पना त्यांना तितकीशी पसंत पडली नाही. त्यांनी ती नदी पार करून पलीकडे जाण्यासाठी एक तराफा बनविला व त्यावरून ते नदी पार करून गेले. तिथल्या लोकांनी पूर्वी असे कधीच केले नव्हते. मला खात्री आहे की त्या नदीतील दैवतांचा रोष होऊ नये म्हणून त्या लोकांनी कितीतरी मिथूनांचा बळी दिला असेल.

पोहोचावयाला अवघड अशा या जागेला भेट देताना मी आजूबाजूचे जंगल पालथे घालून ऑर्किडच्या जवळजवळ ३० जाती जमविल्या. मला त्यांची फारच आवड होती. हिमालयाच्या पायथ्याकडे पूर्वेला नेपाळ आणि सिक्कीमपर्यंत आणि आग्नेय भारताकडील अगदी नागा, मणिपूर, खासी ह्या सर्व टेकड्या तऱ्हतऱ्हेचे ऑर्किड मिळण्यासाठी अगदी प्रसिद्ध आहेत. नुसत्या सिक्कीममध्येच ह्याच्या १००० हून जास्त जाती आहेत.

ऑकिडबद्दल बोलताना आठवले – १८५७ च्या सुमाराला भारताच्या आग्नेयेकडील भागातच त्या सुप्रसिद्ध “सुंदरश्या नारीची चप्पल” (सायप्रीपेडीयम फेरीनम) ह्या ऑर्किडचा शोध लागला होता आणि ते लंडनमध्ये प्रदर्शनात ठेवले होते. २० वर्षांनंतर ते मेले आणि घरातल्या घरात उबदार जागेत लवकर लवकर वाढविण्याच्या प्रयत्नात पाश्चात्य प्रदेशांतून ते संपूर्ण नाहीसेच झाले.

ते पुन्हा शोधून काढण्याचे प्रयत्न झाले परंतु ते कुठून आले होते कोण जाणे! त्याचा उगम कोणालाही सांगता आला नाही. आसाममधील खासी आणि गारो टेकड्या धुंडाळून झाल्या. परंतु व्यर्थ! आणि ते सिक्कीममध्येही शोधून सापडले नाही. ते पुन्हा शोधून काढणारास २००० पौंडाचे बक्षीसही देऊ करण्यात आले. पण उपयोग झाला नाही. शेवटी ते "हरविलेले ऑर्किड" ह्या नावानेच ओळखू जाऊ लागले.

पुन्हा १९०५ मध्ये भूतानमध्ये ते सापडले. नंतर ते पूर्वीच्या बालीपारा फ्रॅंटीयर भागातही सापडले. हा भाग आता नेफा विभागातील कमिंग फ्रॅंटीयार डिव्हिजन म्हणून ओळखला जातो. तो भूतानच्या थोडा पूर्वेकडे आहे. हे ऑर्किड हिमालयाच्या पायथ्याजवळच्या जवळजवळ ३५०० फूट उंचीवरच्या भागांत सापडते. त्याच्या एखाद्या नर्तकीला साजेशा रुबाबामुळे ते अत्यंत सुंदर दिसते.

त्याच्या पाकळ्या टोकाकडे वरच्या बाजूस वळलेल्या दिसतात. त्या पाहून अगदी बॅलेरीना मोठ्या नाजुकतेने तिच्या स्कर्टच्या कडा वर उचलून धरीत असल्याचा भास होतो. अनेक बागाईतदारांना ह्याच जातीच्या ऑर्किडने भुरळ घातली आहे.

तुतींग येथील आमच्या शेवटच्या दिवशी तेथील बुद्ध रहिवाशांचा वेगवेगळे मुखवटे धारण करून "नाच" एस्. एस्. यादव नावाच्या शासकीय अधिकाऱ्यांनी खास आमच्याकरिता म्हणून आयोजित केला. सूर्यास्ताच्या वेळेस त्यांनी ढोलकी, शिंग, तुताऱ्यांच्या तालावर नाच केला. पार्श्वभूमीवर २५४४५ फूट उंच "नामचा बारवा" नावाचे हिमाच्छादित शिखर दिसत होते.

त्या मुखवटे घालून नाच करणाऱ्या चार लोकांबरोबर आमचे फोटो काढण्यात आले; तेव्हा सालीम अली पक्ष्यांचे मुखवटे घातलेल्या दोघांच्या मध्ये आणि माझ्या दोन्ही बाजूला प्राण्यांचे मुखवटे घातलेले दोघे उभे होते, हे अगदी साजेसेच होते.

भारताच्या आग्नेयेकडील ह्या टेकड्यांच्या भागात आपल्याला क्वचितच् बांबूचे फुललेले वन दिसून येते. बांबू २०/३० वर्षातून एकदा फुलतो. बांबूच्या प्रत्येक जातीचे आयुष्यमान कसे असते ते शोधून काढण्याचे प्रयत्न चालू आहेत. ते केव्हा फुलतात, त्यांना बिया केव्हा धरतात व ते केव्हा मरतात. ह्या सर्वांचा शोध घेण्याचे काम चालू आहे. बांबूचे कणीस अनेक जातीचे प्राणी व पक्षी चवीने खातात. बांबूच्या ह्या रसदार बिया खावयास मिळाल्यास उंदरांची वाढ फार झपाट्याने होते आणि जेव्हा हे सहज उपलब्ध असलेले चवदार खाणे संपून जाते तेव्हा उंदीर ती जागा सोडून जातात. म्हणजे समजावे की आता तेथे दुष्काळ पडणार आहे. अशा वेळेस सरकारला तेथील भटक्या जमातीच्या उपाशी लोकांकरिता अन्नाचा साठा पाठवावा लागतो. कित्येकदा अशा उंदरांची हजारोंच्या संख्येने टोळकीच्या टोळकी एक प्रकारच्या आंतरिक प्रेरणेमुळे एकाच दिशेने जाऊ लागतात आणि शेवटी नदीत बुडून जातात किंवा त्यांच्यावर असेच काहीसे नैसर्गिक संकट ओढवते की ज्यामुळे त्यांचा नाश होतो. स्कॅंडिनेव्हीयामधील व इतर युरोपियन देशांमधील लेमिंग्ज ह्या प्राण्याप्रमाणेच त्यांचे वागणे वाटते अशा वेळी. लेमिंग्ज जातीच्या प्राण्यांच्या अशा वागणुकीमुळेच इ.स. १२८४ मध्ये वेस्टफॅलिया येथे हॅम्लीनच्या "पाईड पाइपर" गोष्टीचा उगम झाला असावा.

अनुक्रमणिका

नेफाच्या अगदी पूर्व भागात म्हणजेच तीरप फ्रँटीयर डिव्हीजनमध्ये जेथे पर्वतरांगांनी भारत उ. ब्रह्मदेशपासून वेगळा झालेला दिसतो तेथे “डाफा बूम”ह पंधरा हजार फूट उंच शिखर आहे. ह्या भागात कोणी वस्ती केलेली नाही व त्या ठिकाणि अगदी दाट जंगल आहे. मला वाटते १९४७ मध्ये ब्रिटीश लोक भारतातून जाण्याच्या थोडे आधी गॅझेटमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे ‘तीरप फ्रँटीयर ट्रॅक्ट नॅशनल पार्क’ निर्माण केले आहे.

ह्या उपवनाचा विस्तार ८०० चौ. मैल आहे. त्यामध्ये रानटी; पूर्वी कोणीही अधिक्षेप न केलेले असे जंगल आहे. किंग्डन वॉर्ड एकदा ‘डाफा’ बूमच्या उत्तरेकडील उतारावर लोहितच्या बाजूने गेला होता परंतु तो पूर्ण वरपर्यंत न जाता अर्ध्यावरूनच परतला. डाफा नदीवर किंवा दक्षिणेकडील उतारावर किंवा ह्या पर्वताच्या माथ्यावरून कोणीही सफर केलेली नाही. कदाचित् ह्या ठिकाणी सस्तन प्राणी, पक्षी किंवा वनस्पतींच्या काही नवीनच जाती किंवा उपजाती देखील मिळतील; कारण भारताचा हा भाग अनोळखी असा असून पोहोचण्यासही अतिशय कठीण असा आहे.चीन व ब्रह्मदेश ह्यांच्या सीमारेषेच्या अगदी जवळ असलेला. ह्या उपवनाची आणखी वाढ व्हावी किंवा तो भाग लोकांच्या ओळखीचा व्हावा यासाठी काहीच प्रयत्न झालेले नाहीत. खरे पाहता बहुधा हे उपवन नेफा अधिकाऱ्यांच्या फायलींखाली तसेच दडपले गेलेले दिसते.

जवळच देहींग नदीच्या दरीमध्ये काही गेंडे अस्तित्वात असावेत असा अंदाज आहे कारण त्यांच्या पावलांच्या खुणा तेथे दिसून आलेल्या आहेत. तीरप फ्रँटीयर डिव्हीजनच्या दक्षिणेकडील भागांत केव्हा केव्हा काही गेंडे दिसून येतात. ह्या गेंड्यांचीही जात भारतीय एकशिंगी गेंड्याचीच आहे. ती सुमात्रामधील दोन शिंदी गेंड्याची नाही. ह्या ठिकाणींदेखील निसर्गाचा अभ्यास करणाऱ्यांना हे भाग धुंडाळून पाहण्यास तसेच डाफाबूम चढून तेथून प्राणी व वनस्पती तसेच इतर गोष्टींचा अभ्यास करून खात्रीच्या नोंदी आणण्यास चांगली संधी आहे.

झुऑलॉजीकल तसेच बॉटनीकल सर्व्हे ऑफ इंडिया तसेच युनिव्हर्सिटी आणि संरक्षण खात्यातील अधिकाऱ्यांनी काम करून शोध घ्यावयाला हा संपूर्ण विभाग म्हणजे चांगलेच आव्हान आहे. मला आशा वाटते की कधीतरी ह्या भागांतील पर्वतांचे, दऱ्याखोऱ्यांचे गुपित उलगडले जाईल आणि हा भाग उपवन म्हणून विकसित व्हावा की होऊ नये याचा एक निकाल तरी लागेल.

अनुक्रमणिका

## प्रकरण १५ वे

# हाफलाँगमधील पक्ष्यांचे गूढ

आमच्या तुर्तींग येथील भेटीनंतर सालीम अली व मी आसामची राजधानी शिलाँग येथे परतलो. ह्याच ठिकाणी सध्या मी राहतो. परंतु लवकरच आम्ही पुन्हा हाफलाँग येथील जतींगा ह्या गावी पक्ष्यांचे काही ठराविक गूढ उकलण्यासाठी जीपने खासी, जैतीया आणि उत्तर काचर टेकड्यांवरून हाफलाँगला जावयास निघालो.

हाफलाँगला जाताना आम्ही अत्यंत सुंदर अशा पाईन वृक्षांनी भरून गेलेल्या जंगलाच्या टेकड्या मागे टाकल्या. पुढे पुढे ओक आणि इतर अनेक प्रकारच्या वृक्षांनी भरून गेलेल्या जंगलांच्या टेकड्या लागल्या. हा प्रदेश व्हँडा जातीच्या ऑर्किडच्या सुंदर आकाशी निळ्या रंगाच्या फुलांचा प्रदेश म्हणावा लागेल. दक्षिण अमेरिका सोडली तर जगात फक्त येथेच ह्या निळ्या ऑर्किडची वनस्पती दिसते.

अशी गोष्ट सांगितली जाते की इंग्रज जगाच्या ह्या भागात जेव्हा प्रथम शिशिर ऋतुच्या सुरुवातीला आले तेव्हा त्यांना थोड्या अंतरावरून काहीसे धूसर दृश्य दिसले. त्यांना वाटले तो निळसर धूर बाजूच्याच झाडीमधून लाकूडतोड्यांच्या अग्नीचा अथवा कोळसे जाळणारांच्या शेगडीतून येत असलेला धूर असावा. परंतु जेव्हा ते जवळ गेले तेव्हा त्यांना अत्यंत सुंदर अशा ऑर्किडच्या फुलांचे गुच्छच्या गुच्छ दिसले. ह्या ऑर्किडचे नाव व्हँडा सेरुलिया असे आहे.

जगाच्या ह्या भागात घटपर्णी (पिचर प्लँट-नेपीअँथस खासीयाना) नावाची वनस्पती देखील खूप वाढते. ही वेल असून तिच्या प्रत्येक पानापासून तणावे बाहेर येतात. प्रत्येक तणाव्याच्या टोकाला लोटीसारखा आकार असून त्याला झाकणी देखील असते. झाकणीच्या खालच्या बाजूला असलेल्या मधावर अनेक कीटक आकर्षित होतात. ही झाकणी बंद होण्याची जरुरीच नसते. कीटक आपोआपच त्या लोटीमध्ये पडतात. झाडाला ह्या अन्नाची आवश्यकता असली तर ते येथेच पचविले जातात.

ह्या वनस्पती बहुधा समुद्रसपाटीपासून दोन ते तीन हजार फूट उंचीवरील खडकाळ-उजाड प्रदेशांत वाढतात. त्यामुळे त्यांना अशा कीटकाहाराची आवश्यकता असते. मी एकदा ह्या वनस्पती माझ्या स्वतःच्या बागेमध्ये चांगल्या कसदार जमिनीत लावल्या होत्या. तेव्हा त्यांना बहुधा त्यांच्या ह्या पेल्यासारख्या तणाव्यांतील कीटकांच्या जादा आहाराची जरुरी भासली नाही.

कोपीली नदीजवळ येथे काही गंधकमिश्रित गरम पाण्याचे झरे आहेत. तेथून नदीच्या पैलतीरी जाण्याकरिता छोट्या नावा असल्यामुळे वन्यप्राणी येथे खारवणाकरिता येतात. [ खारवण-पुष्कळसे प्राणी कित्येकदा जमिनितील क्षार (खाण्याचे मीठ व इतर अनेक क्षार) चाटून घेतात. ] गंधकमिश्रित पाणी चाटण्याकरिता सुरक्षिततेने घेऊ शकत नाहीत.

परंतु आसाममधील गोलाघाटपासून जवळच असलेल्या नांबारच्या जंगलात मात्र जेथे असे गरम पाण्याचे झरे आहेत तेथे मी एक छोटेसे अभयारण्य बनविण्यास वनखात्याला मदत केली होती. हे अभयारण्य निर्माण करण्यामागे हेतु हा होता की तेथे खारवणाकरिता येणाऱ्या हरिणांना किंवा मिथून

जातीच्या प्राण्यांना चोरट्या शिकाऱ्यांपासून उपद्रव होऊ नये. कायद्यानुसार तेथे कोणीही रात्री ९ च्या पुढे बसू शकणार नाही.

मी कित्येक वेळा गरम पाण्याच्या मोठ्यात मोठ्या प्रवाहाजवळ माझ्या लपणात बसून सांबर व भेकरांची छायाचित्रे घेतलेली आहेत. स्वभावतः भेकरे एकाकी राहतात परंतु केव्हा केव्हा ती जोडीनेही दिसतात. तीन भेकरे एकत्रित पाहण्यात आल्याचे मी फक्त एकदाच ऐकले होते. ह्यामध्ये बहुधा एक मादी अर्धवट वाढलेल्या पाडसाबरोबर असताना तिच्या मागावर एक नर होता; तेव्हा ते तिघे एकत्रित आले होते. तो पूर्ण वाढीचा प्राणी असला तरी त्या हरिणीची शिंगे लहानच असून ती लांबलचक देठावर आल्यासारखी असतात.

मी एकदा भेकराचे छायाचित्रण करण्यासाठी कॅमेरा वगैरे लावून माझ्या लपणात लपून बसलेलो असताना एक मोठा रानटी नर हत्ती माझ्यापासून दहाएक फूट अंतरावर येऊन ठाकला. तो जवळजवळ ५ मिनिटे माझ्यासमोर रोखून पाहत होता. तेथून वाहत असलेल्या छोट्याशा झऱ्यातले पाणी पिण्याकरिता तो आला होता. माझ्या हृदयाची चाललेली धडधड त्या हत्तीने ऐकू नये अशी मला काळजी पडली होती. दोनच पावले त्याने पुढे टाकली असती तर क्षणार्धात मला धुळीत मिळविले असते. सुदैवाने वाऱ्याने माझ्या नशिबाला साथ दिली आणि तो हत्ती थोडासा शंकित मनानेच १०० फूट दूरवर दुसऱ्या ठिकाणी गेला.

माझ्या ह्या सुदैवी सुटकेबद्दल मी मनातल्या मनात स्वतःचेच अभिनंदन करीत असतानाच काय व्हावे? दुसरा एक रानटी नर हत्ती त्याच झऱ्यावर आला- माझ्यापासून केवळ दहाएक फूट अंतरावर—

ह्या वेळेस निदान माझे हृदय इतक्या जोरजोराने धडधडले नाही कारण हा हत्ती निदान पूर्ण वाढीचा तरी नव्हता. फक्त ¾ वाढीचाच होता. खांद्याच्या वर केवळ ७/८ फूट उंची होती त्याची. माझ्या बाजूलाच त्याने उभे राहून त्याची तहान भागवली. नंतर तो पुढच्या हत्तीला जाऊन मिळाला. नंतर मी ते दोघे सोंडा उंचावून एकमेकांना भेटताना पाहिले. हत्ती साधारणतः सोंडाना सोंडा लावून भेटतात. कारण सोंड हे जसे त्यांचे नाक आहे तसाच हातही आहे.

दोन रानटी नर हत्ती बरोबर किंवा दोनाहून अधिक रानटी नर हत्ती एकत्र दोस्ती ठेवून असणे ह्याला आसामी लोक “माल जुरीया” असे म्हणतात म्हणजेच “मुष्टियोद्धे अथवा मल्ल मैत्री”.

मी असे दोन रानटी नर हत्ती कित्येकदा एकत्र पाहिले आहेत. माझ्याहून ज्यांना हत्तींचा जास्त अनुभव आहे अशांनी तर तीन किंवा चार देखील हत्ती एकत्र पाहिल्याच्या नोंदी आहेत.

उ. काचरच्या टेकड्यांवरील आमच्या प्रवासामध्ये सालीम अलींचे आणि माझे स्वागत हुलूकच्या कळपाने केले. (भारतात ‘एप’ ची ही फक्त एकच जात दिसून येते. ‘एप’ म्हणजे गोरीला जातींचे वानर, ज्यांचे हात-अर्थात पुढचे पाय -गुडघ्याच्याही खालपर्यंत पोहोचतात ते) ह्या अतिशय कामसू प्राण्याचे विशेषसे दर्शन झाले नाही. परंतु त्यांचा ओळखीचा असा व्हूप - पो - व्हूपपो! असा जोरजोराचा आवाज मात्र सदाहारित जंगलांतून घुमल्यासारखा कानी पडत होता.

अनुक्रमणिका

हुलूक किंवा पांढऱ्या भुवईचे हे 'गिबन' बरेचसे लहान असतात. त्यांच्या अंगावर लांब लांब केस असतात. नर काळे असून त्यांची भुवई पांढरी असते तर माद्या मातकट भुरक्या असतात. बऱ्याचशा प्राणिसंग्रहालयांतून त्यांच्या ओरडण्याचा मोठामोठा आवाज ओळखीचा असा वाटतो. ते बंदिस्त वातावरणात सहज राहू शकतात. आसाममधल्या माझ्या कितीतरी मित्रांनी ह्यांची छोटी पिले वाढविली आहेत. त्यांना पिंजऱ्यात ठेवण्याची मुळीच आवश्यकता नाही. ती आवारात झाडावरून इकडून तिकडे मनसोक्त भटकतात, परंतु मधून मधून बंगल्याच्या आवारात त्यांच्या मालकाचे प्रेमाने मनोरंजन करण्यासाठी आपोआप येतात. ती चांगलीच हुशार असतात. चालताना ती विशिष्ट लकबीने चालतात तेव्हा बोटीवरील मद्य प्यालेल्या खलाशासारखी दिसतात.

टप्पाटप्याने आम्ही हाफलाँगला येऊन पोहोचल्यावर तेथील पक्ष्यांच्या विचित्र वागणुकीबद्दल आम्ही जे ऐकले होते त्याची चौकशी ताबडतोब तेथील अधिकाऱ्यांना गाठून केली. ब्रह्मपुत्रेचे पठार व काचरचे पठार जोडणाऱ्या दरीतील हॉफलाँग हे रेल्वेचे तसे मोठे शहर व व्यापार व्यवहाराचे मुख्य ठिकाण आहे. ते उत्तर दक्षिण वसलेले आहे.

वर्षातल्या काही ठराविक वेळी हाफलाँगपासून काही मैलांवरच असलेल्या जतिंगा गावचे रहिवासी रात्रीचे दिवे लावून त्या दिव्याकडे आकर्षित झालेले कित्येक पक्षी मारतात अशा नोंदी आहेत. अशा प्रकारे दिव्यांचा कृत्रिम उजेड करून काव्यांनी पक्ष्यांची पाशवी रीतीने हत्या करण्याची थांबविण्याची विनंती तेथील अधिकाऱ्यांना आम्ही पूर्वीच लिहून केली होती. त्याबद्दल काही योजना केली गेली का, याबद्दल आम्ही तेथील उपविभागीय अधिकाऱ्याकडे चौकशी केली.

तो अधिकारी "हो" असे म्हणाला. कही दिवसांपूर्वी हा पाशवी प्रकार थांबावा अशी आज्ञा निघाली होती.

काय प्रकार आहे ते आम्ही समजलो. कायद्यानुसार तसे आज्ञापत्र खरोखरच निघाले असेल आणि ते त्या फायलींमध्ये असेलही. शिवाय शिलाँगमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्याच्या प्रतीही पोहोचल्या असतील, परंतु बहुधा त्याची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने काही उपाययोजना झाली नसेल किंवा करता येण्यासारखी नसेल. हा अधिकारी कामात चांगला निपुण होता आणि आम्हाला त्याची चांगली मदतही झाली. त्याला दोष देण्यात अर्थ नव्हता. मला येथे फक्त असे स्पष्ट करावयाचे आहे, की भारतात वन्यप्राण्यांचे रक्षण करण्याचे काम किती कठीण व जिकिरीचे आहे. अशी आज्ञापत्रे व कायदे कागदोपत्री आहेत. परंतु त्यांची अंमलबजावणी करणे विशेषतः जेथे रानटी जमातींचा त्याच्याशी संबंध येतो अशा ठिकाणी कितीतरी कठीण आहे.

आम्ही जतिंगा गावच्या पंचायत प्रमुखांच्या मुलाशी संधान बांधले. ह्या गावातील लोक जैतीया जमातीचे आहेत. हा मनुष्य हुशार व शिकलेला होता. ह्या अशा एकमेव जागेतील गूढतेने वागणाऱ्या पक्ष्यांची शिकार करण्यात त्याने स्वतः कित्येकदा भाग घेतलेला होता. अशा प्रकारचे पक्ष्यांचे वागणे जगाच्या आणखी कुठच्याही भागांत दिसून येत असेल की नाही याबद्दल शंकाच आहे.

अनुक्रमणिका

त्याचे असे होते. वर्षाच्या काही ठराविक काळात ह्या टेकड्यांवरील एखाद्या चौ. मैलाच्या छोट्या भागात (जेथे जतिंगा गाव आहे) विशिष्ट हवामानात पेट्रोमॅक्सच्या दिव्यांच्या किंवा इतर दिव्यांच्या उजेडाकडे आकर्षित होऊन असंख्य पक्षी तेथे येतात. ते लोक हे पक्षी काठ्यांनी मारून त्यांचे मांस खातात.

हे सर्वच अघटित असे आहे कारण दरीचा हा विशिष्ट भाग सोडला तर इतर कुठेही असा चमत्कार दिसून येत नाही. इतर भागांतही असे सर्व करून पाहिले आहे पण कुठेही तसा प्रकार घडत नाही. ज्या ठिकाणी हा प्रकार घडतो तो भाग आम्हाला इतर भागापेक्षा काही वेगळा असा आढळून आला नाही. असे घडण्यासाठी पुढील सर्व बाबी जुळून आल्या पाहिजेत.

१) हा काल १५ ऑगस्ट ते ३१ ऑक्टोबरच्या दरम्यानचा असावा. हंस व बदके ऑक्टोबर महिन्यात येतात असे जरी म्हटले जाते तरी सप्टेंबर महिना म्हणजे अगदी योग्य काळ.
२) ती अमावास्येची रात्र असावी. अगदी काळोख्या रात्रीच ते घडते.
३) तेव्हा धुके, किंवा ढगाळ व एकंदर कुंद वातावरण असावे लागते. पावसाची थोडीशी शिडशिड असेल तर आणखीनच उत्तम.
४) वारा दक्षिणोत्तर असावा लागतो. नाहीतर एकही पक्षी येणार नाही.
५) उजेड भरपूर असून गोलसर असावा. विजेरी किंवा गाड्यांच्या पुढच्या दिव्याचा सरळ लांबवर जाणारा प्रकाश असला तर उपयोग नाही.
६) मोकळी जागा बहुधा जास्त चांगली परंतु वरील सर्व गोष्टी जुळून आल्या तर पक्षी घराघरांतही घुसतात.
७) प्रत्येक दिव्याच्या दक्षिणेला एखादा पडदा ठेवावा लागतो व त्याच्या मागे पक्ष्यांना मारण्यासाठी माणूस उभा राहतो. पक्ष्यांचे स्थलांतर दक्षिणोत्तर घडते त्यामुळे ह्या दिशा वगैरे पहाव्या लागतात.

वरील सर्व बाबी जुळून येतात तेव्हा साधारणतः ५०/६० पेट्रोमॅक्सच्या बत्त्या लावण्यात येतात. उत्तम वेळ म्हणजे रात्रीची ७ ते १० पर्यंतची, परंतु केव्हा केव्हा पहाटे २ ते ४ ची वेळही अनुकूल असते. २०० पर्यंत पक्षी एकाच माणसाने मारल्याचीही नोंद आहे. परंतु एकेका रात्री ५००/६०० पक्ष्यांची सहज शिकार होते व एकेका हंगामात हजारो पक्षी टिपले जातात.

आम्ही गेलो तेव्हा नोव्हेंबर महिना चालू होता. त्यामुळे आम्हाला ही हत्या होत असताना पाहावयास मिळाली नाही. परंतु ते हत्याकांड जेथे नुकतेच घडले होते ती जागा मात्र पाहिली आणि आम्ही मुंबईच्या बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीमध्ये त्या पक्ष्यांच्या जाती शोधून काढण्यासाठी पक्ष्यांची पुष्कळशी पिसे गोळा केली.

अलीकडे सालीम अलींनी मुंबईत त्या पक्ष्यांच्या पिसांवरुन त्यांच्या जाती शोधून काढल्यावर अशी असाधारण माहिती समजली आहे की ह्या सर्व जाती स्थलांतरित पक्ष्यांच्या नसून त्या भारतातील स्थायीक पक्ष्यांच्याच आहेत. त्या म्हणजे मलाया बिटर्न, गायबगळा, पहाडी तित्तर, कालीज फेझंट (मोराच्या जातीचा एक सुंदर पक्षी), हरितालक (हिरवे कबुतर) पाचूच्या रंगाचा कवडा, पांढऱ्या छातीचा खंड्या, लालसर खंड्या, नंदननाचण अथवा नर्तक व कस्तूर (नेकलेस्ड लाफींग थ्रश) होत.

ह्यामधील फक्त पहिला पक्षीच निशाचर आहे बाकीचे सर्व दिनचर आहेत.

अनुक्रमणिका

ह्या गोष्टीचे गूढ उकलण्यासाठी बरेच संशोधन झाले पाहिजे. ह्या ठिकाणी पक्ष्यांच्या पायांत कडी अडकवून सोडण्याचे काम करावयासही संधी उपलब्ध आहे त्याद्वारा येथील एखादी स्थलांतरित पक्ष्यांची जातही शोधून काढली जाईल; आणि काहीही असले तरी येथील अधिकारीवर्गाने हे अमानुष हत्याकांड थांबविण्यासाठी किंवा निदान त्याला पुष्कळसा आळा घालण्यासाठी प्रयत्न केलेच पाहिजेत.

मी आमच्या बातमीदाराला विचारले की हे सर्व किती काळापर्यंत चालू आहे व याची सुरुवात केव्हा व कशी झाली? तो म्हणाला साधारण १८९५ च्या सुमाराला जैतीया जमातीचे लोक जैतीया टेकड्यावरून जतिंगा गावी आले १९०५ च्या सुमाराला सप्टेंबरमध्ये त्यांची एक म्हैस धुक्याने भरलेल्या काळोख्या रात्री एका वाघाने मारली. ते पेटत्या मशाली घेऊन म्हशींच्या शोधाला निघाले आणि त्या वेळेस असंख्य पक्षी त्यांच्या डोक्यावर, खांद्यावर व हातावर येऊन बसले. त्यांच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. ते अत्यंत विस्मयचकित झाले. साहजिकच त्यांना वाटले की म्हैस मेल्यामुळे झालेल्या नुकसानभरपाईखातर देवानेच ही भेट धाडली असावी. परंतु जसजशी वर्षे जाऊ लागली तेव्हाही त्यांना तोच अनुभव वारंवार येऊ लागला. बरोबर त्याच हंगामात आणि हवामानाच्या तशाच सर्व गोष्टी जुळून आल्या की तसेच पक्ष्यांचे थवे येऊ लागत. १९४० च्या दशकाच्या सुरुवातीला पेट्रोमॅक्सच्या दिव्यांचा शोध लागला अन् त्यामुळे तर अशा आकर्षित होणाऱ्या पक्ष्यांची संख्या आणखीनच वाढली.

अशा प्रकारे येथे पक्ष्यांचे रहस्यमय विचित्र वागणे खरोखरीच आढळते यात शंका नाही. इतर अनेक लोकांनी तसेच उपविभागीय वनाधिकाऱ्यांनीही हे पाहिले आहे. ह्या हंगामातील पक्ष्यांच्या कत्तलीच्या सांगण्यात आलेल्या गोष्टी—शिवाय आम्हाला मेलेले, शिजवलेले तसेच उन्हात वाळविलेलेही कितीतरी पक्षी दाखविण्यात आले. आम्हाला पाचूच्या रंगाच्या कवड्याच्या दोन जोड्यादेखील दयेखातर न मारता पिंजऱ्यात बंदिस्त करून ठेवल्या होत्या त्या देखील दाखविण्यात आल्या. ह्या मुक्या, गरीब पक्ष्यांना जर वाचा फुटली तर काय काय गोष्टी बाहेर येतील ह्याची कल्पनाच करावी.

जगाच्या ह्या भागात वन्यपक्ष्यांची दरवर्षी आणखी एक चमत्कारिक घटना घडताना दिसून येते. परंतु ह्या बाबतींत ते हत्याकांड नसल्यामुळे ती फारच मनोरंजक आहे.

कलकत्त्यांतील अलिपूर झुऑलॉजिकल गार्डन येथील एका छोट्या तळ्यात दरवर्षी हिवाळ्यात दिवसा हजारो रानबदकांची सभाच भरते. तिचा सारांश मी येथे देत आहे. (छायाचित्र क्र. ४२) काणूक जातीची ही बदके. त्यांना व्हिसलींग टिल असे म्हणण्याचे कारण ती जोरात शीळ घालतात.

गेली १५/२० वर्षे (आता ३५/४० वर्षे म्हणावयास पाहिजेत—मूळ पुस्तक १९६४ मध्ये प्रकाशित झाले होते.) ही रानबदके ह्या कलकत्त्यासारख्या मोठ्या शहरात फक्त दिवसाचा आश्रय घेण्यासाठी ह्या तळ्यांत येतात. प्रत्येक संध्याकाळी मात्र ते पुन्हा त्यांच्या खाद्य उपलब्ध असलेल्या ठराविक ठिकाणी परत जातात. पुन्हा पहाटे त्यांच्या अभयारण्यांत (तळ्यात) येतात. त्यांची ऑक्टोबरमध्ये येण्यास सुरुवात होते. डिसेंबरच्या दरम्यान ४००० ते ६००० बदके तेथे जमतात. वसंत ऋतूंत म्हणजे साधारणतः एप्रिलच्या सुमारास परत जातात.

अशा मोठ्या शहरात एखाद्या प्राणिसंग्रहालयात इतक्या मोठ्या संख्येने अशी रानबदके आश्रयाला येतात ही खरोखर विस्मयकारक घटना आहे. पण ते असे खात्रीपूर्वक करतातच कारण ह्या दिवसात

त्यांच्या नेहमीच्या राहण्याच्या जागेतील गवत व पाणगवत आणि इतर पाणवनस्पती पाणी नसल्याने सुकून जातात व उरलेल्या गाईगुरे खातात. अशा प्रकारे त्यांना तेथे सुरक्षितता किंवा आसरा नसतो. पुन्हा एप्रिलपासून नवीन पाणवनस्पती उगवू लागतात आणि मग त्यांना प्राणिसंग्रहालयाच्या बाहेर राहण्यात सुरक्षितता वाटू लागते. ह्या भागांत जून–जुलैच्या सुमारास ती घरटी बांधू लागतात.

या रानबदकांच्या संदर्भातच येथे सांगावेसे वाटते की कलहंस, राजहंस (रंगीत छायाचित्र क्र. १२) आणि स्थलांतरित बदकांच्या आणखीही कितीतरी जाती ज्या हिवाळ्यात उत्तरेकडून भारतात दरवर्षी येतात त्यांची संख्या कमी होत चालली आहे; ही मोठी खेदाची गोष्ट आहे. ह्याला फक्त त्यांची होणारी शिकार किंवा त्यांना पकडले जाते (कडी अडकविण्यासाठी) ही दोनच कारणे नाहीत तर त्यांच्या घरट्यांच्या जागांमध्ये व वसाहतींमध्ये झालेला बदल किंवा झाडतोड इत्यादी कारणेही आहेत. त्यामुळे त्यांना हवे असलेले पर्यावरणही मिळत नाही.

भारतांतील स्थायिक रानबदकांमधील एक अत्यंत सुंदर आणि कुतुहलजनक गुलाबी डोक्याचे बदक ज्याची जात भारतातून नक्कीच समूळ नष्ट झाली आहे. ही गोष्ट अत्यंत खेदाची आहे. हे बदक खात्रीपूर्वक असे शेवटी १९३५ साली बिहार येथे दिसले होते. त्यानंतरही ते पाहिले असल्याच्या आणि अस्तित्वात असल्याच्या अनेक नोंदी आल्या, परंतु "रेड क्रेस्टेड पोचार्ड" ह्या जातीचे बदक बरेचसे वरील जातीच्या बदकासारखे दिसते म्हणून हा गोंधळ झालेला दिसून येतो. हे बदक का नष्ट झाले हे कुणालाच माहीत नाही. त्याचाही शोध घेण्याची आणखी एक संधी आहे. बंदिस्त वातावरणात ही बदके चांगली राहिली परंतु तेथे त्यांचे पुनरुत्पादन करणे मात्र शक्य झाले नाही.

दुसरे एक स्थानिक बदक अजूनही आसामच्या पूर्वेकडील भागांत दिसून येते परंतु ते देखील दुर्मिळ होत चालले आहे. त्याचे नाव पांढऱ्या पंखाचे जंगली बदक (व्हाईट विंग्ड वुड डक) (रंगीत छायाचित्र क्र. १२) हे बदक आकाराने बरेच मोठे असते. ते दाट जंगलांतील पाण्याच्या ठिकाणी (तळी, ओढे अशा ठिकाणी) दिसते. मी ह्या बदकाला वेळोवेळी प्रसिद्धी देऊन ते शिकाऱ्यांनी किंवा इतर लोकांनी मारून नष्ट करू नये म्हणून प्रयत्न केले आहेत. बंदिस्त वातावरणांत त्याचे पुनरुत्पादन होते. (हॉलंडमध्ये तसे केलेले आहे.) अशा प्रकारे प्राण्यांकरिता एक चांगलीशी बाग तयार करून तेथे असे दुर्मिळ प्राणी वाढविण्यास चांगला वाव आहे.

ठिपकेवाल्या चोचीचे बदक (रंगीत छायाचित्र क्र. १२) (ह्याला हे नाव त्याच्या चोचीवर भडक लाल रंगाचा ठिपका असतो त्यावरून मिळाले आहे.) भारतात अनेक ठिकाणी दिसते. ही बदके साधारणतः इतर जातीच्या बदकांमध्ये फारशी न मिसळता वेगळी वेगळी राहतात.

सहासात हजार फूट उंचीवर असलेल्या नैनिताल व मसूरी ह्या भागांमध्ये पूर्वी दिसत असलेली पहाडी तित्तरे आता का दिसेनाशी झाली आहेत हे कोणालाही माहीत नाही. शेवटचे तित्तर नैनितालच्या टेकड्यांवर १८७६ मध्ये मिळाले होते. 'जेर्डनचा कर्सर' (Jerdon's Courser) हा पक्षीही भारतातून नष्ट झाला आहे. ह्या पक्ष्यांची शेवटची खात्रीलायक नोंद १९०० मधील आहे. [ अनुवादकाची टीप-हा पक्षी BNHS च्या काही संशोधकांनी आंध्र प्रदेशात १९८६ च्या जानेवारी मध्ये पुन्हा शोधून काढला. ]

अलीकडे भारतातील माळढोक ह्या पक्ष्याबद्दल फारच चिंता वाटू लागली आहे. हा पक्षी मोठा व सहज नजरेत भरू शकणारा असून खावयास फारच रुचकर असतो. तो बहुधा शेतीभातीच्या प्रदेशांत तसेच

लोकवस्तीच्या प्रदेशांतही वारंवार आढळतो. या कारणास्तव त्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने काही पावले टाकणे देखील कठीण आहे. अजून तरी ह्या पक्ष्यांचे बंदिस्त वातावरणात ठेवून पुनरुत्पादन करणे शक्य झाले असेलसे मला वाटत नाही; परंतु मला अशा वाटते की कोणते तरी प्राणिसंग्रहालय हा प्रकल्प हाती घेईल. ह्या पक्ष्यांना संरक्षण देण्याकरिता अभयारण्य तयार करणे फारसे हितावह ठरणार नाही. कारण त्यामुळे चोरट्या शिकारी करणारांना त्यांचे अस्तित्व आणखीनच माहीत पडेल.

हा दुर्दैवी पक्षी कित्येक वेळा वार्ताहरांकडून फारच उपहासिला जातो. केव्हा उपसंपादकाच्या किंवा छपाईच्या चुकीमुळे, केव्हा माहीत नसल्यामुळे "U" च्या ऐवजी "a" असे अक्षर पडल्यामुळे तर फारच गोंधळ होतो. ह्याचे इंग्रजी नाव BUSTARD बस्टर्ड असे आहे.)

कलकत्त्याच्या एका सुप्रसिद्ध वार्ताहाराने अलीकडे वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या संदर्भात माझी मुलाखात घेतली होती तो प्रसंग मी विसरूच शकत नाही.

मी त्याला "bustard" ह्या शब्दाचे बरोबर स्पेलिंग लिहिण्याबद्दल आग्रहाने बजावून सांगितले आणि एवढेही सांगितले की कित्येकदा छपाईच्या चुकीमुळे त्याचे 'शिवी' त कसे रूपांतर होते. त्याने मला मी नीट काळजी घेईन असे वचन दिले. दुसऱ्या दिवशी अगदी व्यवस्थित टाईप केलेल्या मुलाखतीचा नमुन्याचा मथळा मला दाखवायला आणला. पक्ष्याच्या नावाचे स्पेलिंग बरोबर छापले होते आणि मी सुटकेचा निःश्वास टाकला.

तिसऱ्या दिवशी मुलाखात प्रसिद्ध झाली आणि माझे धाबेच दणाणले. (त्याबरोबर वाचकांचे मात्र मनोरंजनही झाले!) शब्द छापला होतो "ग्रेट इंडियन कस्टर्ड!" मी फारच रागावून संपादक महाशयांना पत्र लिहिले त्यावर त्यांनी गावठी विनोद करून मला उत्तर धाडले की, "निदान सुदैवाने त्या पक्ष्याचे नाव 'बस्टर्ड' ऐवजी 'कस्टर्ड' असेच झाले आणि आपण सांगितल्याप्रमाणे 'बार्स्टर्ड' (शिवी) असे तरी झाले नाही."

भारतातील माझा आवडता पक्षी म्हणजे भीमराज. (लांब शेपटीचा कोतवाल) तो युरोपमधल्या ब्लॅक बर्डपेक्षा थोडासा लहान असतो. त्याच्या डोक्यावर नजरेत भरण्यासारखा तुरा असून डोळे लालभडक असतात. शेपटीला दोन तारेसारखी लांबलचक पिसे अन् त्यांच्या शेवटाला फक्त केसांचा झुबका! पक्षी उडत असताना जणू त्याच्या मागे दोन भोवरेच लागले आहेत असा भास होतो.

माझ्याकडे कित्येकांनी भीमराज पक्ष्याची छोटी पिले आणून दिली आहेत आणि मी ती कित्येकदा नीट वाढविली देखील. ती कुठच्याही पाळीव पक्ष्यापेक्षा आपल्याला जास्त लळा लावून सोडतात आणि आपले मनोरंजन करू शकतात. मोठी होऊन त्यांना उडता येऊ लागले तरीही मालकाच्या मागे मागे मैलभरापेक्षा जास्त अंतर देखील उडून जातात आणि परत बंगल्यात येतात. त्यांना बोलता येत नाही; परंतु इतर अनेक पक्ष्यांच्या नकला ती करतात.

गाणाऱ्या पक्ष्यांत भारतातील अतिशय उत्कृष्ट पक्षी म्हणजे पहाडी मैना. बंदिस्त वातावरणात त्या खूप माणसाळवता येतात.

देशभर कित्येक लोकांच्या पटांगणात त्या पिंजऱ्यात पाळलेल्या दिसतात. माणसाच्या आवाजाच्या नकला त्या फारच सुंदर करून मनोरंजन करतात. कित्येकदा नोकरांनी चहा किंवा थंड पेये या मैनांच्या हुकुमांवरून (मालकाचीच आज्ञा समजून) आणलेली उदाहरणे मला माहीत आहेत. मला आठवते एकदा एका चाकराने घोड्यावर खोगीर वगैरे घालून तो सज्ज करून आणला होता. साहेबांच्या हुकुमाशिवाय! (हे ह्या मैनेचेच काम असणार! दुसरे काय?)

चहाच्या मळ्यात काम करणारे मजूर तसेच गावकरी कित्येकदा रानटी पक्ष्यांची घरे उद्ध्वस्त करून त्यातील छोटी पिले बाजारात विकावयास आणतात. मी अशी कितीतरी पिले विकत घेऊन त्यांची सुटका करून वाढविली आहेत नंतर त्यांना उडता येऊ लागल्यावर त्यांना मोकळे सोडले आहे.

अशा प्रकारे वाढविलेल्या पक्ष्यांना पुष्कळदा मला सोडून जावेसे वाटत नाही. विशेषतः भीमराज पक्ष्यांची पिले. मला आठवते की करवाक पक्ष्याची (ग्रेट स्टोन प्लव्हर) एक जोडी मी अशीच एकदा वाढवून त्यांची सुटका केली होती. ते कित्येक तासन्तास उडत परंतु पुन्हा माझ्या बंगल्यातल्या हिरवळीवर परत येत. शेवटी एक दिवस मात्र त्यांनी मला कायमचे सोडून जावयाचे ठरविले.


मी पांढऱ्या पाठीच्या गिधाडाचेही एक पिलू ठेवून वाढविले होते. ते अतिशय स्वच्छ होते. त्याचा बराच वेळ ते स्वतःच्या पिसांची साफसफाई करण्यात आणि सूर्यप्रकाश अंगावर घेण्यात घालवीत असे. अशा प्रकारे छोटी पिले वाढवून मोठी करताना आपल्याला त्यांच्या सवयींचा आणि वागण्याच्या तऱ्हांचा पुष्कळ अभ्यास करता येतो.

ह्या गिधाडांच्या संदर्भात बोलताना आठवले. ही गिधाडे त्यांचे खाद्य तीक्ष्ण नजरेने शोधू शकतात की त्यांच्या गंधज्ञानामुळे ह्यावर तीसएक वर्षापूर्वी वाद चालला होता. भक्ष्य शोधण्यासाठी ती इतक्या उंचीवर जाऊन गिरक्या घेत राहतात की तितक्या उंचीवरून त्यांना मेलेल्या प्राण्याचा वास येणे अशक्यच! त्यांची दृष्टी फारच तीक्ष्ण असते. ते नेहमी कावळे, घारी, रस्त्यावरील कुत्रे ह्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवतात. कारण ते नेहमी मेलेल्या प्राण्यांची प्रेते हुडकीत असतात. नंतर ते गिरक्या घेत घेत मेजवानीवर उतरतात.

कावळे कुत्र्यांनी खाऊन उरलेली प्रेते काही दिवस तशीच पडून सडली कुजली असली की त्यावरही गिधाडे लगेच मेजवानी झोडतात. परंतु गाय किंवा तसाच प्राणी आताच मेलेला असून जसाच्या तसा पूर्ण शाबूत असला तर गिधाडे प्रथम त्याभोवती एक प्रकारचा नाच करतात. (छायाचित्र क्र. ४२)

मेलेल्या प्राण्यापासून थोड्या अंतरावर ती राहतात व सर्व शरीर तसेच जमिनीवर ठेवून हळूहळू पावले टाकीत दोनतीन गिधाडे जवळ जाऊ लागतात. प्रत्येक पावलागणिक ती जणू काही मेलेल्या प्राण्यावर घावच घालणार अशा बेतात असल्यासारखी वाटतात. अशी अग्रभागी असलेली गिधाडे प्रेताच्या जवळ पोहोचली की ती प्राण्याच्या पाठच्या भागाकडून काळजीपूर्वक सुरुवात करतात. हा सर्व कार्यक्रम होईपर्यंत इतर गिधाडे खाण्याची घाई न करता गुपचूप वाट पाहतात. हे फारच आश्चर्यकारक आहे. माझ्या आयुष्यात मी हे फक्त दोनदाच पाहिले आहे आणि मला वाटते की हे सर्व मेलेले जनावर खरोखरच मेले आहे की नाही ह्याची खात्री पटवून घेण्याकरिताच केले जात असावे.

अनुक्रमणिका





४१अ. जंगालात पर्यावरणाशी मिसळून  गेलेले कापडी लपण.
४१ब. वरील लपाणात लपून घेतलेले भेकराचे छायचित्र.

अनुक्रमणिका





४२अ. हिवाळ्यात दिवसा कलकत्याच्या प्राणीसंग्रहालयांतील तळ्यात आश्रय घेण्यासाठी जमलेली जंगली बदके.

४२ब. पांढऱ्या पाठीच्या गिधाडाचा चालेला नाच.

अनुक्रमणिका



४३. ह्या एकांड्या रानरेड्याने ८।९ पाळीव रेडे मारलेले आहेत.

अनुक्रमणिका



४४।४५. रानरेडे फार जागरूक असल्याने त्यांच्या कळपाजवळ जाणे फारच कठीण आहे.


अनुक्रमणिका






४६अ. मादी अन् तिचे पाडस-तरत्या अभयारण्यात.
४६ब. हा कालवा येथील तरते गवत कापून बांधून काढताना फारच खर्च झाला.


अनुक्रमणिका





४७अ. पूर्ण वाढीचे छोटे डुक्कर (छायचित्रात फूटपट्टी दिसतेय,) (हे जनावर संपूर्णपणे नाहीसे झाले आहे असे समजण्यात आले होते.)
४७ब. कलकत्ता येथील प्राणीसंग्रहालयातील मणीपूरचे नाचरे हरीण.

अनुक्रमणिका



४८. केंव्हा केंव्हा सांबरे अरण्य सोडून पाण्यात येऊन बसतात.

अनुक्रमणिका

## प्रकरण १६ वे

# मणीपूरचे नाचणारे हरीण

पूर्वीच्या काळी हंस आणि बदकांची शिकार करण्याकरिता प्रसिद्ध ठिकाण होते मणिपूरमधील लोगटाकचे तळे. भारत व ब्रह्मदेश यांच्यामधील नागा टेकड्यांमध्ये मणिपूर वसलेले आहे. पूर्वी ते एक छोटेसे संस्थानच होते. आता तो भारताचाच एक विभाग आहे. मला वाटते आताशा १२ बोअरच्या बंदुकांच्या काडतुसांची किंमत फारच वाढली असल्यामुळे तेथे फारशी शिकार होत नाही.

ह्या तळ्याच्या एका बाजूच्या भागात एका अतिशय दुर्मिळ अशा परंतु अत्यंत सुंदर हरीणाची जात दिसून येते; त्याचे नाव आहे. 'ब्रो अँटलर्ड डिअर' (छायाचित्र क्र. ४७) ह्या हरीणाला असे नाव मिळण्याचे कारण त्याच्या शिंगाचे जेथे फाटे फुटतात तो भाग पुढे झुकून नंतर मागच्या बाजूस वळणदारपणे सुंदर गोलाकार होऊन पुढे वाढतो. हे हरीण खात्रीपूर्वक १९५१ पासून नाहीसे झाले होते. परंतु काही वर्षांनतर काही छोट्या दलदलीच्या प्रदेशांतून व उंच गवताच्या प्रदेशांतून ती जात अजूनही थोड्या प्रमाणांत अस्तित्वात असल्याचे पाहण्यात आले. ह्या दुर्मिळ हरीणाचे संरक्षण व्हावे असे मला फारच वाटत होते त्यामुळे तेथे जाऊन त्याचा शोध घेण्याच्या संधीचे मी चांगलेच स्वागत केले.

आय. यू. सी. एन. ने माझी तेथील भेट आयोजित केली आणि आय. बी. डब्ल्यू. एल्. ने मला शुभेच्छापूर्वक पाठिंबा दिला.

ह्या हरिणाच्या ३ उपजाती आहेत. मणिपूरमधील ही एक, दुसरी ब्रह्मदेशमधली—ही जात दरवर्षी फारच झपाट्याने कमी होऊ लागली आहे आणि तसरी थायलंड व ईशान्य आशियातल्या काही भागांमधली. ही जात तर जवळजवळ नष्टच होत आलीय. वरीलपैकी पहिली जात वाचविणे आपल्या भारतीयांच्या हातात आहे. मणिपुरी भाषेत ह्या हरिणाला "सांगाय्" असे म्हणतात. त्याचा अर्थ "तो प्राणी तुमच्याकडे पाहतोय."

ठरल्याप्रमाणे १९५९ च्या ऑक्टोबरमध्ये मी ब्रह्मपुत्रेच्या दरीपर्यंत व तेथून नागा टेकड्यांवरून मणिपूरला मोटारने गेलो. तेथे माझे स्वागत मनमिळाऊ स्वभावाच्या चांगल्या वनाधिकाऱ्यांनी केले. इम्फाळ ह्या राजधानीच्या शहरात जेवढी माहिती मिळू शकेल तितकी गोळा केल्यावर मी मग लोगटाक तळ्याच्या नैऋत्येकडे माझा जंगलातील अभ्यास करण्यास निघालो.

येथे मला पहिली गोष्ट अशी दिसून आली की हा जो १० चौ. मैलाचा दलदलीचा टापू आहे; आणि जेथे हे हरिण दिसून येते तो भाग इतर सर्वसाधारण दलदलीच्या प्रदेशांसारखा नाही. तो भाग तरंगता आहे. त्यामध्ये कुजलेल्या वनस्पतींच्या अवशेषांचे चटईसारखे तरटच्या तरट झालेले आहे. आणि ते त्या तळ्यातल्या पाण्यावर अक्षरक्षः तरंगत राहते. ह्या तरटाचा जवळजवळ १/५ भाग पाण्याच्या वर आहे व ४/५ भाग पाण्याखाली आहे. ह्या कुजलेल्या वनस्पतीच्या अवशेषांवर पंधरा पंधरा फूट उंचीचे गवत व वेगवेगळ्या पाणवनस्पती उगवतात. हे जे चटईसारखे तयार झालेले तरट आहे त्याला मणिपुरी लोक 'फुमडी' असे म्हणतात. ह्याची जाडी काही इंचापासून ते जवळजवळ ५ फुटांपर्यंत असते.

ह्या फुमडीवर तुम्ही चालू लागलात की ती हलू लागते आणि जर तुम्ही त्यातून निसटून खालच्या वाहणाऱ्या काळसर पाण्यात घुसलात की समजावे येथील फुमडीचा थर काही इंचच जाडीचा आहे! ह्या ठिकाणी ही हरणे हजारो वर्षे राहून राहून जणू काहीं त्यांचे खूर बाहेरच्या बाजूला वळले आहेत; आणि त्यांच्या पायाच्या घोट्याजवळही केस नसून ते शिंगासारखे टणक झालेले असतात त्यामुळे त्यांना पाण्यातील गवत, पाणकणसे इ. वरून न बुडता चालता येणे शक्य होते.

काश्मीर, ब्रह्मदेश व उ. अमेरिका येथे तळ्यामध्ये तरंगती बेटे असल्याचे मी ऐकलेले आहे; परंतु मला वाटते 'कीबूल लामजो' हे भारताच्या आग्नेयेकडील मणिपूर येथे असलेले वन्यप्राण्यांचे तरंगते असे एकमेव अभयारण्य असावे.

मणिपूर वनविभागाने ह्या फुमडीमधून तेथल्या एका छोट्या टेकडीपर्यंत कालवा खणला आहे (छायाचित्र क्र. ४६) जेथून आपल्याला ह्या अभयारण्याचा चांगला देखावा दिसू शकतो. ह्या ठिकाणावरून ही हरणे फक्त पहाटे किंवा संध्याकाळी अगदी उशिराच दिसू शकतात शिवाय विश्रांति गृहापासून येथपर्यंत यावयाला तब्बल दोन तास लागले म्हणून मी तेथेच टेकडीवर रात्र घालविण्याचे ठरविले.

तेथील वनखात्याच्या लोकांनी व रहिवाशांनी मला याच्याविरुद्ध चांगलाच कडक उपदेश केला. "रानडुकरे तुम्हाला त्रास देतील आणि इथले डास तर फारच उपद्रवी आहेत." ते म्हणाले. मी उत्तर दिले, "त्या दोन्हीपैकी कशालाही मी भीत नाही". मग त्यांनी त्यांचे हुकमी पान बाहेर काढले. "ही जागा भुताटकीने पछाडलेली आहे." त्यांनी मला धोक्याचा इशारा दिला. "तुम्ही येथे रात्री राहू शकत नाही." "ही भुते मला पाहवयाची आहेत" मी म्हटले.

मी त्या रात्री त्या टेकडीवर झोपलो. माझ्यासोबत अतिशय घाबरून गेलेली तीन माणसे होती. मी त्यांना माझ्याबरोबर राहण्याचा धोका पत्करण्यास त्यांचे मन कसेबसे वळविले होते. रात्रभर आम्हाला काहीच दिसले नाही. परंतु भल्या पहाटे आम्हाला सहा हरिणांचे (ब्रो अँटलर्ड डिअर) आणि कित्येक रानडुकरांचे दर्शन झाले.

वर्षाच्या ह्या वेळेला तेथे अत्यंत दाट झाडझाडोरा व गवत वाढत असल्यामुळे आम्हाला ते प्राणी नीट जवळून पाहावयाला मिळाले नाहीत; म्हणून मार्चमध्ये जेव्हा तेथे कमी गवत असते तेव्हा पुन्हा येण्याचा मी निर्णय घेतला.

१९६१ च्या मार्चमध्ये तीन दिवसांच्या डोल जत्रेचा सण आटोपल्यावर मी आसाममधील मणिपूर येथे परतलो. मला वाटले सण वगैरे सर्व काही संपून आता स्थिरस्थावर झाले असेल परंतु माझी ती चुकीची समजूत ठरली. भारतभर हा जो सण तीन दिवस साजरा होतो तो मणिपूरमध्ये सहा दिवस केला जातो!

आणि ते सर्व सोडून द्या परंतु मला देखील नाचावे लागेल किंवा त्या तरंगत्या अभयारण्यात हरीण नाचत असलेले मला पाहावयाला मिळेल अशी मी कल्पना देखील केली नव्हती. परंतु तसं घडलं खरं!

इम्फाळमध्ये जेथे मी पहिली रात्र घालविली तेथे सर्वांनी "ताबाल चोंगबा" म्हणजे "चंद्रप्रकाशातील उड्यां"चा नाच केला. तेथे चंद्रही नव्हता आणि कोणी उड्याही मारल्या नाहीत. तो नाच

म्हणजे ३/४ वेगेवगळ्या प्रकारच्या ठेक्यांवर वेगवेगळ्या तऱ्हेने पावले टाकून केलेला नाच होता. त्यामध्ये सर्वांनीच मोठ्या उत्साहाने भाग घेतला होता. आम्ही सर्वांनी हातात हात घालून त्यांच्या ढोलक्यांच्या तालावर नाच केला. तो नाच ४ तास चालला होता.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे अजून पुरते उजाडले देखील नव्हते तेव्हाच तेथून ३० मैल अंतरावर असलेल्या अभयारण्यांत मी जीपने गेलो. आम्ही फुमडीमधून खोदलेल्या कालव्यातून बोटीने प्रवास केला तेव्हा सूर्योदय होत होता. सोनेरी आभाळातून सुंदर लाल रंगाचा गोळा बाहेर येत होता. निरीक्षण टोकडीवरून मी माझ्या दुर्बिणीच्या भिंगातून 'ब्रो अँटलर्ड डिअर' ह्या हरणाची एक जोडी पहिली—एक नर व एक मादी.

दुसऱ्या ठिकाणी दोन माद्या पाहिल्या. प्रत्येकीबरोबर अर्ध्याहून जास्त वाढलेले एक एक पिलू होते. फुमडीमधून उगवलेले कोवळे गवत माद्या शांतपणे खात होत्या. आणि ती दोन पाडसे—माझाच माझ्या डोळ्यांवर विश्वास बसेना. खरोखर ती नाचत होती! गोल गोल रिंगण धरून! एकदा ह्या बाजूला आणि एकदा त्या बाजूला; डोकी उंचावून आणि माना खाली घालून. अगदी उफाळत्या यौवनात त्यांनी पदार्पण केल्यामुळे झालेल्या आनंदाने.

तरंगत्या अभयारण्यात हरीण नाचत होते—ही गोष्ट फक्त मणिपूरमध्येच घडावी! मी जेव्हा ह्याची नोंद कळविली तेव्हा आय्. यू. सी. एन. आणि इतर शिकलेसवरलेल्या संस्थानी माझ्याबद्दल काय समजावे? मला अगदी खात्री होती की ते माझ्यावर मुळीच विश्वास ठेवणार नाहीत आणि ह्यापुढे माझी काही अशा कामासाठी आणखी शिफारस होणार नाही! परंतु खरोखर असे घडले.

मणिपूर गावातील वीसएक रहिवाशांच्या मदतीने आम्ही अभयारण्याचा एक पाव चौ. मैलाचा भाग ढोल बडवून पिंजून काढला. त्यातून त्या प्रकारची ४ हरीणे व १० रानडुकरे निघाली.

वनविभागाच्या लोकांशी व गावकऱ्यांशी पुष्कळ सविस्तर चर्चा करून आणि तिची शहानिशा करून मी ह्या निकालापर्यंत येऊन पोहोचलो की त्या दहा चौ. मैलाच्या अभयारण्यात अदमासे १०० हरीणे (त्याच जातीची); काही भेकरे व तीनएकशे रानडुकरे असावीत.

दुसऱ्या दिवशीचा प्रवास जागोजागी रस्ता अडविला गेल्यामुळे लांबला गेला. वनविभागाच्या लोकांनी मला आधीच सूचना दिल्या होत्या की त्या सणाच्या सहा दिवसात लोक त्या रस्त्यातून जाण्याचे धाडस करीत नाहीत कारण त्यांना मुली जागोजागी अडवितात.

मी काही त्यावर विश्वास ठेवला नाही. परंतु येथे खरोखरच तसे घडते. सुंदर ड्रेस केलेल्या तरुणींचे घोळकेच्या घोळके जागोजागी आमचा रस्ता अडवीत आणि जोपर्यंत आम्ही त्यांना थोडे पैसे देत नव्हतो तोपर्यंत आमची सुटका होत नव्हती. पुन्हा पुढे तसेच. दुसरा घोळका! केव्हा केव्हा त्या एकमेकींच्या हातात हात घालून रस्ता अडवतात तर केव्हा दोरी आडवी धरून. एका ठिकाणी तर एका घोळक्याने बांबूच आडवा धरला होता.

अनुक्रमणिका

प्रथम प्रथम मी पैसे दिले परंतु नंतर आम्हाला दया न दाखविता जबरदस्तीने असे अडथळे डावलून जावे लागले, कारण त्याच रस्त्यावरून जाताना इतक्या वेळा तो रस्ता विकत घेण्याइतका मी श्रीमंत नाही.

मणिपूरमधील ह्या हरणाची जात त्या वस्तीत तशी दुर्मिळच आहे आणि शोधण्यासाठी कठीण आहे. परंतु सुदैवाने ह्या तीनही जाती बंदिस्त जागेतही व्यवस्थित राहू शकतात. कलकत्त्याच्या प्राणिसंग्रहालयात ह्या प्रकारची चार हरीणे व नव्या दिल्लीतील प्राणीसंग्रहालयात १ जोडी मणिपूर येथून नेलेली आहेत. ह्याच हरणाची ब्रह्मदेश येथे दिसून येणारी जात रंगून येथील प्राणीसंग्रहालयात दिसून येते. तेथे ती आता अकरा आहेत. आग्नेय आशियातील जात पॅरीसच्या व युरोपच्या आणखी काही दुसऱ्या प्राणीसंग्रहालयात आहेत.

मणिपूर वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या ह्या तरंगत्या अभारण्यांतील ह्या हरिणांचे नीट जतन करण्याचे ठरविले आहे; परंतु तरीही ह्या प्राण्यांची जात समूळ नष्ट होऊ नये म्हणून प्राण्यांच्या संग्रहालयांमधून त्यांना नीट वाचविण्याचे व त्यांचे जतन करण्याचे समांतर प्रयत्न देखील झाले पाहिजेत.

अनुक्रमणिका

**प्रकरण १७ वे**

## मानसमधील रानरेडे

मागच्या प्रकरणातल्या नाचणाऱ्या हरिणानंतर मला येथे सहज दिसून येणाऱ्या रानरेड्यांबद्दल सांगावेच लागेल. परंतु त्याची चर्चा करण्यापूर्वी पूर्व भारतांतील काही लहानशा व पोहोचण्यास दुर्घट अशा राखीव जंगलांबद्दल मला सांगावयाचे आहे. त्यात मला अंदमान बेटेही अंतर्भूत करावी लागतील.

अंदमान बेटे पोहोचण्यास दुर्घट आहेत. तीही भारताचाच एक भाग आहेत. कलकत्ता आणि मलाया ह्यांच्या मध्ये बंगालच्या उपसागरात ती वसलेली आहेत. मी तेथे कधीही गेलेलो नाही. परंतु भारतातील वन्यप्राणी जीवनाबद्दल लिहिताना ह्या बेटांना वगळून मुळीच चालणार नाही; कारण ह्या ठिकाणी एक गमतीचा प्रयोग करून पाहण्यात आला होता.

काही वर्षांपूर्वी अंदमानमध्ये काही चितळे पाठविण्यात आली होती. ह्या ठिकाणी पूर्वी फारशी वन्य जनावरे नव्हती. हरीणांना मारुन खाणारे कोणतेही मांसाहरी प्राणी तेथे नसल्यामुळे त्यांची संख्या फारच वाढू लागली. म्हणून तेथे त्यांच्या संख्येवर आळा बसावा म्हणून बिबळ्या वाघांच्या काही जोड्या सोडण्यात आल्या. ह्यामध्ये जोडी हा शब्द नीट लक्षात घ्यावयास पाहिजे—येथे दोन माद्या सोडण्यात आल्या होत्या. कारण जर ह्याही प्राण्याची नर मादींची जोडी सोडली असती तर कदाचित् ते देखील संख्येने वाढले असते व त्यांनी बऱ्याचशा हरिणांना नष्ट केले असते.

वाघासिंहाच्या जातींतील ह्या भक्षकांशी चितळ व हरिणाच्या जातीतील दुसरे प्राणी कसे काय वागतात? काहींचे म्हणणे असे आहे की हरिणासारखे प्राणी वाघ अगर बिबळ्याकडून आपण मारले जाऊ अशा भीतीच्या कायम दडपणाखाली आपले आयुष्य काढतात. परंतु तुम्ही—आम्ही लंडन किंवा कलकत्त्यासारख्या रहदारीने गजबजलेल्या रस्त्यांवरून वाहने चुकवीत रस्ता ओलांडताना जेवढे मृत्यूच्या भयाने पछाडलेले असतो तसे हे वन्यप्राणी भक्षकांकडून मारले जाऊ का अशा भीतीने पछाडलेले असतील की नाही याची शंकाच वाटते. आपल्याला धोक्याची जाणीव असते आणि दर दिवशी कितीतरी माणसे वाहनांखाली मरतात याचीही कल्पना असते. परंतु मनात मृत्यूची जाणीव न ठेवता जागरूकतेने रस्ता काळजीपूर्वक ओलांडतो.

तसंच बहुधा हरिणासारख्या ह्या वन्यपशूंना अरण्यात त्यांच्या हालचालींचे स्वातंत्र्य कमी झाले नसले तर वाटत असावे. धोक्याची जाणीव होताच त्याची प्रतिक्रिया अगदी आंतरिक प्रेरणेने आणि क्षणार्धात होते. भक्षकाच्या अस्तित्वाची अगदी किंचितशी चाहूल लागताच ती झटकन पळून जातात. परंतु ती भयाच्या दडपणाखाली यातना भोगत नाहीत किंवा जेव्हा संकट येऊन उभे ठाकते तेव्हा त्यांची तारांबळही उडत नाही.

मी टांगानिकामधील सेरेंगटीच्या उघड्या माळरानांत हे एकदा सविस्तर पाहिले. ती संध्याकाळची वेळ होती. दोन सिंहिणी आणि दोन मोठेसे छावे फारच भुकेले होते, आणि जवळच्या उंच वाढलेल्या दाट गवतातून बाहेर पडलेल्या प्राण्याची शिकार करण्याच्या बेतात ते नक्कीच असलेले दिसत होते. वाईल्डबीस्ट (अथवा ग्नू ...... हा एक गव्यासारखा दिसणारा परंतु केसाळ प्राणी आहे) इलंड, गेझेल (एक प्रकारचा

काळवीटाच्या जातीचा प्राणी) आणि इतर काळवीट त्यांच्या कट्टर शत्रूचे अस्तित्व जाणवूनही शांतपणे चरत होते. परंतु ते सर्व नक्कीच आपण स्वतः नाही पण कदाचित आपल्यातलेच दुसरे कोणीतरी त्या सिंहांचे भक्ष्य बनेल हे जाणून त्या मोठ्या मांजरावर (सिंहावर) डोळा ठेवून होते.

समतोल नीट राखला जावा म्हणून अंदमानमधील हरीणे व बिबळे वाघ यांच्या संख्येवर नीट लक्ष ठेवले पाहिजे. मी जेव्हा ह्या बेटावरील मुख्य वनरक्षपालकांना भेटले तेव्हा ते मला म्हणाले की हरिणांची संख्या अजूनही वाढत होती म्हणून कदाचित् आणखी एक (तिसरी) मादी येथे सोडावी लागेल. १९६० च्या फेब्रुवारीमध्ये तेथे ठिपकेवाल्या चोचीच्या बदकांच्या सहा जोड्या व मोरांच्याही आठ जोड्या सोडण्यात आल्या.

ओरिसा येथे सृष्टीचे नयनरम्य दृश्य दिसते. पूर्वीच्या मयूरभंज राज्यातील सिमलीपाल टेकडीला मी दोन उपयुक्त व फारच आदरातिथ्यशील अशा वनसंरक्षकांबरोबर दिलेल्या भेटीच्या गोड स्मृती माझ्या मनात रेंगाळत आहेत. ह्या टेकड्यांनी मला कान्हाची आठवण करून दिली. फरक फक्त एवढाच होता की येथील साल वृक्षांच्या जंगलांतील जवळजवळ सर्वच गवताळ दऱ्या गावकऱ्यांनी आणि त्यांच्या गाईगुरांनी व शेतीने भरलेल्या होत्या. फारच थोडे वन्यजीवन तेथे होते.

महानदीच्या सत्कोशी येथील सुंदर चिंचोळ्या भागातून आता वन्यजीवन फारच नाहीसे होत चालले आहे आणि त्यांच्यात घबराटही उत्पन्न होत चालली आहे. तेथील जंगलात आता फक्त गवे, सांबर व चितळेच दिसतात. ते देखील रात्री गाड्यांच्या प्रखर उजेडाच्या प्रकाशात. त्यांच्या डोळ्यांत विस्मयजनक घबराट दिसून येते.

ओरिसाच्या पश्चिम व दक्षिण भागांत अजूनही काही रानरेडे उरलेले आहेत. ह्या भागाला लागूनच असलेल्या आंध्र प्रदेशाच्या काहीं भागांतही विशेषतः गोदावरी नदीच्या काठच्या भागांत ते दिसून येतात. ह्या तीनही राज्यांच्या सहमताने त्यांचे संरक्षण केले गेले नाही तर त्यांचे भवितव्य धोक्यात आहे.

बिहारमध्ये हजारीबागजवळ राष्ट्रीय उद्यान आहे. पूर्वी येथे राखीव जंगले होती. ह्या जंगलांचा सर्वच दृष्टीने फारच उपभोग घेतला गेला होता. १९५७ मध्ये येथील वनविभागाच्या मुख्य वनपालकांनी मोठ्या दयाळूपणे मला ही जागा नीट दाखविली. ह्या जंगलांचे नीट संरक्षण करून येथे राष्ट्रीय उद्यान निर्माण करण्यासाठी तसेच येथील वन्यपशूंच्या संख्येची वाढ करण्याकरिता फारच स्तुत्य असे प्रयत्न झालेले दिसत होते.

पश्चिम बंगालमध्ये एक अतिशय उत्कृष्ट अभयारण्य आहे. त्याचे नाव जलदापारा. येथे ४० ते ६० गेंडे अजूनही अस्तित्वात आहेत. ते अभयारण्य १९३० ह्या दशकाच्या सुरुवातीस निर्माण केले गेले. इ. ओ. शेबियर—ज्यांनी भारतीय गेंड्यांच्या संरक्षणासाठी मोठाच हातभार लावला त्यांच्या प्रयत्नामुळे हे अभयारण्य तयार झाले. १९३० ह्या दशकाच्या शेवटाला बंगाल वनविभागाच्यासर्वोच्च पदावरून निवृत्त झाल्यावर शेबियर मलायामध्ये गेम वॉर्डन म्हणून गेले आणि आता ते ब्रिटनमध्ये त्यांचे निवृत्तीनंतरचे उर्वरित आयुष्य घालवीत आहेत.

अनुक्रमणिका

कचेरीतल्या कागदोपत्री कारभारापेक्षा जंगलातील काम जास्त बरे अशा मताचे तेव्हाच्या वनाधिकाऱ्यांच्या परंपरेतील ते एक गृहस्थ होते. ते एव्हरेस्ट पर्वतावर दोन वेळा गेले होते. त्यांच्याबद्दल मी कितीतरी गोष्टी ऐकल्या होत्या. ते गव्हर्मेंट हाऊसमध्ये काही कार्यक्रम वगैरे असले तरी कित्येक वेळा पायातील जोड्याची नाडी 'टाय' म्हणून गळ्याला बांधून जात तर केव्हा पायात मोजे न घालताच बूट घालीत असत. परंतु एक नोंद तर अशी दिसून येते की एकदा बंगालचा गव्हर्नर वाघाची शिकार करावयाला आला असताना हे गृहस्थ पायात बूट न घालता फक्त मोजेच घालून गेले आणि कोणीसे त्याबद्दल विचारले तर म्हणतात, ओह, अशा प्रसंगी आपल्याला थोडीफार धावपळ करावीच लागते.

पूर्वीच्या काळांत जेव्हा जीपगाड्या नव्हत्या तेव्हा ते स्वतः जंगलातून पायी गस्त घालीत किंवा हत्तीवरून जंगल तुडवीत व त्यांना जेथे जावयाचे असेल तेथे जाईपर्यंत मध्येच थांबत नसत. ते अगदी सर्व गोष्टींचे निरिक्षण करीत यावर माझा पूर्ण विश्वास आहे.—झाडांची परिस्थिती वन्यजीवन आणि जंगलात जे जे काही सुंदर व चमत्कारिक असेल ते सर्व ते पाहात. आजकालच्या दिवसात सर्वसाधारणपणे वनाधिकारी कागदोपत्री व्यवहार व फायलींच्या ढिगाऱ्यांत एवढे गुंतवले जातात की त्यांनी खरोखर बाहेर जेथे काम करावयाचे तेथे जाण्यास त्यांना संधीच दिली जात नाही; ही फारच दयनीय परिस्थिती आहे.

शेबियर हे अजूनही भारताच्या व जगाच्या इतर भागातील वन्यजीवनाचे संरक्षण करण्यात रस घेतात. त्यांनी १९५८ मध्ये हत्तींवर एक अतिशय उत्तम असे पुस्तक लिहिले. त्याचे नाव "सुंदर मुनी" ही एका भारतीय हत्तीची गोष्ट आहे.

मी जलदापारा अभयारण्यात दोनदा गेलो. हे अत्यंत सुंदर अभयारण्य आहे. भूतानच्या दक्षिण भागातून व मध्यावरून जोराने वाहणारी तोर्सा नदी त्यामध्ये समाविष्ट आहे. येथील जंगल व गवत काझीरंगापेक्षा खूप दाट आहे त्यामुळे येथे गेंडे शोधून काढणे फारच कठीण आहे. मला आठवते मी जेव्हा या ठिकाणाला दुसऱ्यांदा भेट दिली तेव्हा मी तेथील वनरक्षकाबरोबर व जिल्हा वनअधिकाऱ्याबरोबर हत्तीवरुन मैलचे मैल तुडविले; परंतु आम्ही गेंडा पाहू न शकल्यामुळे आम्हाला फारच वाईट वाटले.

दोन तीन तास फक्त उंच उंच वाढलेल्या 'एलिफंट ग्रास' (एक प्रकारचे उंच वाढणारे गवत) व खुरट्या झुडुपांच्या प्रदेशाखेरीज आम्हाला जंगलांत कुठचेच वन्यप्राणी दिसले नाहीत; परंतु तितक्यातच आम्ही २ गेंड्यांच्या अगदी जवळ असल्याचे आम्हाला दिसून आले आणि नंतर आणखीन गेंडे दिसून आले. आमची निराशा नष्ट होऊन आशेचे किरण फुलू लागले. अलीकडे येथील वनाधिकाऱ्यांनी तेथील गवत व झुडुपे जाळल्यामुळे आता गेंडे पाहणे सोपे झाले आहे असे माझ्या ऐकिवात आहे. जेथील गवताळ कुरणे व उंच झाडे ताब्यात न ठेवता वाटेल तशी वाढू दिलेली असतात अशा भागांपेक्षा जेथील गवत त्यामानाने कमी उंच असते अशा भागात शाकाहारी प्राणी जास्त पटकन् दिसू शकतात आणि ते तेथे व्यवस्थित जीवनही जगू शकतात.

त्यावेळेस मला ज्यांनी जलदापारा अभयारण्य दाखविले त्या वनपालकांचे नाव व्ही. एस्. राव असे होते. नंतर पुढे ते नव्या दिल्लीत I.G.F. (इन्स्पेक्टर जनरल ऑफ फॉरेस्ट) बनले.

श्री. राव हे वन्यप्राण्यांचे संरक्षण करण्याच्या बाबतीत फारच जागरूक होते, परंतु मला वाटते त्यांना ते अंमलात आणणे फार कठीण जात असावे. निदान त्यांना पाहिजे त्या दिशेने व हवी तशी पावले

अनुक्रमणिका

टाकता येत नसावीत. कारण येथील वनसंरक्षणाच्या एकंदर कायद्यातील अडचणी तसेच या देशातील चारशे चाळीस दशलक्ष इतकी लोकसंख्या लक्षात घेता येथील वन्यप्राणी व ते असलेल्या जागादेखील वाचविणे प्रत्यक्षरित्या किती तरी कठीण आहे.

बंगालच्या आणि तेथील प्रमुख जलदापारा अभयारण्याच्या पूर्वेला संकोष आणि मनास ह्या दोन नद्या आसाममध्ये वाहतात. (रंगीत छायाचित्र क्र. ९) ह्या दोन मोठ्या नद्या तोर्सा नदीप्रमाणेच हिमालयाच्या पायथ्याशी भूतान येथून उगम पावून पुढील मोकळ्या पठारावरून वाहू लागतात. मनास नदीच्या दोन्ही काठांवरील भाग भारतातील अतिशय उत्तम अशा अभयारण्याचा भाग आहे. ह्या भागामध्ये वन्यप्राणीही भरपूर आहेत. शिवाय तो भाग सुंदर वनश्रीने देखील नटलेला आहे. दोहोंचे असे मिश्रण जगातील इतर भागात क्वचितच् दिसून येईल.

मनास नदीशी पुराणांतील मानस देवीची पौराणिक कथा निगडित आहे. ह्या नदीच्या पुढेच मोथागुरी येथे वनविभागाचे विश्रांतिगृह आहे. येथेच पर्वताच्या पायथ्याशी रस्ता संपतो. विश्रांतिगृहापासून नदीच्या प्रवाहाच्या वरच्या दिशेने अर्धाएक मैल चालून गेले, की तुम्ही 'व्ह्यू' पॉईंटवर पोहोचाल. येथून तुम्हाला नदीचा प्रेक्षणीय विस्तार आणि भूतानमधील पूर्व हिमालयाच्या खालच्या पातळीवरच्या टेकड्यांच्या एकावर एक अशा रांगांच्या रांगा दृष्टीस पडतील. विश्रांतिगृहाच्या खालच्याच बाजूला मुख्य नदीला दोन फाटे फुटतात. पश्चिमेकडील मनास आणि पूर्वेकडील बेकी. ह्या दोन नद्यांना पुढे अनेक फाटे फुटून त्यांच्या छोट्या छोट्या नद्या होतात. त्या पुढे कुठे कुठे एकत्रित होऊन त्यांच्यामध्ये बेटे तयार होतात.

भूतान सरहद्दीच्या दक्षिणेकडच्या अभयारण्यांत १०५ चौ. मैलांचा टापू आहे. हा नद्यांची पात्रे, गवताळ कुरणे व वेगवेगळ्या प्रकारच्या मिश्र जंगलांनी व्यापलेला आहे. भूतानच्या उत्तर सरहद्दीवरील टेकड्या जंगलांनी भरलेल्या आहेत आणि अजून तरी तेथे खेडी वसली गेली नाहीत. रानटी हत्ती, गवे, सांबार आणि इतर वन्यप्राणी आसामपासून भूतानकडे आणि पुन्हा आसाममध्ये सहज येतात किंवा जातात.

भूतानच्या उत्तरेकडील सरहद्दीवर एक अभयारण्य निर्माण करण्यास भूतानला किती सुवर्णसंधी आहे पहा; कारण हे एक स्वतंत्र राष्ट्र असूनही एका विशेष तहामुळे भारताशी अगदी जवळीकतेने जोडले गेले आहे. जवळजवळची ही दोन अभयारण्ये दोन जवळजवळच्या राष्ट्राराष्ट्रातील उपवने म्हणून आणखीनच वरच्या पातळीवरून एकमेकांना जास्त फायद्याची ठरू शकतील. मी कित्येक वर्षांपासून भूतान सरकार व भारतातील आसाम सरकारशी ह्यावर चर्चा करून वरील मुद्दा मांडला. साधारणतः माझे मत नेहमीच सहानुभूतीने विचारात घेतले जाते परंतु प्रत्यक्षात काही तसे घडत नाही! आणखी काही वर्षांनी काही करणेही अशक्य होईल. कुदळी, फावडी आणि गाईगुरे घेऊन एकदा का लोक येथे वसाहती करण्यास घुसले की संपलेच ..

आसामच्या वायव्येकडे आणि अगदी पूर्वेकडे म्हणजे दारंगा जिल्ह्यातील धुनसीरी नदीपर्यंतच्या भागात काही चितळ आहेत. आसामच्या बाकीच्या भागात जेथील जंगले दाट व सदाहारित आहेत व जेथे पानझडी वृक्ष फारसे नाहीत अशा ठिकाणी ती कधीही दिसून येत नाहीत. आसामच्या इतर भागांत ही ठिपकेवाली हरणे पाहिल्याचे कित्येकजण सांगतात परंतु ती बहुधा "हॉग डिअर" ह्या जातीच्या हरीणाची छोटी किंवा अर्धवट वाढलेली पाडसे असावीत. कारण ती पूर्ण वाढून सरसकट मातकट रंगाची होण्यापूर्वी त्यांच्याही अंगावर सुंदर ठिपके असतात. त्यामुळे चूक होण्याचा संभव आहे.

भारताच्या आग्नेयेकडील दाट जंगलात दिसून येणारा एक वैशिष्ट्यपूर्ण प्राणी म्हणजे लाजरे माकड (स्लो लॉरीस) (छायाचित्र क्र. ४०) हा प्राणी बहुधा एकेकटा किंवा जोडीने दिसून येतो. गुबगुबीत असा हा प्राणी राखाडी उदी रंगाचा असतो. त्याच्या पाठीवर खालच्या बाजूस मातकट रंगाचा पट्टा असतो. तो निशाचर असून पाने, फळे व कीटक खातो. दिवसा तो आपल्या अंगाचे मुटकुळे करून झोपतो त्यावरून त्याला स्थानिक भाषेत लाजरे मांजर असे नाव मिळाले आहे. खरे पाहता हा प्राणी माकडाच्या जातीचा आहे.

एखाद्या गोष्टीवरील त्याची पकड अगदी पक्की असते आणि तो त्याच्या पुढच्या पायांनी पकडलेली फांदी दुसरा घट्ट आधार मिळाल्याशिवाय मुळीच जाऊ देत नाही. त्याचे मोठे चकाकते, भावदर्शक डोळे; त्याच्या भोवती असलेल्या गडद रंगाच्या रिंगणांमुळे फारच उठून दिसतात. कित्येक सिनेतारकांना त्याच्या डोळ्यांचा हेवा वाटत असेल. दक्षिण भारतात व सिलोनमध्ये ह्याचा दुसरा जातभाई दिसून येतो. हा प्राणी थोडा कमी सुंदर असतो—त्याचे नाव "तेवांग" (स्लेंडर लॉरीस) असे आहे. तो अंगाने थोडा हडकुळा असून त्याचे हातपाय लोंबकळत असल्यासारखा तो दिसतो.

मनास अभयारण्यात अगदी नाममात्र गेंडे उरले आहेत. पूर्वी ते तेथे भरपूर असत. परंतु आसाममधील हा भाग पोहोचण्यास अवघड असा असल्यामुळे अशा चोरट्या शिकाऱ्यांना आळा घालणे तेथील स्थानिक रहिवाशांना नेहमीच फार कठीण होते. मला वाटते तेथे आता फक्त १०/१५ च गेंडे उरलेले असावेत; आणि संकोश नदीच्या आसपास आणखी दोन तीन जास्त असावेत. रानटी हत्ती ह्या अभयारण्यात दिसून येतात. केव्हा केव्हा वाघही दिसून येतो.

मनासचे अभयारण्य रानरेड्यांसाठी प्रसिद्ध आहे. (छायाचित्र क्र. ४४-४५) ह्या भागातील रानरेडे भारताच्या इतर भागांतील रानरेड्यांपेक्षा जास्त धष्टपुष्ट असून त्यांची शिंगे देखील जास्त मोठी असतात. माद्यांची शिंगे लांबट असतात तर नरांची जाड असतात.

आसाममधील रानरेडे व भारतातील ओरिसा, मध्य प्रदेश व आंध्र प्रदेश ही तीन राज्ये जेथे एकत्र मिळतात त्या भागातील रानरेडे खरोखरचे रानटी अवस्थेतील आहेत—पाळीव म्हशींचे पूर्वज. ते सिलोन, उ. ऑस्ट्रेलिया व जगाच्या इतर भागांतील रानरेड्यांप्रमाणे काही अंशी माणसाळवलेले व नंतर पुन्हा जंगलात गेलेले—'पोळा' सारखे नाहीत. आसाममधील पाळीव म्हशी किंवा रेडे हे बरेचसे रानटी रानरेड्यांसारखे वाटतात; परंतु त्यांच्याहून आकाराने लहान असतात कारण त्यांच्या मध्ये आपापसांत संयोग होऊन मिश्र रक्तापासून ते तयार झालेले आहेत. भारताच्या इतर भागात पाळीव म्हशी ह्या अगदी वेगळ्याच वाटतात. कारण भरपूर दूध मिळावे म्हणून त्यांच्यात कित्येक शतकांपासून वेगवेगळ्या संकरित जाती निर्माण केल्या गेल्या आहेत.

जेव्हा जेव्हा तुम्हाला रानरेड्यांचे कळप दिसतील तेव्हा अनेकदा एकेकटा नर पाळीव गुरांच्या चरण्यात कुरणांत पाळीव गाई किंवा म्हशींबरोबर संभोग करण्यासाठी शिरलेला दृष्टीस पडेल. असे जेथे घडते तेथे गुराख्यांना पाळीव नर (रेडे) ठेवता येत नाहीत. कारण त्यांना हे रानरेडे जास्त बलवान असल्यामुळे सहज ठार मारू शकतात. एका रानटी रानरेड्याने पाळीव ८/९ रेडे मारल्याची घटना मला माहीत आहे. (छायाचित्र ४३)

असे रानटी रानरेडे जेथे आढळतात तेथे योगायोगाने सर्वच पोळ म्हशी ह्या रानटी रानरेड्यांकडून गाभण राहतात. पुढची प्रजोत्पत्ती त्यामुळे पाळीव जातीच्या पिलांपेक्षा जास्त बलवान् व मोठी होते.

मला जेव्हा जेव्हा असे रानटी रानरेडे अभयारण्याच्या आसपासच्या गुरेचराईच्या जागेत दिसतात तेव्हा तेव्हा मी तेथून जात असताना तेथील गुराख्यांना ही अशी मिश्र रक्ताची पुढची प्रजोत्पत्ती आवडते का ते विचारतो. कित्येकदा त्यांची उत्तरे गोंधळलेली व काहीच अनुमान न काढलेली अशी असली तरी मला वाटते असे म्हणावयास हरकत नाही की अशा प्रकारे मोठे आणि बलवान पाडस जरी जन्माला आले तरी ते म्हशीच्या दुधाचा पुरवठा मात्र कमी करते. शिवाय असे पाळीव रेडे शेतीच्या कामाला किंवा गाडीला जुंपताना हाताळणे फार कठीण जाते.

कळपातील रानरेडे फारच जागरूक असतात. छायाचित्रणासाठी त्यांच्या जवळ जाणे फारच कठीण असते. साधारणतः ते तसे धोकादायक मुळीच नसतात. परंतु एकटा दुकटाच नर असेल तर तो फारच मस्तवाल असू शकतो. हे बहुधा त्यांना गुराख्यांकडून वारंवार त्रास झाल्यामुळे असावे. एकदा मी हत्तीच्या पाठीवरून काझीरंगा अभयारण्यांतून जात असताना एका रानरेड्याने माझ्यावर हल्ला चढविला होता. परंतु माहुत जर हत्तीला बिनधास्तपणे नीट उभा करू शकत असेल तर रानरेडा क्षणार्धात तेथेच उभा राहील किंवा डोक्याला डोके भिडविण्याचे टाळून विजेच्या वेगाने नाहीसा होईल. मी एकदा पायी चालत असता एका रानरेड्याने माझ्यावर हल्ला चढविला होता. परंतु मी सुदैवाने बचावलो.

आपण पायी जात असता अशा एकट्या दुकट्या रानरेड्याच्या अगदी जवळ जावयाचे असेल तर उत्तम उपाय म्हणजे पाळीव म्हशींचा छोटासा कळप असलेल्या गुराख्याशी संधान बांधावे. तुम्ही त्या म्हशींच्या कळपाकळपाबरोबर जात जात रानटी रेड्याच्या अगदी जवळपर्यंत जाऊ शकता. जोपर्यंत तो पाळीव म्हशींच्या रिंगणात असतो तोपर्यंत त्याला फारच दिमाखात वावरल्यासारखे वाटते.

ज्यांनी रानरेड्यांच्या पुष्कळ शिकारी केल्या आहेत त्यापैकी बऱ्याचशा शिकाऱ्यांनी शिकारीचे वर्णन लिहिताना मोठ्या रानरेड्याबरोबर एक छोटा रानरेडा नेहमी असतो असे लिहिले आहे. हा छोटा रानरेडा 'चेला' ह्या नावाने ओळखला जातो. हा मोठ्या रानरेड्याच्या सोबती तसेच विद्यार्थीही समजला जातो. परंतु माझ्या आसाममधील एकेकट्या रानरेड्यांच्या अनुभवात मी केव्हाही चेला पाहिल्याचे मला आठवत नाही. रानरेडा मी सर्वस्वी एकेकटाच पाहिलेला आहे.

मनास अभयारण्यातून फेरफटका करण्यासाठी हत्ती मिळू शकतात. ते नदीपासून दूर जंगलाच्या दाट भागांतून फिरावयास फारच सोयीचे पडतात. त्यांच्यावर बसून आपण गवे, सांबर, भेकरे पाहू शकतो. परंतु हे अभयारण्य पाहण्याचा उत्तम मार्ग म्हणजे रबरी बोटीत बसून नदीच्या खालच्या बाजूस दहाएक मैल जावे. मनास व बेकी नदीच्या काठाच्या वाळूच्या व मोठमोठे दगडगोटे असलेल्या किनाऱ्यावर तसेच तिच्या ओढ्यांच्या गवतानी भरलेल्या कडांवर तुम्हाला कितीतरी रानरेडे, 'हॉग डीअर', जंगली कुत्रे आणि एखादे वेळेस वाघही दिसून येईल. विश्रांतिगृहात तुम्हाला व तुमच्या घडीच्या बोटीला परत न्यावयास तुमची जीपगाडी किंवा मोटार तेथे खालच्या बाजूस येईलच.

तुम्ही नदीवर असताना आणखी एक जनावर बरेचदा तुमच्या दृष्टीस पडेल. ते म्हणजे पाणमांजर (ऑट्टर-Otter) ह्या प्राण्याला बुड्या मारताना; तसेच मासे पकडण्याकरिता अथवा गंमत म्हणून

अनुक्रमणिका

खेळताना—सुळकन् इकडून तिकडे वळताना, किंवा नुसताच उन्हं अंगावर घेत बसला असताना पाहणे फारच मजेशीर व मनोरंजक आहे. ही पाणमांजरे पाहिल्यावर मी चहाच्या मळ्यात काम करीत असताना माझ्या तरुण वयात मी एक पाणमांजर पाळले होते त्याची आठवण मला नेहमी येते.

ते पाणमांजर माझ्या कुत्र्यामांजरांबरोबर खेळत असे. माझ्याबरोबर ते फिरावयास देखील बाहेर येत असे. माझ्या पुढे पुढे ते धावत असे. रस्त्याला कुठे फाटे फुटत असले किंवा रस्ता ओलांडावयाचा असला तर ते थांबून मी कोठच्या बाजूला जात आहे ते नीट पाहून माझ्या पुढे ती जागा धरीत असे.

ईझाक वॉल्टन यांचे जे अनुयायी असतील विशेषतः त्यांना अशा रबराच्या बोटीत बसून नदीच्या खालच्या बाजूस जाऊन अभयारण्य पाहण्याची पद्धती जास्त उपयुक्त आहे. कारण येथे गळ टाकून मासे पकडता येतात. उ. अमेरिकेतील राष्ट्रीय उपवनांत जसे मासेमारीला उत्तेजन देण्यात येते तसेच येथेही देण्यात येते. जसे वन्यपशू किंवा पक्ष्यांची शिकार करण्यामुळे अभयारण्याचा बाह्य देखावाच बदलला जातो तसे काही मासे पकडल्यामुळे होत नाही. शिवाय नदीतील काही मासे मारण्यामुळे उलट उरलेल्या माशांचा खाद्यपुरवठा आपोआपच वाढला जातो. (म्हणीला अनुसरून—मोठ्या माशांचा निकाल लागल्यामुळे!)

तोफगोळे किंवा डायनामाईट टाकून अथवा काही प्रकारची नाशक द्रव्ये टाकून किंवा मोठमोठी जाळी टाकून जे सरसकट सर्वच मासे पकडले जातात ते नियमबाह्य असून अगदी तत्त्वबाह्य देखील आहे. तसेच तो सर्व समाजाविरुद्धचा गुन्हा आहे. कारण अशा प्रकारे माशांचा नाश करणे म्हणजे त्यांचा अगदी पूर्ण ऱ्हासच. त्यामुळे फक्त काही माणसांचाच फायदा होतो आणि ह्या नैसर्गिक सांधनसंपत्तीचा जो अनेकांना फायदा घेता येऊ शकला असता तो दुरावला जातो.

थंडीच्या दिवसांत जे मासे गळ टाकून पकडण्यात येतात ते "माशीर" जातीचे मासे (केव्हा केव्हा यांना चुकून "इंडियन सामन" असे म्हटले जाते.) आणि बोकर किंवा काटली. केव्हा केव्हा "इंडियन ट्राऊट" जातीचे मासेही आग्नेय भारतातील नद्यांमध्ये पकडले जातात. हे छोट्या आकाराचे असून त्यांच्या पराकडे दोन्ही बाजूला पोलादी निळसर रंगाचे ठिपके असतात.

मनास नदीत असाच गळ टाकून ४० पौंड वजनाचा माशीरही पकडण्यात आलेला आहे, परंतु ह्याहूनही मोठे मासे बहुधा येथे असावेत. माझ्या माहितीप्रमाणे ब्रह्मपुत्रेतील उच्चांक ५६ पौंडाचा आहे. दक्षिण भारतात अजूनपर्यंत पकडण्यात आलेला सर्वात मोठा मासा १२१ पौंड वजनाचा होता. १२ ते १५ पौंड वजनाचे बोकर अथवा काटली मासे सहसा पकडले जातात. परंतु कित्येकदा कोळी लोक ह्याहूनही जास्त वजनाचे अशाच जातीचे मासे पकडल्याचे सांगतात. परंतु ते नक्की जात सांगत नाहीत. आपण कोळ्यांवर किती विश्वास ठेवू शकू? असो सर्वसाधारण मच्छिमारांपेक्षा मला जास्त मोठे मासे मिळतात असे मात्र मला वाटते. कदाचित हे मला वेगवेगळ्या जातींचा अंदाज नसेल म्हणूनही वाटत असेल.

मला आठवते मी एकदा माशीर पकडला होता आणि त्याचे वजन भरले त्याहूनही खूपच कमी असेल असा मी अंदाज केला होता. परिणामी माझ्या दोघा सहकारी मित्रांनी मला मी केव्हाही उत्तम मच्छिमार होऊ शकणार नाही, असा गमतीने शेरा मारला होता.

अनुक्रमणिका

मी उत्तम मासेमारी करू शकत असेन वा नसेन; परंतु माझ्या आयुष्यांतले काही आनंदाचे दिवस मी भारतांतील काही सुंदर जागी अशा स्फटिकासारख्या स्वच्छ, खळखळ वाहणाऱ्या नदीच्या किनाऱ्याशी बसून घालविले आहेत. मासेमारी करतानाच्या अशा शांत व निरुपद्रवी वातावरणात फारच मजा वाटते. तो निर्जन एकटेपणा अन् रम्य आणि न गढुळलेल्या अशा निसर्गातील शुद्ध हवा मी नुसती पिऊन घेतो. अशा वेळेस रोमारोमात आनंद पसरतो अन् माणूस अगदी क्षुद्र वाटू लागतो (वरील वर्णन ज्या काव्यातून घेतले गेले ते काव्य कोलंबो बंदरात बिशप हेबर ह्यांनी लिहिलेल्या देवाच्या स्तुतीपर काव्यातले आहे असे मला सांगण्यात आले. यावेळी तेथील रहिवाशांचेकडून त्यांचे सामान हरविले. परंतु हे कितपत खरे आहे हे मला माहीत नाही.)

आणि ह्या मनास व बेकी नद्यांमध्ये किती सुंदर सुंदर पक्षी दिसावेत! यांपैकी काही ठळक म्हणजे पेलिकन पक्षी. हे उडत उडत नदीच्या वरच्या भागाकडे जातात नंतर पाण्यावर तरंगत तरंगत खालच्या भागाकडे मासेमारी करीत करीत येतात. हे अगदी संध्याकाळी विश्रांतीसाठी परतण्यापर्यंत चालते. पाणकावळ्यांचे कितीतरी थवेच्या थवे इकडे तिकडे उडत असतात. मधूनच त्यांचे खाणे शोधण्यासाठी ते पाण्यावर स्थिरावतात. छोटे बगळे मोठ्यामोठ्या थव्यांनी नदीच्या पात्राच्या वरच्या–खालच्या अंगाने उडत राहतात.

मनास नदीवर थंडीच्या दिवसांत नेहमी दिसून येणारे बदक म्हणजे “रेड ब्रेस्टेड मर्गेन्सर” हिवाळ्यात दगडगोटे असलेल्या नदीच्या किनारी शराटी पक्षी देखील फेऱ्या घालतात. परंतु मला सर्वांत अधिक आवडणारे दृश्य म्हणजे नदीच्या चौफेर पात्रावरून उडणारे राखाडी रंगाचे असंख्य धनेश पक्षी.

हे फारच सुंदर दिसणारे पक्षी दरवर्षी फेब्रुवारीच्या शेवटाच्या आठवड्यापासून ते मार्च एप्रिलपर्यंत येथे संध्याकाळच्या वेळी विश्रांतीसाठी येतात. ते बसल्यामुळे टेकडीच्या उतारावरची सगळी झाडे त्यांच्या वजनाच्या भारामुळे वाकल्यासारखी दिसतात. सकाळी ते धनेश उडून जातात. कलकलाट करणाऱ्या ह्या धनेश पक्ष्यांची अशी सुंदर सभा ही वर्षांतल्या फक्त ह्याच दिवसात आणि संध्याकाळच्या वेळी विश्रांतीसाठी परतल्यावर भरते. कदाचित् ती घरटी बांधण्यासाठी जोडीदार मिळावा म्हणून असावी अशी शंका येते.

कॉर्बेट राष्ट्रीय उपवन वनविभागाच्या विश्रांतिगृहात केव्हा एकदा वाघाने विश्रांती घेतली होती तर मनास अभयारण्याच्या विश्रांतिगृहात रानटी अस्वलाने एकदा मुक्काम केल्याची नोंद आहे. थोड्या काळानंतर एक वनाधिकारी फिरतीवर असताना त्या विश्रांतिगृहात उतरला. त्याला ती जागा फारशी साफ नसल्याचे दिसून आले. वनाधिकारी जरा गमत्या होता त्याने विश्रांतिगृहाच्या रजिस्टरमधील अभिप्रायासाठी असलेल्या जागेत लिहिले की माझ्या आधी गोष्टीतल्या अस्वलभाऊने येथे मुक्काम केला असल्याने मला जागा फारच साफसूफ करावी लागली.

वर्षाच्या शेवटी वनखात्याच्या जमाखर्च वहीत हिशेब तपासनीस अधिकारी थोडे विनोदात स्वारस्य घेत नसल्याचे दिसून आले. त्या वनाधिकाऱ्यांनी शेरा मारला, “असे दिसून येते की त्या आधीच्या गृहस्थांनी त्यांचे नाव, हुद्दा, ते किती काळ राहिले तो कालावधी वगैरे नोंदणीवहीत लिहिले नाही तसेच त्यांनी भाडेही दिलेले नाही. तेव्हा ते भाडे त्यांच्या नंतरच्या उतारूकडून वसूल केले पाहिजे.” हिशोब तपासनिसांची आणखी एक गोष्ट–झुऑलॉजीकल गार्डनमध्ये एकदा मॅगपाय् पक्ष्यांची संख्या वाढल्याबद्दलची आहे. त्यांपैकी काही पक्षी विकून आलेले पैसे प्राणिसंग्रहालयाच्या खात्यात जमा केले गेले. हे जास्तीचे पक्षी

अनुक्रमणिका

विकताना काही पैसे उतारू भाड्यावर म्हणा किंवा कशावर खर्च झाले होते. म्हणून खर्चाच्या रकान्यात त्याची नोंद केली गेली होती–हे पक्षी विकण्यावर झालेला खर्च रु. ४ ("For retailing magpies-Rs. 4"). हिशेब तपासनीसांकडून दोन हरकती आल्या. त्या अशा–एक ह्या पक्ष्यांच्या शेपट्या कशा तुटल्या त्याचे सविस्तर कारण हवे व दुसरी म्हणजे ह्या शेपट्या (re-tailing) जोडण्याचे काम प्राणिसंग्रहालयातील कर्मचारीवर्गानेच का केले नाही?

अनुक्रमणिका

## प्रकरण १८ वे

# सोनेरी वानरांचा शोध

हिमालयाच्या पायथ्याकडे उत्तर प्रदेशापासून ते आसामपर्यंत सर्वत्र दिसून येणारे दोन छोटे प्राणी आता फारच धोक्यात आले आहेत व नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. हे म्हणजे रानससा (hispid hare) व छोटे रानडुकर (Pygmy hog). ह्या सशाच्या लांब व राठ केसांमुळे त्याला हे नाव मिळाले आहे. आकाराने हा सर्वसाधारण सशाइतका असतो; परंतु त्याचे कान लहान असल्यामुळे तो रॅबिटप्रमाणे वाटतो. त्याला पूर्वी 'आसामी रॅबिट' असेच नांव होते. स्ट्रँडेलच्या 'मॅमेलीया ऑफ इंडिया' ह्या पुस्तकात त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे—छोटे डोळे, तौलनिक दृष्ट्या पाठचे पाय थोडे छोटे, राठ केसांत मध्येच काळे केस, पाठीवर सर्वसाधा-रणतः विटकरी, उदी रंग व पोटाकडे मळकट पांढरा रंग. शेपूट पूर्ण लालसर मातकट रंगाचे सर्वसाधारण रानसशाच्याच आकाराचा असतो, परंतु कान मात्र तीन इंचाहून लहान असून शेपूट साधारण दोन इंच लांबीचे असते. (रॅबिट—घरात पाळतात तो पांढरा ससा—मूळचा इंग्लंडमधला.)

शेबीयरच्या वेळेपासून ह्या जातीच्या सशाच्या अस्तित्वाबद्दल मी ऐकले नव्हते. ते म्हणतात की त्यांनी ते शोधून काढले. १९०७ ते ११ च्या दरम्यान ते जेव्हा आसाममधील गोलपारा वनविभागामध्ये कामाला होते तेव्हा तेथे ते ससे फारसे काही दुर्मिळ नव्हते. ते मुख्यतः उलू जातीच्या गवतावर उपजीविका करतात. ते गवत ३/४ फूट उंच वाढते. केव्हा केव्हा सुक्या गवताळ प्रदेशांतील बरचसा भाग ह्या गवताने व्यापून टाकलेला दिसतो. शेबीयर पुढे म्हणतात की प. बंगालमधील बक्सा येथे जेव्हा १९११ च्यासुमारास त्यांची बदली झाली होती तेव्हा तेथे अगदी कमी म्हणजे नक्की एखादाच ह्या जातीचा ससा त्यांच्या पाहण्यात आला होता.

मी केव्हाही त्या जातीचा ससा स्वतः पाहिलेला नाही, एखादेवेळेस जर हा ससा खरोखर अस्तित्वात असला तर तो पाहण्याकरिता सध्या मी ह्या भागांतील मळेवाले व इतर लोकांनी ह्या विषयांत रस घ्यावा त्याकरिता प्रयत्न करीत आहे.

जेथे तो हिस्पिड जातीचा ससा आढळून येत असे अशाच पर्यावरणात छोटे रानडुक्करही (छायाचित्र क्र. ४७) आढळून येत असे. मनास अभयारण्याच्या पूर्व तसेच पश्चिम बाजूकडेही छोटे रानडुक्कर दहा बारा वर्षांपूवी पाहिल्याचे सांगणारे काही शिकारी मला भेटले आहेत.

हे छोटे रानडुक्कर दिसावयाला त्याच्या मोठ्या चुलत भावासारखेच (रानडुक्करासारखे) आहे, फक्त ह्या पूर्ण वाढलेल्या डुकराचीही खांद्यापर्यंतची उंची १० इंचाहून जास्त असत नाही.

मी अजूनही ह्या जातीचा ससा अस्तित्वात आहे का, हे हुडकून काढण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे. हे दोन प्राणी जर नाहीसे झाले तर ती खरोखरच दयनीय परिस्थिती होईल. आणि ती कधीही भरून न काढता येण्याजोगी तूट होईल.

अनुक्रमणिका

अजूनपर्यंत जरी 'यती' आणि 'बुरु' यांच्यासारखे कोणतेही प्राणी इतकी भ्रमंती करूनही व ह्या गोष्टीला प्रसिद्धी देऊनही शोधून काढण्यात आलेले नाहीत तरी अलीकडे त्याच भागांमध्ये एक नवीन जातीचे वानर पायथ्याकडील भागांत शोधून काढण्यात आले आहे.

ही नवीन जात म्हणजे सोनेरी वानराची (गोल्डन लंगूर). (रंगीत छायाचित्र क्र. ९) ही जात मी शोधून काढल्यामुळे "झुऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया" ने तिला "प्रेसबायटीस गीई" किंवा गी' ज लंगूर ('गी' चे सोनेरी वानर) असे नाव दिले.)

भारत भूतानच्या सरहद्दीपासून जवळच असलेल्या संकोश नदीच्या पूर्व किनाऱ्यावर जामद्वार जवळ पिवळसर रंगाचे वानर पहाण्यात असल्याच्या नोंदी बऱ्याच वर्षापासून आहेत.

१९०७ मध्ये इ. ओ. शेबीयर ह्यांनी ह्या प्राण्याच्या अस्तित्वाची पहिली नोंद केलेली आढळते. परंतु त्यांच्याकडे सबळ पुराव्याकरिता छायाचित्र नव्हते किंवा ह्या जातीचा जिवंत अथवा मेलेला प्राणीही परीक्षेकरिता ते उपलब्ध करू शकले नाहीत.

१९४७ मध्ये सी. जी. बर्टन ह्या नावाच्या एका निसर्गप्रेमी शिकाऱ्याने ही वानरे पाहिली होती व त्यांनी विश्रांतिगृहाच्या अभिप्राय वहीत नोंद केली होती की, "मी काही पांढरी वानरे पाहिली .... आणि मला तरी वाटते अजूनपर्यंत त्यांची जात कोणीही शोधलेली नाही. त्यांचे संपूर्ण शरीर व शेपटी एकाच रंगाची आहे—चंदेरी सोनेरी रंगाची—एखाद्या रुपेरी केसांच्या गोऱ्या युवतीच्या केसांसारखी. दुसऱ्या वर्षी दुसऱ्या शिकाऱ्याने अभिप्रायांच्या वहीत शेरा लिहिला होते; "त्याने फिकट पिवळ्या रंगाची संकोश वानरे पाहिली."

१९४० ह्या दशकाच्या शेवटाला व १९५० च्या सुरुवातीला संकोश नदीच्या आसपास असलेल्या पिवळसर रंगाच्या वानरांबद्दल वारंवार सांगण्यात आले होते. म्हणून मी जामद्वारला भेट देऊन वानरांची एखादी नवीन जात आहे की काय हे शोधून काढण्याचे ठरविले.

ठरल्याप्रमाणे १९५३ च्या नोव्हेंबरमध्ये मी जामद्वारला गेलो. तेव्हा नदीच्या पूर्वेकडील बाजूस भूतानच्या जवळ ह्या सोनेरी वानरांचे दोन कळप पाहून मला फारच आनंद झाला. तेव्हा हिवाळ्याचा हंगाम असल्यामुळे त्या वानरांचा रंग चेस्टनटच्या फळासारखा दिसत होता. वर्षाच्या वेगवेगळ्या हंगामात त्यांचे रंग बदलतात हे नंतर मला कळून आले. हिवाळ्यात असलेला सोनेरी किंवा चेस्टनटच्या फळासारखा परंतु बराचसा फिकटसा रंग उन्हाळ्यातील गरमीत फिकट पिवळसर होतो.

ह्या अतिशय सुंदर अशा वानरांचे माझ्या स्थित तसेच सिने—कॅमेऱ्याने मी छायाचित्रण केले आणि त्यांचे निरिक्षण करण्यात पुष्कळ दिवस घालविले. मोठ्या कळपांत ३०/४० वानरे होती तर छोट्या कळपात पंधराएक सभासद होते. माझे मित्र प्रवाहाच्या खालच्या बाजूस मासेमारी करीत होते तेव्हा त्यांनी तिसरा कळप पाहिला.

एक दिवस मोठ्या कळपांतील वानरे झाडांच्या शेंड्यावर फळे खात व खेळत असताना मी त्यांच्या कळपाच्या पाठोपाठ जात होतो आणि त्यांचे छायाचित्रण करण्यात मी गर्क झालेलो असताना एक मोठेसे

वानर फांद्या फांद्यावरून खाली येत येत माझ्यापासून केवळ काही फुटांवर येऊन ठेपले. ते झाडाच्या शेंड्यावर जाण्यापूर्वी त्याने माझ्याकडे धमकीवजा जळजळीत कटाक्ष टाकला. मला वाटते मला घाबरविण्यासाठी त्याने हे केले असावे. मी जागच्या जागीच स्तब्ध झालो. बहुधा ही वानरे भित्री असून अपायकारक नसावीत. आपल्या येथली माकडे जशी तांदळाच्या किंवा इतर धान्यांच्या पिकांत घुसून नासधूस करतात तसे ती करीत नाहीत हे मला नंतर कळले.

पुढील वर्षी मी लंडनमध्ये होतो आणि ह्या वानरांच्या अस्तित्वाबद्दल मी लंडनच्या झुऑलॉजिकल सोसायटिच्या डॉ. डब्ल्यू. सी. ओस्मान हिल यांना सांगितले. ते म्हणाले ही बहुधा नवीन जात असावीसे त्यांना वाटते.

१९५५ च्या जानेवारी महिन्यात IBWL ची कलकत्ता येथे सभा होती. तेव्हा गव्हर्मेंट हाऊसच्या सभासदांना ह्या वानरांची मी घेतलेली फिल्म दाखविली. झुऑलॉजिकल सोसायटीचे तेव्हाचे डायरेक्टर डॉ. एस्. एल्. व्होरा तेथे हजर होते. त्यांना माझ्या ह्या फिल्ममध्ये तसेच ह्या वानरांच्या माहितीत रस वाटला. माझ्या विनंतीवरून त्यांनी त्यांच्या संशोधक मंडळींना ह्या भागात शोध घेऊन काही नमुने गोळा करण्याच्या सूचना दिल्या. ही संशोधक मंडळी श्री. एच. खजुरीया यांच्या नेतृत्वाखाली काम करीत होती. त्यांनी नमुन्याकरिता सहा कातडी गोळा केली. त्यांतील एक माझ्या विनंतीवरून ब्रिटीश म्युझियमला भेट देण्यात आले. ह्या वानराची ही नवी जात नमूद करताना खजुरीयांनी त्यांच्या कचेरीतील नोंदीत वानराच्या ह्या जातीचे नांव प्रेसबायटीस गीई" असे दिले आहे. त्याबद्दल मी त्यांचे नम्रतापूर्वक आभार मानतो.

मनास नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर बरेचसे पूर्वेकडेही ह्या जातीची वानरे आढळून येतात असे श्री. बॅरोन यांनी नोंदविले होते आणि तेथील जिल्हा वनाधिकाऱ्यांनीही ह्या विधानाला दुजोरा दिला होता. परंतु १९४९ मध्ये व १९५२ मध्ये मी दोनदा मनास येथे राहिलो होतो, आणि मी जरी नदीच्या पूर्व बाजूस टोपीधारी हनुमान वानरे पुष्कळशी पाहिली होती; तरीही मी तेथे एकही सोनेरी वानर पाहिले नव्हते म्हणून मी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या शिफारशीनुसार १९५९-६० च्या हिवाळ्यात वायव्य आसामच्या भागात दौरा करण्याचे ठरविले.

मी प्रथम संकोश नदीवरील जामद्वार येथे पुन्हा भेट दिली. माझ्या उदिष्ट स्थानाकडे पोहोचण्याच्या रस्त्यावर मी अजून चाळीसएक मैल अलीकडेच असताना मला एकदम तो रस्ताच संपल्याचे दिसून आले. भारतात ठिकठिकाणी बऱ्याच वेळा असे घडलेले दिसून येते. पावसाने पूलच वाहून गेला होता आणि नदीच्या वरच्या बाजूने वळवून वेगळा रस्ता तयार होण्याचे काम अजून सुरू झाले नव्हते. चोकशीअंती असे कळले की मला दुसऱ्या लांबच्या रस्त्याने जावे लागेल. जंगलातल्या पायवाटेने जेथून लाकडे वाहून नेली जातात त्या रस्त्याने मी गेलो तर मुख्य रस्त्याला लागून मला नदीच्या पलीकडच्या बाजूस जाता येईल.

कंत्राटदारांच्या लॉऱ्या लाकूड वाहतूक करताना हा रस्ता वापरीत असल्याने ह्या रस्त्यावरून मला मोटारगाडीने सहज जाता येईल असे मला वाटले. परंतु ही हिवाळ्याची नुकतीच सुरुवात होती. जमिनीवरची माती अजूनही भुसभुशीत होती. वजनदार लॉऱ्यांनी जाऊन जाऊन तेथे खोलखोल खड्डे झाले होते; आणि त्यांपैकी काही खड्डे तुटलेल्या फांद्याच्या बुडख्यांनी वरचेवर भरलेले होते. माझी लँड रोव्हर गाडी तसेच ट्रेलर पुनः पुन्हा त्या खड्ड्यामध्ये अडकत होता. पुन्हा पुन्हा मी आणि माझे तीन सहकारी गाडीतून उतरून गाडी व ट्रेलर त्या काळ्या मातीतून ढकलून बाहेर काढीत असू.

अनुक्रमणिका

अंधार पडेपर्यंत हे असेच चालले. त्यानंतर तर रस्त्याचा अतिशय खराब भाग लागला. येथे तर आमच्या गाडीची व ट्रेलरची चाके खोल चिखलात रुतूनच बसली. ती आम्हाला काढता येणे शक्यच नव्हते. एकंदर परिस्थिती फारच कठीण दिसत होती. आम्हाला तो प्रवास म्हणजे एक भयानक संकटांनी भरलेला वाटू लागला. आजूबाजूला आम्हाला मदत करावयाला येईल असे कोणी चिटपाखरू देखील दिसत नव्हते.

तेवढ्यात खाकी कपड्यांतील एक वनाधिकारी जंगलातले काम आटोपून त्याच्या मजुरांच्या टोळक्याबरोबर परत चाललेला दिसला. माझ्या डोळ्यांवर माझा विश्वासच बसेना. नंतर आम्ही सर्वांनी मिळून चुटकीसरशी माझी गाडी व ट्रेलर बाहेर काढला. तो खराब रस्ता संपल्यानंतर 'बाम्बा' वसतिगृहाकडे पोहोचण्यास फक्त अर्धाच मैलाचे अंतर कापावे लागले. हे वसतिगृह ज्या नदीवरचा पूल वाहून गेला होता त्याच छोट्या नदीजवळ आहे.

त्या वनाधिकाऱ्याला ज्या मजुरांनी मला मदत केली त्यांना देण्यासाठी मी काही पैसे देऊ केले.

तो म्हणाला, "मी तुमचा आभारी आहे. तुमच्यासारख्या गृहस्थांना मदत करणे आमचे कर्तव्य आहे. आम्हाला पैसे नकोत."

मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानून मला इतका त्रास देणाऱ्या त्या नदीचे नाव विचारले. त्याने उत्तर दिले हिला "नरकनदी" असे म्हणतात.

त्या रात्री मी त्या वनाधिकाऱ्याला व इतरांना माझ्याबरोबर मी आणलेली रंगीत चित्रे दाखविली. सोनेरी वानर, साधे वानर व टोपीधारी हनुमान वानर ह्या तिन्हीचे रंग कसे वेगवेगळे असतात ते देखील मी त्यांना सांगितले. त्यांना मी साधे वानर कसे चंदेरी रंगाचे असून त्यात किंचितच् पिवळसर रंगाची झाक असते व टोपीधारी वानराच्या रंगात थोडीशी गुलबट तांबडट झाक असून त्याच्या डोक्यावर टोपी घातल्यासारखे काळे केस असतात त्यामुळे त्याला टोपीधारी वानर असे नाव मिळाले आहे हेही सांगितले. नंतर मला त्यांच्याकडूनही बरीचशी माहिती मिळाली. त्यांनी मला तेथील आजूबाजूच्या प्रदेशांत सोनेरी वानरांचे दहा कळप असल्याचे सांगितले आणि त्या दुसऱ्या दोन जातींची वानरे मात्र तेथे दिसून येत नाहीत असे सांगितले.

दुसऱ्या दिवशी मी माझा प्रवास मुख्य रस्त्यावरून जामद्वाराकडे सुरू केला. पुढे काहीही संकटे आली नाहीत. तेथे मला सोनेरी वानरांचे सहा कळप दिसले. त्यांचे निरिक्षण व छायाचित्रण करण्यात मी पुढचे अकरा दिवस अत्यंत आनंदात घालविले. त्या वेळेस २/३ महिन्याची कित्येक पिले त्यांच्या आईच्या छातीला घट्ट बिलगून असलेली दिसून आली त्यावरून ती ऑगस्ट—सप्टेंबरच्या सुमारास जन्मलेली असावीत असे वाटते. अगदी छोट्या पिलांचा रंग मोठ्यांच्या मानाने फारच फिकट वाटतो—जवळजवळ पांढराच. ती वानरे ज्या वेगवेगळ्या झाडांवरची फळे खात होती त्या झाडांची नांवे मी वनखात्याच्या माणसांच्या मदतीने मिळवू शकलो.

श्री. बॅरोन व इतरांनी लिहिल्याप्रमाणे ह्या नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर सोनेरी वानरे दिसून येतात का त्याचा तपास करण्यासाठी तेथून मग मी माझा मनास अभयारण्यातील मोथारगुडी विश्रांतिगृहाकडे प्रवास सुरू केला.

माझ्या नरम घडीच्या रबरी बोटीतून त्या मोठ्या नदीचा प्रवाह ओलांडून मी तिच्या पश्चिम किनाऱ्यावर गेलो. बऱ्याच लोकांच्या मदतीने मी तेथे सोनेरी वानरांचा शोध घेऊ लागलो. आम्ही सोनेरी वानरांचा एकच कळप पाहिला. आमच्यातील सर्वांचे अंदाज वेगवेगळे—वीसपासून चाळीसपर्यंत वानरे मोजल्याचे होते. परंतु ती वानरे फारच दक्ष होती आणि संकोश नदीच्या काठावरील जंगलापेक्षा हे जंगल फारच दाट आणि पोहोचण्यास कठीण होते. शेवटी आम्ही त्यांचा मागोवा घेण्याचे आणि त्यांचे छायाचित्रण करण्याचा नाद सोडून दिला.

नदीच्या पूर्वेकडे मी परत कितीतरी टोपीधारी वानरे पाहिली. मोथारगुडीच्या वरच्या अंगाला एक दिवस मी मासेमारी करीत असताना सात सोनेरी वानरांचा एक कळप पश्चिमेकडील किनाऱ्यावर पाण्याच्या काठाला पाहिला. ते खडकांवर काहीतरी खात होते. मी माझ्या रबरी बोटीतून लगेच प्रवाह ओलांडून गेलो आणि ते ठिकाण नीट पाहिले. तेथील जमीन खारवणाची होती.

माझे लपण उभारावयाला मला वेळ लागला नाही. ह्या ठिकाणावर रोज सकाळी ११ पासून दुपारी ३ पर्यंत पहारा ठेवण्यात आला. ह्या वेळांत बहुधा वानरे खारवणासाठी येतात असे समजले. तीन दिवसानंतर सात सोनेरी वानरे तेथे खारवणासाठी आली. त्यांच्यामध्ये फिकट रंगाचे एक छोटे पिलू देखील होते. ते सर्वजण तेथे येऊन त्यांनी तेथील जमीन चाटली. दोघेजण पाणी देखील प्याले. त्यांना जवळून पाहणे खरोखरच मनोरंजक होते.

भूतानच्या सरहद्दीवर आणि संकोश व मनास नदीच्या मध्ये जेथे ही सोनेरी वानरे दिसून येतात तेथे ती संख्येने जवळजवळ ५५० च्या आसपास असावीत असा मी अंदाज केला.

हा वर दिलेला भाग ब्रह्मपुत्रेच्या उत्तरेकडे आहे. परंतु ब्रह्मपुत्रेच्या दक्षिणेकडे देखील खासी, गारो टेकड्यांच्या खालच्या भागांत ही वानरे अस्तित्वात असल्याच्या नोंदी आहेत. म्हणून मी ह्या भागालाही भेट देण्याचे ठरविले.

१९६० च्या मार्च एप्रिलमध्ये मी खासी व गारो टेकड्यांच्या पायथ्याकडील भागांतून फिरलो. माझ्या तिघा सहकाऱ्यांबरोबर शक्य असलेल्या सर्व स्थळांतून फिरलो आणि माझ्याकडील त्या वानरांची रंगीत छायाचित्रे सर्वांना दाखविली. आम्ही टोपीधारी वानरे पाहिली; परंतु सोनेरी वानरे मात्र आम्हाला दिसली नाहीत. परंतु ह्या टेकड्यांमध्ये काही सोनेरी वानरे अस्तित्वात असावीत याची मला खात्री पटली आहे. ही वानरे येथे पाहिल्याच्या ज्या नोंदी आहेत त्या मी पुन्हा तपासून पाहिल्याशिवाय माझे प्रयत्न काही थांबविणार नाही.

मला जरी ह्या भटकंतीत सोनेरी वानरे दिसली नाहीत तरी मला तेथे दुसरा दुर्मिळ असा प्राणी पाहावयाला मिळाला—तो देखील सोनेरीच! गारो टेकड्यांवरून परतताना; बाजारातून जात असताना मी तेथील एका पाळीव प्राण्यांच्या विक्रेत्याकडे त्याला सोनेरी वानरांची माहिती आहे का ते विचारण्यास गेलो. त्याच्या घरात हुलूक जातीच्या वानराचे पिलू, वेगवेगळ्या जातीच्या उद्मांजरांची पिले, रानमांजरी व मी पूर्वी कधी न पाहिलेली वेगळीच दिसणारी मांजरीची पिले पाहिली.

मी लगेच ती अगदी दुर्मिळ परंतु दिसावयाला अत्यंत सुंदर अशा सोनेरी मांजरीची (टेमनीक्स कॅट) असल्याचे ताडले. (रंगीत छायाचित्र क्र. १०) दुर्दैवाने त्या विक्रेत्यालाही प्राणी अतिशय दुर्मिळ असल्याचे माहीत होते. हा प्राणी कलकत्त्यांत विकावयाचा त्याचा इरादा होता. त्यामुळे त्याच्यापासून ह्या प्राण्याची फारकत करावयास मला पुष्कळ वेळ झगडावे लागले—शिवाय मला पैसेही बरेच मोजावे लागले.

तीशी—माझं सोनेरी मांजर—या छोट्याशा गुबगुबीत पिवळसर खाकी रंगाच्या पिलांच मोठ्या भव्य सोनेरी मांजरात रूपांतर झाले. शिलाँगमधील माझ्या घरात ते जवळजवळ एक वर्षभर राहिलं. त्याला माझा खूपच लळा लागला होता. त्याला त्याची खरोखरची आई बहुधा माहितही नसावी. कारण त्याला जंगलांतून आणलं तेव्हा ते खूपच लहानसं होतं. ते जणू मलाच त्याची आई म्हणून समजत होतं. ते तीनचतुर्थांश वाढीचं झालं होतं तराही माझ्या मांडीवर बसून पाय वर करून माझ्या कानाच्या पाळ्या तोंडात पकडून ते दूध प्याल्याप्रमाणे त्याचे ओठ हलवून दूध मिळाल्याचे समाधान मानी.

दिवसा त्याच्या मनाला येईल तेव्हा ते बाहेर जात असे किंवा आत येई. जेव्हा मला त्याच्याशी खेळावयाला वेळ नसेल तेव्हा ते तासन्तास जंगलाच्या पार दुसऱ्या टोकाकडे टेकडीच्या खाली जाई. परंतु जेव्हा जेव्हा मी हाक मारीत असे तेव्हा ते न चुकता बरोबर येई. हे मांजर दोन भिन्न जगतांतलं होतं. माझ्याकडे ते अगदी पाळीव प्राण्याप्रमाणे प्रेमाने वागे; तर जंगलांत त्याचा स्वभाव रानटी व भयानक असे.

सोनेरी मांजर साधारणतः चार फूट दोन इंचापर्यंत वाढते. त्याच्या नख्या व दात चांगलेच मजबूत आणि तीक्ष्ण असतात. जवळच्या खासी खेड्यांतील काही खेडुतांच्या तावडीत ते केव्हा तरी सापडेल याची मला फार काळजी वाटत असे. हे खेडूत त्यांच्या धनुष्यबाजीत चांगलेच निष्णात असतात.

आफ्रिकेसारख्या ठिकाणी असा प्राणी जंगलात सोडून त्याच्या मुळच्या रानटी अवस्थेत तो पुन्हा जीवन जगू शकणे एखादे वेळेस शक्य झाले असते; परंतु भारतात लोकसंख्या इतकी मोठी आहे आणि अशा प्राण्यांना लागणारे भक्ष्यही इतके कमी झाले आहे की हे शक्य नाही. पुढे मागे 'तिशी' नक्कीच कोण्याच्या तरी शस्त्राला बळी पडणार. मी भारतांतील कुठच्याही प्राणीसंग्रहालयात हा 'तिशी' पाठवावयास तयार होतो परंतु ते सर्व सखल प्रदेशात आहेत. दार्जीलिंगच जास्त उंचीवरचा भाग आहे परंतु तेथील प्राणिसंग्रहालय ह्या प्राण्याला ठेवावयास तयार नव्हते.

मी द. भारतातील माझ्या दुसऱ्या दौऱ्यावर जाण्याच्या तयारीत होतो म्हणून नाईलाजाने मी तो लंडनच्या प्राणीसंग्रहालयाला देण्याची तयारी केली. तेथे तो आजतागायतही आहे. जे जे त्याला पाहतात त्यांना तो खूपच आवडतो. B. O. A. C. च्या कॉमेट विमानाने तो लंडनला आल्यावर मला डॉ. डेस्मॉंड मॉरीस यांचे पत्र आले. ते तेथे सस्तन प्राण्यांचे वरिष्ठ अधिकारी आहेत. त्यात ते म्हणतात, "तिशी" इथे नक्कीच रमला आहे आणि तो उत्तम स्थितीत आहे. तो इथला एक उत्कृष्ट प्राणी आहे. आम्ही त्याचा दूरदर्शनवर कार्यक्रम देखील आयोजित केला—त्यामध्ये तिशी दाखविण्यात आला आणि मला सांगावेच लागेल, तो अत्यंत उत्कृष्ट दिसला.....

माझ्या एका छोट्या भाचीने मला पत्र लिहिले. त्यामुळे तर मी हरखूनच गेलो. ती म्हणते, "आम्ही प्राणीसंग्रहालयात गेलो. तिथे सोनारी मांजर पाहिले. ते सुंदरच होते. शिवाय पिंजऱ्यांच्या गजांमधून ते

अनुक्रमणिका

माझ्याकडच्या बशीबरोबर खेळले देखील. मला वाटते जेव्हा आम्ही त्याला हाक मारली तेव्हा त्याला नक्कीच वाटले असेल की आम्ही त्याच्या मालकाला ओळखतो."

ज्या प्राण्याला माझा इतका लळा लागला होता तो प्राणी त्याच्या नव्या घरांत इतका आनंदी होता हे समजल्याने मला फारच बरे वाटले. युरोपमधल्या दुसऱ्या कोठच्या प्राणीसंग्रहालयांत असे सोनेरी मांजर असेलसे मला वाटत नाही. कलकत्त्याच्या प्राणीसंग्रहालयात मी मागे गेलो तेव्हा तेथे दोन सोनेरी मांजरे होती आणी मला असे समजले की शिकागोमधील ब्रुकफील्ड येथील प्राणीसंग्रहालयांत त्यांचे एक सबंध कुटुम्बच्या कुटुम्ब आहे.

ह्या रान—मांजराबद्दल बोलत असतानाच मला द. भारतात सापडणाऱ्या वाघाटी जातीसारख्याच जातीची मांजर [फक्त अलीकडेच मी असे ऐकले आहे की हे मांजर (वाघाटीच्या जातीचे—Rusty spotted Cat) भारताच्या वायव्येकडे गुजरात राज्यातही दिसून येते. पूर्वीच्या बांसडाच्या महाराजांचे जे राज्य होते त्या हद्दीत हे मांजर दिसून येते. ते ह्या मांजराचे रक्षण करण्याचा प्रयत्न करून त्याची छोटी पिलेही बंदिस्त अवस्थेत वाढविण्याकरिता मला मिळवून देतील असे वचन त्यांनी मला दिले आहे.] तसेच नेपाळ व पूर्व भारतात सापडणाऱ्या "मार्बल्ड कॅट" ची एकही नोंद असल्याचा उल्लेख आढळत नाही. जर हे प्राणी येथून समूळ नष्ट झाले असतील तर यासारखी लज्जास्पद गोष्ट दुसरी कुठचीच नाही. उ. भारतात तसेच वायव्य भारतात दिसून येणारे "काराकल" जातीचे मांजरही फारच दुर्मिळ होत चालले आहे आणि त्याचे रक्षण करणे अत्यंत जरुरीचे आहे असे मला वाटते.

अजूनही आग्नेय भारतात तीन जातींच्या मांजरी सहज दिसून येतात. (१) फिशिंग कॅट (मच्छीमार मांजर) ह्या मांजरीच्या नावाप्रमाणे मात्र ती काही मासे पकडताना किंवा मासे खाताना अजून तरी दिसून आलेली नाही! (२) राखाडी रंगाची जंगली मांजरं (बौगा) व (३) छोटीशी सुंदर वाघाटी (रंगीत छायाचित्र क्र. ११) वाघाटीची छोटी पिले पुष्कळदा मिळतात व ती बंगल्यावर पाळावयाला आणली जातात. ती माणसाळवणे फारच कठीण असते व विश्वास बसणार नाही इतकी ती खट्याळ व उग्र असतात; परंतु ती अगदी लहान असताना आणून त्यांना नीट शिक्षण दिले तर वाघाटी एक अत्यंत सुंदर आणि आपल्याला जीव लावेल असा पाळीव प्राणी होऊ शकतो. ह्या प्राण्याला नीट शिक्षण मिळाल्यामुळे ते किती शिस्तबद्ध वागू शकतात याची अनेक उदाहरणे मला माहीत आहेत. तुम्ही विश्वास ठेवा की ठेवू नका, परंतु ही मांजरे स्वतः होऊन स्नानगृहाच्या बाजूचे पाणी सफाईकरिता नियमितपणे अगदी बरोबर वापरतात. मला वाटते जगातले कुठचेही रानटी अथवा पाळीव मांजर असे करू शकणार नाही.

सोनेरी वानरे जगातल्या कुठच्याही प्राणिसंग्रहालयात आढळत नाहीत. कुठच्याही जातीचे वानरे पिंजऱ्यात बंद करून ठेवणे फारच कठीण असते आणि ही सोनेरी वानरे अशी पिंजऱ्यात ठेवणे तर फारच कठीण असावे, कारण त्यांच्या खाण्यापिण्याच्या संवयीचा अजून कोणी अभ्यासही केलेला नाही. १९५७-५८ मध्ये अशी दोन सोनेरी वानरे आसाममधल्या गौहत्तीच्या प्राणिसंग्रहालयात पाठविण्यात आली होती परंतु ती तेथे अगदी थोडाच काळ जगली. ती ज्या फळांवर उपजीविका करतात ती झाडे वगैरे मोठ्याशा जागेत लावून तेथे कुंपण घालून त्यांना व्यवस्थित खाणे पिणे दिल्यास ती एखादे वेळेस बंदिस्त अवस्थेत राहू शकतील असे मला वाटते.

गौहत्तीच्या प्राणिसंग्रहालयांतील एक सोनेरी वानर मेल्यावर मी दुसऱ्या वानराचे छायाचित्रण करण्यासाठी व त्याला पाहण्यासाठी तेथे गेलो. त्याला पिंजऱ्यातून काढून हिरवळीवर ठेवून काही खाण्यास देण्यात आले. मी रिफ्लेक्स कॅमेरा वापरीत होतो आणि त्या प्राण्यावर मी अंतर नीट अजमावून प्रकाशकिरण

अनुक्रमणिका

फेकले तर तेथे कोणीच नव्हते. ते नाहीसे झाले होते! त्याला परतपरत हिरवळीवर ढकलण्यात आले आणि प्रत्येक वेळा मी कॅमेरा नीट जुळवून घेई परंतु त्यापूर्वीच ते वानर कॅमेऱ्याच्या भिंगापुढून नाहीसे होई.

प्रत्येक वेळा ते माझ्या खांद्यांवरून उडी मारून निसटून जाई. तर केव्हा ते माझ्या डोक्यावर हात ठेवून त्या रिफ्लेक्स कॅमेऱ्यामध्ये खाली डोकावून पाही. फारच मजेशीर व रहस्यमय विषय—परंतु छायाचित्रण करणे किती दुर्घट होते!

माझ्या एका चहाच्या मळेवाल्या मित्राने एकदा सोनेरी वानराची दोन पिले वाढविली व पुढे ती चांगलीच माणसाळली. तीन महिन्यानंतर त्यातला नर मेला. मादी पुढे माझ्या त्या मित्राच्या हुलूक जातीच्या दुसऱ्या पाळीव नराबरोबर मैत्री करू लागली.

ही वानराची मादी आणि हुलूक नर दोघांचीही चांगलीच गट्टी जमली. ते बाजूच्या जंगलात नेहमी फिरावयाला जाऊ लागले. तसेच बंगल्यात झोपण्यासाठी किंवा जेवण्यासाठी दोघेही जोडीने परतत. दीड वर्षानंतर ती मादी पूर्ण वाढीची झाली. नंतर ती जंगलांतच राहू लागली. तेथे ती सामान्य वानराबरोबर राहू लागली असे म्हणतात. हे सर्व दार्जीलिंग जिल्ह्यातील तराईच्या भागात घडले. तेथे सोनेरी वानरे नसतात.

संकोश आणि मनास ह्या नद्यांमधील सोनेरी वानरांची वसाहत भूतान व भारत ह्या दोन्ही राष्ट्रांमध्ये विभागलेली आहे. भूतान सरकारने आसाममधील मनास अभयारण्याच्या उत्तरेकडे भूतानच्या विभागात वन्यप्राणी अभयारण्य निर्माण करावे असे मी त्यांना कळकळीने सांगण्याचे हे आणखी एक कारण आहे.

दरवर्षी जेव्हा मुसळधार पाऊस, तसेच हवेतील आर्द्रता संपून हिवाळ्यांतील सुके थंड वारे लागतात. (अशा थंड हवामानासाठी विशेषतः उ. भारत प्रसिद्ध आहे.) तेव्हा स्वच्छ आणि खळखळ वाहणाऱ्या संकोश व मनास नद्यांचे व त्यांच्या पार्श्वभूमीवरील पायथ्याकडील दाट झाडांनी भरलेली जंगले ह्या सर्वांचे विचार माझ्या मनात वाहू लागतात. मला तेथे पुन्हा जाऊन रहावेसे वाटते. शहरातील अद्ययावत् कृत्रिम वागणे अन् सुधारणा ह्या सर्वांपासून दूर दूर ......

हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या ह्या प्रदेशपट्टीत विशेषतः जेथे ह्या भव्य नद्या उगम घेऊन दुथडी भरून वाहू लागतात व त्यांच्या किनाऱ्यावरील दगडगोट्यांच्या तसेच वाळूच्या सपाट प्रदेशांत जितके विविध वन्यजीवन जितक्या मोठ्या प्रमाणावर दिसते त्याहून जास्त असे वन्यजीवन जगाच्या इतर कुठल्याही भागांत आढळून येणार नाही; शिवाय येथील सृष्टीसौदर्य देखील मनाला भुरळ पाडणारे आहे.

ह्या ठिकाणाचे वर्णन पूढीलप्रमाणे करता येईल. इथे कोळ्यांची प्रार्थना सफल झाली आहे व कलाकाराचे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरले आहे; पण वन्यप्राणीप्रेमी व निसर्गप्रेमी लोकांची अजूनपर्यंत प्रत्यक्षात न आलेली अशी आशा आहे.

आणि नवीनच शोध लागलेली ही सोनेरी वानरे फळे खात असताना किंवा खेळताना आणि ह्या फांद्यांवरून त्या फांद्यांवर, झाडाच्या शेंड्यांवर उड्या मारत असताना रुपेरी—हिरवीगार पाने निळ्याशार आकाशाच्या पार्श्वभूमीवर हलवीत राहतात तेव्हा ती अधिक सुंदर आणि चमत्कारिक वाटतात. ह्या वन्यप्राण्यांशिवाय मी आणखी कशाचा विचारच करू शकत नाही.

अनुक्रमणिका

**प्रकरण १९ वे**

## काझीरंगातील गेंडा

भारतीय गेंड्याचा इतिहास (छायाचित्र क्र. ५१ ते ५६) म्हणजे देखील ह्या खंडातील बदलत्या हवामानाची व वनस्पतींची एक कथाच म्हणावी लागेल. मोहोंजोदारो कालापासून म्हणजे सुमारे ५००० वर्षांपूर्वीपासून सिंधूच्या पठारावर म्हणजे आता जेथे प. पाकिस्तान आहे तेथे गेंडा अस्तित्वात असल्याचे आढळते. नव्या दिल्लीतील 'इंडियन नॅशनल म्युझियम' येथे तत्कालीन लोकांच्या राहणीमानाचे अवशेष ठेवण्यात आले आहेत. त्यामध्ये गेंड्याच्या छापाची मोहोरही आहे. (छायाचित्र क्र. ५०) तेव्हा हा भाग सुपीक व हिरवागार होता. उ. आफ्रिका आणि मध्य पूर्वेकडील कित्येत भागांत जसे घडले; तसेच येथेही लोकसंख्या वाढीमुळे गुरेचराईसाठी व लाकूड फाट्याकरिता झाडे तोडून तोडून येथील बराचसा नैसर्गिक हिरवा रंग पुसला गेला. त्यामुळे हळूहळू येथील हवामान देखील बदलत चालले.

अशी नोंद आढळते की १३९८ मध्ये तिमूर खानाने जेव्हा इथे हल्ले केले तेव्हा काश्मीरच्या सरहद्दीवर कितीतरी गेंडे मारले होते. सोळाव्या शतकात ह्या उपखंडाच्या पश्चिमेकडील अगदी पेशावरच्या वायव्य भागापर्यंतही कुठे कुठे गेंडे होते. सम्राट बाबराच्या स्मृतिपत्रकांत तो म्हणतो की अगदी १५१९ च्या सुमाराला देखील त्याने सिंधूच्या खोऱ्यांतील झुडुपांच्या प्रदेशांत गेंडे मारले होते. त्याच सुमारास खंबायतच्या राजाने (पश्चिम भारतात) पोर्तुगालच्या राजाला एक गेंडा भेट म्हणून पाठविला तो गोव्यावरून बोटीत चढविला. युरोपमधील हा पहिलाच भारतीय गेंडा. यापूर्वी ईजिप्त, ग्रीस व रोम येथे गेंडे आणण्यात आले होते; परंतु ते बहुधा आफ्रिकेतील नाईल नदीच्या आजूबाजूच्या सुदान प्रदेशांतील पांढरे गेंडे होते.

पकडण्यात व मारण्यात आल्यामुळे काही अंशी; तर काही अंशी शेतीभाती, गुरेचराई व मनुष्यवसाहतीकरिता गेंड्याच्या वसाहती नष्ट केल्यामुळे हे गेंडे पश्चिम भागातून शेवटी हटत चालले. १९ व्या शतकामध्ये गंगेच्या खोऱ्यातूनही गेंडा समूळ नष्ट झाला. १९०० च्या सुमाराला तो फक्त द. नेपाळ, उ. बिहार, उ. बंगाल व आसाममध्येच उरला.

गेल्या शतकांत आसाममधील ब्रह्मपुत्रेचे बहुतेक सर्व खोरे झाडांनी व दाट गवताने भरलेले होते. त्यानंतर चहाचे मळे आले अन् त्याबरोबर भारताच्या इतर भागांतून मळ्यांत काम करणारे मजूर आयात करण्यात आले. साहजिकच मळे सुरू करण्यासाठी पुष्कळशी साफसफाई करण्यात येऊ लागली. ह्या शतकाच्या शेवटाला आसाममध्ये रेल्वेबांधणी सुरू झाली. त्यामुळे ह्या खोऱ्यात पुष्कळ लोक वसाहतीकरिता तसेच गुरेचराईकरिता घुसले. हळूहळू वन्यप्राणीजीवन कमी कमी होऊ लागले. विशेषतः गेंडा तर शिकाऱ्यांकडून तसेच विनापरवाना शिकार करणारांकडूनही फारच मोठ्या प्रमाणावर मारण्यात आला.

गेंड्याच्या शिंगात विशिष्ट गुण असतात असा काहीसा चमत्कारिक समज आहे. त्यामुळे तर गेंड्याची फारच मोठ्या प्रमाणावर हत्या होते. गेंड्याचे शिंग हे खरोखरीचे शिंग नाही तर ते केसांचा पुंजका एकत्र येऊन (जटेसारखे) तयार झालेले आहे. शास्त्रीय भाषेत सांगावयाचे तर ह्यामध्ये "केराटीन"चे तंतू तंतू एकत्र येऊन त्याची जटा वळल्यासारखा जाडसर पुंजका झालेला आहे. हरिणाच्या किंवा बैलांच्या शिंगाप्रमाणे डोक्याच्या कवटीला जोडूनच शिंग आलेले नाही. त्यांची शिंगे कवटीच्या कपाळमध्यावर दोन्ही

बाजूपासून उगवलेली असतात. गेंड्याचे शिंग डोक्याच्या कवटीला जोडलेले नाही. ते बाह्यत्वचेवरूनच येते व मासांच्या वरच असते. जोराच्या फटकाऱ्याने ते सहज उन्मळून पडू शकते. गेंड्याचे शिंग असे कापले की जखमेतून फारच रक्तस्राव होतो; परंतु वर्षभरातच नवीन शिंग तेथे उगवू लागते.

ह्या शिंगामध्ये अनेक औषधी गुण असतात असा फार पूर्वीपासून समज आहे. ते विषावरचा विमा म्हणून समजले जाई कारण असा समज होता की गेंड्याच्या शिंगातून कोरून काढलेल्या प्याल्यात (छायाचित्र क्र. ५०) विष ओतले तर त्याचे दोन तुकडे होतात! आणखी दुसरा समज असा होता की अशा प्याल्यात विष टाकल्यास त्याला फसफसून फेस येतो! म्हणून पूर्व अशिया खंडातील राजे अशा प्रकारचे पेले वापरीत असत. असे एक दोन पेले वस्तुसंग्रहालयात व आणखीही एकदोन ठिकाणी जमा करून ठेवले आहेत.

ते शिंग माणसाचे कमी होत चाललेले चैतन्य व पौरुषत्व पुन्हा मिळवून देते असाही गैरसमज असल्याने अजूनही पूर्व अशिया खंडात विशेषतः चीनमध्ये गेंड्याच्या शिंगाला फारच गिऱ्हाईक आहे. तीस वर्षापूर्वी त्याची किंमत सोन्याच्या दुप्पट होती. आता ती आणखीही जास्त आहे. अलीकडेच गौहत्तीमध्ये झालेल्या एका लिलावांत ऐकले होते की एका छोट्या चार्टर्ड विमानातून व्यापाऱ्यांची एक टोळी मुंबईमधून येथे आली आणि त्यांनी असलेली सर्व शिंगे दर पौडाला रु. २५२५ ह्या दराने (१८९पौंड) घेऊन टाकली. आफ्रिकेतील गेंड्यांच्या शिंगाचा भाव पूर्व आफ्रिकेत दर पौड वजनाला फक्त २ पौंड १० शिलींग इतकाच आहे.

I U C N च्या सर्व्हायव्हल कमिशनने काही काळापूर्वी गेंड्याच्या शिंगाच्या भुकटीऐवजी काही कृत्रिम पदार्थ मोठ्या प्रमाणावर बाजारात आणावयाचे ठरविले त्यामुळे तरी उरलेल्या गेंड्याचे आयुष्य जगविता येईल असे त्यांना वाटले. परंतु असे खोटे औषध त्यामागचा उद्देश कितीही चांगला असला तरी बाजारात आणणे हे रीतसर होणार नाही म्हणून मला वाटते ही युक्ती देखील त्यांना बरी वाटली नाही.


मला असे कळून आले की बेसल (स्वित्झर्लंड) मधील रासायनिक प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत गेंड्याच्या शिंगात असे काहीही रासायनिक किंवा शरीरातील हार्मोन्समध्ये फेरफार करणारे गुण नाहीत असे आढळून आले आहे. ह्यामध्ये शरीरातील पेशींना उत्तेजित करण्याचे गुणधर्म आहेत का हे तपासल्यावर मला वाटते जरी एखादे वेळेस तसे काही गुणधर्म असले तरी त्याचे इतर दुष्परिणाम फारच आहेत.

पूर्व आशियाच्या काही भागांत आणखी एक असा मजेदार समज आहे की बाळंतिणीच्या पलंगाखाली गेंड्याचे शिंग प्रसूतीच्या वेळी ठेवल्यास त्या बाईला प्रसूती वेदनांचा फारसा त्रास न होता प्रसूती सुखकर होते. ज्यांच्याकडे असे शिंग असते ते गरोदर स्त्रियांना प्रसूतीच्या वेळेस ते भाड्याने देखील वापरावयास देतात. त्याचा दर प्रत्येक खेपेस ३० पौंडापर्यंत असतो. आणखी एक अपसमज असा होता की गेंड्याचे शिंग एका बादलीत पाण्यात बुडवून ठेवून बराच काळ भिजत घालावे मग घरातील सर्व लोकांनी दरदिवशी ह्या बादलीतले चमचाभर पाणी प्यावे म्हणजे कुठल्याही रोगावरील ते रामबाण औषध असून आयुष्य वाढविते.



४९. 'स्लो लॉरीस' ची एक जोडी. (ह्यांच्या हातापायांची पकड खूपच घट्ट असते.)


अनुक्रमणिका






५०अ. ५००० वर्षापूर्वीच्या मो-हें-जोदारो कालीन गेंड्याचे चित्र असलेल्या शिक्याचा ठसा.
५०ब. गेंड्याच्या शिंगापासून बनविलेला नक्षीदार प्याला.

अनुक्रमणिका







५१अ. भारतीय एकशिंगी गेंडा अगदी पुरातन काळाच्या अवशेषांसारखाच वाटतो.
५१ब. ही रागवलेली मादी पिल्लाचे रक्षण करताना ३ वेळा आमच्या हत्तीवर धावून आली.



५२/५३. हा मोठा नर चिखलात लोळण्यासाठी परत परत येतो.


अनुक्रमणिका





५४अ. कान, शिंगे आणि नाक वर ठेवून पोहत असतानाचे एकमेव छायाचित्र.
५४ब. बहुदा छोटे पिलू आईच्या पुढे चालते.


अनुक्रमणिका





५५अ. काही पर्यटक अकबरच्या पाठीवर बसून चिखलात लोळत असलेल्या गेंड्याचे चलत्-चित्रण करीत असताना.
५५ब. गेंड्याची ही मादी वाघापासून आपल्या नवजात अर्भकाचे रक्षण करीत असताना.

अनुक्रमणिका





**५६अ. ह्याची शिंगे चांगली आहेत त्यावरुन तो बहुधा दुसऱ्या काही रोगामुळे मेलेला असावा.**
**५६ब. ह्या गेंड्याचे शिंग चोरट्या शिकाऱ्यांनी काढून नेले आहे.**

आजच्या ह्या शास्त्रोक्त व यांत्रिक अशा अंतराळ युगातही मानव अशा फालतू समजांवर विश्वास ठेवतो हे अत्यंत चमत्कारिक व नवलाचे वाटते. चीनमध्ये गेंड्याच्या शिंगात औषधी गुण किंवा त्याचे इतर काही फायदे नसल्याने गेंड्याच्या शिंगाचा वापर करण्यावरील बंदी घातल्याचे व तसा कायदा करण्यात आल्याचे वृत्त प्रसारित करण्यात आले आहे त्यांत काहीतरी तथ्य असावे अशी आशा वाटते.

अनुक्रमणिका

भारतातील गेंड्याच्या मादीचे शिंग हे नराइतके मोठे असते. प्रथमदर्शनी नर व मादी गेंड्यांतील फरक त्वरित लक्षात येत नाही. ब्रिटिश प्राणिसंग्रहालयात ठेवलेल्या भारतीय गेंड्याचे शिंग २४ इंच लांबीचे आहे. हा उच्चांकच म्हणावा लागेल. मी काझीरंगामध्ये पाहिलेल्या गेंड्यांमध्ये जास्तीत जास्त लांब शिंग १८ इंचाचे पाहिले आहे. हे एका म्हाताऱ्या मेलेल्या गेंड्याचे शिंग वनखात्यातील एका कर्मचाऱ्याने कुठूनतरी जमविले होते. मी एका जिवत गेंड्याचे जवळजवळ सोळा इंच लांबीचे शिंग पाहिले आहे आणि त्याची छायाचित्रेदेखील घेतली आहेत. मला वाटते काझीरंगामध्ये गेंड्याच्या नाकावर दिसून येणारे शिंग सर्वसाधारण आठ इंचाचे असावे.

शिंगाशिवाय गेंड्याच्या शरीराचा कुठचाही भाग बाजारात विकला जातो. त्याचे मूत्र देखील काही लोक पितात. त्याच्या कातडीचे अणि हाडांचे छोटे छोटे तुकडे काही आजारात लोक गळ्यात तसेच मनगटातही बांधतात. काही लोक त्याचे मांस नुसते रुचकरच नाही तर ते खाल्लास चिरकाल शांती मिळण्याचा व स्वर्गाला जाण्याचा परवानाच मिळाला असे समजतात.

आताचे जे काझीरंगाचे अभयारण्य आहे ते म्हणजे पूर्वीचे कोणाचाही शिरकाव होऊन न बिघडलेले असे ब्रह्मपुत्रेचे गवताळ खोरे होते. ह्या मोठ्या नदीच्या दक्षिण किनाऱ्यावरचा जवळजवळ २५ मैलांचा टापू म्हणजे मिखिर टेकडीच्या उत्तरेस, आसामच्या साधारण मध्यावर असलेला हा भाग. १९०८ पर्यंत तर तो भाग शिकारी लोकांचा तसेच विनापरवाना चोरट्या शिकाऱ्यांचाही अत्यंत आवडीचा भाग होता. त्यानंतर मात्र तेथील अधिकाऱ्यांच्या लक्षात आले की आता तेथे जेमतेम एखाद डझनभरच गेंडे उरले असतील.

१९२६ मध्ये येथे शिकारींना मनाई करण्यात येऊन तो जंगलाचा राखीव भाग आहे असे जाहीर केल्यावर हा भाग "गेम सँक्च्युरी" म्हणून जाहीर झाला; आणि १९४० च्या दशकाच्या शेवटी शेवटी ह्या "गेम सँक्च्युरीचे" रूपांतर वन्यप्राणी अभयारण्यात (वाइल्ड लाईफ सँक्च्युरी मध्ये) झाले. कारण 'गेम' ह्या शब्दाचा अर्थ जे प्राणी किंवा पक्षी मारून पेंढा भरून ठेवण्यासाठी किंवा त्यांच्या मांसाकरिता मारण्यात येतात ते, असा होतो; तर 'वाइल्ड लाईफ' ह्या शब्दाचा अर्थ सर्वच सजीव वन्यप्राणी व त्यांचे संरक्षण असा होतो.

१९३० ह्या दशकाच्या सुरुवाती सुरुवातीपर्यंत काझीरंगा तर एक बंद प्रकरण होते आणि वनखात्याने तर ते एकाकी तसेच सोडले होते. मी १९३४ मध्ये तेथे जाण्याकरिता परवानगी घ्यावयास गेलो होतो ते मला आठवते. परंतु तेव्हाच्या वनविभागाच्या ब्रिटिश जिल्हाधिकाऱ्याने मला खोटीच सबब सांगितली होती. ते म्हणाले, "ह्या जागेत कोणीही जाऊ शकत नाही." त्यानंतर थोड्याच दिवसांत एका चांगल्या मुख्य वनपालकांनी—त्याचे नाव ए. जे. डब्ल्यू. मिलरॉय असे होते— उलट विचार केला व त्या भागातील अलीकडेच चालू झालेल्या चोरट्या शिकारी थांबविण्याचे व हा भाग पर्यटकांसाठी खुला करण्याचे ठरविले.

१९३०—४० च्या साधारण मध्यावर काझीरंगा येथे पाहणीकरिता दौरा करण्यास जो प्रथम वनाधिकारी नेमला होता त्याच्याबरोबर मी बोललो होतो. त्याला ह्या चोरट्या शिकाऱ्यांचे तंबू प्रत्येक पाणवठ्याच्या (छोटे तळे) जागी दिसून आले आणि मेलेल्या जवळजवळ ४० गेंड्यांची सडलेली प्रेते दिसून आली. परंतु त्या प्रत्येकाच्या नाकावरचे शिंग मात्र काढून नेलेले आढळून आले. ह्या चोरट्या शिकाऱ्यांमध्ये अभयारण्याच्या दक्षिण सरहद्दीवरील मिखिर टेकड्यांमध्ये राहणारे आदिवासी जमातीचे मिखिर लोकही

अनुक्रमणिका

होते. हे लोक तसे साधे व शांत स्वभावाचे व खूप मजेशीर असतात. वनखात्याच्या कर्मचाऱ्यांना पाहून जेव्हा ते तेथून पळून गेले तेव्हा त्यांच्या 'शेपट्या' (कासोटीचा भरतकाम केलेला काचा) तेवढ्या त्यांचा पाठलाग करणारांच्या हाती लागल्या. तेव्हा त्या मिखिर लोकांनी पळून जावयास मिळावे म्हणून त्यांच्याकडच्या तीक्ष्ण चाकूंनी शेपट्याच कापून टाकल्या.

१९३८ मध्ये जेव्हा काझीरंगाचे अभयारण्य पर्यटकांसाठी खुले झाले तेव्हा ते पाहण्यासाठी जाणारांपैकी मी एक होतो. माझे दोन मित्र व विभागीय वनाधिकारी माझ्याबरोबर होते. आमच्या दोन हत्तींवरून भटकताना आमचा वेळ अतिशय मजेत गेला. मी जेव्हा प्रथम गेंडा पाहिला, तेव्हा हा प्राणी मला पुराणकालीन, विचित्र परंतु सुंदर असे चिलखत घातल्याप्रमाणे वाटला आणि त्याच्या अंगावरील जाड कातडीमुळे तो इतिहासपूर्व काळातील आता अस्तित्वात नसलेला असा प्राणी वाटला. आमच्याकडे स्वसंरक्षणासाठी प्रत्येक हत्तीवर एक एक अशा दोन मोठ्या बंदुका होत्या. परंतु अलीकडे अशाप्रकारे अभयारण्यातून फिरताना स्वसंरक्षणासाठी हत्यारे ठेवण्यास परवानगी नाही. तेव्हापासून मी भारताच्या कुठल्याही भागातून फिरताना स्वसंरक्षणार्थ बंदूक बरोबर घेतलेली नाही.

त्या काळात गेंड्यांना अशा मानवी पर्यटकांची संवय नव्हती आणि त्यामुळे त्यांच्या हद्दीत शिरणाऱ्या मानवांवर ते जोराने हल्ला चढवीत. तसेच त्या वेळेस वनविभागाचे पर्यटकांसाठी ठेवलेले हत्ती अशा हल्ला चढविणाऱ्या गेंड्याच्या समोर जमिनीवर न भिता ठामपणे उभे राहण्यास शिकविलेले नव्हते. त्यांच्या आंतरिक प्रेरणेने ते गेंडा दिसला रे दिसला की वळून शेपूट दाखवून पळू लागत; आणि माहुतांचेही तसेच होई. परिणामतः अविचाराने उलट्या दिशेने त्या उंच उंच गवतातून मैलभर तरी सैरावैरा रपेट होई. अभिप्राय वहीत मी लिहिलेला शेरा मला आठवतोय्—"गेंड्याने दोनदा हल्ला चढविल्यामुळे हत्ती प्रत्येक वेळेस बरेच अंतर कसेतरी पळून गेले."

काही महिन्यानंतर माझ्या काही मळेवाल्या मित्रांनी अभयारण्याला भेट दिली त्यावेळेस पर्यटक तेथील गेंड्याच्या परिचयाचे झाले होते. अभयारण्यांतून हत्तींच्या पाठीवरून फिरण्याचे पैसे देऊन गेल्यावर त्यांनी अभिप्राय वहीत शेरा लिहिला, "असमाधानकारक, फक्त वनखात्यानेच आमच्याकडून (वर) पैसा (चार्ज) उकळला!" [मूळ इंग्रजी भाषेत येथे नर्म विनोद आहे. तो असा—Rather disappointing. Charged only by the Forest Department!" (not by rhino).]

अलीकडे हत्तीच्या पाठीवरून फिरविण्यांत येणाऱ्या भागातून जे गेंडे वसती करून असतात ते अगदी व्यवस्थित वागतात. सहसा हल्ला चढवीत नाहीत—अगदीच एखाद्या मादीबरोबर पिलू असल्याखेरीज. अभयारण्याच्या इतर भागात जेथे पर्यटक क्वचितच् जातात तेथे गेंड्याचा हल्ला होण्याचा संभव आहे. परंतु हत्तींना देखील जमिनीवर ठामपणे उभे राहण्याचे व्यवस्थित शिक्षण दिल्यामुळे ते फारच चांगले वागतात. असा हल्लेखोर गेंडा देखील सहसा हल्ला करीत नाही. बहुतेक वेळा तो हत्तीपासून जवळच थांबतो, गर्कन् वळून रागाने फुरफुरत का होईना परंतु दुडक्या चालीने परत जातो. अगदी क्वचित एखादे वेळेस गेंड्याने जर अशा हत्तींवर किंवा पायी चालणाऱ्या माणसावर हल्ला चढविलाच तर तो हल्ल्याकरिता शस्त्र म्हणून त्याचे शिंग वापरीत नाही. आफ्रिकन् गेंडा मात्र ते वापरतो; परंतु भारतीय गेंडा अशा प्रकारे त्याचे शिंग वापरताना केव्हाच दिसून येत नाही. तर तो मुसंडी मारून शत्रूला त्याच्या पुढच्या व खालच्या जबड्यातील पटाशीच्या दातांनी जोरात चावतो. डोक्याच्या बाजूने मुसंडी मारल्याने खालच्या दातांनी चावलेली एकच सलग जखम दिसते. त्यामुळे त्याने शिंग घुसवून मारले आहे असा काल्पनिक अपसमज

अनुक्रमणिका

आहे. आफ्रिकन् गेंड्याचा जबडा छोटा असतो आणि त्याचे पटाशीचे दात भारतीय गेंड्यांइतके मजबूत नसतात.

याशिवाय आफ्रिकन गेंडे असे रानटी अवस्थेत आपल्या शिंगाला कशावरही घासून घासून धार लावतात तसे भारतीय गेंडे त्यांच्या शिंगाला धार लावीत असल्याचे माझ्या केव्हाही ऐकण्यात नाही. तेव्हा जर तुम्ही कधी भारतीय गेंडा प्राणिसंग्रहालयात त्याच्या पिंजऱ्याच्या लोखंडी पट्ट्यांवर किंवा भिंतीवर शिंगाखाली नाक घासत असताना पाहिला असेल तर तो बहुधा त्याच्या अंगावरील कृमी कीटकांमुळे सुटलेली खाज थांबविण्याकरिता असे करतो असे खुशाल समजा. शिकागो येथील ब्रुकफील्ड प्राणिसंग्रहालयाचे उपचालक श्री. राल्फ ग्रॅहॅम यांनी हे शोधून काढले आणि त्यांच्याकडील एक भारतीय गेंड्याची जोडी वाचविण्यात त्यांना यश आले. त्यांनी त्यांच्या नाकावर औषधमिश्रित माती थापली त्यामुळे तेथील जंतू मरून गेले. उपचारानंतर शिंग घासावयाचे गेंड्यांनी थांबविले; व त्यांची शिंगे नीट वाढू लागली.

भारतीय गेंडे नैसर्गिक अवस्थेत दिवसा बहुधा भरपूर पाणी व चिखल असलेल्या खड्ड्यांमध्ये डुंबत पडलेले आढळतात. यामुळे बाहेरील बारीकसारीक परजीवी जंतू, माशा इ. पासून त्यांना संरक्षण मिळते. माशा नेहमी त्यांच्या चिलखतासारख्या जाड जाड कातडीच्या वळ्यावळ्यांमध्ये अंडी घालण्यासाठी त्यांच्या शरीरावर घोंघावत असतात.

गेंड्याला हे असे चिलखतासारखे कातडीचे कवच कसे मिळाले ह्याबद्दल एक पौराणिक कथा आहे. एकदा कृष्णाने ठरविले की लढाईमध्ये हत्ती न वापरता गेंडे वापरावे कारण हत्तींचे माहूत शत्रू पक्षाचे धनुर्धारी सहज मारून टाकीत; त्याबरोबर तो निकामी होत असे. त्यामुळे गेंड्याला पकडण्यात आले. त्याला चिलखत घालून शिक्षण देण्यात आले. परंतु जेव्हा हा गेंडा कृष्णमहाराजांकडे आणण्यात आला तेव्हा त्यांना हा प्राणी आज्ञा पाळण्याचे शिकण्यात फारच मंद बुद्धीचा आणि निर्बुद्ध वाटला. म्हणून तो तसाच चिलखतासकट जंगलात हाकलवण्यांत आला. तेव्हापासून आजतागायत गेंड्याच्या सर्व प्रजेला घडीचे चिलखत मिळाले.

खरे पाहाता पूर्वीच्या काळात भारतातील काही राजांनी युद्धात पुढे आघाडीचे वीर गेंड्यावरून वापरल्याचे दिसून येते. गेंड्याच्या शिंगावर त्रिशूळासारखे लोखंडी शस्त्र बसविण्यात येई. यावरून त्याला काही प्रमाणात शिक्षण देण्याची जरुरी असल्याचे दिसून येते.

भारतीय एकशिंगी गेंड्याचे शास्त्रीय नांव 'ऱ्हायनोसॉरस युनिकॉर्निस' असे असल्याने 'युनिकॉर्न' नावाच्या पौराणिक प्राण्याचे मूळ गेंड्यामध्येच असावे काय हे पाहाणे मोठे मजेशीर होईल. जुन्या काळांतील एक प्रसिद्ध समज असा आहे की हा घोड्यासारखा दिसणारा नाकावर शिंग असणारा 'युनिकॉर्न' प्राणी आपले शिंग कुठल्याही द्रव्यात बुडवून त्यांत विष असल्यास ओळखून काढू शकतो. हा समज गेंड्याच्या शिंगामध्ये जादूचे गुणधर्म असल्याच्या गैरसमजाशी बरोबर जुळतो. आणखी एक समज असा आहे की हत्तीशी धडक घेण्याचे साहस करणारा 'युनिकॉर्न' हा एकच प्राणी आहे. तेव्हा त्याचे अन् गेंड्याचे नाते मिळते जुळते आहे. हत्ती व वाघ दोघेही गेंड्याला घाबरूनच असतात हे जमेला धरून गेंडा हाच पशूंचा राजा असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. वाघ गेंड्याच्या छोट्या पिलाला मारू शकेल आणि मादी

जवळपास नसताना अशा छोट्या पिलाला तो सहज पळवून नेण्यात बहुधा यशस्वी होतो. परंतु कुठचाही एकटा वाघ पूर्ण वाढलेल्या गेंड्यावर हल्ला करण्यास धजत नाही. हे पुढील गोष्टीवरून दिसून येईल.

१८८६ मध्ये एक शिकारी हत्तीच्या पाठीवरून आताचे जे काझीरंगाचे अभयारण्य आहे तेथे गेंडा मारावयास गेला. त्याने एक गेंडा गाठला आणि जवळ जवळ डझनभर तरी गोळ्या अगदी जवळून त्याला मारल्या. जखमी गेंडा पळून गेला आणि रात्र होत आल्यामुळे शिकारी त्याच्या तंबूकडे परतला. दुसऱ्या दिवशी त्या फारच जखमी झालेल्या गेंड्याच्या रक्ताचा मागोवा पकडून तो शिकारी गेंड्याच्या शोधाकरिता निघाला आणि पाहतो तो काय तो गेंडा दोन वाघांशी झुंज देत होता. त्याचे वर्णन पुढे देत आहे; एक वाघ—ज्याची मान जबरदस्त फाटून जखमी झाली होती—नक्कीच ती त्या गेंड्याच्या दातांमुळे; आणि दुसरा वाघ रक्तबंबाळ झाला होता. शिकाऱ्याने दोन्ही वाघांवर बार टाकले त्यानंतर त्याने दुर्दैवी गेंड्यालाही जास्त वेळ वेदनांत विव्हळत ठेवले नाही.

ही घटना भारतीय गेंड्याची धिटाई, बळ व चपळाईचे उदाहरण आहे. तो हत्तीला सहज हरवू शकतो. द्रुतगतीने धावणे, उडी मारणे, इकडे तिकडे गर्रकन् वळणे, या सर्व गोष्टी तो करू शकतो. हत्तीला हे करणे शक्य नाही. हत्ती धावू शकत नाही. तो फक्त सरपटी गतीने जास्तीत जास्त ताशी २० मैल ह्या वेगाने जोरात चालू शकतो. हत्तीला उडी मारता येत नाही. खरे पाहता ६ फुटांपेक्षा जास्त लांबीचा खड्डा किंवा भगदाड असेल तर ते त्याला एका चालीत ओलांडता येत नाही. ते त्याच्या दोन पावलांतील जास्तीत जास्त अंतर होय.

जगात दिसून येणाऱ्या गेंड्याच्या पाचही जाती (दोन आफ्रिकेतील व तीन आशिया खंडातील) मनुष्यामुळे नाहीशा होण्याच्या संकटात आहेत. त्यामुळे ह्या गेंड्यांना समूळ नष्ट होण्यापासून वाचविण्यासाठी एक जागतिक समिती नेमण्यात आली आहे.

आफ्रिकेतल्या दोन जातींना त्यातल्या त्यात कमी धोका आहे. आफ्रिकेतील काळे (वळलेल्या ओठाचे) गेंडे आता ११००० ते १३५०० च्या दरम्यान आहेत तर आफ्रिकेतील पांढरे गेंडे (चौकोनी ओठाचे) बरेच कमी म्हणजे २५०० ते ३५०० इतके आहेत. ह्या दोन्ही जातीच्या गेंड्यांना दोन दोन शिंगे असतात. काळा गेंडा कुरणात चरतो तर पांढरा भारतीय गेंड्याप्रमाणे रवंथ करतो.

आशिया खंडातील तीनही जातींचे गेंडे फारच कमी आहेत. भारतीय एकशिंगी गेंड्याचे माझ्या मते प्रमाण असे आहे—नेपाळमध्ये १८५, बंगालमध्ये ६५ आणि आसाममध्ये ३७५ म्हणजे एकंदर ६२५ इतके. एशियाटीक किंवा सुमात्रामधील दोन शिंगाचे गेंडे आता साधारण १७० इतकेच आहेत. ते मुख्यतः बर्मा, मलाया व सुमात्रा येथे आहेत. ह्या जातीची एक मादी कोपनहेगन प्राणिसंग्रहालयात आहे. जावामधील एकशिंगी छोटा गेंडा आता फक्त उद्जाँग कुलोन ह्या पश्चिम जावामधील राखीव जंगलातच दिसून येतो आणि ते आता केवळ २५ ते ५० इतकेच उरले आहेत. जावामधील गेंड्याची ही जात आता कुठेच बंदिस्त अवस्थेत प्राणिसंग्रहालयांतही नाही.

आकारामध्ये आफ्रिकेतील पांढरा गेंडा सर्वांत मोठा आहे. त्या खालोखाल जावामधील गेंडा व तिसरा नंबर आफ्रिकेतील काळ्या गेंड्याचा लागतो. त्याखालोखाल जावामधील गेंडा आणि सर्वांत लहान सुमात्रामधील गेंडा. आफ्रिकेतील पांढरा गेंडा व भारतीय गेंडा चरत असताना पाहणे मजेशीर असते. मादी

अनुक्रमणिका

व पिलू बरोबर गवताळ प्रदेशांतून चरत असताना पिलू मादीच्या पुढे असते आणि आई त्याच्या पाठोपाठ जाते. हे बहुधा आफ्रिकेत सिंह व भारतात वाघ यांसारख्या दबा धरून बसणाऱ्या पशूंवर लक्ष ठेवण्याकरिता असावे. (छायाचित्र क्र. ५४) बहुधा झाडाझुडुपांचा पालापाचोळा खाणाऱ्या इतर जातीच्या गेंड्यामध्ये हे जरुरीचे नसावे.

आशिया खंडात दिसून येणाऱ्या तीनही जाती भारतात दिसून येत असत. जावामधील एकशिंगी छोटा गेंडा पूर्वी भारतात बंगालमध्ये सहज दिसून येत असे. विशेषतः सुंदरबनमध्ये तो मोठ्या प्रमाणावर दिसून येई परंतु १९०० च्या सुमारास तो भारतातून समूळ नष्ट झाला. सुमात्रामधील दोन शिंगी गेंडा अजूनही म्हणजे १९३५ पर्यंत आसाममधील मिझो टेकड्यांवर (पूर्वीच्या लुशाई) दिसून येई. त्यानंतर मात्र तो तेथे दिसेनासा झाला. हा जरी दोन शिंगाचा असला तरी त्याचे पुढचे शिंग लहान असते व पाठचेच शिंग चांगले लक्षात येण्याइतपत मोठे असते.

भारतीय एकशिंगी गेंडा देखील समूळ नष्टच झाला असता; परंतु ह्या शतकाच्या सुरुवातीला त्याची संख्या फारच कमी झाल्याने वेळीच त्याला पूर्ण संरक्षण देण्यात आले म्हणून ठीक. गेंडा हा जीवाजीवांच्या झगड्यात तग धरून राहाण्यास का असमर्थ आहे? काही माणसे म्हणतात की त्याची श्रवणशक्ती अगदी कमी आहे व दृष्टी देखील मंद आहे. परंतु मी याच्याशी सहमत नाही.

मला स्वतःला वाटते की तो मंद बुद्धीचा असून उगाचच नसता धोका पत्करतो. भारतातील जास्तीत जास्त वन्यप्राणी काहीही धोका दिसला तर आंतरिक प्रेरणेने ताबडतोब पळून जाऊन दाट झाडीत अथवा दाट जंगलांत गडप होतात; परंतु अविचारी गेंडा बरोबर उलटे करतो. तो धोका अगदी पुढ्यात येऊन ठेपेपर्यंत चरतच राहतो आणि नंतर देखील पळून जाऊन लपण्याऐवजी तो हल्ला करून स्वतःला आणखीनच दिसेलसे करतो. तसेच त्याला एकाच ठराविक ठिकाणी जाऊन विष्ठा टाकण्याची संवय असते या त्याच्या संवयींमुळे त्याला मारणारांचे फावते. अशा या विष्ठेच्या ढिगाऱ्याच्या ठिकाणी मारेकरी लपून राहातात कारण या ठिकाणी गेंडा विष्ठा टाकण्यासाठी उलट उलट चालत जातो.

काहींचे म्हणणे असे आहे की ह्या विष्ठेचा ढिगारा त्या त्या गेंड्याची सरहद्द दाखवितो. परंतु मला तसे वाटत नाही. कोणताही गेंडा कोणत्याही ढिगाऱ्यामध्ये आपली विष्ठा टाकतो हे मी स्वतः पाहिले आहे आणि विशेषतः तो गेंडा त्या ठराविक हद्दीत राहातही नाही. ते चरण्यासाठी एका जागेमधून दुसरीकडे जेथे गवत पाला जास्त असेल तेथे जातात. प्रत्येक गेंडा विष्ठेच्या ढिगाऱ्याजवळून जाताना त्याचा उपयोग करावयाचा की नाही ते ठरवितो.

नीलगाय व काळवीटांसारखे आणखी काही शाकाहारी प्राणीदेखील विष्ठा टाकण्यासाठी एखाद्या ठराविक जागेकडे जातात. त्याचा त्यांचा हद्दींशी काहीएक संबंध नसतो.

गेंडा जरी एकाकी राहणारा प्राणी आहे तरी मी एका चिखलाच्या मोठ्या डबक्यात एकाच वेळी सात गेंडे एकत्र डुंबत असताना पाहिले आहेत. परंतु हे सात वेगवेगळ्या ठिकाणाहून आले होते. त्या डबक्यांतून त्यांना डिवचल्यावर ते सात वेगवेगळ्या दिशांना पांगले. एका भारतीय कवीने म्हटले आहे:

“कशालाही भीत नाही कोणाचीही पर्वा नाही,

अनुक्रमणिका

एकटाच भटकतो गेंड्यासारखा.”

प्राण्यांवर लिहिणाऱ्या कित्येक लेखकांनी गेंडा फक्त एकाच प्रकारचा आवाज काढतो असे लिहिले आहे आणि तो म्हणजे गुरगुरल्यासारखा! परंतु मी गेंडा चार प्रकारचे आवाज काढताना ऐकलेला आहे ते म्हणजे: (१) गर्जना—गेंड्याला पकडण्यात आलेले त्याला कळताच तो मोठी गर्जना ठोकतो (२) फूत्कार – त्याला डिवचले किंवा चिडवले असता; (३) गुरगुरणे – सहजच तो गुरगुरल्याचा आवाज काढतो आणि (४) शीळ घातल्यासारखा आवाज – प्रणयचेष्टा किंवा संभोगाचे वेळी – मला वाटते मादी असा आवाज बहुधा काढीत असावी; आणि नर मात्र हलकेच गुरगुरल्यासारखा आवाज काढतो. परंतु जुन्या काळातल्या शिकारी लेखकांनी असे वर्णन केलेले आहे की अतिशय जखमी झालेला गेंडा असा शीळ घातल्यासारखा आवाज काढतो.

भारतीय गेंड्याबद्दल एक मजेशीर गोष्ट अशी की म्हतारा झालेला नर गेंडा आयुष्याच्या उरलेल्या शेवटच्या दिवसात जेव्हा बलवान गेंड्याबरोबर सामना देऊ शकत नाही तेव्हा कार्यनिवृत्त झाल्याप्रमाणे स्वतः होऊन आपले उर्वरित आयुष्य अभयारण्याच्या एका टोकाला घालवितो. केव्हा केव्हा असे गेंडे गावाच्या बऱ्याच जवळपासही राहतात त्यामुळे त्यांना गावकऱ्यांकडून संरक्षण मिळते. कारण तरुण गेंडे अशाप्रकारे अभयारण्याच्या बाहेर यावयास धजावत नाहीत. हे असे म्हतारे गेंडे प्रथम अभयारण्याच्या बाहेरच्या अंगाला येतात तेव्हा त्यांच्या अंगावर मारामारीच्या तीव्र खुणा असतात त्यामुळे ते खराब दिसतात, परंतु नंतर ते बरे होऊन उलट काझीरंगाचे अभयारण्य पाहावयाला येणाऱ्या पर्यटकांचे एक आकर्षण बनून जातात. कारण त्यांना अभयारण्यात एकही गेंडा दृष्टीस पडला नसला तर हा असा एखादा तरी सहज जवळून पाहता येण्याची खात्री असते.

‘बूरा गूंडा’ नावाचा असा एक म्हतारा अर्धवट माणसाळलेला गेंडा फारच प्रसिद्ध होता; तो असा अभयारण्याच्या बाहेरच्या बाजूस जवळजवळ १४ वर्षे त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या दिवसांत राहिला. हजारो पर्यटकांनी त्याचे कितीतरी फोटो काढून त्याला गौरविले होते. मी एकदा त्याचा फोटो जमिनीवर असताना त्याच्या नाकापासून अवघ्या ९ फूट अंतरावरून न घाबरता काढला होता; त्यामुळे तेथे जवळपास दूरदर्शनचा एक छायाचित्रकार; गेंडा माझ्यावर हल्ला केव्हा चढवील याची वाट पाहत सज्ज होऊन बसला होता त्याची मात्र निराशा झाली—माझ्या प्राणावर बेतले असते तर त्याचे चांगलेच फावले असते.

‘बूरा गूंडा’ म्हणजे आसामी भाषेत “मोठा म्हतारा नर”. तो १९५३ मध्ये नैसर्गिकरित्या शांतपणे मरण पावला. सर्वांनाच चुकल्याचुकल्यासारखे झाले, परंतु त्याची जागा लवकरच दुसऱ्या एका हाकलविल्या गेलेल्या नराने घेतली. त्याचे नाव ‘कान कट्टा’ म्हणजे “कापलेल्या कानाचा”.

जगाच्या अनेक भागातील लोकांना पाहावयाला मिळावेत म्हणून कित्येक प्राणिसंग्रहालयांत काझीरंगामधून गेंडे पाठविण्यात आले आहेत. यापैकी काही सुरुवातीचे गेंडे म्हणजे मोहन (१९४७ मध्ये) आणि मोहिनी (१९५२ मध्ये) व्हिप्सनेड येथे गेली. हे दोन्ही छोटे गेंडे पकडण्यापासून ते त्यांना विमानात बसवून ब्रिटनला पाठविण्यापर्यंत सर्व व्यवस्था व त्यांची काळजी घेण्यात मी मदत केली.

गेंड्यांना खड्डे खणून पकडण्यात येते. गेंड्यांचा साधारण दैनंदिन जाण्यायेण्याचा रस्ता असतो तेथे मध्यावर दहा फूट लांब, ५ फूट रुंद व सहा फूट खोल असा खड्डा खणण्यात येतो. नंतर तो गवत, काटक्या

अनुक्रमणिका

कुटक्या, पालापाचोळा यांनी वरचेवर झाकून बाजूच्या जमिनिशी मिळताजुळता करण्यात येतो. बहुधा मादीच्या पुढे पुढे चालणारे छोटे पिलू अशा खड्यात पडते. नंतर त्याला हत्तींनी ढकलत आणलेल्या चाकाच्या पिंजऱ्यात ढकलले जाते. हत्ती तो चाकाचा पिंजरा ओढत ओढत उंच उंच बांबूच्या कामट्यांनी बनविलेल्या गोठ्यात आणतात. येथे ते कुठच्याही प्राणीसंग्रहालयात पाठविण्यापूर्वी साधारण महिनाभर राहते. हे सर्व शास्त्रीय पद्धतीने व सहानुभूतीपूर्वक केले जाते–अर्थातच वनखात्याच्या अनुभवी कर्मचारी वर्गाकडूनच.

गेंड्याला पकडल्यावर प्रारंभी तो प्रथम पकडलेल्या हत्तींप्रमाणेच अत्यंत चवताळून व दांडगाई करून नाखूषी व्यक्त करतो. हे आपण प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिल्याशिवाय विश्वास ठेवता येणार नाही. याचे मुख्य कारण म्हणजे एकाएकी तो स्वतःला पूर्वी कधीही न पाहिलेल्या अशा या नवीन परिस्थितीत, बंदिस्त अवस्थेत पाहतो व आपल्या हालचालींचे स्वातंत्र्य नष्ट झाले आहे हे त्याला उमगते. हे केवळ भीतीपोटीच असते कारण काही दिवसांतच असे हे पकडलेले गेंडे किंवा हत्ती रुळाला लागून चांगले माणसाळले जातात. त्यांना एकदा माहीत झाले की त्यांची चांगली देखभाल केली जाते; की त्यानंतर त्यांची भीती नष्ट होते. मोहिनी अगदी छोटी असताना तिला पकडल्यावर काही काळच तिने रानटीपणा दाखविला त्यानंतर लवकरच ती चांगली माणसाळली गेली आणि मला चांगलेच आठवते की माझा तर तिला इतका लळा लागला होता की जेव्हा जेव्हा तिला संधी मिळे तेव्हा तेव्हा ती माझे हात चाटी.

व्हिप्सनेड येथील मोहन व मोहिनी आणि स्वित्झर्लंडमधील बेसल येथील गेंड्याच्या आणखी एका जोडीने अनुक्रमे दोन व तीन पिलांना व्यवस्थित जन्म दिला आणि त्यांच्या प्रजोत्पत्तीबद्दल आपल्याला अमूल्य माहिती उपलब्ध करून दिली. ह्यावरून काझीरंगासारख्या प्रशांत आणि मोकळ्या वातावरणांत आपण किती निरिक्षण करू शकू याची कल्पना येते.

उदा. आता आपल्याला असे माहित झाले आहे की जेव्हा एक पूर्ण वाढलेला गेंडा दुसऱ्या पूर्ण वाढलेल्या गेंड्याच्या मागे लागला असला तर तो केवळ एक बलवान नर दुसऱ्या कमजोर नराला हुसकून लावीत असेल असेच नाही किंवा नर एखाद्या मादीच्या मागे लागला असेल असेही नाही. बऱ्याच वेळा 'माजावर' आलेली मादीच एखाद्या "नाखूष" नराच्या मागे लागलेली असते. वर्षभरात ४६ ते ४८ दिवसांच्या अंतराने मादी अशाप्रकारे माजावर येते. ह्या वेळात नराकडून संभोग होऊन ती तृप्त झाली नसली तर ती नर गेंड्याच्या मागे लागते. नर देखील अशाप्रकारे ठराविक वेळात माजावर येतात; व नर आणि मादी दोघांचा माजावर येण्याचा काळ संभोग होण्यापूर्वी बरोबर जुळून यावा लागतो. गर्भधारणेचा काळ सव्वासोळा ते साडेसोळा महिने असतो. गेंड्याचे आयुर्मान हत्तीइतकेच म्हणजे जवळजवळ ७० वर्षांचे असावे असा अंदाज आहे, परंतु अजूनही आपल्याला त्याबद्दल नक्की माहिती नाही.

गेली पंचवीस वर्षे जेव्हा पासून काझीरंगाचे अभयारण्य पर्यटकांसाठी खुले झाले तेव्हापासून मी ह्या ठिकाणाला भेटी देत आहे. येथील सर्व ओढे व तळी जलकुंभीच्या सुंदर दिसणाऱ्या परंतु आगंतुकासारख्या वाढणाऱ्या वनस्पतींनीं आक्रमण करून आता पूर्ण भरून गेली आहेत. यापूर्वी ते कसे दिसत असे ते मला माहीत आहे. साधारणतः ५० वर्षापूर्वी ही वनस्पती एक शोभिवंत वनस्पती म्हणून द. अमेरिकेमधून भारतात आणून लावली गेली. ह्या वनस्पतीचा एक छोटासा तुकडा काही महिन्यांतच ६०० चौ. वाराहून जास्त पाण्याचा पृष्ठभाग व्यापतो त्यामुळे अमाप हानी होते. सुरुवातीला रानडुकरे सोडली तर दुसरे कोणतेही

जनावर त्याला तोंड लावीत नसे. ही डुकरे देखील उन्हाळ्यातच ह्या वनस्पतीची मुळे खात. अलीकडे नाईलाजाने का होईना परंतु हत्ती, गेंडे व रानरेडे सर्वच ह्या वनस्पती थोड्या तरी खातात.

मी काझीरंगा अनेक वेळा पाहिले आहे. फेब्रुवारी–मार्चच्या सुमारास येथे जोराचे सुके वारे वाहू लागतात तेव्हा मी मी म्हणणारे देखील लोळविले जातात. उंच उंच वाढणाऱ्या ('एलिफंट ग्रास') गवताला आगी लागतात त्यामुळे गवत जळून जाऊन त्याचे फक्त खाक झालेले दांडे उरून वैराण जंगलात काळे काळे भाग दिसून येतात. मी ते एप्रिल–मे मध्ये देखील पाहिले आहे. त्यावेळेस येथे उगवणारे नवीन गवताचे कोंब उन्हाळ्यांतील खुला रंग प्राप्त झालेल्या स्वॉम्प डिअर व हॉग डिअर ह्या जातीच्या हरीणांना आकर्षित करून खुणावीत असल्याचे मी पाहिले आहे.

भर पावसाळ्यात पूर आलेले असताना मी येथून बोटीने गेलेलो आहे. आणि अशाच वेळेस एकदा मला खोल पाण्यात पोहणाऱ्या गेंड्याचे छायाचित्र (क्र. ५४) मिळाले आहे. हे बहुधा एकमेव छायाचित्र असावे. परंतु मला सर्वात जास्त वेळ आवडते ती पावसाळ्याच्या शेवटाशेवटाची ऑक्टोबर–नोव्हेंबर दरम्यानची, जेव्हा पूर ओसरलेले असतात आणि पावसाळ्याची आर्द्रता संपून थंड, सोनेरी उन्हाचे दिवस सुरू होतात. याच दिवसांत अनेक प्रकारच्या गवतांना अन् पाणकणीसांना फुले येऊ लागतात; आणि उत्तरेकडे शेकडो मैल दूर असलेली पूर्व हिमालयाची हिमाच्छादित शिखरे सहज स्पष्ट दिसू लागतात.

हत्तींवरून रपेट करताना कित्येक वेळा आपल्याला चित्तथरारक अनुभव येऊ शकतात. केव्हा रागावलेला तर केव्हा भ्यालेला गेंडा फुरफुरून हल्ला चढवील याचा नेम नसतो. हत्तीचा माहूत हत्तीला बरोबर उभा करून गेंड्याच्या ह्या 'बकवासा' ला प्रत्युत्तर देईल की हत्ती शेपूट दाखवून मोठी झाडे नसलेल्या उंच गवतातून पळून जाईल (झाडे नसल्याने तुमचे डोके फांद्यांच्या मारापासून शाबूत राहील) हे देखील तितकेच सनसनाटी असते.

हत्तीच्या पाठीवरून फिरताना येणाऱ्या बारीक सारीक चित्तथरारक अनुभवांखेरीज मी पायी चालत असताना माझी गेंड्याशी दोनदा गाठ पडल्याचे प्रसंग मला आठवताहेत.

गेंडे फारच धोकादायक असू शकतात; आणि दरवर्षी गेंड्यांनी काही माणसे मारल्याची उदाहरणे आहेत. ह्या धोक्यामुळे पर्यटकांना अभयारण्यांत हत्तीवरून खाली उतरून पायी चालण्यास परवानगी नाही. परंतु मी अनुभवी व मानसेवी वनाधिकारी असल्यामुळे मला वनखात्याने नेहमीच सहकार्य दिलेले होते.

पहिला प्रंसग मी जेव्हा उघड्यावर गेंड्याची एकदोन छायाचित्रे मिळविण्याचा निश्चय केला होता तेव्हाचा आहे. हत्तीवरून छायाचित्र घेणे अतिशय कठीण आहे. कारण तो केव्हाच स्थिर राहात नाही. ठरल्याप्रमाणे मी जेव्हा त्या सुकलेल्या तळ्याच्या ठिकाणी गेलो तेव्हा तेथील खुरट्या गवतावर एक मोठा नर गेंडा चरत असल्याचे पाहून मी माहुताला थांबण्याचा इशारा केला आणि हत्तीला गुडघ्यावर बसावयाला सांगितले. नंतर मी आणि माझा सहकारी ज्याला मी छायाचित्रण करताना माझी यंत्रसामुग्री सांभाळावयास घेत असे असे दोघेजण हत्तीवरून उतरून पायीच सावधानतेने हलके हलके चालत गेंड्याकडे कॅमेरा तिवई इ. घेऊन गेलो.

मी जेव्हा छायाचित्र घेण्यासाठी बरोबर अंतरावर आलो तेव्हा तिवई व त्यावर कॅमेरा मांडून गेंड्याच्या छायाचित्रणास सुरुवात केली. तो हळूहळू सरळ माझ्या रोखाने येऊ लागला. मी माझ्या सहकाऱ्याला हत्तीकडे परत पाठविले आणि मी मात्र त्या जवळ येणाऱ्या पशूची छायाचित्रे घेतच राहिलो. कॅमेऱ्याच्या भिंगावर जशी गेंड्याची प्रतिकृती मोठमोठी होऊ लागली तेव्हा माझे काम आवरते घेण्याचे मी ठरविले. परंतु तेव्हा कॅमेरा व तिवई उचलून घेण्यास वेळ नव्हता.

मी हत्तीकडे जाता जाता पाठी वळून पाहिले. तो गेंडा माझा कॅमेरा जवळून न्याहाळून पाहात होता. मी नेहमीप्रमाणे हत्तीच्या पाठच्या वाकलेल्या पायावर पाय देऊन त्याच्या शेपटीखालील दोर पकडून त्यावरून चढून हत्तीवर जाऊन बसलो. तो गेंडा अजूनही तिकडे माझा कॅमेरा न्याहाळीतच होता. त्याला जर तो कॅमेरा वापरता येत असता तर त्याला एका घाबरलेल्या व चीत्कार करीत असलेल्या हत्तीवर एक माणूस भराभरा कसाबसा कोंबून बसत असतानाचे चांगले छायाचित्र टिपता आले असते.

दुसरा प्रसंग – काझीरंगामध्ये एका शेवरीच्या झाडावर मच्छीमार गरुडाचे (Palla's fishing eagle) घरटे लोंबत होते; त्यात त्या गरुडाची जोडी होती–त्याचे छयाचित्रण मी करीत असतानाचा. त्या झाडाजवळच्याच दुसऱ्या एका झाडावर मी जमिनीपासून ४० फूट उंचावर मचाण बांधले होते. ते झाड अशा ठिकाणी होते की त्यामुळे मला सकाळच्या ८·३० ते ९·३० च्या दरम्यानच्या सूर्यकिरणांचा चांगला उपयोग करता आला असता. तेथील आजूबाजूच्या भागात काही गेंडे केव्हाही फिरत असण्याचा संभव असल्यामुळे मला व माझ्या दोन सहकाऱ्यांना तेथे सकाळी आणून सोडण्यासाठी तसेच २/३ तासानंतर परत नेण्याकरिता एक हत्ती मागविला होता.

एका दिवशी सकाळी हत्ती आलाच नाही. मी काय करावे ह्या संभ्रमात पडलो. निरभ्र आकाशात सूर्य चमकत होता आणि ते गरुड एकमेकांना त्यांच्या मोठ्या आवाजात कू....रु....कू....रु... अशी शीळ घालून बोलावत होते त्या हिरव्यगार पानांच्या गर्द पालवीने भरलेल्या झाडावरील घरट्याकडे जाण्याचा मोह मला आवरेना. तो प्रवास मी पायीच करण्याचा धोका पत्करला.

'हत्ती आला नाही' मी माझ्या दोघा सहकाऱ्यांना सांगितले. परंतु मी तेथे पायीच चालत जायला तयार आहे. तुम्ही माझ्या बरोबर येणार आहात की तुम्हाला येथेच राहावयाचे आहे?

"साहेब जिकडे जातील तेथेच आम्हीही जाऊ" मला अनपेक्षित उत्तर मिळाले.

आम्ही त्या उंच वाढलेल्या गवताच्या चिंचोळ्या पट्टीतून मोठ्या सावधानतेने जाऊ लागलो. मला आठवते तेव्हा मला वाटू लागले की आपण किती लहान व क्षुद्र असून ते १५ फूट उंच गवत आपल्यापेक्षा किती तरी उंच आहे. त्या शेवरीच्या झाडापर्यंत आम्ही व्यवस्थित पोहोचलो. त्यानंतर एखादा तास चांगले छायाचित्रण केले. त्यानंतर सूर्यकिरणांची दिशा बदलली व छायाचित्रण करणे अशक्य होऊ लागले. त्या उंच गवतातून पुन्हा परत जाण्याची वेळ झाली होती.

आम्ही शंभरएक यार्डांवर गेलो असू नसू तेवढ्यात घाबरलेल्या आवाजात गेंडा येतोय, गेंडा येतोय् असे काहीसे मी ऐकले! विशीच्या आसपास असलेले ते माझे दोघे सहकारी ताबडतोब ऑलिम्पिक शर्यतीचे सर्व उच्चांक मोडून भराभर खालच्या रस्त्यावरून केव्हाच नाहीसे झाले.

अनुक्रमणिका

मी त्यांच्या वयाचा असतो तर त्यांच्याहूनही जोराने धावलो असतो. परंतु मला माहीत होते की कितीही जोराने धावू शकणाऱ्या माणसाला देखील गेंडा सहज गाठू शकतो. काहीही असो, मी देखील सुटकेसाठी प्रयत्न करू लागलो. तो सबंध रस्ता ओला व निसरडा झालेला होता. गेंड्यांच्या तीन बोटांच्या ठशांनी आणि हत्तीच्या मोठ्या गोलसर पावलांनी जागोजागी त्या रस्त्यावर खड्डे खड्डे झालेले होते.

तीसएक फुटांवर गेल्यावर मी त्यातल्या त्यात उत्तम गोष्ट करता येईल ती केली. मी पाठीवर उताणा पडून निश्चल पडून राहिलो. एव्हाना गेंडा माझ्या अगदी जवळ आला होता. मला माहीत होते की हत्तीप्रमाणेच भारतीय गेंडा देखील पडलेल्या भक्ष्यावर हल्ला चढवीत नाही. नंतर मी पटकन् रस्त्याच्या कडेला गवतातून गडबडत गेलो आणि तेथेच काहीही हालचाल न करता निश्चल पडून राहिलो.

गेंडा मेघगर्जनेसारखा गर्जत निघून गेला. नंतर जवळजवळ वीसएक मिनिटांनी गवत हलले आणि माझ्या दोघा मदतनीसांपैकी एकजण उगवला. तो बऱ्याच अंतराच्या वळणावरून आलेला दिसला. मी ठीक आहे का असे त्याने विचारले. नंतर आम्ही दोघेजण त्या पाऊलवाटेवरून मुख्य रस्त्यावर आलो आणि दुसऱ्या मदतनीसाला हाका मारल्या. बऱ्याच वेळानंतर तो एकदाचा उगवला. त्याची भीतीने अगदी बोबडी वळली होती. शेवटी एकदाचे त्याने वर्णन करून सांगितले की तो योगायोगाने कसा बरेच दाट गवत वाढलेल्या ठिकाणीं पडला आणि गेंडा त्याच्यावर सर्व शरीराचा भार टाकून उभा राहून जोरजोराने श्वास टाकून मग आपल्या वाटेने निघून गेला.

अनुक्रमणिका

**प्रकरण २० वे**

# एक सुंदरसा सुर्योदय

काझीरंगाचाच विषय असल्यामुळे पुन्हा रानटी हत्ती तसेच पाळीव हत्तींचा विषय निघणे संभवनीयच आहे. कारण काझीरंगाच्या आतील भागांत रानटी हत्ती नेहमीच दिसतात. केव्हा केव्हा तर मिखिर टेकड्यांच्या पुढे दोनदोनशे हत्ती देखील दिसतात. आणि ह्या दलदलीच्या प्रदेशांत जे १५ फुटाहूनही उंच गवत (एलिफंट ग्रास) वाढते ते तुडविण्यासाठी पाळीव हत्तीदेखील आवश्यकच आहेत.

काझीरंगामध्ये कित्येक वर्षे एक मोठा सुळेवाला हत्ती फारच प्रसिद्ध होता. त्याचे नाव अकबर होते. (छायाचित्र क्र. ५५, ५७). आसामचे गव्हर्नर आणि तसेच मोठमोठे हुद्देवाले लोक ह्या भव्य हत्तीवरून काझीरंगाच्या अभयारण्यांतून फिरले होते. कित्येक वेळा हा हत्ती पिलू बरोबर असताना रागीट बनलेल्या गेंड्याच्या मादीशी देखील सामना देण्यास उभा ठाकीत असे. खरे पाहता हत्ती हल्ला करण्याच्या पवित्र्यात असताना जशी सोंड आतल्या बाजूस वळवून घेऊन गुडघ्यावर उभे राहून पवित्रा घेतात तसे उभे राहून अकबरने कित्येक वेळा लढण्याच्या जिद्दीने उभ्या ठाकलेल्या गेंड्याशी सामना दिलेला आहे.

हत्तीचे वजन बरेच असल्याने व तो बलवान असल्याने पाळीव हत्ती केव्हा केव्हा अशा हल्ला करण्याच्या जिद्दीने आलेल्या गेंड्याची मुसंडी पचवू शकतात; परंतु असे अगदी क्वचितच् घडते. परंतु हत्तीची सोंड फारच नाजूक असल्याने गेंड्याच्या पुढच्या पटाशीच्या दातांनी तिला जखम होण्याचा फारच संभव असतो. एका प्रसंगी अकबरच्या सोंडेला फारच दुखापत झाल्याचे मला आठवते, परंतु सुदैवाने ती लवकरच भरून आली.

अकबरच्या वनखात्याच्या नोकरीमध्ये त्याने तीन माणसांना ठार मारले आहे. परंतु प्रत्येक वेळा त्या मरणाऱ्या माणसानेच जणू काही ते मागून घेतले होते. तिसऱ्या वेळचा प्रसंग मला चांगलाच आठवतोय. दुसऱ्या एका हत्तीचे गवत कापणारा मनुष्य अकबरच्या खाद्यातील धान्य बराच काळपर्यंत चोरीत असे. एके दिवशी अकबरला मुळीच राहावले नाही. त्याने त्याचा घरापर्यंत पाठलाग केला आणि मरेपर्यंत त्याला ठेचून काढले. ही घटना घडल्याबरोबर अकबरचा माहूत त्या भव्य प्राण्यापर्यंत गेला. त्याच्यावर चढून बसला आणि त्याला पुन्हा ते पाळीव प्राणी जेथे ठेवलेले असत तेथे त्याने आणले. तो अगदी पूर्वी सारखाच वागला.

आश्चर्य म्हणजे त्यानंतर चारच दिवसांनी अकबरला मद आला. मला अगदी वाटते की मद येण्याच्या सुमाराचा त्या माणसाला मारण्याशी काहीतरी घनिष्ठ संबंध असावा. त्याचा मद ओसरल्याबरोबर अकबरवर आरूढ होणारा असा मीच पहिला होतो; आणि अभयारण्यातून फिरताना मला अकबर व्यवस्थित आणि काबूत असल्यासारखा वाटला.

माझ्याकडे दूर पल्ल्याचे भिंग जेंव्हा नव्हते तेंव्हा काझीरंगा येथील छायाचित्रणाच्या दिवसांत मी अकबरवरून खाली उतरून देखील गेंड्याच्या अगदी जवळपर्यंत चालत चालत जाई. अकबर माझ्या पाठोपाठ येऊन अगदी माझ्या बाजूला उभा राहून त्याचे भले मोठे सुळे टेकवून गेंड्याने हल्ला चढविलाच तर त्यापासून माझे रक्षण करता यावे म्हणून उभा राही. खरे पाहता माझ्या डोक्यापासून त्याचे भव्य सुळे किती जवळ असत; हे केंव्हाही धोकादायकच! केव्हा केव्हा मी चालत जाणाऱ्या गेंड्याचे छायाचित्रण

करण्याकरिता दाट वाढलेल्या गवतातून अडखळत चालत असताना तो माझ्या काही फूट अंतरावर मागे मागे चालत राही. नंतर छायाचित्रण संपले की तो भव्य प्राणी मला त्याचेवर आरूढ होता यावे यासाठी गुडघे टेकवून उभा राही.

ह्या भव्य प्राण्याला १९५६ मध्ये नैसर्गिक रीत्या मृत्यू आला. तो मरण्याच्या फक्त सहा आठवड्यापूर्वीच त्याने जवळच्याच पालापाचोळ्यातून आलेल्या एका जखमी वाघाशी सामना दिला होता आणि त्याला चांगलीच जबरदस्त लाथ देऊन लोळविला होता. दोन महिन्यांपूर्वी त्याने अभयारण्यात एका बिनसुळ्याच्या, रानटी हत्तीवर हल्ला चढवून त्याच्याशी सामना दिला होता. जखमी वाघ तर अकबरकडून ठार मारला गेला. शिवाय माखना ५ मिनिटांच्या झुंजीतच पराजित झाला.

साधारणतः अभयारण्यात असताना अशा शिकाऊ हत्तींना फक्त एकट्या दुकट्या रानटी हत्तींकडूनच केव्हा तरी उपद्रव्य होण्याचा संभव असतो. कळपात असलेल्या रानटी हत्तींकडून पर्यटकांना काहीच धोका नसतो. खरे पाहता आपण हत्तीवर असताना तर आपल्याला रानटीहत्तींच्या अगदी जवळ जाता येते. केव्हा केव्हा तर त्यांच्या कळपातही शिरता येते. काही जिज्ञासू खिलाडू वृत्तीचे रानटीहत्ती तर शिकविलेल्या हत्तीच्या जवळ येऊन त्याच्या सोंडेला सोंड लावून हितगूज देखील केंव्हा केंव्हा करतात. त्यांना ह्या हत्तीवर आरूढ झालेल्या मानवी प्राण्यांची जाणीव देखील नसते.

काझीरंगा येथे वनखात्याने ८/९ हत्ती ठेवलेले आहेत. ह्या मध्ये नर—माद्या दोन्ही आहेत. ह्यापैकीं दोन माद्या—एक देवकाली व दुसरी पार्वती—सात फूट सहा इंच व सात फूट चार इंच अनु. अशा उंचीच्या आहेत. त्या दोघी इतर हत्तींसारख्याच दिसतात, परंतु सर्वसाधारण माणूसही सांगू शकेल की देवकाली पार्वतीपेक्षा वयाने खूपच मोठी आहे.

ह्या दोघींच्या मागे एक मोठीच गोष्ट आहे. देवकाली आई आहे आणि पार्वती तिची लेक आहे. आताशा लेक देखील आई इतकी उंच झालेय ही गोष्ट अलाहिदा! त्यांच्या मागचा इतिहास असा आहे.

देवकाली दोयांगच्या राखीव जंगलात शिकाऊ हत्तीण म्हणून कामाला होती. ही जागा मी ज्या चहाच्या मळ्यात मॅनेजर म्हणून कामाला होतो तेथून जवळच होती. १९४५ मध्ये ती येथून नाहीशी झाली आणि ती एका रानटीहत्तींच्या कळपांत सामील झाली. १९४९ पर्यंत म्हणजे जवळजवळ ४ वर्षेपर्यंत ती बाहेरच जंगलात राहिली. १९४९ मध्ये ती ज्या कळपांत राहात होती तो सबंध कळपच्या कळप खड्डा करुन हत्ती पकडणाऱ्या लोकांनी पकडला. ती “बॉन घरासिया” म्हणजे पाळीव शिकविलेले प्राणी रानात पळून जातात तशी ओळखली गेली आणि वनखात्याने तिच्यावर आपला हक्क सांगितला.

ती पुन्हा आपल्या पूर्वीच्या माहुताकडे गेली आणि आपले पूर्वीचे काम करू लागली. वनखात्यात तिचे काम पुन्हा सुरू झाले. सहा फेब्रुवारी १९५० ला तिने पार्वतीला जन्म दिला. म्हणजे २० महिन्यांपूर्वी तिचा रानटीहत्तीशी संयोग झाला असावा.

तिने प्रसविलेल्या पिलाची बातमी माझ्यापर्यंत आली. त्या दिवशी चहाच्या मळ्याला सुटी असल्याने मी ताबडतोब तेथे गेलो आणि आईची व नुकत्याच जन्मलेल्या पिलाची छायाचित्रे घेतली. (छायाचित्र क्र. ५८) तेव्हा माझ्या मनात आले की दरवर्षी ६ फेब्रुवारी किंवा त्याच्या आसपासच्या वेळेस तेथे जाऊन मला

अनुक्रमणिका

तिच्या पुढच्या पायाचा घेर, खांद्यापर्यंतची उंची इत्यादी प्रकारची मोजमापे घेऊन नीट नोंद ठेवली पाहिजे. (मला वाटते भारतीय हत्तींमध्ये खांद्यापर्यंतची उंची बरोबर दुप्पट होते.) [पार्वतीच्या उंचीच्या मोजमापांपैकी काही पुढे देत आहे: १ वर्षाची—४ फूट १ इंच; ३ वर्षाची—५ फूट १ इंच; ७ वर्षाची—६फूट १ १/२ इंच; ११ वर्षाची—७ फूट; १३ वर्षाची—७ फूट २ इंच. तिच्या आईपेक्षा केवळ ४ इंचच लहान). ]

हे मी एक वर्ष सोडून प्रत्येक वर्षी करीत असे. (छायाचित्र क्र. ५९) फक्त एकच वर्ष मी द. भारतात असल्यामुळे करू शकलो नाही तेव्हा मी तेथील विभागीय अधिकाऱ्याला ही मोजमापे घ्यावयास सांगितली. १९५५ पासून देवकाली आणि पार्वती दोघीही काझीरंगा येथे पर्यटकांसाठी रपेट करण्याकरिता राखून ठेवण्यात आल्या. पार्वती गेली दोन वर्षे अभयारण्यातून पर्यटकांना फेरफटका करवून आणीत आहे.

भारतीय हत्तींच्या वाढीची अशी एकमेव नोंद सलग तेरा वर्षपर्यंत मी मिळविली आहे. ती देखील अशी की हा हत्ती त्याच्या स्वतःच्या मूळच्या गावीच अभयारण्यात म्हणजे जवळजवळ जंगलातच नैसर्गिक अवस्थेत वाढत आहे. याशिवाय १९५३ मध्ये पाच रानटीहत्तींचा एक छोटा कळप जो कामट्या व बांबूच्या कुंपणामध्ये अडकून पकडून ठेवलेला होता त्याचेही जवळून निरीक्षण करून त्यांची छायाचित्रे मला घ्यावयास मिळाली, त्यामुळे मी स्वतःला सुदैवी समजतो (छायाचित्र क्र. ६०—६१)

ह्या पाच रानटीहत्तींचा कळप मी जवळून पाहीपर्यंत मला इतर रानटीहत्तींसारखाच वाटला. नंतर पाहाता दिसून आले की त्या सर्व माद्या होत्या. एक मोठी अन् बाकीच्या चौघी, उतरल्या वयांची ४ पिले. शेवटचे तर अगदीच छोटे होते. आणखी नीट न्याहाळून पाहाता असे आढळून आले की ती एकाच मादीची वेगवेगळ्या वयातील चार पिले असावीत. सर्वात मोठे पिलू मात्र फारच वेडेवाकडे दिसत होते. त्याच्या पाठीची, पायातील, शेपटीची सगळीकडचीच हाडे वेडीवाकडी मोडल्यासारखी दिसत होती. त्याच्या वयाच्या दहापंधरा वर्षांत (वेगवेगळ्या लोकांच्या अंदाजाप्रमाणे हे वय नमूद केले आहे.) त्याच्या आईने अगदी भक्तीभावाने अत्यंत काळजी घेतल्यामुळेच केवळ ते जगलेले दिसत होते.

कुंकीवरून (कुंकी—नवीन रानटीहत्ती पकडण्यासाठी वापरण्यात येणारा शिकविलेला हत्ती) रानटीहत्तींवर दोर फेकून त्यांना पकडणाऱ्या धंदेवाईकांनी इतर तीन पिलांना नीट दोर अडकवून त्यांना शिक्षण देण्याच्या तंबूकडे नेले. तेथे त्यांची मोजमापे घेण्यात आली. त्या कुंपणांतून मादी हत्तिणीला व त्या बेडौल पिलाला सोडण्यात आले तेव्हा आपल्या इतर पिलांना सोडविण्याकरिता रागाने जाणाऱ्या त्या हत्तिणीच्या पायाखाली कोलमडून पडता पडता मी थोडक्यात बचावलो.

पार्वतीच्या मोजमापांच्या नोंदीवरून त्या इतर तीन पिलांचे वय अंदाजे सांगता येईल ते असे : १ वर्ष (४ फूट १ इंच उंचीचे), ३ वर्षे (५ फूट उंची) व ७ वर्षे (सहा फूट २ इंच उंची).

यावरून असे दिसून येते की नैसर्गिक अवस्थेत दोन पिलांच्या जन्मामध्ये केवळ दोन वर्षांचेही अंतर असू शकते. यावरून त्यांची संख्या किती भरपूर होऊ शकते ते पहा: एक हत्तीण तिच्या सबंध आयुष्यांत म्हणजे साधारण सत्तर वर्षात वीसएक पिलांना सहज जन्म देऊ शकते. कदाचित् त्याहूनही जास्त पिले तिला होण्याचा संभव आहे.

योगायोगाने सांगावयाचे असे की ह्या वेळेला पकडलेल्या पिलांतील सर्वात छोटे पिलू त्या हत्ती पकडणाऱ्या कंपनीने मला देऊ केले. त्याची किंमत चालू भावाप्रमाणे १५०० रु. (११२ पौंड १० शिलींग)

इतकी सांगितली. १९४९ मध्ये मी असेच एक छोटे पिलू (मादी) विकत घेऊन लंडनच्या प्राणिसंग्रहालयासाठी विमानाने पाठविले होते हे त्यांना माहित होते. तेथे त्याला 'जम्बो' म्हणजे 'उडणारा हत्ती' असे नांव देण्यात आले होते कारण तो असा विमानातून पाठविण्यात आलेला पहिलाच हत्ती होता.

त्यावेळेस कोणत्या प्राणिसंग्रहालयाला अशा छोट्या पिलाची आवश्यकता असल्याचे माझ्या ऐकिवात नव्हते त्यामुळे मी ती विनंती नाकारली. त्या दिवशी संध्याकाळी मी परत माझ्या बंगल्यावर परत आलो तेव्हा लंडन प्राणिसंग्रहालयाच्या डायरेक्टरांचे एक पत्र माझी वाट पाहात पडले होते. त्यात त्यांनी मला एक हत्तीचे पिलू (विशेषतः मादी) मिळवून देण्याची विनंती केली होती. माझ्या आश्चर्याला पारावार उरला नाही. मधल्या काळात रीतसर ते छोटे पिलू विमानातून लंडन प्राणिसंग्रहालयाकडे रवाना करण्यात आले आणि मी १९६३ मध्ये जेव्हा माझ्या घरी लंडनला गेलो तेव्हाही ते तेथे होते. तिचे नाव लक्ष्मी होते. (छायाचित्र क्र. ६२)

आज काझीरंगा जसे दिसत आहे ते श्री. पी. डी. स्ट्रासी ह्यांच्या श्रमाचे फळ आहे. नाही तर ते तसे दिसले नसते. ते अविरत मेहनत घेत. १९४७ मध्ये आसाम वनविभागाच्या प्रमुख वनाधिकाऱ्याकडून (हा अधिकारी इंग्रज होता) त्याची सूत्रे त्यांच्या हातात आली. खरे तर सर्व भारतात वन्यप्राणी जीवनांत स्ट्रासींपेक्षा अधिक रस घेणारा असा प्रमुख वनाधिकारी माझ्या अजून तरी पाहण्यात नाही. १९५४ ते ६० च्या दरम्यान ते डेहराडूनच्या वनशिक्षण विभागाचे डायरेक्टर होते आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे त्यांना वनविभागाच्या कॉलेजमध्ये वन्यप्राणी आणि त्यांची व्यवस्था पाहाणे हा भाग घालता आला. "वाईल्ड लाईफ प्रिझर्व्हेशन सोसायटी ऑफ इंडिया" ची स्थापना त्यांनीच केली.

१९४० च्या सुमाराला ह्या अभयारण्याची व्यवस्था पाहाण्यासाठी चांगला विभागीय अधिकारी मिळणे फार कठीण होऊन बसले. कारण वनविभागाचे नेहमीचे काम सांभाळून वन्यप्राणी जीवनात रस घेणारा अधिकारी विरळाच आणि क्वचितच् दिसून येतो. १९४९ च्या सुमाराला काझीरंगा येथील विभागीय अधिकाऱ्यांशी माझे झालेले संभाषण मला आठवते.

"ह्या दिवसांत काझीरंगा अभयारण्यांत काही चोरट्या शिकारी चालतात का?" मी विचारले.

"चोरट्या शिकारी"? त्या कशा बरे होतील? हे अभयारण्य आहे आणि माझे सहकारी जागोजागी पहारा करीत आहेत." तो मोठ्या मिजाशीने म्हणाला.

मला जेव्हा अशा प्रकारचे उत्तर मिळते तेव्हा मी खरे काय ते समजतो. खरे पाहता त्याचे उत्तर असे काहीसे असते की, "हो, काही चोरट्या शिकारी अभयारण्यांत अन् बाहेरही होतातच परंतु मी आणि माझे सहकारी त्या कशा थांबवता येतील याचे जास्तीत जास्त प्रयत्न करीत आहोत" तर ठीक होते. आमचे वरील संभाषण घडल्यानंतर काही आठवड्यांतच अभयारण्यांत विनापरवाना प्राणी मारले जातात व मासेमारी देखील जाळी लावून केली जाते अशा धोक्याचा इशारा देणाऱ्या बातम्या फुटल्या व पसरत चालल्या. वनविभागाचे सर्वच नाही तरी पुष्कळसे कर्मचारी ह्यामध्ये गुंतले होते. एरव्ही दिवसा अभयारण्यांतून फेरफटका करावयास १५ रु. घेणारे हत्ती ह्या चोरट्या शिकाऱ्यांना रात्रीचे अभयारण्यांत नेण्यास ५० रु. घेताना पकडण्यांत आले होते.

एकेका कर्मचाऱ्याची चांगलीच धुलाई करण्यात आली आणि नवीन विभागीय अधिकारी आणण्यात आला. त्याचे नाव आर. सी. दास असे होते. हा गृहस्थ पूर्वी शाळामास्तर होता. नंतर त्याने वनखात्याची नोकरी स्वीकारली. हा गृहस्थ धिप्पाड व आनंदी वृत्तीचा होता. मुख्य म्हणजे वन्यजीवनांत त्यांना फारच रस होता. स्ट्रासी मुख्य सूत्रधार, त्यांच्याखाली हा गृहस्थ आणि तरुण व धडाडी वृत्तीचा जिल्हा वनाधिकारी याच्या हाताखाली मग नकाशावर काझीरंगा एक अतिशय चांगली व्यवस्था असलेले अभयारण्य झळकू लागले.

मी ज्या चहाच्या मळ्यावर राहून काम करीत असे तो मळा काझीरंगापासून पन्नास एक मैलांवर होता आणि मी माझे रविवार व सुट्टीचे इतर दिवस काझीरंगा अभयारण्यामध्ये घालवीत असे. वन्यजीवनाचे संरक्षण करताना घडणाऱ्या घडामोडी आणि त्यात येणारी संकटे याच्यावर दास आणि मी नेहमी चर्चा करीत असू तसेच चोरट्या शिकाऱ्यांना दूर ठेवून तेथील रहिवाश्यांबरोबर चांगले संबंध कसे ठेवता येतील यावरही बोलत असू. तसेच काही तातडीच्या प्रश्नांचे किंवा निसर्गाबद्दल काही शंका असल्यास त्यांचे निरसन करून घेण्यासाठी व माझ्या सल्ल्यासाठी दास नेहमी माझेकडे येत असत.

चोरट्या शिकारींमुळे स्वाम्प जातीच्या हरणांची (दलदल हरिणांची) जात जवळजवळ निपटून काढली जात होती आणि 'हॉग डिअर' देखील अगदी कमी झाले होते; दास काझीरंगा येथे असतानाच ते पुन्हा संख्येने वाढू लागले होते. त्यांनी गेंड्यांच्या चोरट्या शिकारी तर जवळजवळ पूर्णपणे थांबविल्या आणि दरवर्षी जगाच्या सर्व भागांतून येणाऱ्या पर्यटकांची संख्या खूपच वाढू लागली.

दास यांच्या चांगल्या कामगिरीमुळे त्यांना बढती देण्यात आली व त्यांची दुसरीकडे नेमणूक झाली. दोन वर्षांपूर्वी १९६२ मध्ये (मूळ पुस्तक १९६४ मध्ये प्रकाशित झाले होते.) काही गंभीर आजारामुळे त्यांचे अकाली निधन झाले. त्यामुळे आसाम वन खात्याचे फारच नुकसान झाले. आता जो कोणी अधिकारी काझीरंगा येथे असेल त्याला दास यांच्यासारखेच किंवा त्याहूनही अधिक चांगले कार्य करता येण्याची, तसेच हे अभयारण्य भारतांतील सर्वांत चांगली व्यवस्था असलेले राष्ट्रीय उद्यान कसे होऊ शकते हे दाखविण्याची चांगलीच संधी आहे.

खरे पाहता भारतात वन्यप्राण्यांचे जतन करण्याचे काम वनविभागाकडेच सोपविण्यात आले आहे आणि इथे वन्यप्राण्यांचे वेगळे खाते नाही हे फारच चमत्कारिक वाटेल. परंतु १९५२ मध्ये जेव्हा हा प्रश्न उद्‌भवला तेव्हा सर्व वेगवेगळ्या राज्यांनी हे काम वनविभागाकडेच सोपविले. कारण ह्या देशांतील वन्यप्राणी व जवळजवळ सर्वच अभयारण्ये ही जंगलात व वनविभागाचा हक्क असलेल्या जमिनींतच मोडतात. त्यामुळे वन्यप्राण्यांच्या रक्षणाकरिता आणखी वेगळे खाते निर्माण केल्यास उगाचच त्याच त्याच कामांकरिता दोन दोन वेगळी खाती व लोक नेमावे लागले असते आणि असे अनुभवी योग्य व शिकलेले लोक दुसऱ्या कामाकरिता मिळणे कठीणच.

तेव्हा भारतात वनविभागाचे काही अधिकारी व त्यांच्या हाताखालील कर्मचारी यांच्यावर जंगले तसेच वन्यप्राणी यांचे जतन करण्याचे काम सोपविण्यांत आले आहे. याकरिता वनखात्यात वेगळा 'वन्यप्राणी विभाग' व काही वेगळे खास अधिकारी मुख्य वनपालांच्या हाताखाली काम पाहातात.

अनुक्रमणिका

भारतांतील वन्यप्राण्यांचे तसेच ते दिसून येणाऱ्या भागांचे कोणतेही वर्णन वाचून वनखात्याच्या लोकांचे काम असावे तितके चांगले नसल्याचे वाचकांच्या नक्कीच लक्षात आले असेल. म्हणून येथे मला काझीरंगामधील आर. सी. दास आणि वनखात्यांतील इतर काही अधिकारी व कर्मचारी, ज्यांनी आपले आयुष्य वन्यप्राण्यांचे जतन करण्याच्या कामी वाहिले, त्यांचे कौतुक करण्याची संधी मिळाली आहे ती मी घेतलीच पाहिजे. खरे तर हे काम करताना त्यांना कितीतरी संकटे येतात—अगदी भयंकर अशा चोरट्या शिकाऱ्यांपासून जिवाला धोका असतो. बंदूकप्रिय शिकारी, बंदुकीचा चाप ओढवयाला केव्हाही तयार असतात व सर्वसाधारण लोकांना ह्या संबंधात विशेष माहिती नसते. मी अगदी गव्हर्नर आणि मंत्री यांच्यासारख्या लोकांबरोबरही काझीरंगामध्ये बऱ्याच वेळा गेलो आहे. मी ह्या अभयारण्याची आणि तेथील वन्यप्राण्यांची ओळख एका अगदी मजेशीर पर्यटकाला करून दिली होती. त्यांचे नाव डॉ. एस. एल. व्होरा असे होते. १९५४ मध्ये ते झूऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडियाचे डायरेक्टर होते. डॉ. व्होरा ह्यांनी जरी माशांचा अभ्यास करून इंडियन म्युझियममध्ये काम केले होते तरी त्यांना वन्यप्राण्यांचे रक्षण व्हावे असे मनापासून वाटे आणि त्याकरिता ते हिरीरीने सल्ला देत. ते IBWL चे पहिले चिटणीस होते. १९५५ मध्ये त्यांच्या निधनाने भारताचे वन्यप्राणी त्यांच्या एका चांगल्या रक्षणकर्त्याला मुकले.

केव्हा केव्हा वन्यप्राण्यांची माहिती छापणाऱ्या स्टेट्स्मन सारख्या दैनिकांत वाचकांची पत्रे या सदरासाठी आम्ही दोघे—ते त्यांच्या शास्त्रीय ज्ञानाने आणि मी माझ्या जंगलातील अनुभवाने—एकत्रपणे व्यवस्थित उत्तरे देत असू. आता ते माझ्याबरोबर काझीरंगामध्ये हत्तीवर बहुधा प्रथमच बसून भटकत असता आम्ही दोघेजण गेंड्यांची शिरगणती कशी करता येईल व त्याकरिता कोणती पद्धत अवलंबिता येईल, अभयारण्यांत मधून मधून काही भागांतून आडवे तिडवे जाऊन तपासणी करता येईल का,त्याची चर्चा करीत होतो.

अशी मोजणी करण्याची काही समाधानकारक पद्धती आम्ही शोधून काढू शकलो नाही. कारण तेथे अधून अधून अति दाट व उंच उंच वाढणाऱ्या गवताचे भाग आहेत. मी पूर्वी एका छोट्या हलक्या विमानातून चार वेळा सर्व काझीरंगावरून फिरलेलो होतो. विमानांतूनही हे प्राणी मोजण्याचा प्रयत्न करणे तितकेच कठीण आहे. १६६ चौ. मैलांच्या अभयारण्यांतील वेगवेगळ्या भागातील गेंड्यांची साधारण संख्या किती आहे हे तेथे सरावाने माहीत झाल्यानंतर साधारण अंदाजे त्यांची संख्या सांगता येईल. माझ्या अंदाजाप्रमाणे काझीरंगामध्ये २७५ गेंडे असावेत. ह्यात नरमादी संख्येने साधारण अर्धे अर्धे असावेत.

सर्व पर्यटकांमध्ये काझीरंगा पाहांयला येणारा एक पर्यटक माझ्या फारच लक्षात राहिला आहे. तो ऑक्टोबरमधला एक दिवस होता. वर्षाच्या ह्या सुमारास पाऊस संपत आलेला असतो; आणि निरभ्र आकाश आता लवकरच थंड हवेची सुरुवात होणार असल्याची चाहूल आणू लागते. आपण त्याची अधीरतेने वाट पाहू लागतो. सर्व वर्षभरांत ह्या सुरुवातीच्या निरभ्र दिवसांतच आपण अगदी दूरपर्यंत स्वच्छ पाहू शकतो. ११० मैलांवरील पूर्व हिमालयाच्या भव्य से—ला पर्वतरांगाचे देखील दर्शन ह्या दिवसांत घडू शकते. वर्षातील केवळ २०/२५ दिवसच ही हिमाच्छादित शिखरे व्यवस्थित दिसू शकतात.

ह्या महत्त्वाच्या पर्यटकाचे स्वागत करण्यासाठी अगदी जय्यत तयारी चालू होती. परंतु माझ्या मनात जास्त धाकधूक होती ती ..... ते जेंव्हा येथे भेट देतील तेंव्हा हवामान कसे काय असेल? कारण हे तीन आठवडे तर वातावरण जवळजवळ ढगाळ असून पावसाची रिपरिप चालूच होती ........

अनुक्रमणिका

हा पर्यटक येथे येण्याची वेळ झाली तसे आम्ही सर्वजण त्यांचे स्वागत करण्यासाठी सज्ज झालो. आसाम सरकारचे कित्येक मंत्री, वनखात्याचे वरिष्ठ अधिकारी, आसाम सरकारचे सरकारी अधिकारी, पोलीस दलाचे सलामीचे पथक आणि इतर जवळजवळ ५०० लोक तेथे जमले होते.

ह्या सर्व मिरवणुकीच्या तांड्यातील पहिल्या गाड्या पर्यटकांसाठी असणाऱ्या विश्रांतिगृहाकडे येऊन थडकल्या आणि भारताच्या ह्या निःसंशय लाडक्या व स्वातंत्र्य मिळाल्यापासून अजूनही प्रधानमंत्रीपदावर असणाऱ्या पुढाऱ्याचे मला प्रथमच दर्शन घडले.


ह्या समारंभाचे मला निमंत्रण मिळाले होते म्हणून मी फारच आनंदित होतो. कारण मला माहीत होते की पंडित जवाहरलाल नेहरूंना स्वतःला वन्यप्राणी, पक्षी ह्यांची खूपच आवड होती. भारतातील प्राणीजीवन सध्या कशा परिस्थितीत होते हे त्यांना जाणवून देण्याची मला संधी मिळणार होती. ते आणि त्यांची कन्या इंदिरा गांधी यांच्याबरोबर मला चहाचे निमंत्रण होते. जनरल थिमैय्या आणि फिरोज गांधी देखील ह्या चहापार्टीत होते. आम्ही हे अभयारण्य व तेथील प्राणी ह्यांच्या संबंधात गप्पा मारल्या.


परंतु हवामानाचे काय? मी जेव्हा रात्री माझ्या तंबूकडे परतलो तेव्हाही वातावरण ढगाळच होते. पहाट होण्यापूर्वीच कोणीतरी माझ्यासाठी चहाचा कप आणला आणि तो पिण्यापूर्वी मी बाहेर पाहिले. अगदी निरभ्र आणि स्वच्छ आकाशात तारे हळूहळू लुप्त होत होते.

आम्ही हत्तीच्या पाठीवरून गेंडे व इतर वन्यप्राणी पाहण्यासाठी अभयारण्यांतून फेरफेटका करावयाला निघालो असताना (छायाचित्र क्र. ६३) अत्यंत सुंदर अशा पहाटेच्या सूर्योदयाने आमचे स्वागत केले. तो सूर्योदय माझ्या चिरंतन स्मरणात राहील. तो सूर्योदय काही ठराविक एका दिशेतून आल्यासारखा वाटत नव्हता. आम्ही दक्षिणेकडे किंवा पूर्वेकडे कोठेही सूर्यकिरणांच्या दिशेने पाहात नव्हतो. रमणीय अशा जंगलांनी भरलेल्या मिखीर टेकड्यांच्या मागून सूर्य वर येत होता. उत्तरेकडे आम्ही नजर टाकली तर 'कांग्टो'ची (तिबेटमध्ये ह्या शब्दाचा अर्थच मुळी हिमाचा ढिगारा असा आहे.) २३२२५ फूट उंचीची, "चुमो'ची (म्हणजे आदरणीय प्रौढा) २२७०७ फूट उंचीची आणि 'नेयगी कानसंग'ची (आनंदमयी बर्फाळ प्रदेश) २३१२० फूट उंचीची हिमाच्छादित शिखरे नजरेस पडत होती. ती प्रथम लालभडक होती. परंतु नंतर ती क्रमाक्रमाने मोत्यासारखी गुलाबी, पिवळीधम्मक व शेवटी पांढरी होऊन गेली.




५७. काझीरंगातून अकबर त्याच्या आईच्या मागे जात आहे. वर आसामचे गव्हर्नर बसले आहेत.






५८अ. वनविभागाची हत्तीण देवकाली तिच्या नव्या पिलासमवेत. पार्वाती ६ फेब्रुवारी १९५० ला जन्मली.
५८ब. काही दिवसानंतर पिलाला फिरावयाला नेताना.

अनुक्रमणिका




५९. लेखक पार्वतीची मोजमापे-दोन्ही पायांचे घेर, खांद्यापर्यंतची उंची-नियमितपणे घेत असे.

अनुक्रमणिका




६०/६१. हा रानटी कळप खड्ड्यात पकडला होता. त्यामध्ये मादीबरोबर ४ पिले होती. - सर्वच माद्या.

अनुक्रमणिका




६२. १९६० मध्ये लक्ष्मी अन् तिची आई लंडनच्या प्राणीसंग्रहालयात - लक्ष्मी तेंव्हा १० वर्षाची होती.

अनुक्रमणिका



६३. काझीरंगाच्या अभयारण्याला भेट देताना पं. जवाहरलाल नेहरु.

अनुक्रमणिका



**६४. नेहरुंच्या भेटीच्या दिवशीचा सुर्योदय फारच सुंदर होता. तेव्हा तेथून ११० मैलांवरील हिमालयाचा पूर्व भागही स्पष्ट दिसत होता.**

जगांतील सर्वात जास्त कार्यमग्न अशा त्या प्रधानमंत्र्यांची एक वैशिष्ठ्यपूर्ण गोष्ट दिसून आली. त्यांच्याभोवती असलेल्या सर्व मंत्री व अधिकाऱ्यांच्या गराड्यातून निसटून ते माझ्याकडे मी त्यांना वन्यप्राणी दाखविले म्हणून आभार मानण्याकरिता आले. मी सर्व गर्दीच्या एकदम पाठी एका कडेला होतो.

अनुक्रमणिका

ते म्हणाले, “ह्या दरीतील समशातोष्ण हवामानांतील वनस्पती व हिमालयांतील बर्फाच्छादित पर्वत किंवा अल्पाईन पर्वतरांगा यांच्या एकमेव मिलाफाबद्दल मला फारच आश्चर्य वाटते.” थोडा वेळ अशाच गप्पा मारून हस्तांदोलन केल्यावर ते पुन्हा मंत्री व इतरांच्यात जाऊन मिसळले. त्यांची कन्या देखील कित्येक जणांनी तिला घातलेल्या गराड्यांतून वाट काढीत माझा निरोप घेण्यासाठी मजजवळ आली.

मी पं. नेहरूंना पुन्हा एकदा दिल्लीत भेटलो. आम्हा निसर्गप्रेमी संरक्षकांच्या जमावाला उद्देशून ते म्हणालेले मला चांगले आठवतेय की, “सर्वात जास्त जरुरी कशाची असेल तर ती मुलांकरिता भारतीय वन्यप्राण्यांवरील रंगीबेरंगी चित्रे असलेली पुस्तके” यांची. हे अगदी खरे आहे. कारण भारतात अशी पुस्तके जवळजवळ नाहीतच. पाश्चिमात्य देशांत मात्र ही अशी पुस्तके सर्व दुकानांतून सहज उपलब्ध असतात.

त्यांना वन्यप्राणी फारच आवडतात आणि भारतात आता उरलेल्या वन्यजीवनाला टिकवून ठेवण्यासाठी त्यांच्या राहण्याच्या नैसर्गिक जागांना रक्षण दिले पाहिजे याची त्यांना चांगलीच जाणीव आहे. मी पूर्वी भारत सरकारकरिता “वन्यप्राण्यांचे जतन का केले पाहिजे” ही एक छोटी पुस्तिका लिहिली होती त्याची प्रस्तावना पं. नेहरूंनीच लिहिली होती.

त्यामध्ये ते म्हणतात ....... “भारतासारखे इतर कुठच्याही देशांत वन्यप्राण्यांचे रक्षण करण्याबाबत पुस्तकांतून लिहिले गेले नसेल आणि कितीही क्षुद्र किंवा कितीही नाशकारक प्राणी असला तरी त्याचा नाश करावयाला माणसे धजणार नाहीत. परंतु प्रत्यक्षात आपण प्राणीजगाकडे अजिबात लक्ष देत नाही. आपल्या येथे कितीशा लोकांना काही वनपक्ष्यांची नावे तरी माहीत असतील? पक्षी व प्राण्यांच्या जीवनावरची पुस्तके आपल्या येथे किती दुर्मिळ आहेत. जर हे सुंदर आणि भव्य असे वन्यपशूपक्षी नसले तर आयुष्य रूक्ष आणि नीरस होईल. आपली जंगले आपल्याला कितीतरी दृष्टिकोनांतून अगदी जरुरीची आहेत. आपण त्यांचे जतन केले पाहिजे. आतापर्यंत तर त्यांचा पुष्कळसा नाश झालेलाच आहे. लोकसंख्या वाढते तशी अधिक धान्य पिकविण्याची जरूर भासते हे तर खरेच आहे; परंतु हे आपण शेतीपद्धती सुधारून केले पाहिजे. त्याकरिता जंगलांचा विध्वंस करून नव्हे. कारण जंगले ही राष्ट्राच्या संपत्तीत मोलाची भर टाकतात. ह्या पुस्तिकेचे मी स्वागत करतो आणि ही पुस्तिका लोकांना वन्यजीवनावर जास्त सहेतुक व दयार्द्रतेने खोलवर विचार करावयाला लावील अशी आशा करतो.”

काझीरंगामधील त्या रम्य सूर्योदयाच्या दिवशी मला भारतातील वन्यप्राणीजतनासंबंधीच्या जुन्या इतिहासाकडे वळून पाहिल्याशिवाय आणि भविष्यकाळ थोडा उज्ज्वल असावा असे वाटल्याशिवाय राहावले नाही.

भारताच्या जुन्या इतिहासात व संस्कृतीमध्ये निसर्गाचे जतन करण्याचे आवाहन पिढ्यान्‌पिढ्या केलेले आहे. ख्रिस्तपूर्व ३०० वर्षापूर्वीच्या काळात लिहिल्या गेलेल्या कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत कलेसंबंधाने सविस्तर लिहिले आहे. त्यामध्ये “शिकारीसाठी सर्वांना खुल्या असलेल्या” काही ठराविक जंगलांना नीट संरक्षण दिलेले होते.

ह्या सुरक्षित जंगलांमध्ये कडक पहारा असे आणि वन्यपशू–पक्षी व माशांच्या काही जाती पूर्ण संरक्षित होत्या. यांतील काही प्राणी जर भयानक उपद्रवी झाले तर ते अभयारण्याच्या बाहेर पकडून मारले जात त्यामुळे दुसऱ्या कोणाला त्यांचा उपद्रव पोहचत नसे. लाकूडतोड, कोळसा जाळणे, गवत, सरपण,

पालापाचोळा जमविणे, बांबू, वेत कापून नेणे, केसाळ कातडी, प्राण्यांचे दात व हाडे जमविणे यासारख्या सर्व गोष्टींना बंदी होती. अशा जंगलांना 'अभयारण्य' असे म्हणत. हल्लीच्या काळांतील 'राष्ट्रीय उद्याने' असे त्यांना म्हणावयास हरकत नाही.

ख्रिस्तपूर्व २४२ वर्षाच्या काळात सम्राट अशोकाच्या पाचव्या स्तंभांवरील एका आज्ञेने मासे, प्राणी व जंगले यांना संरक्षण मिळाले होते.

बऱ्याच काळानंतर इंग्रजांच्या राजवटीत कित्येक प्रदेशांतून छोट्या मोठ्या वन्यपशूंचे जतन करण्यासाठी व त्यांना रक्षण देण्यासाठी अनेक प्रयत्न केले गेले. हीच उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून तेव्हाच्या राजघराण्यांनी वन्यपशूपक्ष्यांना किंबहुना जास्तच संरक्षण दिले.

परंतु १९४७ मध्ये स्वातंत्र्याची पहाट होताच येथील सर्वसाधारण लोकांनी मात्र ह्या चांगल्या कार्याची उलटापालट केली. त्यांना वाटले की आता ही सर्व मालमत्ता आपलीच आहे आणि विचार न करता ते वाटेल त्या जंगलांत जाऊन दिसेल त्या प्राण्याची वाटेल तशी हत्या करू लागले. पूर्वीच्या जयपूर संस्थानात एकदा एक ट्रक भरून शिकारी जाऊन त्यांनी ७०/८० सांबरांची हत्या एका रात्रीत कशी केली याची गोष्ट मला सांगण्यात आलेली आहे. त्यांपैकी एकच पाडस खाण्याकरिता घरी आणले गेले.

स्वातंत्र्य मिळाल्यावर ५ वर्षानंतर भारत सरकारला वन्यप्राण्यांचे जतन करण्यासाठी थोडा वेळ काढता आला. १९५२ मध्ये इंडियन बोर्ड फॉर वाइल्ड लाईफ [IBWL] ची स्थापना करण्यात आली.

भारताच्या घटनेप्रमाणे वन्यप्राणी हा प्रत्येक राज्याचा वेगळा प्रश्न आहे. केंद्राचा नाही. केंद्रसरकार आणि त्यांचे सल्लागार IBWL फक्त कायदा अंमलात आणण्यासाठी उत्तेजनपर काही शिफारशी करतील. वन्यप्राण्यांचे जतन करण्यासाठी कायदा व नियम बनविणे आणि ते जारी करून अंमलात आणण्याचे काम राज्यसरकारचे.

अशा प्रकारच्या रचनेमध्ये काही दोष राहतात. कारण काही राज्ये अशा कामात विशेष उत्साहाने भाग घेत नाहीत. त्या त्या वनमंत्र्यांचा व मुख्य वनपालकांचा ह्या कामी जसा दृष्टिकोन असेल व ते किती हिरीरीने काम करतील यांवर ते अवलंबून असते. राज्यांमधील वाइल्ड लाईफ बोर्डाकडे देखील फारसे हक्क नसतात; आणि जेव्हा त्यांच्याकडे विचारणा केली जाते तेव्हा ते फक्त सल्लाच देऊ शकतात. त्यामुळे भारतांतील वन्यप्राण्यांचे जतन व रक्षण व्हावे असे मनापासून वाटणारे सालीम अली, धर्मकुमारसिंहजी, कृष्णन् आणि माझ्यासकट इतर काही, यांच्यासारखे जे काही थोडे उत्साही लोक आहेत, ते नेहमी वर्तमानपत्रांत किंवा इतर लेखन करून लोकांचा या कामी सबळ पाठिंबा गोळा करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

ही रचना अशा प्रकारची असल्यामुळे काही राज्यांमधील चांगली अभयारण्ये त्यांनी आणखी चांगली करून त्यांना राष्ट्रीय उद्यानांचा दर्जा मिळवून दिला आहे. तर इतर काही राज्यातील खरोखरची चांगली अभयारण्ये अजूनही तशीच राहिली आहेत. त्यांना राष्ट्रीय उद्यानांचा दर्जा मिळालेला नाही. केंद्रातील IBWL ने आता ठरविले आहे की जी अभयारण्ये खरोखरीच चांगली आहेत आणि देशाच्या तसेच जगाच्या इतर भागांच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत फक्त तीच राष्ट्रीय उद्याने म्हणून जाहीर करावीत.

अनुक्रमणिका

१९५२ पासून केंद्राने तसेच राज्यांनीही आपले नाहीसे होत चाललेले वन्यजीवन जतन करण्याचा प्रयत्न चालू केला आहे. परंतु सतत होणारी धोकादायक लोकसंख्यावाढ पाहता हे प्रयत्न पुरेसे नाहीत. लोकसंख्यावाढ वन्यप्राणीजीवनाला फारच धोकादायक आहे कारण त्यामुळे अन्नधान्य जास्त पिकविण्यासाठी अधिकाधिक जंगलतोड होते तसेच गुरेचराईकरिताही जंगलांचा भाग व्यापला जातो. येथे १२·७ लक्ष चौरस मैलांत, ज्यांमध्ये काही वाळवंटी भाग तसेच हिमालयाचे उंचावरील भाग, आग्नेयेकडील पावसाळी दाट जंगले, इ. येतात, अशा या देशात, [हे पुस्तक तयार होऊन वाचकांच्या हातात पडेपर्यंत लोकसंख्या ४४ कोटीच्या वर गेली असण्याची शक्यता आहे. – मूळ पुस्तक ६४ मध्ये प्रसिध्द झाले आता भारताची संख्या ८० कोटीच्या जवळपास आहे.] ४४ कोटी लोक राहतात—त्यामधील बहुसंख्य लोक अशिक्षित व अत्यंत गरीब, अर्धपोटी राहणारे आहेत. त्यामुळे आफ्रिका, युरोप किंवा अमेरिका यांसारख्या राष्ट्रांपेक्षा भारतातील वन्यजीवनाचे रक्षण करण्यामागचे प्रश्न अगदीच वेगळे आहेत. इतर देशांत 'शिकारी' हे एक मोठे संकट असते. भारतात जे खरोखरचे परवानाधारक शिकारी आहेत त्यांनी वन्यजीवनावरील माहितीत फारच मोलाची भर घातलेली आहे आणि ओघाओघाने वन्यप्राणी रक्षणालाही मदत केली आहे. (ह्यामध्ये चोरटे शिकारी—जे पर्वा न करता प्राणी वाटेल तसे मांसाकरिता किंवा इतर कारणांसाठी मारतात त्यांचा समावेश नाही.)

मानवाच्या गरजा प्रथम लक्षात नक्कीच घेतल्या पाहिजेत. आताच्या नव्या भारतात मानवी जीवनाचा दर्जा उंचविण्यासाठी मोठमोठे कारखाने उभारले जात आहेत. परंतु मानवी गरजांकरिता जी प्रगती होत असते तीच केवळ सर्व काही आहे असे नाही तर निसर्गाच्या सौंदर्याचा आत्मिक आनंद देखील तितकाच महत्त्वाचा आहे आणि त्याचे रक्षण झालेच पाहिजे.

औद्योगीकरणाने अतिप्रगत झालेल्या देशांतील जास्तीत जास्त लोक आता वन्य व दूषित न झालेल्या नैसर्गिक विभागांकडे वळत आहेत त्यामुळे भारतातील वन्यजीवन व नयनरम्य नैसर्गिक देखावे पाहण्यासाठी जास्तीत जास्त पर्यटक भारतात येऊ लागतील. खरे पाहता भारतात आता पर्यटक खाते महत्त्वाचे होऊ लागले आहे आणि त्यामुळे देशाला चांगले उत्पन्न देखील मिळू लागले आहे.

ह्या जास्त लोकसंख्या असलेल्या देशात उ. अमेरिका आणि आफ्रिकेत असणाऱ्या मोठमोठ्या राष्ट्रीय उद्यानांसारखी उद्याने निर्माण करणे शक्य नाही; परंतु छोटी छोटी अभयारण्ये, तसेच राष्ट्रीय उद्याने यांची निगा राखली गेलीच पाहिजे व आणखीही नवीन तयार झाली पाहिजेत.

आता ज्या वेगाने जंगलतोड, गुरेचराई व वन्यप्राण्यांची कत्तल होत आहे ते पाहता मला निःसंशय वाटते की जेव्हा लोकांना खरोखरीच ह्या वन्यजीवनाचे जतन झाले पाहिजे असे वाटू लागेल. तेव्हा जतन करण्यासारखे काही उरलेले देखील नसेल. आतापासून केवळ छत्तीस वर्षांनी म्हणजे इ. स. २००० मध्ये झुऑलॉजीकल गार्डन्स सोडली तर अन्य कोठेही वन्यजीवन फारशा प्रमाणात राहिलेले दिसून येणार नाही.

साधारण पाहता प्रथम जातील ते मोठमोठे सस्तन प्राणी विशेषतः ज्यांचे मांस रुचकर लागते ते. छोटे सस्तन प्राणी व पक्षी ज्यांना उडून जाऊन आपला जीव वाचविता येतो ते नंतर हळूहळू नष्ट होतील.

अनुक्रमणिका

कल्पनाच करा इ. स. २००० मध्ये फक्त कोल्हे, उंदीर, चिचुंदऱ्या, गिधाडे, घारी, कावळे व चिमण्या यांच्यासारखे दाट मनुष्यवस्तीच्याही आसपास वावरू शकणारे पशूपक्षीच फक्त दिसू शकतील! हेच फक्त येथील वन्यजीवन राहील?

भारतांतील भावी पिढी काझीरंगामधील गवतातून व फुललेल्या पाणकणासांतून आनंदाने चरत जाणाऱ्या गेंड्याच्या पाठीवर सुंदरसा हिमासारखा पांढरा शुभ्र गायबगळा अलगदपणे व मोठ्या डौलदारपणे उतरून विराजमान होत असतानाच्या सुंदर दृश्याला मुकेल! गीरमधील खुरट्या झाडांमध्ये जर भव्य सिंह, सिंहिणी अन् छावे आपल्या आयुष्याचा आनंदाचा क्षण वाढवायला नसते तर गीरचं जंगल कसं वाटलं असतं? बंदिपूर तेथील भव्य गव्यांशिवाय, पेरीयार तेथील राजस हत्तींशिवाय अन् कान्हा डौलदार स्वाम्प जातीच्या (दलदल) हरीणांशिवाय कसे वाटेल? .... छे, कल्पनाच करवत नाही. अन् भरतपूर ... तेथल्या पाणथळीवर जमलेल्या विणीच्या हंगामातील पक्ष्यांशिवाय .......?

नजरेत भरणारा वाघ, दिमाखदार मोर अन् जंगलात व गवताळ कुरणांत दिसून येणारे इतर सुंदरसे पशुपक्षी जर अस्तित्वात येण्याचे थांबले तर आयुष्य किती रूक्ष बनेल?

जर उशीर होण्यापूर्वीच ह्या वन्यपशुपक्ष्यांच्या रक्षणाचे प्रयत्न झाले नाहीत तर असे घडावयास फारसा वेळ लागणार नाही. अर्थात हा काही फक्त भारताचाच प्रश्न आहे असे नाही तर सर्व जगाचाच आहे. ह्याकरिता पाश्चिमात्य देशांत वर्ल्ड वाईल्ड लाईफ फंड ह्यासारख्या संस्था सुरू झाल्या आहेत. भावी पिढीकरिता वन्यप्राण्यांचे जतन करून नैसर्गिक जागा उपलब्ध व्हावी म्हणून जगाच्या अनेक भागांतून विचारपूर्वक आखणी सुरू झाली आहे.

मी भावीकाळाबद्दल इतका निराशावादी नाही. जरी पुष्कळसे व्हावयाचे असले तरी बरेचसे प्रयत्न चालू आहेत.

ख्रिस्तपूर्व ३०० ते २४२ मध्ये जसे निसर्गरक्षणाला महत्त्व दिले गेले होते तसे जर आजही भारतात ह्या गोष्टीला महत्त्व दिले गेले तर निसर्गसंरक्षण ही आद्यकाळाची निकडीची गरज मानली जाईल. सुंदरसा निसर्ग अन् वन्यप्राण्यांचे रक्षण करणाऱ्या संस्था देशांत असणे म्हणजे देशाच्या प्रगतीचे अन् भरभराटीचे लक्षण आहे. येथील नेते, पुढारी व सर्वच रहिवासी यांना त्यांचे वन्यजीवनाचे रक्षण करण्याचे आजचे कर्तव्य करण्याची चांगली संधी आहे आणि त्यामुळे देशाची जंगलातील पशुपक्षी संपत्ती उद्याकरिता टिकविली जाईल.

अनुक्रमणिका

**भारतातील काही महत्वाची अभयारण्ये**

| | वर्षभरात भेटीसाठी उत्तम काळ | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जाने | फेब्रु | मार्च | एप्रील | मे | जून | जुलै | ऑग | सप्टें | ऑक्टो | नोव्हें | डिसें |
| बंदीपूर | ४ | ४ | ४ | ५ | ५ | ४ | ३ | ३ | ३ | ३ | ४ | ४ |
| मुदुमलई | ४ | ५ | ५ | ५ | ५ | ३ | २ | २ | २ | ३ | ४ | ४ |
| पेरीयार | ५ | ५ | ५ | ४ | ४ | ३ | २ | २ | २ | २ | ३ | ४ |
| वेडनथांगल | ५ | ४ | ३ | २ | १ | ० | ० | १ | २ | ३ | ४ | ५ |
| रंगन्थीटू | २ | २ | २ | २ | २ | ४ | ५ | ५ | ३ | २ | २ | २ |
| भरतपूर | २ | २ | १ | १ | १ | १ | ४ | ५ | ५ | ५ | २ | २ |
| कान्हा | ३ | ४ | ४ | ५ | ५ | ४ | १ | ० | ० | ० | १ | ३ |
| शिवपुरी | ४ | ५ | ४ | ४ | ४ | ४ | ५ | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| गीरचे जंगल | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ३ | १ | १ | १ | २ | ३ | ४ |
| चंद्रप्रभा | ४ | ५ | ५ | ५ | ४ | ३ | ३ | २ | २ | ३ | ३ | ४ |
| कॉर्बेट | ३ | ४ | ५ | ५ | ४ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| दाचीगाम | १ | १ | ३ | ४ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ३ | १ |
| हजारीबाग | ४ | ५ | ५ | ५ | ५ | ३ | २ | २ | २ | २ | ३ | ४ |
| जलदापारा | ४ | ५ | ५ | ५ | ४ | २ | १ | १ | १ | २ | ३ | ४ |
| मनास | ५ | ५ | ५ | ३ | २ | १ | १ | १ | १ | ३ | ५ | ५ |
| काझीरंगा | ४ | ५ | ५ | ४ | ३ | २ | २ | २ | २ | ३ | ४ | ४ |

५ सर्वात उत्तम काळ
४ छान
३ ठीक, परंतु उत्तम नाही
२ क्वचित पाहू शकाल. परंतु शिफरसयुक्त नाही.
१ एखादे वेळेस पाहू शकाल, शिफारस नाही.
० शक्य नाही, अभयारण्य बंद असू शकेल.

अनुक्रमणिका

# भारतातील प्राणी–उद्याने

| | |
|---|---|
| आंध्र | झुऑलॉजिकल गार्डन्स, हैद्राबाद, आंध्र |
| आसाम | स्टेट झू, गौहती, आसाम |
| बंगाल | झुऑलॉजिकल गार्डन्स, अलिपूर, कलकत्ता, प. बंगाल |
| दिल्ली | दिल्ली झुऑलॉजिकल पार्क, नवी दिल्ली |
| गुजरात | झुऑलॉजिकल हिल गार्डन्स, अहमदाबाद, गुजरात सयाजीराव गार्डन झू, बडोदा, गुजरात झुऑलॉजीकल गार्डन जुनागढ, गुजरात |
| केरळ | झुऑलॉजीकल गार्डन, त्रिवेंद्रम, केरळ झुऑलॉजीकल गार्डन, त्रिचूर, केरळ |
| मध्य प्रदेश | किंग जॉर्ज झुऑलॉजीकल पार्क, लष्कर, ग्वाल्हेर, म. प्र. |
| तामीळनाडू | झुऑलॉजीकल गार्डन्स, मद्रास, तामीळनाडू |
| महाराष्ट्र | व्हिक्टोरिया गार्डन झू, मुंबई, महाराष्ट्र पेशवे पार्क झू, पुणें, महाराष्ट्र |
| कर्नाटक | श्री चामराजेन्द्र झुऑलॉजिकल गार्डन्स, म्हैसूर, कर्नाटक |
| राजस्थान | झुऑलॉजिकल गार्डन, जयपूर, राजस्थान<br>झुऑलॉजिकल गार्डन, जोधपूर, राजस्थान<br>झुऑलॉजिकल गार्डन, बिकानेर, राजस्थान<br>झुऑलॉजिकल गार्डन, उदयपूर, राजस्थान |
| उत्तर प्रदेश | झुऑलॉजिकल गार्डन, लखनौ, उ. प्र. |

अनुक्रमणिका

# संदर्भग्रंथ


| | | |
|---|---|---|
| डॉ. अली सालीम | - | दी बुक ऑफ इंडियन बर्ड्स् (सहावे प्रकाशन) (१९६१)<br>इंडियन हिल बर्ड्स (१९४९) |
| बर्ग, बेंग्ट | - | जंगले (१९३३)<br>टायगर उंद मेंश्य (१९३५) |
| ब्रँडय, ए. ए. ड्युनबार | - | वार्डल्ड ॲनिमल्स इन सेंट्रल इंडिया (१९२३) |
| चँम्पियन, एफ्. डब्लू | - | विथ ए कॅमेरा इन टायगरलँड (१९२७) |
| कॉर्बेट, जिम | - | मॅन ईटर्स ऑफ कुमाव (१९४४) |
| कॉफलर, यला | - | ॲनिमल्स इन इंडिया (१९५८) |
| प्रेटर, एस्. एच. | - | दी बुक ऑफ इंडियन ॲनिमल्स (१९४८) |
| शेबियट, इ. ओ. | - | सुंदर मुनी (१९५८) |
| स्टॉकले, सी. एच् | - | स्टॉकींग इन दी हिमालयज अँड नॉदर्न इंडिया (१९३६) |
| वैद्य, सुरेश | - | दी जंगल लाईज अहेड (१९५८) |
| इलार्मन, जे. आर. अँड मॉरासन–स्कॉट, टी.सी. एस् | - | चेकलिस्ट ऑफ पॅलिॲरटीक अँड इंडियन मॅमल्स (१८५१) |
| रिप्ली, एस्. डिलॉन | - | ए सिनॉप्सिस ऑफ दी बर्ड्स् ऑफ इंडिया अँड पाकिस्तान (१९६१) |


अनुक्रमणिका